४६


# शब्द रुची


एप्रिल २०२२ • मूल्य १० रुपये

पृष्ठे ९६

लता मंगेशकर विशेषांक

जग(णं) व्यापलेला आवाज...




PAGE No. 100
DATE I ♡ U
आज पुन्हा भर दुपारी,
बरसून गेल्या श्रावणसरी.
वहीत जपलेलं पिंपळपान,
पुन्हा थोडं हिरवं झालं.
आषाढ श्रावण आले गेले,
प्रेम करायचं राहून गेलं ♡
PNG
प्रस्तुत
तू तेव्हा तशी
Shining Partner
पितांबरी
शायनिंग पावडर
सोम-शनि
रात्री 8 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Presenting Sponsor: PNG
Shining Partner: पितांबरी शायनिंग पावडर
Streaming Partner: ZEE5

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

४६

**लता मंगेशकर विशेषांक**

**एप्रिल २०२२, वर्ष नववे**
**अंक बारावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अतिथी संपादक : **सुदेश भोसले**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ चित्र : **रघुवीर मुळगावकर**
चित्रसौजन्य : **संपादक श्री दीपलक्ष्मी – हेमंत रायकर**

कार्यालयीन संपर्क
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**
**साहाय्य – अर्चित नागवेकर**

SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi
GRANTHALI

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**



## संपादकीय

**सुदेश भोसले**

'भारतरत्न लता मंगेशकर यांना आदरांजली वाहणारा विशेषांक 'ग्रंथाली' प्रसिद्ध करणार आहे, त्यासाठी तुम्ही अतिथी संपादक व्हावं,' अशी विनंती मला 'ग्रंथाली'ने केली त्यावेळी मनात संमिश्र भावना निर्माण झाल्या. आमचे दैवत असलेल्या या गानसम्राज्ञी आज नाहीत, हे मानायला मन धजावत नाही. कारण आजही ज्याने दिवस उगवतो आणि मावळतो, ते अलौकिक स्वर अमर आहेत. त्यावर पुढेही अनेक पिढ्या समृद्ध होणार आहेत. आणि दुसरीकडे, या अंकातून त्यांच्या अखंड ऋणाला वंदन करता येणार आहे. त्यामुळे मी काही लेखक व साहित्यिक नसताना अंकासाठी केलेली 'ग्रंथाली'ची विनंती मी मान्य केली.

अंकामागची भूमिका 'ग्रंथाली'कडून कळली, की हा एक संग्राह्य अंक व्हावा. त्यात नव्या-जुन्या, जाणत्या-नवोदितांच्या लतादीदींबद्दलच्या भावना व्यक्त व्हाव्यात. या दृष्टीने या अंकात जे लेख समाविष्ट आहेत, त्यात विदुषी श्रुती सडोलीकर, संगीतकार आनंदजी आणि प्यारेलालजी, शशी व्यास, सुरेश वाडकर; दीदींनी ज्यांच्यासाठी पार्श्वगायन केले त्या अभिनेत्री शर्मिला टागोर, सायराबानू, वैजयंतीमाला; कलावंत वैभव मांगले, भरत दाभोळकर, सचिन पिळगावकर; दिलीप वेंगसरकर हे विख्यात क्रिकेटपटू यांचे लेख आहेत. तसेच, अंबरीश मिश्र, जयश्री देसाई, आनंद डबरे, मनोज आचार्य, विजय ढवळे इत्यादींचे लेख आपल्याला दीदींचे वेगवेगळे पैलू दाखवतात.

हे लेख जमवण्यात, आवश्यक तिथे शब्दांकन करण्यात पूजा सामंत. डॉ. लतिका भानुशाली, राधिका कुंटे, राजीव जोशी, अस्मिता पांडे, चंद्रकांत शिंदे आणि डॉ. समीरा गुजर यांची मोलाची साथ लाभली.

अंकाचे एक वैशिष्ट्य असे, की सुरेश लोटलीकर, मनोज आचार्य, विजयराज बोधनकर, वैभव मांगले, सतीश भावसार या चित्रकारांनी लताजींना आपल्या चित्रातून आदरांजली वाहिली आहे. अंकात अनेक मान्यवरांचे दीदींबद्दलचे उद्गार पानांच्या तळाला स्वतंत्र चौकटीत घेऊन अंक अधिक माहितीपूर्ण करायचा प्रयत्न केला आहे.

लता मंगेशकर या व्यक्तिमत्त्वाबद्दल काय आणि किती लिहावे, ते थोडेच आहे. या अंकात अनेक व्यक्तींकडून वेळेअभावी लेख मिळणे शक्य झाले नाही; तसेच, हा काही परिपूर्ण दस्तऐवज नाही याची आम्हाला कल्पना आहे.

दीदींचा स्वर जग(णं) व्यापून राहिला आहे. त्यामुळे त्या नाहीत त्या फक्त देहाने. आपल्या जगण्याशी त्यांची जुळलेली नाळ अतूट राहणार आहे.

या अंकात अतिथी संपादक म्हणून आणि माझ्या भावना लेखाद्वारे मांडण्याची संधी दिली, त्याबद्दल 'ग्रंथाली'चे आभार मानतो. ●

# अनुक्रम

**श्रुती सडोलीकर-काटकर / ५**
स्वरपारिजात

**सुदेश भोसले / ९**
साक्षात्काराचा अनुभव

**आनंदजी शाह / १३**
आता राहिल्या फक्त आठवणी

**प्यारेलाल शर्मा / १५**
लव्हाळ्यांचं वृक्षांत रूपांतर झालं...

**सुरेश वाडकर / १८**
सरस्वतीमाँ!

**मनोज आचार्य / २१**
उपजत संस्कारबद्ध कंठ

**अंबरीश मिश्र / २७**
दीदीमावशी

**वैभव मांगले / ३२**
लताबाईंच्या गाण्यांची नक्षी

**जयश्री देसाई / ३६**
बहुगुणी स्वरसम्राज्ञी

**आनंद डबरे / ४१**
आभाळमाया

**डॉ. सुरेश चांदवणकर / ४४**
लता मंगेशकर ह्यांच्या ध्वनिमुद्रिका

**शशी व्यास / ४९**
अलौकिक स्वराधीश

**अरुण जोशी / ५३**
जग(णं) व्यापलेला आवाज!

**सायराबानू / ५५**
हमारा दिल का रिश्ता था

**शर्मिला टागोर / ५७**
त्यांच्या मैत्रीचे हळुवार क्षण

**वैजयंतीमाला / ५९**
साक्षात सरस्वती माझ्यासाठी गात होती!

**चंद्रकांत शिंदे / ६१**
संगीतात बदल होणे स्वाभाविकच आहे

**उदित नारायण / ६४**
रियाज करत राहा...

**अनुप जलोटा / ६५**
त्यांचे स्वर पुढील पिढ्यांना तृप्त करतील

**भरत दाभोळकर / ६६**
स्वर्गाचे लेणे

**दिलीप वेंगसरकर / ६८**
आठवते कौतुकाची थाप

**चारुशीला साबळे-वाच्छानी / ६९**
एक कौटुंबिक मैत्र

**सचिन पिळगावकर / ७०**
गानसम्राज्ञी

**डॉ. विजय ढवळे / ७२**
सरस्वतीदेवी इंद्रलोकात परतल्या!

**सुराज साठे / ७६**
सुरेल ऋणानुबंध

**जयंत ओक / ७७**
लाख जन्मांची पुण्याई

**अतुल अरुण दाते / ७८**
लता – एक जगण्याचे कारण

*नियमित सदरे*
**शरद काळे / ७९**
कार्बनचे स्थिरीकरण
**राजीव श्रीखंडे / ८३**
गलिव्हर्स ट्रॅव्हल्स – जोनाथन स्विफ्ट
**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ८७**
**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ९१**



श्रुती सडोलीकर–काटकर

# स्वरपारिजात



**लहान** बालकाच्या मुखावर निर्व्याज हसू यावे, नवयुवतीच्या गालावर लज्जेची लाली यावी किंवा पौर्णिमेच्या रात्री चांदण्याची बरसात व्हावी तसा सहजसुंदर निर्व्याज स्वर ज्यांच्या कंठात सरस्वतीदेवीनेच स्थापित केला अशा लताजी, लतादीदी, भारतरत्न लता मंगेशकर हा एक चमत्कार नुकताच लुप्त झाला. त्यांच्या त्या निर्व्याज स्वराला अंगोपांगी बहरून येणाऱ्या पारिजातकाचे सुकोमल, अलवार सौंदर्य आणि मनाला तुष्ट करणारा परिमळ लाभला होता.

आमची पिढी ह्या पारिजातकाच्या वर्षावातच मोठी झाली. संगीत, स्वर, सुरेलपणा, भावपूर्ण गाणे, मनात उसळणाऱ्या अनेक ऊर्मींचे नेमके चित्र, या सगळ्या परिभाषा ज्या स्वराने शिकवल्या तो स्वर लताजींचा.

मला लहानपणी वाटे लताजी रेडिओतच (आकाशवाणी केंद्रातच) राहतात. कारण दिवसात कोणत्याही वेळी दहापैकी नऊ गाण्यांत तोच स्वर असे. आज हसू येते, पण मला आठवतंय मी 'गंमतजंमत' कार्यक्रमात गायला पहिल्यांदा रेडिओवर गेले तेव्हा मायाताई चिटणीसांना मी अधीर होऊन विचारलं, ''इथे लता मंगेशकर कुठे राहतात?''

हजारोंच्या संख्येने भारतातल्या छत्तीस भाषांतून लताजी गायल्या आहेत. हा चमत्कार जितका आहे तितकाच तो कोणत्याही कलाकारासाठी एक मोठा वस्तुपाठ आहे.

लताजींचे पूर्ण आयुष्यच एक कथा आहे. नशीब आणि स्वकष्टाने, जिद्द आणि परिस्थितीवर मात करण्याच्या चिकाटीमुळेच त्यांनी भारत म्हणजे लता मंगेशकर हे समीकरण स्थापित केले.

दुर्दैवाने कोवळ्या वयात, शिकवण्याच्या वयातच पितृछत्र हरपल्यामुळे त्यांना मा. विनायक माझ्या वडिलांकडे (पं. वामनराव सडोलीकर) घेऊन आले. बरीच वर्षे आमच्या वडिलांनी त्याची वाच्यता आम्हा मुलांकडे केली नव्हती; पण त्यांची १९४२–४३ची एक डायरी सापडली. तीत नोंद आढळली, १ जानेवारी – 'आज कु. लता मंगेशकर शिकवणी सुरू'.

लताजींचा आवाज जात्याच उंच, पातळ होता; पण त्याला वळण लावण्यासाठी काही मेहनत घेणे आवश्यकच होते. वडिलांनी ॐकार, मंद्रसाधना आणि पलट्यांचा अभ्यास करून घेता घेता काही रागांचाही परिचय करून दिला होता. पंढरीनाथ कोल्हापुरेंना माझे वडील लताजींना 'शुद्ध सारंग' राग शिकवत असतानाचे प्रसंग आठवत होते. माझ्या वडिलांचा नाट्यकलेमुळे दीनानाथजी आणि कृष्णराव कोल्हापुरे (पंढरीनाथजींचे वडील) यांच्याशी घनिष्ट संबंध होता. पुढे लताजी पार्श्वसंगीतात खूपच अधिक गुंतू लागल्या आणि वडीलही त्यांच्या कार्यक्रम करणे, नाटके यात व्यग्र झाले. पण ॐकार आणि मंद्रसाधना मात्र लताजींच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग होऊन गेला.

लताजींसारखे गाण्याचा प्रयत्न अनेकींनी केला. गरिबांची लता, प्रतिलता इत्यादी नामाभिधाने लावून कार्यक्रमही झाले, पण अस्सल जो लताजींचा आवाज ती दैवी कृपा फार दुर्मिळ म्हणावी अशी. बरे, केवळ आवाज म्हणजेच लताजी असे म्हणता येईल का? मला वाटते, नाही. त्यांचे जवळजवळ सात दशके अबाधित यश केवळ आवाजाचे नाही. त्या आवाजामागे लताजी एक व्यक्ती, एक शक्ती होती. या व्यक्ती-शक्तीचा अभ्यास केला तर काहीतरी त्या अलौकिक यशाचा सुगावा लागू शकतो. प्रयत्न फक्त करून पाहावा.

'किती हसाल' या चित्रपटाच्या वेळी जो पातळ कोवळा आवाज चित्रपटासाठी वापरला गेला त्याने फार खळबळ नाही उडाली कारण लताजींचे वय कोवळे होते आणि गाण्याचा भावही अल्लड, अवखळ होता. 'नाचू या गडे खेळू' म्हणणारी बालिका याच निरागसतेने गाणार हे रास्तच होते. परंतु पुढे 'आएगा आनेवाला' आणि 'हवामें उडता जाये' या गाण्यांनी लताजींच्या आवाजाला राजमार्गावर आणून अलगद उभे केले.

घरात बालवयात शास्त्रीय, उपशास्त्रीय गायकीचे, नाट्यसंगीताचे पक्के संस्कार घडले, त्याला ॐकारसाधना, मंद्रसाधनेची जोड मिळाली आणि मुख्य म्हणजे विपरीत परिस्थितीचे चटके बसले. बागडण्याच्या वयात कोवळ्या खांद्यांवर कर्तेपणाचे ओझे आले. या सर्वातून लताजी घडत गेल्या. अस्तित्वाची लढाई लढताना येणारे प्रौढपण आवाजात जरूर आले, पण त्यात कटुतेचे कंगोरे मात्र येऊ दिले नाहीत त्यांनी. मला वाटते प्रत्येक कलाकाराने यावर विचार करावा.


भारतातील छत्तीस भाषांतून गाणी म्हणणे ही साधी सोपी गोष्ट निश्चितच नाही. कारण प्रत्येक भाषेला तिचा वेगळा नाद, वेगळी लय असते. संगीतकार बहुधा तीच भाषा बोलणारा असूही शकतो. तसे नसेल तर त्याला जे श्रम घ्यावे लागतात तेच गायक कलाकाराही घ्यावे लागतात. उच्चारणातील आणि स्वरलयीबरोबरची फेक हा मोठाच अभ्यास आहे. कारण परभाषा शिकणे आणि परभाषेत गाणे या दोन वेगळ्या गोष्टी असतात.

'मराठी दालभात' म्हणून उल्लेखलेल्या आवाजात उर्दू भाषेमधील गीते, गझला, नज्म ऐकताना ना शब्द, ना उच्चार दुखावला गेला, ना चुकीच्या ठिकाणी श्वास सोडल्याने अर्थाचा अनर्थ झाला. ही किमया लताजींनी जिद्दीने उर्दू भाषेचा अभ्यास केला त्यामुळे घडली.

''कोणत्याही भाषेतील गीत त्याच्या विशिष्ट उच्चार-वैशिष्ट्यानुसार प्रथम देवनागरीत उतरवून घेते, ते गीत संवादाप्रमाणे जिभेवर घोळवून नंतर स्वरांच्या खास नोंदी करते, शब्द-वाक्य कुठे तोडायचे याच्या खुणा करायच्या, किती वेळा पुनरावृत्ती करायची याची आकडेवारी करून मगच मी गाणे रेकॉर्ड करते'' असे त्यांनी एका प्रत्यक्षभेटीत मला सांगितले होते. माझे वय त्यावेळी लहान असल्याने माझ्या मनावर ही प्रक्रिया कोरली गेली आणि तिचा मीही अंगीकार केला.

लताजींचा स्वर नेमके काय करत होता? ॐकारसाधनेने आवाजाला एक बाणाप्रमाणे अग्र लाभते ज्यामुळे स्वरबिंदूच्या केंद्रस्थानी तो स्थापित होतो. छांदोग्य उपनिषद ॐकारसाधनेचा महिमा फार छान वर्णन करते. तीच किमया लताजींचा आवाज करत असे. बाणाप्रमाणे स्वराचा वेध घेणारा आवाज हीच लताजींची शाश्वत ओळख बनली. अनावश्यक कंप किंवा कणसूरपणा नावालाही सापडू नये. विशेष म्हणजे सिनेसंगीतात गायकाबरोबर साथ करणारी, हुबेहूब जाणारी व्हायोलिनही असतात. त्यामुळे मूळ आवाजाला उठाव येतो, पण गायकाची जबाबदारी वाढते. एक श्वासही अयोग्य ठिकाणी न तोडता गाणे 'निभावून' नेणे, काटेकोरपणाची परिसीमाच मानावी लागेल.

तसे म्हटले तर चित्रपटातील गीत जेमतेम साडेतीन-चार मिनिटांचे, पण त्या मुदतीत भावनापरिपोषासाठी आवाजात योग्य तितके माधुर्य, सुरेलपणा, लयीचे पक्केपण, वाद्यमेळाचे भान बाळगणे आणि नेमकेपणाने स्पष्ट शब्दोच्चार करून कथानकाला गती देण्याचे अवघड कार्य पार्श्वगायक करत असतात. ज्या पात्रासाठी आपला आवाज वापरला जात आहे त्याची मानसिकता समजणे हे फार महत्त्वाचे ठरते, अशा वेळी स्वत्व विसरावे लागते. ही सारी कसरत लताजींनी अतिशय विचारपूर्वक मेहनत करून साध्य केली. त्यामुळे त्यांचा आवाज आपल्या भूमिकेला लाभावा, अशी आस नट्यांना लागून राहात असे.



'लतासारखी तान जन्मभर मेहनत करूनही कोणाला येणार नाही.
ही जर शास्त्रीय संगीताचा व्यासंग करील,
तर दुसऱ्या कुणालाही गाऊ देणार नाही!'

**– वझेबुवा**

कोवळ्या वयापासून परिस्थितीने पोळून थकलेल्या वृद्धेपर्यंतच्या सर्व वयोभावना लताजींच्या आवाजाने दर्शवल्या. उत्फुल्ल यौवनेपासून वात्सल्यमूर्ती मातेच्या ममतेने ओथंबलेल्या, आशंकांनी कातर झालेल्या आईच्याही भावना लताजींच्या स्वराने सहज पेलल्या. जणू त्याद्वारे लताजी कायाकल्पाची किमयाच साधत होत्या.

लताजींचे पार्श्वगायनक्षेत्रात आगमन होण्याआधी थोड्या सानुनासिक, प्रौढ आवाजांची चलती होती. परंतु गायक-नटी ही कल्पना अस्तंगत झाली. हलका, उत्फुल्ल, टवटवीत गुलाबपुष्पासारखा लताजींचा आवाज ही स्वातंत्र्योत्तर नवसृजनाची पताका ठरली. रूढीपरंपरांना झुगारून देत 'प्यार किया तो डरना क्या?' असे आव्हानही याच आवाजाने दिले.

लताजींनी एक लोरी-अंगाईगीत गायले आहे, 'धीरसे आजारी अँखियनमें'. यात त्यांच्या आवाजात कुठेही 'मी लता मंगेशकर गाते आहे' असा भाव नाही. ममत्वाने आपल्या बाळाला झोप यावी म्हणून थोपटणारी आई जशी हळुवारपणे गाईल, तो भाव सहज पोहोचवला आहे.

पंडित दीनानाथांनी भारताच्या संगीतप्रांगणात लता नावाचा महाकल्पवृक्ष रुजवला आणि केवळ सिनेसृष्टीच नव्हे तर भारतीय संगीतातील शास्त्रीय, उपशास्त्रीय, ललित संगीताप्रमाणेच, भावगीत, भक्तिगीत अशा अनेक प्रकारांना अनुपमेय स्वराचे कोंदण लाभले. त्यांच्या आवाजाच्या प्रचंड आवाक्याचा पुरेपूर उपयोग करून घेणारे संगीतदिग्दर्शकही त्यांना लाभले हा मोठाच सुयोग होय. नौशाद, सी. रामचंद्र, शंकर-जयकिशन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, राहुल देव बर्मन, एस.डी. बर्मन यांनी रागदारीपासून उपशास्त्रीय संगीताची पूर्ण बैठक असलेली गीते रचावीत आणि लताजींनी ती लीलया गावीत असा सुंदरसा अलिखित नियमच होऊन गेला होता.

मदन मोहनजींनी लताजींच्या स्वरातील तरल, नाजूक आर्तता हेरून ज्या चाली दिल्या त्यातील कोणती एकच सरस म्हणून उचलावी, हे फार अवघड काम आहे. 'आपकी नजरोंने समझा', 'लग जा गले', 'रूके रूके से कदम', 'वो चूप रहे तो'... अशा कितीतरी अप्रतिम गाण्यांच्या अनमोल सुरावटींना लताजींच्या सुवर्णशलाकेप्रमाणे तेजस्वी स्वराचा अमृतस्पर्श झाला आणि ती रसिकांच्या हृदयावर राज्य करू लागली.

सज्जाद हुसैन हे अवघड, अनवट अशा चाली बांधण्यात तरबेज संगीतदिग्दर्शक. त्यांची दोन गाणी मला उल्लेखनीय वाटतात. 'हलचल' चित्रपटातील 'आज मेरे नसीबने' अणि 'रुस्तम सोहराब'मधील 'ऐ दिलरुबा' ही गाणी ऐकताना बारीकसारीक तानांची गुंफण आणि शब्दांची अचूक फेक या गोष्टींबद्दल लताजींचे अभिनंदन करावेसे वाटते. 'ही माझी गाणी केवळ लताजीच गाऊ शकत होत्या', असे खुद्द सज्जादजींनी एका मुलाखतीत म्हटले होते.

आपल्या संगीतदिग्दर्शकांकडूनही लताजी खूप शिकल्या. पुरुष सहगायकांबरोबर गाताना, त्यांच्या स्वरात गाताना आपला आवाज कर्कश वाटू नये, पण अस्पष्ट होऊन झाकोळून जाऊ नये अशी तारेवरची कसरत कशी करावी हे लताजींनी हिमतीने स्वत: करून अन्य गायिकांसाठी आदर्श म्हणून स्थापित केले.

लताजींच्या संगीतदिग्दर्शक व कवींना जे सांगायचे होते त्याचे नेमके मर्म ओळखून त्यांनी आपल्या आवाजाचा आवाका वापरला. स्वरालंकार, तान, मुरकी खटका यांचा संयत वापर केल्याने श्रोते अधिकाधिक तृप्तही झाले. तसेच, अधिक काही मिळण्यासाठी आसुसलेलेही राहिले. त्यांच्या गाण्यातील गोडवा 'मिट्ट गोड' नव्हता, तर सुधारसासारखा केव्हाही आपला वाटावा असा हवाहवासा होता. हे तारतम्य लताजींनी वापरले म्हणूनच छत्रपती शिवाजीमहाराज असोत वा वीर सावरकर असोत, शौर्यगाथा, राष्ट्रगीते, 'ऐ मेरे वतन के लोगो'सारखे काळजाला हात घालणारे गीत असो, लताजींच्या आवाजाने त्या भावनांना योग्य न्याय दिला.

लताजींचा स्वर, त्यांची अथक मेहनत, जीवनानुभव, संवेदनशीलता, नेमकेपणाने काम करण्याची जिद्द या सर्वांचा अभ्यास करणे हेच पुढील पिढीला मार्गदर्शक ठरेल.

शंकर-जयकिशन यांना त्यांच्या संगीतासाठी लताजींचा स्वर नेहमीच हवा असे. 'जिस देशमें गंगा बहती है' या चित्रपटातील 'ओ बसंती पवन पागल' आणि मुकेश यांच्यासह गायलेले 'आ अब लौट चले' या गाण्यांत लताजींच्या आवाजातील गोळीबंद अचूकपणा आणि प्रचंड उंचीवरून लगावाने घातलेली दर्दभरी साद हृदयाचा ठाव घेतात.

'आ अब लौट चले' या गीतातील तार षड्जावरून ज्या अचूकपणे त्या तार पंचमावर गेल्या आहेत ते ऐकून अंगावर शहारा येतो. तो षड्ज म्हणजे ॐकारसाधनेतून कमावलेल्या दमसासाचे सुंदर उदाहरण आहे. या दमसासाच्या अभ्यासामुळेच कोणत्याही गाण्यात लताजींचा श्वास कुठे संपला आणि कुठे नवा श्वास घेतला हे कळतच नाही. मायक्रोफोनमध्ये कधीही त्यांच्या श्वास घेण्याचा आवाज ऐकू येत नाही, जो आज आपण अनेकदा गद्य संवादात होताना पाहातो.

पंडित दीनानाथजींकडून रक्तातून आलेली संगीताची जाण आणि उपजत कुशाग्र बुद्धी यांचा मनोहारी संगम जसा लताजींमध्ये दिसतो, तशी त्यांच्या गायकीतील चमत्कृतीची चमक पंडित हृदयनाथ



लता गाऊ लागते तेव्हा ती एखाद्या देवीसमान भासते.
तिचे चरणस्पर्श करण्याची इच्छा होते.

**– सलील चौधरी**

मंगेशकर यांच्या संगीतरचनांमधून दिसून येते. ज्ञानेश्वरांच्या रचनांच्या चाली लताजींच्या आवाजाची पूर्ण ओळख असणाऱ्या हृदयनाथजींनी बांधल्या. अर्थातच त्या चालींचे अवघडपण लताजींना अवघड गेले नाही आणि त्या जनमानसात सहज रुळल्याही.

ज्ञानेश्वरी रेकॉर्ड प्रथम प्रकाशित झाली तेव्हा पन्हाळ्याला भालजी पेंढारकर ती घेऊन आले. सुशील रुईयांच्या बंगल्यावर ती ऐकवण्यात आली तेव्हा एका ढुढ्ढाचार्यांनी माझ्या वडिलांना म्हटले, ''काय ही पाच-पाच मिनिटांची गाणी, गवयाच्या गायकीचा मजा औरच बुवा!'' चटकन माझे वडील म्हणाले, ''बुवा, गवय्या जे करायला तास तास लावतो, ते लता पाच मिनिटांत करून मोकळी होते.'' माझ्या वडिलांना आपल्या शिष्येचा रास्त अभिमान होता.

श्रीनिवास खळे हेदेखील असेच 'अवघडदास' संगीतकार. त्यांची-माझी एकदा भेट झाली तेव्हा लताजींचे नाव निघताच चटकन ते म्हणाले, ''श्रुती, लताजी म्हणजे ह्या कलियुगातली साक्षात देवी सरस्वतीच! संगीतविश्वात अशी स्वरसंगती कोणतीच शिल्लक नाही जी त्या कंठातून निघाली नाही.''

'परिवार' चित्रपटात सलील चौधरी यांनी हंसध्वनी रागावर आधारित 'जा तोसे नहीं बोलू' हे खास नृत्याला जोड असे गीत संगीतबद्ध केले आहे. यातील तारसप्तकातील गंधारावरून 'छूट की तान', तसेच मुखड्याची तान लताजींच्या गळ्यातील फिरतीची उत्तम उदाहरणे आहेत.

याच सलीलजींनी लताजींकडून काही अतिमधुर बंगाली गीतेही गाऊन घेतली होती. 'मधुमती' चित्रपटातील 'आजा रे परदेसी', 'अन्नदाता'मधील 'निस दिन निस दिन' या गीतातील हलकी तरल आलापी, याउलट अल्लड तनुजावर चित्रित 'मेम दीदी' चित्रपटातील 'बेटा वॉव् वॉव्' आणि 'रातों को जब नींद उड जाय' ह्या गाण्यात लताजींनी आपल्या आवाजात यौवनातील अवखळपणा आणि टवटीतपणाचा प्रत्यय आणून दिला आहे.

लताजींच्या शास्त्रीय संगीताधारित गाण्यांमधील ताना, खटके, मुरक्या, हरकती इत्यादी अलंकारांनी गीत तर खुलून दिसतच असे, महत्त्वाचे म्हणजे एरवी शास्त्रीय संगीताला नाके मुरडणारे लोकही अलगदपणे या 'शास्त्रीय' नव्हे तर 'ललित-शास्त्रीय' माधुर्याने आकृष्ट होत असत. उच्चभ्रू समाजातील काही ललना हीच गाणी सहज कंठगत करत असत.

अनेक युगलगीतांमध्येही लताजींनी नायिकेच्या मनातील भावना नाजूकपणाने पण ठामपणे मांडण्याचे कसब दाखवले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही विचार प्रकट करण्याचे बळ लाभले. तरुणांच्या जीवनात व्यक्तिस्वातंत्र्याची पहाट उगवली आणि त्यांनी एकांतात निसर्गाच्या साक्षीने एकमेकांना दिलेल्या आणाभाकांचा उद्गार ज्या प्रेमगीतातून, भावगीतातून उमटू लागला, त्याचे प्रतिबिंब दृक्‌श्राव्य माध्यमातून प्रकट होऊ लागले. अशावेळी लताजींच्या गोड, आकर्षक, प्रसंगी लाजऱ्या, कधी धीट, कधी कातर आवाजाने स्त्रीहृदयाचे मनोगत यथार्थपणे व्यक्त केले. कोणत्याही प्रसंगी त्यांचा आवाज भावाभिव्यक्तीला कमी नाही पडला.

लताजींनी संगीतदिग्दर्शनही केले. मराठी मातीशी, कष्टकरी जीवनाशी नाळ जोडणारी गीते संगीतबद्ध करताना पात्रांच्या जीवनातील हत्यार-अवजारांच्या आवाजांचाही त्यांनी उपयोग केला. 'ऐरणीच्या देवा तुला' या गीतात हा अनुभव येतो आणि विशेष म्हणजे स्वत: गाताना खास ढंग आवाजात उतरवला. हे संगीतदिग्दर्शन त्यांनी 'आनंदघन' या टोपणनावाने केले. आनंदाची बरसात करणाऱ्या स्वराचे किती समर्पक वर्णन!


मला कल्पना आहे, आज पूर्वीप्रमाणे एकेका गाण्यासाठी एकेक महिना तालमी करायला वेळ नसतो. प्रत्येक चॅनेलवर वेगवेगळी वाद्ये आधी रेकॉर्ड करून नंतर मुख्य गायक हेडफोनमध्ये ऐकू येणाऱ्या 'क्लिक'वर गाणे गाऊन निघून जातात, हे ऐकून आहे. गायक स्वरात घसरला तर त्याला यंत्राचे बटण फिरवून स्वरात आणताही येते. या सर्व पार्श्वभूमीवर लताजींच्या पिढीने तंत्रज्ञानाच्या गैरहजेरीत जे स्वर-शब्दांचे अनमोल जडजवाहीर निर्माण करून ठेवले आहे त्याची किंमतच करता येणार नाही.

आपल्या कानांवर ज्यांनी स्वरसंस्कार केला, संगीताची अमृतमय गंगा जनसामान्यांना आपली वाटावी, सर्वांना गुणगुणावेसे वाटावे, स्व-आत्मसुखासाठी खुशाल डोळे मिटून ऐकत स्वत:ला विसरावे, अशा लताजींच्या स्वराचे वर्णन अशक्यप्राय आहे.

दैवी कृपा जरी असली तरी तिला कठोर परिश्रम, जिद्द, कुशाग्रबुद्धी, सुसंस्कृतपणा आणि संवेदनशील मन यांची जोड मिळाली तर दैवदत्त स्वराचा वेलू गगनावरी जातो आणि निरंतर अमृतसिंचन करत राहातो असे मला वाटते. हाच लताजींचा स्वरपारिजात पुन्हा सूरलोकी स्थिरावला आहे.

जीवनभर मनुष्यजातीवर स्वरसंस्काराचे व्रत आचरून आपल्या अलवार आवाजाने मायेची फुंकर घालणाऱ्या त्या स्वरपारिजाताला शतश: प्रणाम!

**– श्रुती सडोलीकर-काटकर**
shrutisadolikar@yahoo.com



लताजी म्हणजे ह्या कलियुगातली साक्षात देवी सरस्वतीच!
संगीतविश्वात अशी स्वरसंगती कोणतीच शिल्लक नाही जी त्या कंठातून निघाली नाही.
दीदींचा सूर इतका पक्का आहे की तुम्ही त्यावर तानपुरा लावू शकता.

**– श्रीनिवास खळे**



**सुदेश भोसले**

# साक्षात्काराचा अनुभव

**१९८६ पासून** मी आशाताईंबरोबर कार्यक्रम करतोय. कार्यक्रम करायला सुरुवात केली तेव्हापासून दीदींना ठाऊक होतं की मी आशाताईंच्या कार्यक्रमात असतो. त्यांची सगळी टीम वेगळी होती. त्या काळातले सगळे सीनियर गायक त्यांच्यासोबत गायचे. किशोरदा, मुकेशजी, बालसुब्रमण्यमजी यांच्यासोबतच त्या कार्यक्रम करायच्या. एकदा असं घडलं, की आशाजींचा वाढदिवस होता. सरप्राइज बर्थडे पार्टी होती. त्या पार्टीत माझी दीदींशी प्रत्यक्ष ओळख झाली. सुरेश वाडकरांनी ओळख करून दिली होती, की 'हे सुदेश भोसले. चांगलं गातात.' तेव्हा माझा 'लम्हे' नावाचा चित्रपट आला होता - श्रीदेवी-अनिल कपूरचा. त्यात मी एक पॅरडी साँग गायलो होतो - विनोदी बाजाचं! मन्ना डे, एस.डी. बर्मनसाहेब वगैरेंचे आवाज काढून अनुपम खेरांसाठी ते गाणं गायलो होतो. वाडकरांनी ओळख करून दिल्यावर मी पाया पडायला म्हणून दीदींसमोर वाकतच होतो; तेवढ्यात त्या म्हणाल्या, 'लम्हे'मध्ये हेमंतकुमार ऐकून मी गारच पडले होते! साक्षात दीदींच्या समोर मी उभा आहे आणि वाडकर अजून ओळख करून देताहेत, तोवर दीदीच मला दाद देताहेत - माझा विश्वासच बसत नव्हता कानांवर! नंतर त्या पार्टीत दीदी, सुरेशजी, माझी पत्नी आणि मी एकत्र बसलो एका टेबलपाशी आणि जेवण, गप्पा सुरू होत्या. मी तर एकटक पाहत होतो दीदींकडे. आपण दीदींसमोर बसलो आहोत हे स्वप्न वाटत होतं मला!

त्यानंतर काही दिवसांनी माझ्या मोबाइलच्या व्हॉइस मेलमध्ये एक व्हॉइस मेसेज आला. तो मी ऐकला. 'नमस्कार. मी लता मंगेशकर. तुम्ही माझ्याबरोबर कार्यक्रम कराल का?' माझा तर विश्वासच बसेना जे ऐकलं त्यावर. मी ताबडतोब त्यांना फोन केला, की 'दीदी, मी सुदेश भोसले बोलतोय. कार्यक्रम करशील का असं काय विचारताय? तुम्ही मला बोलावताय हीच किती मोठी गोष्ट आहे माझ्यासाठी.' मला म्हणाल्या, की माझा गोहाटीला एक कार्यक्रम आहे. बालसुब्रमण्यमजींचा काहीतरी प्रॉब्लेम झालाय. त्यांना येणं जमत नाहीये. भूपेन हजारिका, बालसुब्रमण्यम आणि दीदी असा कार्यक्रम होता. मी दीदींना म्हटलं की मी नक्की येतो. मग मला त्यांनी विचारलं, तुम्ही किती पैसे घेणार? मी म्हटलं, तुम्ही द्यायचेही नाहीत मला. तरी त्यांनी त्यांच्या ऑफिसमधून मॅनेजरकडून चार-पाच वेळा फोन करवले - 'आप कितने पैसे लेंगे?' शेवटी मी त्या मॅनेजरांना सांगितलं, दीदींना सांगा - 'सव्वा



रुपया आणि श्रीफळ!' या कार्यक्रमाच्या निमित्तानं पुन्हा दीदींची भेट झाली. रिहर्सल झाल्या. कार्यक्रम उत्तम झाला. त्यावेळेस बालसुब्रमण्यमसाहेबांची 'मैने प्यार किया'ची गाणी खूप गाजत होती. त्यांची आणि दीदींची द्वंद्वगीतं फार प्रसिद्ध होती त्यावेळेस. ती सगळी गाणी, काही किशोरदांची आणि सचिन देव बर्मनसाहेबांची गाणी होती. कार्यक्रम फार चांगला झाला.

त्यानंतर १९९५ मध्ये त्यांनी परत एकदा मला बोलावलं. दीदींची टूर होती – अमेरिका, कॅनडाची. दोन महिने दर रविवारी त्यांच्या पेडर रोडच्या घरी 'प्रभुकुंज'मध्ये रिहर्लस होऊ लागल्या. आशाजींना भेटल्यावर पाचव्या मिनिटाला सगळी औपचारिकता दूर होते आणि हसतखेळत गप्पा सुरू होतात, असा माझा अनुभव. दीदींचं व्यक्तिमत्त्व तसं गंभीर! काही लोकांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाचं आदरापोटी दडपण येतं – त्यापैकी दिलीपसाहेब, अमिताभजी आणि दीदी! मात्र या तालमींना मी जाऊ लागलो आणि हळूहळू माझ्या लक्षात येऊ लागलं की त्या दिसतात तितक्या काही धीरगंभीर स्वभावाच्या नाहीत. रिहर्सल करत असताना कधी मी हेमंतदांचा आवाज काढला की त्यांच्या चेहऱ्यावर स्माइल उमटायचं. कौतुकानं त्या पाहायच्या. मन्नादांचं एखादं गाणं गायलं तरी अशीच कौतुकाची दाद मिळायची. एकदा मी गात होतो – 'शाम ढले खिड़की तले.' – 'घड़ी घड़ी खिड़की में खड़ी तुम तीर चलाना छोड़ दो'. शेजारी हृदयनाथजी बसले होते. दीदी त्यांना म्हणाल्या, 'बाळ, मला वाटलं माझ्याशेजारी अण्णाच बसले आहेत.' अशी मनमोकळी दाद मला दरवेळी मिळत गेली. एकदा 'मैने प्यार किया'मधलं बालसुब्रमण्यमजींचं – 'जुते दे दो, पैसे ले लो' गाणं कार्यक्रमात मी गात होतो. दीदी अगदी लक्षपूर्वक ऐकत होत्या आणि एकदम त्यांनीही ती ओळ गुणगुणली. शेजारी कुणी बसलं होतं – अनिलजी असावेत. त्यांना म्हणाल्या – 'कस्सं गातात ना हे!' ही अशी उत्स्फूर्त निरागस दाद किंवा कौतुक मला बऱ्याचदा अनुभवता आलं. मी स्वत:ला भाग्यवान समजतो.

अमेरिकेचा दौरा सुरू झाला. कार्यक्रम सुरू झाले. दीदींच्या सहवासात मनावरचं दडपण जरा कमी झालं. माझी भीड थोडी चेपली. आणि एकदा मी दीदींना म्हटलं, की 'दीदी, सिलसिला'मधलं 'मैं और मेरी तनहाई' गाऊया का? तर म्हणाल्या, 'अरे हो! पण ते गाणं घेताच येत नाही कार्यक्रमात. अमिताभजींचा आहे ना आवाज त्यात.' अनिल मोहिले तिथेच होते. दीदी त्यांना म्हणाल्या, ' अनिल, बघा हे भोसले काय म्हणताहेत. पटकन हे गाणं बसवून घ्या.' अनिलजींनी दहा मिनिटांत म्युझिशियन्सबरोबर गाणं तयार करून घेतलं. रिहर्सल झाल्या. अमेरिकेत पंचवीस हजारांचा जनसमुदाय समोर होता. 'मैं और मेरी तनहाई' सुरू केलं आणि लोकांनी शिट्ट्या, टाळ्यांचा कडकडाट सुरू केला. दीदींनी डोळ्यांवरचा चष्मा खाली करून माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाल्या, अरे वा! क्या बात हैं! एकदा कुमार शानूंचं गाणं गात होतो. गाणं सुरू केलं. त्यानंतर दीदींची ओळ होती. दीदींचा आवाज आला नाही म्हणून मागे वळून पाहिलं. बघतो तर दीदी शेजारी नाहीत. त्या ऑर्केस्ट्राच्या मागे – म्युझिशियन्सच्या मागे जाऊन चेहरा पदरामध्ये लपवून खो खो हसत होत्या. अशा अनेक गमतीशीर आठवणी!

मी त्यांच्या शोमध्ये सुरुवातीला 'जुम्मा चुम्मा' गाणं गात नव्हतो. किंवा एखाद्या गाण्यात ऑडियन्समधल्या लहान मुलांना पुढे बोलावून त्यांना त्या गाण्यावर नाचू द्यायचो, जरा गंमत म्हणून त्यांना उठाबश्या काढायला लावायचो. मात्र दीदींच्या कार्यक्रमात हे सगळं करायचं कसं हे दडपण होतंच. दोन-तीन शो झाल्यावर दीदींनी अनिलजींना बोलावून सांगितलं, की 'भोसले ते काय काय करतात ना मुलांना बोलावून ते करू दे त्यांना. काही हरकत नाही.' चौथ्या शोमध्ये अनिलजींकडून निरोप पाठवला, की ते 'जुम्मा चुम्मा' गायलात तरी काही हरकत नाही. ब्रेकफास्टला एकदा एकत्र बसलो असताना म्हणाल्या, मला माहितीए, आशाच्या कार्यक्रमात तुम्ही खूप मस्ती करत असता स्टेजवर. माझ्याकडे गाताना मात्र फार शांत शांत असता. कलाकाराचा बेस्ट परफॉर्मन्स कसा होईल आणि त्यासाठी त्याला कम्फर्टेबल करणं आणि हे करताना वागण्याबोलण्यातली सहजता हा दीदींचा स्वभाव मला अनुभवता आला.

प्रवासातलेही काही यादगार प्रसंग आहेत. अमेरिकेत एके ठिकाणी कार्यक्रम होता. एअरपोर्टवर आम्ही उतरलो. विमानातून उतरल्यावर जरा इकडेतिकडे रेंगाळत माझं 'सागर किनारे दिल ये पुकारे' असं गुणगुणणं सुरू होतं. तेवढ्यात तिथे एक मोठा गोलाकार खांब होता त्याच्यामागून आवाज आला – 'तू जो नहीं तो...' दीदी गात होत्या. मला वाटलं दीदी, बाकीचे म्युझिशियन सगळे पुढे निघून गेले असतील. मी त्यांना सॉरी म्हटलं. मला म्हणाल्या, 'किती छान बनवलंय ना पंचमनं हे गाणं!' ज्येष्ठ-कनिष्ठ असा कुठलाही भाव मनात येऊ न देता गाण्याबद्दल संवाद साधणाऱ्या, सतत गाण्यात रमणाऱ्या, त्या वातावरणातच श्वास घेणाऱ्या दीदी मला दिसत होत्या.

आशाजींसोबतचं माझं नातं इतकं अनौपचारिक आहे – कार्यक्रमाशिवायही घरगुती समारंभांच्या निमित्तानं येणंजाणं, भेटीगाठी



कम्बख्त कभी बेसुरी नहीं होती.
क्या अल्लाह कि देन है!

**– उस्ताद बडे गुलाम अली खान**

होत असतात. सुखदु:खाच्या गोष्टी बोलल्या जातात. माझी आई गेली तेव्हा सगळ्यात आधी माझ्या घरी पोहोचल्या होत्या त्या आशाताई. त्याआधी मला दीदींचा फोन आला. म्हणाल्या, 'सुदेश, मला बातमी कळली तुमच्या आईंची. धीरानं घ्या. मी येऊ शकत नाही आता. मात्र आशा निघालीय, पोहोचेल १५ मिनिटांत.' अतिशय आपलेपणाचं नातं आहे या सर्वांशीच. आशाताईंचं दडपण येत नाही; मात्र दीदींसोबत जरा दडपण असायचं. दीदींनाही त्याची कल्पना होती. ते दडपण येऊ नये, यासाठी त्या नेहमी प्रयत्न करायच्या. एकदा दादरला कार्यक्रम झाला दीदींचा. अमिताभजी, सचिन तेंडुलकर कार्यक्रमाला आले होते. अमितजींनी 'मैं और मेरी तनहाई.' म्हटलं होतं त्या कार्यक्रमात.



रिहर्सलला ते पेडर रोडला आले होते. दीदी, दीदींच्या बाजूला मी आणि थोडं पुढे बच्चनसाहेब बसले होते. लहान मूल कसं पायाशी पाय जुळवून बावरून बसतं तसे! दीदींचं लक्ष नव्हतं तेव्हा मला खुणेनंच जवळ बोलावलं आणि म्हणतात कसे – 'लताजी से बहुत डर लगता है मुझे।' आता विचार करा – जिथे अमितजींना असं दडपण येऊ शकतं, तिथे माझी अवस्था कशी होत असेल!

१९९५ आणि ९७ मध्ये वर्ल्ड टूर झाल्या. त्या दोन्ही टूरमध्ये मोठमोठे गायक-गायिका असूनसुद्धा त्यांनी मला नेलं. साधारण वीस-एकवीस वर्षांपूर्वी अंधेरी स्टेडियममध्ये एक हाऊसफुल्ल कार्यक्रम झाला होता. त्यात दिग्गज गायक कलाकार समोर ऑडियन्समध्ये होते आणि मी त्यांच्यासोबत स्टेजवर होतो. त्या कार्यक्रमात मन्ना डेंचं गाणं मी गात होतो – 'प्यार हुआ इकरार हुआ..' दीदींनी चटकन माझ्याकडे पाहिलं. मला वाटलं की मी काहीतरी गडबड केलीय. गाणं तर पूर्ण केलं. मात्र मला वाटत राहिलं की मी काहीतरी चुकलो असेन म्हणून दीदींनी माझ्याकडे पाहिलं. गाणं झाल्यावर त्यांनी म्हटलं, 'ये सुदेशजी हर किसी की आवाज़ में गाते है। अभी उन्होंने बिलकुल मन्नादा की तरह गाया। और मैंने बिलकुल लता मंगेशकर की तरह गाया।' दीदींची उत्तम विनोदबुद्धी! – इतरांना दिलखुलास हसवणारी, रिलॅक्स करणारी!

कॅनडामध्ये एका इंटरव्ह्यूमध्येही त्या म्हणाल्या, की 'भोसले होते हैं मेरे साथ तो किसी दूसरे मेल सिंगर की ज़रूरत नहीं होती और मैं कोई भी ड्युएट गा सकती हूँ उनके साथ – चाहे वो सहगल साहब का हो या रफ़ी साहब, किशोरदा, मन्नादा से लेकर कुमार सानू, उदित नारायण तक।' पुन्हा मला तेच सांगावंसं वाटतं– दीदींकडून मी काय शिकलो तर सहकलाकाराचं कौतुक करणं, त्याचा आत्मविश्वास वाढवणं. आपलं दडपण त्याच्यावर न येऊ देणं.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट मी त्यांच्याकडून शिकलो. लतादीदींनी त्यांची गाणी कितीतरी कार्यक्रमांतून कितीतरी वेळा गायली असतील. मात्र कार्यक्रम आला की कमीत कमी दोन महिने त्या रिहर्सल करायच्या. एकेक गाणं चार-सहा वेळा गाऊन तयार करायचं. अमेरिकेला गेल्यावरही कार्यक्रमाच्या आधी, कार्यक्रमाच्या दिवशी पूर्ण रिहर्सल! त्या म्हणायच्याही, 'लोकांना चालतील ना आपली गाणी?' मी लता मंगेशकर आहे म्हणून काहीही, कसंही गायले तरी लोक ऐकतील हा कधीच भाव किंवा आव नाही, लोकांना गृहीत धरणं नाही; तर पूर्ण तयारीनिशी आणि लोकांना जे ऐकवायचं ते सर्वस्व ओतून हाच समर्पित भाव! आशाताई, अमिताभजी, किशोरदा या मंडळींकडूनही हेच डेडिकेशन मला शिकता आलं. ग्रेट लोक आहेत हे सगळेच!



मधुर आणि मुलायम आवाज, स्पष्ट आणि अर्थपूर्ण शब्दोच्चार यामुळे लताचे गाणे ऐकणाऱ्याचे देहभान गळून पडते. दु:ख, क्लेश, यातना यांना विसरायला लावण्याचे विलक्षण सामर्थ्य लताबाईंच्या स्वर्गीय गळ्यात आहे.

**– प्रल्हाद केशव अत्रे**

काही वर्षांपूर्वी अचानक त्यांच्या घरून फोन आला मला, की दीदींना काही फोटो सापडलेत तुमचे टूरचे. ते तुम्हाला पाठवायचेत म्हणून पत्ता हवाय. मी घरचा पत्ता दिला आणि विचारलं, की दीदी असतील का आता आणि मी बोललो तर चालेल का? एका मिनिटात दीदी फोनवर आल्या आणि म्हणाल्या, नमस्कार! बोला. मी म्हटलं दीदी इथूनच नमस्कार करतोय. कशा आहात तुम्ही? ख्यालीखुशाली झाली. मला म्हणाल्या, फार छान फोटो आहेत. मी पाठवतेय तुम्हाला. मी म्हटलं, तुम्हाला भेटायची, तुमच्याशी बोलायची फार इच्छा होते; पण खूप भीती वाटते. तर म्हणाल्या, अहो, कशाला घाबरता? तुम्हाला वाटलं की करा फोन. त्यांच्या या वाढदिवसाला – २८ तारखेला आशाताई माझ्या घरी आल्या होत्या. तेव्हा मी दीदींना शुभेच्छा द्यायला फोन केला. मला अगदी आपुलकीनं विचारलं, 'कसं चाललंय तुमचं? दोनअडीच वर्षं सगळे कार्यक्रम, काम ठप्प झालंय. ठीक आहात ना?' हे माझं त्यांच्याशी झालेलं शेवटचं बोलणं!

अनेक आठवणी आहेत. न संपणाऱ्या आणि कधीही विसरता येणारच नाहीत अशा! लाखो-करोडो लोकांच्या मनात असायचं, होतं, की त्यांना एकदा तरी प्रत्यक्ष पाहता यावं, भेटावं. मला तर त्यांचा सहवास लाभला. त्यांनी मला घरी बोलावणं, त्यांच्या कार्यक्रमात सहभागी करून घेणं हे सगळं ऐश्वर्य मला लाभलं! मला सगळ्यात मोठी कॉम्प्लिमेंट मिळाली ती अनिल मोहिलेंकडून! ते म्हणाले, मी चाळीस वर्षं दीदींबरोबर कार्यक्रम करतोय, पण तू आल्यापासून दीदी स्टेजवर हसू लागल्या! आमच्या 'मेलडी मेकर्स'मुळे आम्हाला सवय होती प्रेक्षकांशी, श्रोत्यांशी बोलायचं. 'कैसे हैं आप? अरे पीछेवालों, अरे उपरवालों!' तुम्हाला खोटं वाटेल; पण दीदीही तसं बोलायला लागल्या! 'पीछेवालों, तालियाँ नहीं बजाएँगे क्या?' ही सहजता दीदींसारख्या महान कलाकाराकडेच असते!

प्रत्यक्ष समोर बसवून त्यांनी मला काही शिकवलं नाही. मात्र त्यांच्या सहवासात – रिहर्सल करताना, प्रवास करताना, फोनवरच्या संभाषणातून नकळत माझ्यावर संस्कार होत गेले. त्यांच्या वडिलांबद्दल, सुरुवातीच्या कामाबद्दल, ज्या संगीतकारांकडे त्या गायल्या त्यांनी कसं शिकवलं, रेकॉर्डिंगच्या आठवणी. अशा अनेक गोष्टी प्रत्यक्ष त्यांच्याकडून ऐकता आल्या. तेही अनौपचारिक शिक्षणच होतं! मेंदूत कायमस्वरूपी रेकॉर्ड झालंय ते! बोलताबोलता एखादी गोष्ट, एखादं वाक्य असं बोलायच्या की आयुष्यभर पुरेल अशी अनुभवाची पुंजी मिळावी! दीदींनी वडिलांची आठवण सांगताना म्हटलं होतं, की 'बाबांनी हातात तानपुरा दिला तेव्हा सांगितलं होतं की माझ्याकडे तुला द्यायला काहीच नाही. फक्त हा तानपुरा आहे. हा नुसता तानपुरा नाही; हा संत आहे. कधीही यावर धूळ बसू देऊ नकोस.' रियाजातल्या सातत्याचा मंत्र त्यांनी वडिलांकडून घेतला. रियाज, तालीम या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या मानायच्या त्या. एकदा मला म्हणाल्या, समजा, तुम्ही स्टेजवर गात असताना ऑडियन्समध्ये तुमचे गुरू बसले असले तरी घाबरायचं नाही. आत्मविश्वास आणि गायनकलेवरची श्रद्धा! फार कष्टातून स्वत:ला घडवलं दीदींनी. सहजसाध्य काहीच नव्हतं. दीदींनी व्यावसायिक गायन सुरू केलं त्या काळात अनेक दिग्गज गायिका होत्या. त्यातही स्वत:चा सूर दीदींनी सिद्ध केला. गळ्यात दैवी सूर होता; मात्र गाण्यासाठी अत्यंत निष्ठेनं केलेली मेहनतही तितकीच महत्त्वाची आहे. एका टेकमध्ये गाणं ओके! – असं तर अनेकदा झालं. एखाद्या संगीतकाराकडे गाणं गायचं – तर चाल सांगितली जायची. दीदी पुन्हा चाल ऐकायच्या. पुन्हा एकदा गा म्हणायच्या, परत ऐकायच्या. पाचसहा वेळा गाणं ऐकून मग टेक! कुणी विचारलं, दीदी, गाना तो वन टेक ओके हुआ! तो ये पाँच बार क्यूं सुना आपने? तर म्हणायच्या, 'ट्यून तो पहली बार गाया तभी समझ आयी थी, लेकिन मैं देख रही थी हर शब्द को आप किस तरह गाते हो, प्रोनाउन्स करते हो।' दीदींबद्दल असं म्हटलं जातं की रेकॉर्डिंग करताना त्या कशा गातात, श्वास कसा घेतात काही कळतच नाही; इतकं सहज गातात. तरीही संगीतकाराला हवं तसं गाणं झालं पाहिजे हा ध्यास! संगीतकार गाऊन दाखवताना ते गाणं वीस टक्के असेल तर दीदी गाताना ते शंभर टक्के व्हायचं. पूर्णत्व यायचं गाण्याला! संगीतकाराच्या मनात ते गाणं कसं आहे ते ओळखून गाणाऱ्या गायिका म्हणजे लतादीदी. गाणं या पाचही मंगेशकरांचा प्राण! मात्र कधीही स्वत:च्या गाण्याची, आवाजाची तारीफ करणं नाही. जे काही मिळालं, यश मिळालं ते सगळं उपरवाले की देन है, हाच विनम्र भाव! काय माझा पुण्यसंचय आहे माहीत नाही; पण लतादीदी आणि आशाताईंचे आशीर्वाद मला मिळाले.

मी कार्यक्रमातून, चित्रपटांतून 'जुम्मा चुम्मा', 'खईके पान' यांसारखी हलकीफुलकी, मजेच्या मूडची गाणी गातो, स्टेजवर धमाल मजामस्ती करतो खरा; पण माझा मूळचा स्वभाव शांत आहे. मला पार्ट्यांना जायला आवडत नाही, मोठमोठ्या कार्यक्रमांत मिरवायला आवडत नाही. एक टीव्ही आणि आवडीचं खाणं देऊन अगदी कोंडून ठेवा एका खोलीत – मी रमतो माझा माझ्यात! वॉकला जात असेन, गाडी चालवत असेन, एकटा असेन तेव्हा माझ्यासोबत असंख्य गाणी असतात – दीदींची, किशोरदा, रफीसाहेब, मुकेशजी यांची. आणि कोणती? तर त्यांनी गायलेली सगळी 'दर्दभरी गाणी'. दीदींची अशी गाणी ऐकताना डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहतात, मन शुद्ध आणि शांत होत जातं. ही हृदयाशी संवाद करणारी गाणी मला प्रेरणा देतात, स्फूर्ती देतात.

हजारो, लाखो, अगणित वर्षं, युगं लोटतील; पण 'लता मंगेशकर' पुन्हा होणार नाहीत! दीदींनी गायलेली गाणी अजरामर आहेत. माझं भाग्य की 'लता मंगेशकर' या साक्षात्काराचा अनुभव मी घेतला!

**– सुदेश भोसले**

**शब्दांकन – अस्मिता पांडे**
asmitaspande@gmail.com



आनंदजी शाह

# आता राहिल्या फक्त आठवणी

**मला** अनेक जण विचारतात लतादीदींना सर्वप्रथम भेटलात तेव्हा तुम्हाला भीती वाटली होती का? लता मंगेशकर एक गायिका म्हणून स्थापित झाल्या होत्या आणि तुम्ही संगीतकार म्हणून कारकीर्द सुरू करणार होता तेव्हा तुमची स्थिती कशी होती? यावर मी एवढंच म्हणू इच्छितो, की भीती वाटण्याचा संबंधच नव्हता. लताची आणि आमची भेट सर्वप्रथम नक्की कधी झाली ते आता आठवत नाही, पण अगदी लहानपणापासूनच आमचं एकमेकांकडे येणं-जाणं होतं. लता नानाचौकात राहायची आणि आम्ही गिरगावात. तेव्हा आमचं वय ८-९ वर्षांचं असेल. ती लता मंगेशकर नव्हती आणि आम्ही कल्याणजी-आनंदजी नव्हतो तेव्हापासूनची आमची ओळख आहे. आमच्या नेहमी गप्पा व्हायच्या. ती हळूहळू मोठी झाली आणि इथे पेडर रोडला राहायला आली. आणि आम्हीही काही काळानं चार इमारती सोडून तिच्याजवळ राहायला आलो. आम्ही जवळ राहायचो त्यामुळे एकमेकांकडे येणंजाणं व्हायचं. काय चाललंय, कसं चाललंय; ट्रेन मिळाली की नाही, ५.१७ ची ट्रेन घ्यायची होती पण ती गेली मग दुसरी पकडली, अशा गोष्टींवर आमची चर्चा व्हायची. पूर्वी साउंडप्रूफ स्टुडिओ नसल्यानं रात्रीचं रेकॉर्डिंग व्हायचं. त्यामुळे लता रात्रीच्या वेळी रेकॉर्डिंगला जायची. त्या काळात जिथे शूटिंग होत असे तिथेच गाण्याचं रेकॉर्डिंग केलं जायचं. हे रेकॉर्डिंग रात्री शूटिंग संपल्यावर केलं जायचं, कारण दिवसा रेकॉर्डिंग केलं तर बाहेरचे आवाज यायचे. रात्री नऊच्या नंतर रिहर्सल व्हायची आणि मग गाणी रेकॉर्ड व्हायची. पूर्वी लहान म्हणजे अगदी २-३ मिनिटांची गाणी तयार व्हायची तेव्हापासून आमची ओळख होती. त्यामुळे आम्ही संगीतकार झाल्यानंतर त्यांच्याकडून पहिल्यांदा गाणं गाऊन घेताना आम्हाला जराही भीती वाटली नव्हती. 'सम्राट चंद्रगुप्त' चित्रपटाला कल्याणजी वीरजी शाह या नावानं आम्ही संगीत दिलं होतं. या चित्रपटातील 'चाहे पास हो चाहे दूर हो' हे लतानं आमच्यासाठी गायलेलं पहिलं गाणं. मोहम्मद रफी आणि लता यांचं हे ड्युएट होतं.

गाण्यांसाठी आमची सीटिंग व्हायची. लताची खासियत म्हणजे जे गाणं गायचं आहे त्याची सगळी माहिती ती घ्यायची. रेकॉर्डिंगच्या आदल्या दिवशी येऊन गाणं न्यायची. गाणं नायिकेवर आहे, वृद्ध नायिकेवर आहे, मुलांचं आहे, याची माहिती घ्यायची. कारण प्रत्येक व्यक्तीसाठी गाणं वेगळ्या पद्धतीनं गाणं आवश्यक असायचं, आणि त्यानंतर गाणं गायची. गाण्यात कधी पंजाबी, कधी गुजराती, कधी मराठी भाव असायचा, त्याचा लहेजा वेगळा असायचा, तो लक्षात घेऊन ती गायची. शब्द तेच असायचे, संगीतही तेच असायचं, पण गाण्याचा अंदाज वेगळा असायचा. ती तसं गायची म्हणून ते गाणं त्या सिच्युएशनला सूट व्हायचं.

लताचं एक वैशिष्ट्यं होतं. एखादा नवीन संगीतकार आला, की त्याला काम करणं सहजसोपं जावं असा प्रयत्न ती करायची. नवीन संगीतकाराला आदरानं वागवत असे. त्यांची चांगली विचारपूस करायची. गाण्याच्या बाबतीत संगीतकाराला काय हवंय याची माहिती घ्यायची. मोठी गायिका आहे म्हणून स्टारडम दाखवण्याचा प्रयत्न लतानं कधी केला नाही. संगीतकाराला गाण्यात जे हवं तेच लता शंभर टक्के द्यायची. संगीतकारानं जसं सांगितलं तसं गाणं गाऊन ती संगीतकाराला समाधान द्यायची. गाणं झाल्यावर गाणं बरोबर झालंय का, अजून काही हवं आहे का, असंही विचारायची. अंगी नम्रपणा कसा असावा हे आम्ही तिच्याकडूनच शिकलो. एवढंच नव्हे; तर नवीन लोकांशी कसं वागायचं याचे धडेही आम्ही लताकडूनच घेतले. लता फार कमी बोलायची. माझ्याशी तर फार कमी बोलायची. कल्याणजीभाईंशी तिचं जास्त बोलणं व्हायचं. संगीताव्यतिरिक्त विविध विषयांवरही आमच्या गप्पा व्हायच्या.

त्या काळी कोणामध्ये इगो नसायचा. सगळे एकमेकांशी मिळूनमिसळून राहायचे आणि काम करायचे. उदाहरण द्यायचं तर- एक मोठा स्टेज शो होता. किशोरकुमार मुख्य गायक होता. मात्र ऐनवेळेला त्यानं काही कारणास्तव येणार नाही असं सांगितलं. तेव्हा

आरडी बर्मन आणि आशा भोसले यांनी सांगितलं की आम्ही येतो. आम्हाला कार्यक्रमाला बोलावलं नाही तर आम्ही का येऊ असा इगो तेव्हा नव्हता. एकमेकांना मदत करण्यास सगळे तयार असत. लतानंही माझी गरज असेल तर सांगा मी येईन असं सांगितलं होतं.

लताचं कामावर म्हणजेच गाण्यावर प्रचंड प्रेम होतं. याचं एक छोटंसं उदाहरण द्यावंसं वाटतंय. आम्ही एक चित्रपट करत होतो 'कोरा कागज'. या चित्रपटातील 'रुठे रुठे पिया मनाऊ कैसे' हे गाणं लताला गायचं होतं. गाण्याच्या रेकॉर्डिंगची वेळ ठरली होती, पण त्यावेळेसच लता आजारी होती. ताप आला होता. निर्माता बिचारा लहान होता. त्यानं जया बच्चन यांची डेट घेतली होती त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत गाणं रेकॉर्ड करायचंच होतं. तेव्हा शूटिंगच्या वेळेसच रेकॉर्डिंग केलं जात असे हे मी अगोदर सांगितलंच आहे. ताप असल्यानं रेकॉर्डिंगला येणार नाही असं लतानं कळवलं होतं. मी लताला म्हटलं आमची गाणी साधी असतात. तुला काहीही त्रास होणार नाही. एकदा येऊन एक टेक देऊन जा मग नंतर ते पुन्हा रेकॉर्ड करू. आमचं ऐकून लता आली आणि एकाच टेकमध्ये गाणं गायलं. तो टेकच आमच्यासाठी ओके होता. आणि विशेष म्हणजे या गाण्यासाठी लताला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

लताला एखादं गाणं सांगितलं की ती त्यातील कुठल्या शब्दावर जोर दिला पाहिजे हे विचारायची. कारण संगीतकारानं प्रत्येक शब्दाबाबत काहीतरी ठरवलेलं असतं. तसंच, एखादं गाणं लताला दिलं, की ती त्या गाण्यावर थोड्या थोड्या अंतरावर लाईन ओढायची. मी एकदा विचारलं, असं का? तेव्हा लतानं सांगितलं, गाणं गाताना ब्रीदिंग स्पेस कुठे घ्यायची ते मी मार्क करते. यातूनच लता गाण्याबाबत किती विचार करायची ते दिसून येतं. असे अनेक गायक आहेत जे गाणं गाताना ब्रीदिंग कुठे करायचं याकडे लक्षच देत नाहीत. गाणी गातात. मग मध्ये थकतात आणि मग थंड पाणी प्यायल्यानं आवाज बसलाय, सिगारेट ओढलीय त्यामुळे माझा आवाज बसलाय अशी कारणं देतात. लता असं कधीच करत नव्हती. त्यामुळेच ती लता आहे.

आम्ही जवळजवळ चाळीस वर्षं एकत्र काम केलं. लता मंगेशकरसोबत इतके दिवस काम केलं याचा मला अभिमान वाटतो. तिच्यासोबत गाणी बनवण्याचा आनंद आम्ही घ्यायचो. लताचं अनेक भाषांवर प्रभुत्व होतं. तिनं कच्छी भाषेत गाणं गावं अशी आमची नेहमीच इच्छा होती. पण आम्ही ते या आयुष्यात करू शकलो नाही. खरं तर लताही कच्छी भाषेत गाण्यासाठी उत्सुक होती. कारण याच भाषेत तिनं कधीही गाणं गायलं नव्हतं. लता कुदरत की शक्ती थी, कुदरत में वापस चली गई. तिच्याशिवाय जग पुन्हा संगीतमय होणार नाही, असं माझं मत आहे.

लताबरोबर गाण्यांच्या बैठकी व्हायच्या, पण त्यात असामान्य असं नसायचं. अत्यंत खेळीमेळीनं काम व्हायचं. तिच्यासाठी गाणं बनवताना आम्हाला विचार करावा लागायचा नाही. कोणतंही गाणं ती अत्यंत लीलया गायची. ती गाऊ शकणार नाही असं काहीही नव्हतं. आम्हाला कधी कधी इतर गायकांसाठी विचार करावा लागायचा, पण तिच्यासाठी कधीच असा विचार करावा लागला नाही. लताचं आणखी एक वैशिष्ट्यं म्हणजे ती गाण्यांची रिहर्सलही फार कमी वेळा करी. एका टेकमध्येच ती गाणं ओके करत असे. एखाद्या वेळेस, तिला वाटलं तरच, ती रिहर्सलसाठी विचारायची. गाण्यांचे शब्द, चित्रपटातील सिच्युएशन, गाणं कशा प्रकारचं आहे म्हणजेच प्रेमगीत, विरहगीत, मस्तीतलं आहे का, गाण्यात भावना कोणत्या हव्यात याचा विचार करायची आणि ते कोणावर चित्रित केलं जाणार आहे हेसुद्धा पाहायची आणि त्यानंतर गायची. त्यामुळेच ज्या नायिकेसाठी लता गाते ते गाणं त्या अभिनेत्रीचंच आहे असं वाटत असं. लताची हीच खासियत होती. आम्ही तयार केलेल्या गाण्यांचा दर्जा ती वाढवत असे. लताला नेहमीत आमच्यासारख्या जुन्या सहकाऱ्यांसोबत काम करताना आनंद वाटत असे. तिनं नवीन संगीतकारांसोबत काम करण्याचाही अनुभवही घेतला. इतर अनुभवी सहकाऱ्यांशी जशी वागेल तशीच ती त्यांच्याशीही वागायची.

तिच्यासोबत आम्ही ३५०च्या आसपास गाणी केलीत. प्रत्येक गाणं आमच्यासाठी एक वेगळा अनुभव असायचा. त्यामुळे लतानं आमच्यासाठी गायलेल्या गाण्यांमधून तिची सर्वोत्कृष्ट गाणी निवडणं अवघड आहे. अगदी 'सरस्वती चंद्र'मधील 'चंदन सा बदन'पासून, 'हम थे जिनके सहारे' आणि इतर प्रत्येक गाणं तिनं तिच्या आवाजानं खास बनवलं आहे. काही वर्षांपासून लतानं गाणं बंद केलं होतं. त्यामुळे चांगली गाणी ऐकायला येणं बंद झालं आहे हे तुमच्या लक्षात आलंच असेल. लतासोबत काम केल्याचा आम्हाला अभिमान आहे. आम्ही मजेत काम करायचो. एक आपलेपणा होता.

लतासोबतच्या असंख्य आठवणी आहेत. आता त्यांना खूप मिस करणार आहोत.

**शब्दांकन – चंद्रकांत शिंदे**
shindeckant@gmail.com



मला जर कोणी विचारलं आकाशात देव आहे का, तर मी सांगीन मला माहीत नाही. मला माहीत आहे एकच, की या आकाशामध्ये सूर्य आहे, चंद्र आहे आणि लताचा स्वर आहे. दिवस–रात्र कुठलीही अशी वेळ नाही, असा क्षण नाही, की लताचा स्वर कुठून तरी कुठेतरी जात–येत असतो.

**– पु.ल. देशपांडे**



प्यारेलाल शर्मा

# लव्हाळ्यांचं वृक्षांत रूपांतर झालं...

**लतादीदी** आणि आम्ही दोघं (संगीतकार लक्ष्मीकांत कुडाळकर आणि मी) – आम्हांला आमच्या प्रतिभेनं, परिश्रमानं काम मिळालं, पण आम्ही राखेत पडलो होतो तेव्हा आमच्यावर फुंकर मारून, आमचं बोट पकडून आम्हाला मार्गाला लावणाऱ्या दीदी होत्या हे मी कसं विसरणार? दीदी लक्ष्मीकांतला म्हणे, 'अरे, ऐन दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी तुझा जन्म झाला म्हणून तुझं नाव लक्ष्मीकांत असं ठेवलं, नावातच लक्ष्मी आणि बुद्धीत सरस्वतीचा वास... तुला आयुष्यात पुढे काहीही कमी पडणार नाही बघ!'

आणि तसंच झालं. दीदी रत्नपारखी होत्या. आमच्या दोघांतील संगीतप्रतिभा त्यांनी वेळीच जोखली. आम्ही १२-१३ वर्षांचे असल्यापासून दीदींचं अनमोल मार्गदर्शन लाभलं आणि दीदींमुळेच लव्हाळ्यांचं वृक्षात रूपांतर झालं.

मुंबईत कुलाबा विभागात एका संगीतजलशात दीदी प्रमुख पाहुण्या म्हणून गेल्या होत्या. ते वर्ष कुठलं हे मला आता स्मरत नाही. ह्याच जलशात बारा वर्षांचा लक्ष्मीकांत मॅन्डोलिन वाजवण्यात देहभान हरपून गेल्याचं दीदींनी पाहिलं. इतक्या लहान वयात त्याचं वाद्य आणि सुरांवर असलेलं असामान्य प्रभुत्व दीदींना समजण्यास वेळ लागला नाही. लक्ष्मीकांत आणि मी, आमची आर्थिक परिस्थिती बेतास बात असल्यानं कमावणं गरजेचं होतं हे दीदींना समजल्यावर त्यांनी त्याला संगीतकार सी. रामचंद्र, नौशाद, शंकर-जयकिशन यांच्याकडे पाठवलं. त्यांच्या ताफ्यात लक्ष्मीकांत साहायक म्हणून काम करू लागला. रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये लक्ष्मीकांत इतर प्रौढ वादकांसोबत रेकॉर्डिंगला बसे तेव्हा त्याची उंची माईकपर्यंत पुरत नाही, त्याला त्याचे मंडोलिनचे सूर माईकपर्यंत पोचवण्यास त्रास होतोय हे दीदींच्या ध्यानात आलं आणि त्याच्यासाठी एका उंच आसनाची सोयदेखील दीदींनी करवली.

दीदी आणि त्यांचे मंगेशकर कुटुंबीय ह्यांनी 'सुरीला बालकेंद्र'ची स्थापना केली होती. लक्ष्मीकांत आणि त्याचे मोठे बंधू शशिकांत, मी, माझे धाकटे भाऊ गणेश, गोरख असे सगळे दीदींच्या ह्या केंद्रात संगीत शिकत असू. त्या काळात हे केंद्र दीदींच्या घरी चाले. संगीताची शाळाच जणू! ह्या शाळेनंदेखील माझ्यावर खूपसे संस्कार केलेत.



लक्ष्मीकांत, लता मंगेशकर आणि प्यारेलाल

जीवनाच्या एका टप्प्यावर आमच्या लक्षात आलं, हिंदी चित्रपटांत अतिशय प्रोफेशनल आणि निष्णात ॲरेंजर आणि व्हायोलनिस्ट अँथनी गोन्साल्विस आहे, त्याच्याकडून व्हायोलिनचे धडे गिरवणं आमच्यासाठी आवश्यक आहे. अँथनी प्रभादेवीला अहमद मॅन्शनमध्ये राहत असे. मी माझ्या घरून सकाळी सहा-सातला निघत असे, ठीक सात वाजता अँथनीकडे त्याच्या घरी पोचत असे. सकाळी सात ते नऊ तो मला व्हायोलिन शिकवी

आणि मग नऊ वाजता मी त्याच्या घरून निघून साडेनऊ ते दहापर्यंत रेकॉर्डिंग स्टुडिओत संध्याकाळी सहापर्यंत काम करी. संध्याकाळी सात ते नऊ मी रात्रशाळेत जात होतो. थकूनभागून घरी दहा ते साडेदहापर्यंत पोहोचे. दीदींचा आग्रह आणि कटाक्ष होताच आम्ही शालेय शिक्षण सोडू नये. दीदींना फार लवकर शाळा सोडावी लागली आणि कुटुंबाचा भार त्यांच्यावर आला होता, म्हणून होतकरू विद्यार्थिदशेतील मुलांसाठी त्या कासावीस होत. मला आणि लक्ष्मीकांतला दीदींनी शिकता शिकता कुटुंबाला हातभार लावण्याचा सल्ला दिला तो ह्याचसाठी!

(१९७७ मध्ये आम्ही संगीत दिलेल्या 'अमर, अकबर, अँथनी' ह्या फिल्मध्ये ह्या शीर्षकगीत आहे. तोच संदर्भ ह्या अँथनी गोन्साल्विसचा!)


लतादीदींनी आम्हाला अनेक गुरुमंत्र दिलेत – जीवनविषयक अनेक उच्च मूल्यं आम्ही त्यांच्याकडून शिकलोय. त्या नेहमी म्हणत, आयुष्यात कितीही मोठे झालात तरी विद्यार्थिदशा सोडू नका. शिकत राहिलात तर ते संचित गंगाजळ बनेल.

खरंच लता मंगेशकरांमध्ये आम्ही आमच्या मातेचं, बहिणीचं, गुरूचं, गॉड मदरचं, देवी सरस्वतीचं अशी अनेक रूपं पाहत गेलो. आज एका सत्य गोष्टीचा मी उलगडा केल्यास कुणाला सांगून खरं वाटणार नाही –१९६३ ह्या एकाच वर्षात दीदींनी आमच्यासोबत सहाशेपेक्षा जास्त गीतं गायलीत! आहे ना रेकॉर्ड!



लता मंगेशकर ह्यांनी त्यांच्या कारकिर्दीत पन्नास हजारांपेक्षा अधिक गीतं ध्वनिमुद्रित केलीत. हिंदी चित्रपटांसाठी दीदींचा सर्वाधिक गीतं आमच्यासोबत गाण्याचा रेकॉर्ड आहे. लता मंगेशकर यांना आमच्यासोबत काम करणं अधिक आवडे, त्याला एक ठोस कारणही आहे. मुळात त्यांना रागदारी असलेली गाणी गाणं अधिक आव्हानात्मक वाटे. आमची खूपशी गाणी विविध रागांवर बेतलेली असत. सध्या हा ट्रेंड फारसा राहिलेला नाही कारण संगीत–गाणी हा सिनेमाचा आत्मा असतो, पण हल्ली एक तर सिनेमात गाणी काही प्रमाणात नामशेष होताहेत, तर एका सिनेमासाठी तीन ते चार संगीतकार असण्याचा नवा ट्रेंड सुरू झालाय. असो. आमच्या 'सती सावित्री' ह्या फिल्मची गाणी भरत व्यास ह्यांनी लिहिली होती. ह्यातील 'जीवन डोर तुम्ही संग बांधी' हे गीत राग यमनकल्याणमध्ये आम्ही बसवलं होतं, हे गीत दीदींना खूप आवडे. आम्हीच दीदींची आवड लक्षात घेऊन राग शिवरंजनीमध्ये गीत स्वरबद्ध केलं. 'लुटेरा' ह्या फिल्ममध्ये एकूण सहा गाणी होती, पण प्रत्येक गीत वेगळ्या रागातलं होतं. एक गझल, एक अरेबियन फोक, एक कॅब्रे तर एक रोमँटिक. दीदींना अशी गाणी एका वेगळ्या उंचीवर नेत असत. गायिका म्हणून त्यांचा कस लागे, त्यातील क्लासिकल फॉर्ममुळे! 'सनम राह भूले यहां' हे त्यांचं आवडतं गाणं होतं, ज्यात आम्ही गिटार, मेंडोलिन, व्हायोलिन अशा अनेक वाद्यांचा प्रयोग केला होता. दीदींना वाद्यांचीदेखील गहिरी समज होती. जे वाद्य चपखल वाटे त्या खुणेनं किंवा चक्क बोलून आपल्या भावना व्यक्त करत. १९७०मध्ये रिलीज झालेल्या 'अभिनेत्री' ह्या फिल्ममध्ये हेमामालिनी ह्या तेव्हा नवोदित असलेल्या अभिनेत्रीवर चित्रित झालेलं गाणं 'ओ घटा सांवरी, थोडी थोडी बावरी' हेदेखील दीदींचं लाडकं गीत होतं! ह्यातही व्हायोलिन, फ्लूट, संतूर अशा वाद्यांचा समतोल राखत गाणं बहारदार झालं आहे. दीदींनी त्यांच्या कारकिर्दीत कॅब्रे गाणी खूप कमी गायलीत, पण १९६७ मध्ये रिलीज झालेल्या 'नाईट इन लंडन'मध्ये हेलनवर चित्रित झालेल्या 'मेरा नाम है जमीला' हे कॅब्रे गीत मी कसं गायलेय म्हणून दीदी साशंक होत्या! मैने ठीक गाया न? असा प्रश्न रेकॉर्डिंग स्टुडिओत विचारणाऱ्या दीदींचा निरागस चेहरा आजही डोळ्यांसमोरून हलत नाही!

**शब्दांकन – पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com



दीदींबद्दल सांगायचं तर,
आम्ही चार शिष्य, दहा शिष्य घडवतो.
दीदींनी चार पिढ्या घडवल्या आहेत.

**– पं. जसराज**



सुरेश लोटलीकर

कॅरिकेचर (अर्कचित्र) काढणं सोपं नाही. ते फक्त कौशल्य नाही. व्यक्तीचं हुबेहूब विडंबनचित्र म्हणजे अर्कचित्र नव्हे. अर्कचित्रेसुद्धा सुचावीच लागतात. अर्कचित्रकारस चेहऱ्याची मोडतोड करत नाही तर तो नवीन चेहरा रचतो. लताबाईंचा चेहरा हे अर्कचित्रकाराला आव्हान आहे. लताबाईंचे फोटो त्यांच्या गाण्याप्रमाणेच सदाबहार आणि अतिशय प्रसन्न. त्यांच्या गाण्यातील नित्य ताजेपणा त्याचबरोबर लोकांच्या हृदयातील त्यांचं अढळस्थान व्यक्त करायचा हा प्रयत्न. मूळ चित्र रंगीत आणि बऱ्याच वर्षांपूर्वीचं. खूप प्रयत्न करूनही त्यात बदल करावासा वाटत नाही.





**सुरेश वाडकर**

# सरस्वतीमाँ!

**सुरेख** मैफल सुरू आहे. गाणे संपते. संपूर्ण प्रेक्षागृह उठून उभे आहे. टाळ्यांचा गजर सुरू आहे. लतादीदी नमस्कार करून मागे वळताहेत. त्या आत येतात आणि खुर्चीवर न बसता जमिनीवर बसतात. दीदी हे काय?... मी अचानक भानावर येतो आणि हे स्वप्न होते हे माझ्या लक्षात येते. दीदी माझ्या घरी आल्यावर ज्या ठिकाणी बसत तिथे माझी नजर जाते. मी गहिवरतो. त्या नाहीत असा विचार कसा करायचा? She was म्हणणे शक्यच नाही.



She is हेच म्हणणार मी. त्यांना गाडीतून जाताना नुसते पाहायला मिळाले तरी जागीच खिळून उभे राहायचो आम्ही पोरवयात. त्यांच्याबरोबर मी गाणी गाऊ शकलो, त्यांचे प्रेम अनुभवले, गाण्याच्या मंदिरातील माझी देवता त्या, त्यांचे दैवी गाणे जवळून न्याहाळले आणि त्यांचे थोर माणूसपणही अनुभवले. ह्यापरते भाग्य कोणते? त्यांच्या गाण्याचा विचार तर मी सतत करत असतो. तासन् तास त्यांची गाणी मी ऐकत असतो. अशा अलौकिक गाण्याला काही मोजमाप नसते. त्यांनी जे गाणे गायले ते संपूर्ण गाणे होते. ते गाणे म्हणजे पूर्णविराम. त्या म्हणजे अवतारी मानव आहेत असे मी मानतो. बियॉन्ड ह्युमन लेवल. देवाने त्यांना 'जा तू आणि गा' असे म्हणूनच पाठवले. त्यांचे गाणे हे लौकिकतेच्या कसोटीत किंवा आपल्या कल्पनांच्या कवेत मावत नाही. ते परिघाबाहेरचे गाणे होते. अगदी उत्तमोत्तम, प्रतिभावंत गायक आपण म्हणूया की ९२-९५ टक्के गाणे गातात तर दीदी १२५-१५० टक्केचे गातात. अर्थात हे आपल्याला समजावे म्हणून म्हणायचे. एरवी अवतारी गाण्याचे काय आणि कसे मोजमाप करायचे? त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीमुळे, दीनानाथ मंगेशकरांचे छत्र हरपल्यामुळे, अवघ्या बाराव्या वर्षी त्या कुटुंबाचा आधार बनल्या. त्यामुळे त्यांना इतरांप्रमाणे गुरूकडे रियाज करणे, तालीम घेणे हे मिळालेच नाही. नाही म्हणायला त्या अमानत अलीसाहेबांकडे शिकल्या. पण तरी अशा प्रकारच्या शिक्षणाला जी स्वस्थता हवी ती त्यांच्या परिस्थितीमुळे त्यांना मिळाली नाही. परंतु त्यांचे जे गाणे आहे, ते शिकवून गायलेले गाणे नाही. एखाद्या तयारीच्या गाणाऱ्याच्या गाण्यात त्याची तयारी दिसते. दीदींच्या गाण्यात जी सहजता आहे ती दैवी आहे. ते येताना लावण्य घेऊन आलेले गाणे आहे. त्या जातिवंत गाण्याला वरून कुठल्याही मेकअपची, सजवण्याची, अलंकरणाची गरजच नाही. त्या गाण्याच्या सौंदर्यात कोणताच बेगडीपणा नाही.

मला तर प्रामाणिकपणे असे वाटते की मोनालिसापेक्षा अधिक सुंदर स्त्री कोणी असेल तर त्या लता मंगेशकर आहेत. माझ्या दृष्टीने त्या जगातील सगळ्यात सुंदर स्त्री आहेत. कारण त्यांचे गाणे,

वागणे, जगणे निखळ आहे, खरे आहे आणि म्हणून सुंदर आहे. त्यात कुठेही बेगडीपणा नाही.

त्यांच्या गाण्याला अमरत्वाचा स्पर्श आहे, ते गाणे कालातीत ठरते, हा त्यांचा खास 'लता टच' आहे. त्यांनी जे गाण्यातील रेकॉर्ड केले आहे, त्याच्या आसपास पोहोचण्याचा विचारही करता येत नाही. मी तर म्हणेन त्यांच्या लोकप्रियतेतही तो नव्हता. लोक स्वतःला प्रकाशझोतात आणण्यासाठी काय काय करतात हे आज तर आपण पाहतोच आहोत. मी त्यांची देश-विदेशातील प्रसिद्धी जवळून अनुभवली आहे. जगातल्या कोणत्याही एअरपोर्टवर मी त्यांच्याबरोबर उतरलो की अनुभव यायचा की त्यांच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दुतर्फा लोक उभे असायचे. त्यांची शानदार लेमोझिन रस्त्याने जायची तेव्हा वाटायचे कोणी साम्राज्ञी निघाली आहे. त्यांना नुसते पाहून लोकांच्या डोळ्यांत पाणी असायचे. त्याचबरोबर, प्रसिद्धीच्या शिखरावर असताना सहकलाकारांना किती सन्मानाने, आपुलकीने वागावावे हे त्यांच्याकडून शिकावे. मला आठवतेय, त्या सहसा हॉटेलमध्ये रूमवरच जेवण मागवायच्या. मला त्यांचा फोन येई, 'सुरेश, छान प्रॉन्स मागवलेत. तुम्हाला आवडतात ना! या, एकत्र जेवू!' मी इतर खूप कलाकारांबरोबर काम केले आहेच की! पण असे कोण वागते! गाडीत बसतानाही त्या आमची व्यवस्था नीट झाली ना पाहायच्या मगच स्वतः बसायच्या. ज्या ठिकाणी आपण आलो आहोत तिथली महत्त्वाची ठिकाणे सगळ्यांनी बघणे असो, खरेदीला जाणे असो, सगळ्यांना सामावून घेऊनच त्या आखणी करणार. ह्यातही एक विलक्षण गोष्ट जी मी अनुभवली ती सांगतो. ह्या श्रीमंत वातावरणात, सुखासीनतेत कोणीही हरवून जाईल. सहज शक्य आहे ते. पण तुम्हाला सांगतो, मी सकाळी उठून हॉटेलच्या पॅसेजमध्ये फिरत असताना त्यांच्या रियाजाचे सूर ऐकू आले आणि मी मनातून थरारून गेलो. आपण त्यांच्या गाण्याचा दैवी म्हणून गौरव केला तरी त्यामागची मेहनत कदापि दुर्लक्षित करता येत नाही. गाणे हा त्यांचा श्वास होता. सतत गाण्याचे चिंतन सुरू असायचे. प्रवासातही गाणे ऐकणे सुरूच असायचे. सहसा क्लासिकल किंवा वाद्यसंगीत ऐकत असायच्या. बडे गुलाम अली खांसाहेब, सलामत अली - नजाकत अली खांसाहेब, आमीर खांसाहेब अतिशय आवडीने ऐकायच्या. संगीताच्या क्षेत्रातले त्यांचे लहानपणापासूनचे दैवत म्हणजे कुंदनलाल सेहगल. पुढेही सेहगलचे गाणे हा त्यांच्यासाठी भक्तीचा विषय राहिला. सेहगलसाहेबांनी त्यांना एक अंगठी भेट दिली होती. रेकॉर्डिंगला अनेकदा ती त्या आवर्जून घालून येत. पुढे त्यांनी अनेकांना संगीतातून आदरांजली वाहिली त्यात सेहगलसाहेबही होते. महेदी हसन ह्यांची गाणी ऐकत. त्यांच्याशी तर फोनवरून गाण्याविषयी गप्पाही होत त्यांच्या. पाश्चात्त्य संगीतही आवडीने ऐकायच्या आणि गायच्याही. पाश्चात्त्य सुरावटीही त्यांच्या गळ्यातून खुलून येत. गाण्याव्यतिरिक्त त्यांना दुसरे जगच नव्हते. माझे भाग्य की मी त्यांच्या सहवासात दीर्घकाळ घालवला. त्यांच्याबरोबर खूप फिरलो. त्यांना व्यग्र शेड्युलमध्ये थोडा वेळ मिळाला, उसंत मिळाली की कोल्हापूरला जायला आवडे. गाडी काढत, घरून सुरेख सँडविचेस पॅक करून घेत आणि मग गप्पा मारत-गाणी ऐकत कोल्हापूरला जात. मी त्यांच्याबरोबर गेलो आहे. ह्या प्रवासात त्या बालपणीच्या कितीतरी जुन्या आठवणी सांगण्यात रमून जात. कशा त्या झाडावर चढायच्या ते सांगायच्या. भावंडांच्या लहान वयातल्या गमतीजमती सांगायच्या. मग रंगात येऊन त्या नकला करत. किती मिश्किल होत्या त्या. त्यांच्या खळखळून हसण्याचा तो प्रसन्न स्वर आजही माझ्या कानात आहे.

आज मागे बघताना वाटते की असे गाणे, इतकी वर्षे सातत्याने अधिराज्य करणे हे कसे शक्य आहे? हे यश, हा रुतबा, हा सन्मान, अशी कारकीर्द पुन्हा होणे नाही, हे निर्विवाद सत्य आहे. अनेकांना वाटते ते, की त्या होत्या म्हणून इतर गायिकांना कमी संधी मिळाली का? मला तर हे तर्कटच हास्यास्पद वाटते. सूर्य होता म्हणून काजवे चमकले नाहीत, या धर्तीची ही तक्रार आहे. त्यांच्याच इतके यश आशाबाईंनी आपल्या जिद्दीवर स्वयंभूरीत्या कमावले. हृदयनाथ मंगेशकरांसारखा प्रतिभावंत संगीतकार त्यांचा लाडका धाकटा बंधू. त्यांनीही यश मिळवले ते स्वकष्टाने. लतादीदींना मिळालेल्या प्रदीर्घ यशाचे कारण केवळ आणि केवळ गुणवत्ता आहे. त्यांच्या यशात इतरांनी आपल्या अपयशाची कारणे शोधणे मला पटत नाही. त्यांचे गाणे ऐका आणि तसे गायचा प्रयत्न करा, तुमचे तुम्हालाच कळून येईल. मी त्यांची गुणग्राहकता पाहिली आहे, अनुभवली आहे. कधी रफ ट्रॅकसाठी गायलेले एखाद्या गायिकेचे गाणे आवडले तर त्या नवोदित गायिकेचे गाणे ठेवा असा आग्रहही त्यांना धरला आहे. माझे गाणे आवडले तर अनेक संगीतकारांना त्यांनी स्वतःहून माझे नाव सुचवले. मला वाटते, गाणे हेच त्यांचे जग होते, जे अलौकिक होते. त्यांना लौकिक जगाच्या ह्या असल्या कद्रूपणाची ठिगळे जोडू नयेत. त्यांना रेकॉर्डिंग रूममध्ये पाहावे, आता आठवावे म्हणावे लागेल, पण त्या अनुभवापुढे दुसऱ्या कशाचेच मोल उरत नाही. त्यांचे 'सावरे सावरे' ऐका. तशी तान घेणे रियाजी गळ्यालाही शक्य नाही. बर्मनदादा असतील, रोशनसाहेब असतील किंवा दीदींचे लाडके मदनभय्या, किंवा त्या काळातील कोणीही संगीतकार दीदी



लताचा स्वर हा शतकाशतकांतून एकदाच निर्माण होणारा स्वर आहे. तसा स्वर पुन्हा सिद्ध होणे अवघड नव्हे, अशक्य आहे. मी ज्यावेळी इतर देशांतून हिंडत असतो त्यावेळीही लता माझ्यापासून दूर आहे असे मला कधी वाटतच नाही.

**- शिवाजी गणेशन**

व्यग्र असतील तर महिना-महिना रेकॉर्डिंगसाठी थांबायचे, कारण त्यांना खात्री असायची, आपल्या गाण्याला दीदींइतका न्याय कोणी देऊच शकत नाही. त्यांच्या गाण्यावर 'लता' नावाची लफ्फेदार सही असायची. 'सुरमयी शाम' या गाण्याच्या रेकॉर्डिंगची गोष्ट सांगतो. ते गाणे आधी मराठीत मीच हृदयनाथजींकडे गायले होते. शांताबाई शेळकेंची गीतरचना होती - 'स्पर्श सांगेल सारी कहाणी.' ती मराठी फिल्म प्रकाशात आली नाही मग ती चाल 'लेकिन'साठी वापरायचे ठरले. त्या आवर्जून रेकॉर्डिंगसाठी आल्या होत्या. त्या समोर बसून ऐकत आहेत याचे दडपण कुणाला येणार नाही! मलाही ते आले होतेच. त्यांच्याही ते लक्षात आले असावे. त्यांनी तालीम ऐकली आणि मग त्या उठून माझ्याकडे आल्या, मला म्हणाल्या, 'छान होईल गाणे. मी निघते आता. पण एक सुचवू का?' मी तर सर्द झालो. म्हटले, सांगा ना दीदी. त्या म्हणाल्या, 'तो 'सांस' शब्द आहे ना तिथे त्याचे श्वासपण उच्चारातून जाणवू द्या. पाहा असं..' - असे म्हणून त्यांनी गाऊन दाखवले आणि त्या निघाल्या. मी पाहतच राहिलो. त्यांचे गाणे लोकोत्तर का ठरते तर त्यामागचा विचार इतका खोलवर आहे म्हणून.... म्हणून त्या गानसरस्वती आहेत. कोणतेही हातवारे न करता त्या गात. कुठेही आदळआपट नाही. ताकद लावणे नाही. अचूक स्वर लागणे हेच गाण्याचे गमक आहे असे त्या म्हणत. मग भाव आपोआप प्रकट होतात आणि शब्दांना आपल्या चोचीत अलगद उचलून वेगळ्याच उंचीवर घेऊन जातात. 'दयाघना'च्या रेकॉर्डिंगलाही त्या आल्या होत्या. ती मूळची बाबांची (दीनानाथ मंगेशकरांची) बंदिश होती. त्यामुळे गाणे रेकॉर्ड झाल्यावर त्या खास ऐकायला आल्या होत्या. गाणे ऐकले आणि माझ्या पाठीवर हात ठेवत म्हणाल्या, बाबांची आठवण करून दिलीत, त्यांचाच भास झाला. दीनानाथ मंगेशकरांच्या नावाची पावती; तीही गानसारस्वतीकडून, मला यापेक्षा मोठा दुसरा पुरस्कार मिळाला नाही, मिळणार नाही.

मला आठवते आमचा मोठा दौरा सुरू होता. पॅरिसला कार्यक्रम झाला, पुढचा कार्यक्रम ॲमस्टरडॅमला होता. पुढे अमेरिकेत सात-आठ कार्यक्रम होते. दीदींचे गाणे झाले आणि माझी एंट्री झाली. मी 'मै हूं प्रेमरोगी' गायलो आणि मग 'सीनेमें जलन' गात होतो. गाता गाता सहज विंगेकडे लक्ष गेले तर लतादीदी गाणे ऐकत उभ्या दिसल्या. मी ह्याची कधी कल्पनाच केली नव्हती. मी अक्षरशः सटपटलो. क्षणभर शब्द विसरलो. अर्थात देवाच्या कृपेने लगेचच शब्द आठवले म्हणून निभावले. नंतर मी त्यांना त्याविषयी सहज विचारले तर त्या म्हणाल्या, मला खूप आवडते तुमचे हे गाणे. मी प्रत्येकच प्रयोगाला पटकन माझी तयारी करून हे गाणे ऐकायला धावपळ करून येते. मला सांगा, एक कलाकाराचे याहून मोठे भाग्य काय असेल! हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आणि ममत्व होते. म्हणून तर त्या मां होत्या, माऊली होत्या. अशा कितीतरी विलक्षण आठवणी आहेत. त्यांच्याबरोबर गायलेली हिंदी-मराठी गाणी. ती रेकॉर्डिंग म्हणजे उत्सव असायचा. शेकडो वादक, कोरस असला तरी ३०-४० माणसे सहज... लाइव्ह रेकॉर्डिंग आणि अशा वातावरणात दीदी यायच्या. इतरांनी तीन-चार तालमी आधीच केलेल्या असायच्या, पण दीदी मोजकीच तालीम करायच्या. त्यात गाणे फाईनपासून फाईनरकडे झुकायचे आणि प्रत्यक्ष टेकला त्याचे फायनेस्ट रूप दिसायचे. मधे हास्यविनोद व्हायचा, चर्चा असायची; पण गाणे सुरू झाले की डोळ्यांसमोर अद्भुत घडायचे. त्यांचे गाण्यादरम्यान श्वास घेण्याचे आणि आस टिकवण्याचे तंत्र केवळ लाजवाब होते. त्यामुळे तीन-साडेतीन ओळी त्या सहज एका श्वासात गाऊन जात. गाण्याचे कथेतील स्थान, तो प्रसंग, ती नायिका हे सगळे समजून घेऊन त्या गायच्या. सगळ्या नायिकांच्या त्या उत्तम नकला करत. त्यामुळे पडद्यावरही त्यांचे गाणे त्या नायिकेच्या ढंगाने त्या वळवायच्या. त्यांचे गाणे असे परिपूर्ण होते. त्यांनी क्लासिकलपेक्षा क्लासिक गायले आहे याची पावती अनेक दिग्गज शास्त्रीय गायक मोकळेपणाने देतात. आमच्याच वसंतोत्सवात दीदी आणि अण्णा अर्थात भीमसेन जोशी अशा दोन भारतरत्न ठरलेल्या दिग्गज व्यक्ती एकत्र आल्या होत्या. तेव्हा भीमसेनजी सहजपणे म्हणाले, तुम्ही माझ्यापेक्षा वयाने लहान असाल पण गाण्यात माझ्यापेक्षा ७५ वर्षे पुढे आहात! ही त्यांच्या गाण्याची थोरवी होती. त्या लीलया गायच्या - कारण ती देवाची लीलाच होती. त्यांची गाण्यातील सम दाखवण्याची पद्धत बघा, ते कोणालाच शक्य नाही. ताल सांभाळायचा तर कसा? तो ऐरणीचा ठोका नाही, काळजाचा ठोका आहे. ताल आहे आणि नाही असा त्या तो सांभाळत. काळजाचा ठोका कसा, आत तो सुरूच असतो. मला एकदा त्या म्हणाल्या, मी तालाला कच्ची आहे. मी त्यांना म्हटले का माझी थट्टा करताय? एवढी विनम्रता होती त्यांच्याकडे. त्या सम कशी उचलत, तर खो-खोमध्ये पाठीमागून हात लावून उठवतात तशी. हात लावणाऱ्याला आणि ज्याला उठवले त्याला माहीत असते. पाहणाऱ्यांना वाटते अचानक घडले. तशी सम त्यांची वाट बघत असायची. त्यांच्या गाण्याविषयी काय आणि किती बोलावे. त्या गाण्याचे विद्यापीठ आहेत. आता त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संगीत विद्यापीठ होते आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी ही शिदोरी आहे. हे देवघरचे संगीत आम्ही ऐकले म्हणून आम्ही भाग्यवान. मी तर माझ्याच भाग्याचा हेवा करतो की मला त्यांनी त्यांच्या हातची फिश करी खाऊ घातली आहे. सुख-दुखांच्या क्षणांत सहभागी करून घेतले आहे. मला नेहमी म्हणत - काही नवं रेकॉर्ड करण्याआधी सांगा - आता कुणाला सांगू? काही असे समोर आले की हात फोनकडे आपोआप जातो. पलीकडून आता तो अमृतमय स्वर ऐकू येणार नाही? .. छे... she was म्हणणे शक्यच नाही. मी she isच म्हणत राहीन.

**शब्दांकन - डॉ. समीरा गुजर**
samira.gujar@yahoo.com



**मनोज आचार्य**

# उपजत संस्कारबद्ध कंठ

**लताबाईंचे** स्वरमाधुर्य जगातील कोणत्याही भागाच्या भूगोलात बंदिस्त न होता, ब्रह्माण्डव्यापी होते. त्या कारणानेच त्यांना संगीत जगतात सरस्वतीचा अवतार मानले जाते आणि पूजले जाते. म्हणूनच या आवाजाला संपूर्ण विश्वाचा आवाज 'लता', भक्ती-शक्तीचा आवाज 'लता', प्रेम-विरहाचा आवाज 'लता', सुखाचा-दु:खाचा आवाज 'लता', मनाला आत्मसंतुष्टी देणारा आणि विश्वासाचा एकमेव आवाज 'लता' असे मोठ्या गौरवाने म्हटले जाते. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी, लता नावाचे अलौकिक स्वरमाधुर्य शरीररूपाने जरी लोप पावले तरी या आवाजाने ५०,००० ध्वनिमुद्रित गाण्यांच्या स्वरूपात आपले अस्तित्व अनंतकाळापर्यंत जगभरातील मानवासाठी राखून ठेवले आहे, ते काय थोडे आहे? जीवन अनिश्चित आहे, पण मृत्यू अटळ आहे हे एक जैविक सत्य आहे. जी माणसे लताबाईंसारखी दीर्घायू असतात ती अन्य माणसांच्या तुलनेने अधिक समाधानी असतात. आपण खूप जगलो. समाधानाने जगलो. म्हणून मरणाचे भय त्यांना कधी वाटत नाही. उलट मृत्यूचे स्वागत करायला ती तयार असतात. म्हणूनच हल्लीच एका मुलाखतीत लताबाईंना प्रश्न विचारला गेला होता, की ''तुम्हाला पुन्हा जन्म मिळाला, तर लता मंगेशकरच व्हायला आवडेल का?'' तेव्हा लताबाई तत्काळ म्हणाल्या होत्या, की ''मला पुन्हा जन्म नकोच आहे. जर मिळालाच, तर लता मंगेशकरचा नकोच नको.'' हे त्यांनी अगदी हसतहसत निर्मळ मनाने सांगितले होते. असे उत्तर तीच व्यक्ती सहजपणे देऊ शकते, जिचा आपल्या जगण्याचा आणि अंतर्मनाचा सखोल अभ्यास झालेला असतो. लता मंगेशकरांनी आपले जगातील श्रेष्ठत्व अनुभवतानाच, त्यासाठी मोजाव्या लागणाऱ्या यातना तितक्याच सोसल्या होत्या. त्या यातना त्यांना पुन्हा सोसण्याची यत्किंचितही इच्छा नव्हती. म्हणून त्या म्हणाल्या मला जन्म नकोच.




चित्र - मनोज आचार्य

लताबाईंच्या स्वरास आध्यात्मिक समागमापेक्षा कमी लेखता येऊ शकत नाही. असे लिहिलेले काही जणांना अतिशयोक्ती वाटेल. ते त्यांना आवडणारही नाही. परंतु ज्यांनी लताबाईंना बारकाईने आणि निष्ठापूर्वक कधी ऐकलेच नसेल, त्यांना काय कळणार की आपण आज काय गमावले आहे? लताबाईंच्या एकूण गानप्रवासाची मीमांसा करणे तसे कोणाच्याही क्षमतेबाहेरचेच आहे, नव्हे ते कठीणदेखील आहे. काही संगीतकारांना वाटायचे की, आम्ही लताबाईंना घडवले. तो त्यांचा फुका अभिमान होता असेच म्हणावे लागेल. कारण मास्टर दीनानाथराव जे संगीतक्षेत्रात काळाच्या एक पाऊल पुढेच होते; त्यांचे गायन सर्वसाधारण कल्पनांच्या, अपेक्षेच्या साच्याबाहेरचे होते; त्यांनी अचानकपणे आपल्या घरात एकदा पाच वर्षे वय असलेल्या आपल्या या कन्येच्या तोंडून, तिला न शिकवताही त्यांचीच एक बंदिश गाताना ऐकले होते. तेही पूर्ण तयारीनिशी

गाताना ऐकले. ती तयारी, तो आवेश, ती अनुस्यूत हृदयंगमता पाहून त्यांनाही क्षणभर हे रसायन काही निराळे आहे, हे जाणवले असणार. त्याचबरोबर 'आपले गाणे ही पुढे नेईल' याची त्यांना खात्री पटली असणार. म्हणून तर त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी पहाटेपासून लताबाईंना तालीम द्यायला सुरुवात केली होती. त्यांनी त्यानंतर लताबाईंना जेमतेम सात-आठ वर्षे का होईना, पाचपन्नास उत्तम चिजा प्रेमाने शिकवल्या. फार काळ आपल्या या थोर पित्याची तालीम लताबाईंना मिळाली नाही; हे लताबाईंचे दुर्दैव. मात्र ती तालीम सुरूच झाली नसती, तर आज हिंदी-मराठी वा इतर प्रादेशिक चित्रपट संगीतालाच नव्हे, संपूर्ण विश्वाला लता नावाच्या अलौकिक स्वराचे तेज कधी पाहायलाच मिळाले नसते. हे दीनानाथरावांचे श्रोत्यांवर फार मोठे उपकार आहेत.

पुढे लताबाईंनी भेंडीबाजार घराण्याचे उस्ताद अमन अली खाँ यांच्याकडे तालीम घ्यायला सुरुवात केली. हे घराणेसुद्धा प्रयोगशील आणि खुल्या विचारांचे. गुंजनयुक्त घुमारदार खुला आवाज, दीर्घ दमसास, बीनच्या अंगाने जाणारे मींडयुक्त आलाप, मेरखंड तत्त्वाने केलेली बढत त्यामुळे राग सादर करताना येणारी विस्तारक्षमता नि भारदस्तपणा, सरगम अशी भेंडीबाजार घराण्याची गायनशैली. तसेच, स्वर, लय, शब्द यांचा उत्तम संगम असलेल्या बंदिशी म्हणजे भेंडीबाजार घराण्याची गायकी. उस्ताद अमन अली खाँ लताबाईंना जे जे शिकवायचे, ते ते तत्काळ बरहुकूम त्या म्हणून दाखवायच्या. त्यामुळे अमन अली खाँना त्यांच्या अफाट आकलनशक्तीचा अचंबा वाटायचा. थोडक्यात, नैसर्गिकरीत्याच लताबाईंचा कंठ तयारीचा होता. मग अशा गायिकेला तुम्ही घडवणार कोण? आणखीनही शास्त्रीय संगीतातील काही विचारशील, बुद्धिवान ज्येष्ठ गायक असे होते, की त्यांच्यावर लताबाईंच्या स्वरांचे कमालीचे गारूड होते. त्यात जयपूर-अत्रौली घराण्याचे उस्ताद भूर्जी खाँसाहेब, पतियाला घराण्याचे उस्ताद बड़े गुलाम अली खाँसाहेब. उस्ताद भूर्जी खाँसाहेब तर, लताबाईंच्या ग्रामोफोन रेकॉर्ड तासन्तास ऐकत राहायचे. उस्ताद बड़े गुलाम अली खाँसाहेबांच्या मैफिलीआधी जर नकळतपणे त्यांच्या कानांवर लताबाईंचे एखाद्या रागातील चित्रपट गीत पडले, तर ते अस्वस्थ व्हायचे आणि तो राग मैफिलीत गायचे नाहीत. हा म्हटला तर त्यांचा लताबाईंच्या स्वराविषयी आदरभावच होता. एकदा वझेबुवांनी लताबाईंच्या स्वरांत 'लरा माई सजनी...' ही जयजयवंतीमधील दीनानाथी स्वरविस्तारासह चीज ऐकली, तेव्हा त्यांना दीनानाथांची आठवण होऊन त्यांचे डोळे अश्रूंनी भरून गेले. खास करून त्यातली लताबाईंची वेगवती आणि दाणेदार नि सुरेल तान ऐकून वझेबुवा म्हणाले, 'अशी तान जन्मभर मेहनत करूनही कोणाला येणार नाही. ही जर शास्त्रीय संगीताचा व्यासंग करील, तर दुसऱ्या कुणालाही गाऊ देणार नाही!' कुमार गंधर्व तर म्हणायचे की, 'लताला सातही सूर मिळाले आहेत.' तर अशा असामान्य कंठाला मी घडवले, असे म्हणण्याचे कोण धाडस करेल? पण काही संगीतकार हे धाडस करायचे. या शुभ्रवस्त्र परिधान केलेल्या सरस्वतीकन्येत पराकोटीचा दृढनिश्चयी, परिश्रमी, मेहनती आणि संवेदनशील संगीतसाधक-आत्मा वास करत होता. त्यामुळेच लताबाईंची संगीत-साधना, वैचारिक उदात्तता, ज्ञानाची खोली, आत्म्याची शुद्धता, सृजन-धार्मिकता, स्वर-निरागसता आणि नम्रता यांना एका विशेष श्रेणीच प्राप्त झाली होती.

फाळणीच्या व्हायच्या आधीच्या काळात हिंदी चित्रपटजगतात एका संगीतकाराचे नाव अग्रणी होते, ते म्हणजे मास्टर गुलाम हैदर. ते एकदा फिल्मिस्तानचे सर्वेसर्वा शशधर मुखर्जींकडे लताबाईंना घेऊन गेले, ते आपल्या संगीतात लताबाईंनी गावे यासाठी. तेव्हा शशधर मुखर्जींनी लताबाईंचा आवाज ऐकून म्हणाले, 'हा आवाज माझ्या चित्रपटातील अभिनेत्रीला बिलकूल सुयोग्य नाही. खूप पातळ आणि बारीक आहे हा आवाज. चालणार नाही.' त्यावर मास्टर गुलाम हैदर मुखर्जींवर रागावले आणि ते त्यांना म्हणाले, 'हा आवाज एके दिवशी इतका उच्चस्थानी जाईल, की तिचा आवाज आपल्या चित्रपटात असावा, म्हणून अनेक जण तिच्या घरासमोर रांगेत उभे राहतील. मल्लिका-ए-तरन्नुम नूरजहाँलादेखील लोक विसरतील.' आणि ते लताला घेऊन ते फिल्मिस्तान स्टुडिओतून निघून गोरेगाव स्टेशनवर आले. तिथे ती दोघं एका जागी बसली आणि गुलाम हैदर आपल्या हातातील ५५५ या सिगारेटच्या डब्यावर ताल धरून एक स्वररचना गुणगुणू लागले. मग ती स्वररचना त्यांनी लताबाईंना गाऊन दाखवायला सांगितली. त्यांनी ती इतक्या सहजपणे गाऊन दाखवली, की मास्टर गुलाम हैदर एकदम खुश झाले. (आजही ती जागा गोरेगाव स्टेशनवर आहेच, फक्त ती दोघं कुठे बसली होती, हे सांगणारे कोणी राहिले नाही.) मग लताबाईंना घेऊन ते मालाडला बॉम्बे टॉकिजमध्ये गेले. तिथे त्यांनी तीच स्वरचना लताबाईंच्या आवाजात रेकॉर्ड केली. ते गीत म्हणजे 'दिल मेरा तोडा कहीं का न छोडा...' नाज़िम पानीपती यांनी ते लिहिले होते. चित्रपट होता १९४८ साली प्रदर्शित झालेला 'मजबूर'. याच चित्रपटात 'दामन है चाक चाक है मेरा', 'देखो जी देखो जी मोरी बैंया पकड के' आणि 'पिया मिलने को आ' ही सोलो गाणी तसेच मुकेशजींबरोबर 'अब डरने की कोई बात नहीं' आणि गीताजींबरोबर 'गोरी सखियों



लतासाठी अतुलनीय याशिवाय विशेषण नाही.

**– सी. रामचंद्र**

से अखियां चुराई रही रे' ही युगलगीते लताबाईंकडून गाऊन घेतली. ह्या सगळ्या गाण्यांमधले 'दिल मेरा तोडा कहीं का न छोडा' हे खूप लोकप्रिय झाले. याचे कारण छोटे छोटे स्वरपुंज एकमेकांत गुंफून ताल आणि मीटर यांच्या साहाय्याने या गीताचे स्वरसौंदर्य वाढवून, एक अलमस्ती अर्थात अल्लडपणा, नशा आणि उल्लास हे भाव लताबाईंच्या स्वरांची क्षमता जाणून ते त्यांच्या स्वरांतून कसे प्रकट होतील, हे गुलाम हैदरांनी पाहिले होते. त्यामुळे या नवीन शैलीतील स्वरचनेमुळे इतर संगीतकारांचे लक्ष लताबाईंच्या आवाजाकडे वेधले गेले. मास्टर गुलाम हैदर फाळणीनंतर पाकिस्तानात गेले नसते, तर कदाचित आणखी काही अवीट गोडीची गाणी लताबाई त्यांच्या संगीत दिग्दर्शनात नक्कीच गायल्या असत्या. मास्टर गुलाम हैदर यांच्यानंतर लताबाईंच्या स्वरांची मोहिनी जाणणारे संगीतकार होते खेमचंद प्रकाश. यांनी १९४८ सालीच प्रदर्शित झालेल्या 'जिद्दी' या चित्रपटात लताबाईंकडून चार सोलो गाणी आणि एक किशोरकुमारबरोबर युगलगीत गाऊन घेतले. सोलो गाण्यातल्या 'चंदा रे चंदा रे जारे जारे' ह्या राग छायानटवर आधारित गाण्यातल्या लताबाईंच्या उच्चारांवर थोडा नूरजहाँ या गायिकेच्या स्वरांचा प्रभाव जाणवत होता. मात्र ते गाणे श्रोत्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाले. याचे कारण लताबाईंचा अलौकिक, स्वर्गीय, कोवळा, मोहक माधुर्ययुक्त स्वर. त्यातून मोठ्या ओळीचा मुखडा श्वासावर नियंत्रण ठेवून एका दमात गाणे कठीण होते, मात्र लताबाईंनी तो मुखडा अगदी सहज गायला. बाकी संपूर्ण गाण्यात त्यांनी आपल्या स्वरांची मोहिनी कायम राखली होती. त्या शिवाय मोहक स्वराबरोबरच पार्श्वसंगीताद्वारे भावाभिव्यक्ती अनेक पाश्चात्त्य आणि भारतीय वाद्यांचा अनोखा मिलाप करून, नवीन प्रयोग सादर केल्यामुळे हे गीत त्या काळात अतिशय लोकप्रिय झाले.

खेमचंद प्रकाश यांच्या संगीतनिर्देशनात १९४९ साली लताबाईंनी गायलेल्या 'महल' चित्रपटातील राग पहाडीमधील 'आएगा आएगा आनेवाला' गाण्याने काय इतिहास घडवला, हे सांगण्याची गरज नाही. खास करून लताबाईंच्या गूढ आणि सुरील्या स्वरांतील उठान आणि ठहराव खूपच अनोखा होता. त्याशिवाय पार्श्वसंगीतातील गूढ आणि नाट्यमय वातावरण इतके प्रभावी होते, की श्रवण करणारा श्रोता भारावला गेला नसता, तरच नवल! रेकॉर्डिंग आधी या गाण्याचा सराव पूर्ण दिवसभर चालला होता. शेवटी संध्याकाळी सहा वाजता अंतिम रेकॉर्डिंगची सुरुवात झाली, मात्र ते दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता संपले. गंमत अशी होती, की हे गाणे खूप लोकप्रिय झाले. रेडिओ सिलोन केंद्रावर सतत लावले जात होते. परंतु हे गाणे कोणी गायले आहे ते नाव रसिक श्रोत्यांना माहीत नव्हते. कारण त्या वेळेच्या प्रथेनुसार चित्रपटाच्या श्रेयनामावलीत तसेच ग्रामोफोन रेकार्डवर, 'आयेगा आएगा आनेवाला' चित्रपटातील नायिकेचे नाव कामिनी हे छापलेले होते. कामिनी म्हणजे मधुबाला. हे गाणे त्या काळात रसिक श्रोत्यांना अक्षरश: वेगळ्या शैलीचे आणि आकर्षक आवाजाचे वाटल्याने, ते कोणी गायले आहे याची उत्सुकता खूप होती. रेडिओ सिलोन केंद्रावर पत्रांचा पाऊस पडला. त्यात विचारणा करण्यात आली होती की गायिकेचे नाव सांगा. रसिक श्रोते पारखी होते. त्यांच्यावर या अलौकिक आवाजाची मोहिनी एखाद्या नशेसारखी चढून बोलत होती. सिलोन रेडिओ केंद्राचे प्रमुख त्या पत्रांमुळे हैराण झाले होते. शेवटी एके दिवशी दुपारच्या वेळी हे गाणे लावण्याआधी उद्घोषणा केली गेली, की हे लता मंगेशकर या गायिकेने गायले आहे. तेव्हा रसिक श्रोत्यांच्या जीव भांड्यात पडला. मग जे लताबाईंच्या नावाला वलय प्राप्त होत गेले, ते सातत्याने मोठेच होत गेले. अगदी सातासमुद्रापार गेले.

'आराम' (१९५१) या चित्रपटात राग 'जौनपुरी'मध्ये निबद्ध अतिशय मधुर आणि बांधीव स्वररचनेतील मुजरा 'बालमा जा जा जा। अब कौन तुझे समझाए...' जेव्हा आपण ऐकतो, तेव्हा लक्षात येते, की लताबाईंचा रियाज एकदम पक्का होता. असे म्हणण्याचे कारण या गाण्यातील त्यांच्या गायनात स्वरस्थानांचे महत्त्व, रागाचे सौंदर्य, भावस्पर्शता यांचा अनोखा संगम अशा वेगवेगळ्या अंगांनी त्यांच्या सुमधुर गायकीचे विविध पैलू समजून घेता येतात व जाणूनही घेता येतात. १९५३ सालात प्रदर्शित झालेला 'हमदर्द' म्हणजे शास्त्रीय संगीताची मेजवानीच होती. या चित्रपटातील प्रेम धवन यांनी लिहिलेले, लताबाई आणि मन्नादा यांनी गायलेले राग 'गौड़ सारंग', 'गौड़ मल्हार', 'जोगिया' आणि 'बहार' या रागांच्या रागमालेवर आधारित आणि ऋतुपरिवर्तनाची अनुभूती देणारे 'ऋतु आये ऋतु जाये सखी री...' हे गीत म्हणजे समर्पक शब्दांत सांगायचे झाले तर, सरस्वतीच्या वीणेचा झंकार, उर्वशीची नूपुरांची झुणझुण नि कृष्णाच्या मुरलीचा साद हे सर्व एकवटून विधात्याने घडवलेल्या या दोन अलौकिक कंठांद्वारे सूर, ताल, सिद्धी यांचा सुरेल संगम होता. मग 'चार दिल चार राहें' (१९५९) या चित्रपटात अनिल बिस्वास यांनी लताबाईंकडून एक अतिशय प्रभावशाली रागमाला गाऊन घेतली होती. त्या रागमालेत 'यमन कल्याण', 'बिहाग' आणि 'भैरवी' रागांचा समावेश होता. रागमालेतील सुरुवातीची सृजनशील आलापी, त्यानंतरचा स्वरलगाव, ठहराव, लयकारीची



लता जब आयी तो हम संगीतकार आश्वस्त हो गए कि
अब हम धुनें बनाते समय संगीत कि किसी भी गहराई टक डुब सकते है.

**– अनिल विश्वास**

पद्धत हे साधारण माणसाला भावणारे गायन नव्हे! केवळ जाणकारच ते पचवू आणि समजू शकतो. आणि मुख्य म्हणजे त्याचा आनंद लुटू शकतो. या रागमालेत एका रागातून दुसऱ्यास रागात सहजपणे जाण्याचे लताबाईंचे कसब म्हणजे एक रंजक असा मनोज्ञ आविष्कार होता. सौतेला भाई (१९६२) या चित्रपटातील राग 'अडाना'च्या पूर्ण चलनातील एक बोल बंदिश जी ठुमरीच्या अंगाची होती, 'जा मैं तोसे नाहीं बोलूँ...' जी मुजरा शैलीत चित्रपटात सादर केली आहे. या गाण्याची खासियत अशी, की या गाण्याचे सौंदर्य वाढण्यासाठी अनिलदा यांनी राग 'काफी'चा अतिशय कुशलतेने स्पर्श देत वापर केला आहे. या ठुमरी-मुजरा गीतात लताबाईंनी तान, हरकत, मुरकी आणि सरगम या गायनगुणांचे प्रदर्शन करताना आपली ख्यालगायनातील समज किती प्रगल्भ आहे, याची जाणीव रसिकांना करून दिली होती.

१९६० सालात प्रदर्शित झालेल्या 'अनुराधा' चित्रपटातील गीते म्हणजे एक अविस्मरणीय सुरीला अध्यायच आहे. या चित्रपटाच्या संगीतासाठी ऋषीदांनी प्रथम लता मंगेशकरांना विचारले होते, पण लताबाईंनी त्यास नकार दिला. त्यानंतर बड़े गुलाम अली ख़ान यांना विचारले गेले, त्यांनीही नकार दिला. मग शंकर-जयकिशन स्वत:हून कमीत कमी मानधनात संगीत द्यायला तयार झाले होते, मात्र ऋषीदा त्यास सहमत नव्हते. त्यांना या चित्रपटाचे संगीत निश्चितपणे वेगळे हवे होते. मग ते पंडित रविशंकर यांच्याकडे गेले आणि त्यांनी संगीताची जबाबदारी स्वीकारली. पुढे जो इतिहास घडला तो शब्दातीत असाच. राग भैरवीतील 'साँवरे, साँवरे, जाओ, साँवरे, साँवरे, काहे मोसे करो जोराजोरी, बैंयाँ ना मरोड़ो मोरी...' या गीताची रचना ब्रज-अवधीभाषेचा प्रभाव असलेली. श्रीकृष्णाच्या नटखट शृंगारात्मक ब्रजलीलांचे वर्णन करणारी अर्थात नर-नारी यांची प्रेमाभिव्यक्ती. ही प्रेमाभिव्यक्ती थोडी बोल-आलाप, वेगवती दाणेदार तानांनी युक्त (गीतरचनेतील शब्दांच्या साहाय्याने आलाप आणि तान घेणे) ठुमरीच्या अंगाने जाणारी, तरीदेखील पूर्ण सुगम संगीताच्या बाजाची. सुरुवातीस साँवरे, साँवरे... या शब्दांद्वारे टिपेला नेलेला आर्त स्वर कसा खुबीने खाली येतो, हे ऐकण्यासारखे आहे. नंतरची संपूर्ण चपल स्वरसमूहाची रचना आपल्याला मंत्रमुग्ध करते. लताबाईंनी गाताना शब्दातील आर्जव आणि मार्दव आपल्या अलौकिक स्वरांनी मोहकपणे खुलवले आहे. चपल बोल-आलापीचे कठीण अंदाज...चपल वेगवान आणि दाणेदार-तानांची वक्र अवघड वळणे... भावोत्कटता... ब्रज-अवधी भाषेचे शब्दोच्चारण... स्वरवाक्यांकतील नक्षीकाम, एकूणच हे गीत म्हणजे अविस्मरणीय उस्फूर्त स्वराविष्काराच आहे.

'हाऽऽयऽ कैसे दिन बीते कैसे बीती रतियाँ पिया जाने न हाय...' हे गीत अनुराधाच्या मनातील घुसमट आणि त्या घुसमटीचा एक एक पदर उलगडून दाखवणारे. मनात खूप साठलेले असल्याने मन कासावीस आहे. ते तिला फक्त व्यक्त करायचे आहे. मात्र त्यात तक्रारीचा सूर नाही. त्यामुळे तिच्या मनात होणाऱ्या घुसमटीचे भांडवल करणारे हे गीत निश्चितच नाही. पंडितजींनी नायिकेची घुसमट दाखवण्यासाठी या गीताला राग 'माँज खमाज'ची जोड दिली आहे. हे गीत म्हटले, तर 'घनाक्षरी ठुमरी'च्या वळणाचे. 'घनाक्षरी' हा एक मुक्त छंद आहे. यात लय आणि तिचा प्रवाह सम-विषम नियमात शब्दांद्वारे विभाजित केला जातो. अशा प्रकारच्या ठुमरीत तक्रारीचा अदृश्य भाव असतो. तो भाव स्पष्ट दिसत नसला तरी, मनातील मूक खदखद प्रकट करणारा असतो, शिवाय त्यातील रस आणि रंग ठसवणारा असतो. उदाहरणार्थ, सदर गीतातील त्याच पद्धतीचे भाव प्रकट करणाऱ्यात ओळी पाहा- 'नेहा लगा के मैं पछताई, सारी सारी रैना निंदिया ना आयी, जान के देखो मेरे जी की बतियाँ।' पुढच्या अंतऱ्यातील ओळी पाहा- 'रुत मतवाली आ के चली जाये, मन में ही मेरे मन की रही जाये, खिलने को तरसे नन्ही नन्ही कलियाँ।', 'कजरा न सोहे गजरा न सोहे, बरखा न भाये बदरा न सोहे, क्या कहूँ जो पूछे मोसे मोरी सखियाँ।' या सर्व ओळींत सम-विषम भावाचे प्रकटीकरण आहे. लताबाई गीताच्या सुरुवातीस आर्तपणे 'हाऽऽयऽ' ही बोल-तान घेत आपल्या अलौकिक स्वरांतून मूक खदखद प्रकट करतात. ते स्वरमंडल, सारंगी, सरोद या तारयुक्त वाद्यांच्या आणि बासरी या काष्ठ वाद्याच्या तसेच तबल्याच्या कहेरवा तालाच्या संयत अशा ठेक्याच्या साहाय्याने. या सर्व वाद्यांचे ध्वनी मनातील आर्त भाव प्रकट करणारे आहेत. संगीतकाराने त्या वाद्यांचे अचूक संयोजन केल्याने ते जास्त प्रभावित करते. शैलेंद्र यांचे हे अर्थपूर्ण गीत नायिकेची मनात साठून राहिलेली व्याकुळता सहज, सोप्या भाषेत प्रकट करणारे. खास म्हणजे प्रसंगाशी तसेच पात्राशी सुसंवाद साधणारे. लताबाईंनी संपूर्ण स्वररचनेतील अनुस्यूत गोडवा राखतानाच, नायिकेच्या मनातील सूक्ष्म संवेदनेचा अन् दुःखाचा भाव ठरावीक स्वरांचा चढता-उतरता क्रम लयीच्या अंगाने गाऊन, तो टोकदार न करता ज्या संयत पद्धतीने रागाचा भाव ओळखून प्रकट केला आहे, ते सारे शब्दातीत आहे.

पन्नास आणि त्या पुढील तीन दशकांत विशेष रचनाकौशल्य असणाऱ्या गीतकारांकडे आणि प्रतिभावान संगीतकारांकडे तसेच स्वरांचे उपजत अंग असणाऱ्या गायक-गायिकांकडे जात्याच



घरीदारी कष्ट करणाऱ्या बायाबापड्या लताच्या गाण्यांच्या सुरांबरोबर कष्ट विसरून राबतात. क्वचित स्वत:ही गातात, सुखावतात. कानातून हृदयात प्रवेशणाऱ्या संगीताच्या सुखद प्रवाहात मनसोक्त डुंबतात.

**- भालजी पेंढारकर**

कमालीची प्रगल्भ प्रतिभा होती. त्यामुळेच हिंदी सिनेमामधील निरनिराळ्या प्रकृतीच्या, आशयाच्या अर्थपूर्ण रचना रसिकांना ऐकायला मिळाल्या. त्या रचना निश्चितपणे लक्षणीय होत्या, अजरामर होत्या. गीतकारांनी त्या रचना सिनेमातल्या प्रसंगानुरूप लिहितानासुद्धा त्यात संधी मिळेल तिथे समाजाला जीवनाचे सहज, सोपे तत्त्वज्ञान समजावण्याचा प्रयत्न केला. शिवाय गीतकारांनी त्या रचनांद्वारे स्वत:ची ध्येयवादी वैचारिक भूमिका मांडण्याचासुद्धा यशस्वी प्रयत्न केला. इतकेच नाही तर, विसंगत वाटणाऱ्या जीवन व्यवहारांचे यथार्थ चित्रणदेखील आपल्या रचनांमधून मांडले. ते मांडताना कोणतीही तडजोड न करता आपल्या लेखणीशी ते प्रामाणिक राहिले. तोच भाग संगीतकारांचा, त्यांनी त्या रचनांना चाली देताना समाजात रुजलेले शास्त्रीय ख्याली ठेके वा पारंपरिक लयबंध यांचा वापर करतानाच, आधुनिक स्वरांची साथ घेतली, तरीही त्यात सुरेलपणा अधिक टिकवला, नव्हे रुजवला. त्यामुळे त्या सर्व रचनांना अमरत्व प्राप्त झाले. संगीतकारांच्या बुद्धिवान साहाय्यकांनी वाद्यवृंदांसाठी रचलेली स्वरावली केवळ श्रवणीयच नव्हती, तर ती त्या त्या रचनांच्या बौद्धिक पातळीनुसार होती. शिवाय त्या रचनांतील शब्दांना आणि संगीतकारांच्या चालींना न्याय देणारी अशीच होती. म्हणूनच त्याकाळातील अनेक हिंदी सिनेगीते ही गीतकार, संगीतकार यांच्या अफाट मेहनतीमुळे रसिकांच्या हृदयाचा भाग बनली. या सगळ्या कार्यात आपल्या शब्दांच्या सामर्थ्यांने हजारो रसिकजनांना जगण्याचे बळ देणारे, शब्दार्थाद्वारा निर्माण होणारे भाव कुशलतेने गडद करून श्रोत्यांच्या चित्ताला सुखावून टाकणारे असे गीतकार होते. त्यावेळी जे आघाडीवर असणारे गीतकार होते, त्यात साहिर लुधियानवी, मजरुह सुलतानपुरी, शकिल बदायुनी, हसरत जयपुरी, नीरज, राजेंद्रकृष्ण, शैलेंद्र, कैफ़ी आज़मी, राजा मेहदी अली ख़ान, गुलजार, नक्श लायलपुरी हे प्रमुख होते. ह्या सगळ्यांच्या रचनांना प्रसन्न सुरावटीत स्वरबद्ध करणाऱ्या संगीतकारांमध्ये अनिल बिस्वास, सी. रामचंद्र, स्नेहल भाटकर, नौशाद, रोशन, हुस्नलाल भगतराम, सुधीर फडके, हंसराज बहेल, हेमंतकुमार, मदनमोहन, एस.डी बर्मन, शंकर-जयकिशन, चित्रगुप्त, जयदेव, रवी, एन. दत्ता, ओ.पी नय्यर, एस. एन. त्रिपाठी, कल्याणजी आनंदजी, लक्ष्मीकांत प्यारेलाल, राहुलदेव बर्मन, राजेश रोशन अशी गुणी प्रतिभावान मंडळी आघाडीवर होती. ह्या सगळ्या संगीतकारांचे मोठे नाव होते. त्याचबरोबर आणखीन अनेक गुणी संगीतकार होऊन गेले त्यांना फारसे नाव नव्हते, मात्र त्यांची काही गाणी खूप लोकप्रिय झाली. त्यात प्रामुख्याने होते दत्ता कोरगावकर, बुलो.सी. रानी, ए.आर. कुरेशी, सज्जाद हुसेन, लच्छीराम तोमर, विनोद, अविनाश व्यास, मोहम्मद शफ़ी, दत्ताराम, अजित मर्चंड, एस. डी. बातिश, सरदार मलिक, नारायण दत्त, एस. मोहिंदर, शार्दुल सिंह क्वात्रा, जमाल सेन, शिवराम, बी.एन. बाली, हनुमान प्रसाद, बिपिन-बाबुल , रामलाल आणि इतर अनेक.

१९५० ते १९८० पर्यंतच्या काळात हिंदी सिने-संगीतात गायनक्षेत्रात पार्श्वगायिकांमध्ये लताबाई, आशाबाई ह्या दोन पार्श्वगायिका आपल्या अलौकिक गायनक्षमतेच्या आणि रेकॉर्डिंग तंत्राच्या उत्तम ज्ञानाच्या ताकदीवर अग्रेसर राहिल्या. त्या आधीच्या १९४० ते १९५० ह्या दशकातील पार्श्वगायिकांना लताबाई आणि आशाबाई या दोघींनी अक्षरश: शह देत, हिंदी चित्रपट संगीतात आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचे, स्वतःला सिद्ध करण्याचे फार मोठे आव्हान जिद्दीने पेलले. शिवाय त्या दोघी खरोखरच अशा अग्रेसर झाल्या, की त्यांच्या आवाजाचे गारूड जवळजवळ त्या काळातील सगळ्याच संगीतकारांवर होते. त्यातही लताबाईंच्या आवाजाचा प्रभाव हा अधिकच होता. याचे कारण त्यांच्याकडे ध्वनिमुद्रणासाठी सुयोग्य चमकदार, तिन्ही सप्तकांतील विलक्षण स्वर आणि गायन-तंत्राचे जन्मजात सुयोग्य भान ह्याबरोबरच कमालीची आकलनशक्ती, उच्चारणाची नजाकत, आकर्षक स्वरसौंदर्य टिकवण्यासाठीची जबरदस्त मेहनत, शिवाय आलाप, तान आणि हरकत या गायनकलेतील गुणांचा सखोल अभ्यास हे ठासून भरलेले होते.

**- मनोज आचार्य**
भ्रमणध्वनी-९०९६६८७९६३
manoj.acharya90@gmail.com

ग्रंथाली

# साईड इफेक्टस्




ग्रामीण कादंबरीचा विस्तृत पट

मूल्य ३५० रु.
सवलतीत २०० रु.

नीलम माणगावे

**'शब्द रुची'**
पुढील महिन्याचा अंक
**'अभिजात मराठी विशेषांक'**
अतिथी संपादक
**राजीव खांडेकर**
संपादक, एबीपी माझा



विजय बोधनकर

अंगणातल्या वृंदावनाभोवती शुभ्रपांढऱ्या रांगोळीची लयदार रेघ आईच्या बोटातून झरायची आणि सकाळ प्रसन्न वाटायची, अगदी तशीच लयदार आवाजाची बारीक रेघ गळ्यातून कानापर्यंत यायची आणि सकाळ लयदार वाटायची. ती लयदार, नाजूक आवाजाची ईश्वरी रेघ म्हणजे प्रिय लतादीदी. त्या नाजूक स्वराने आम्हा रसिकांच्या हृदयाला श्रीमंत करून सोडलं. मी या ईश्वरी आवाजासाठी या निसर्गाचे आभार मानतो. दीदी आपल्यात आजही सुरांच्या रूपाने वावरत आहेत आणि जग असेपर्यंत हा सूर अमर राहील...





अंबरीश मिश्र

# दीदीमावशी

**समुद्राची** सतत बदलणारी अनेकविध रूपं. लहरींचं नित्यनूतन नर्तन, मुठीत न मावणारा ओढाळ वारा, पानांची नवथर सळसळ, पावसाच्या पहिल्या थेंबाचा कोवळा नि:श्वास...

...आणि दीदींचं गाणं.

खरं तर यापुढे एकही ओळ लिहू नये, असं वाटतं.

दीदींचं गाणं म्हणजे, कुसुमाग्रजांच्या ओळींचा आधार घेऊन सांगायचं तर, 'पुढे पसरला अथांग दरिया...'

भूगोल म्हणतं, हे जग तीन बाजूंनी पाण्यानं वेढलेलं.

आम्ही म्हणतो, भारत तीन बाजूंनी दीदींच्या गाण्यानं व्यापलेला.

थोर अमेरिकन लेखक अर्नेस्ट हेमिंग्वेनं लिखाणाविषयी म्हटलंय : Writing is nothing, but sitting by the typewriter and bleeding. खरा लेखक तो जो टाईपरायटर घेऊन बसतो आणि आपल्या रक्तानं कागद भिजवून टाकतो.

विख्यात उर्दू कवी फैज़ अहमद फैज़ना पाकिस्तान सरकारनं तुरुंगात डांबलं. ही १९६५ ची गोष्ट. फैज़च्या वाचन-लिखाणावर बंदी आली. कागद, लेखणी मिळणार नाही, बसा तुरुंगात खितपत. कवी तो. असा कसा गप्प बसेल? असं म्हणतात की, फैज़नं युक्तीनं खडू मिळवला आणि तुरुंगाच्या भिंतीवर लिहिलं:

मता-ऐ-लौह-ओ-क़लम छिन गई तो क्या ग़म है
के खून-ए-दिल में डुबोई हैं उंगलियाँ हमने

(माझी पाटी-पेन्सिल, कागद-लेखणी तुम्ही माझ्याकडून भले हिसकावून घेतली असेल. त्याचं दु:ख कशाला? अहो, मी माझी बोटं माझ्या रक्तात बुडवून लिहू शकतो की!)

दीदी उत्कटतेनं गायल्या. 'मी फुलांना रक्त माझे पाजले' अशा उत्कटतेनं. गाण्यात गुंतायचं आणि पुन्हा त्याच गाण्यापासून तुटून अलगही व्हायचं. फळ एकदा पिकलं की ना ते देठाला धरून राहतं ना देठ फळाला, अशा आशयाची ज्ञानेश्वरमाऊलीची ओवी आहे. दीदींचं जगणंही असंच.

महाराष्ट्र ही नररत्नांची खाण. तुम्ही असं समजा, की १८८० ते १९७० हा नऊ दशकांचा काळ इतिहासानं महाराष्ट्राच्या नावे इनाम करून टाकला होता. प्रत्येक क्षेत्रात मराठी माणूस तानाजी मालुसरेच्या तलवारीप्रमाणे तळपत होता. या वैभवशाली परंपरेची सुरुवात लोकमान्य टिळकांनी केली. त्यावर सोन्याचा कळस चढवला दीदींनी.

दीदींच्या बऱ्याच आठवणी मनात येरझारा घालताहेत. मी दीदींकडे वेगळ्याच प्रिझममधून पाहतो आहे. याची काही कारणं आहेत. मी सिनेमातला नाही. दुसरं, संगीत हा माझ्या आवडीचा विषय आहे, उपजीविकेचा नाही. माझ्या कवितांना पंडितजींनी (पं. हृदयनाथ मंगेशकरांनी) चाल लावावी व ती दीदींच्या आवाजात रेकॉर्ड व्हावीत, असं कधी वाटलं नाही. माझ्या कविता मी सहसा छापायलादेखील पाठवत नाही.

आता राहिला सवाल माझ्या बातमीदारीचा. तर दीदींची मुलाखत घेण्याचा सपाटा मी कधी लावला नाही. दीदींना प्रसिद्धीची अजिबात गरज नव्हती, आजही नाही. देशातल्या समस्त दैनिकांचा जेवढा खप आहे त्याहून दीदींचे लाखपट अधिक चाहते असतील. मी पाळण्यात होतो तेव्हाच आकाशातल्या तारकांनी आपल्या नखांवर दीदींचं नाव कोरून घेतलं होतं.

दीदींच्या किंवा मंगेशकर परिवाराच्या लखलखत्या केशरउन्हात न्हाऊन निघावं, असंही कधी वाटलं नाही. म्हणून आजवर कधी दीदींचं व्यक्तिचित्र लिहिलं नाही. हा पहिला लेख. मी मागेच माझ्यापुरतं एक ठरवलं होतं. दीदी, त्यांची कलाकीर्द, त्यांचं समग्र कलाभान, त्यांची जीवनदृष्टी यांकडे निवांत तटस्थपणे पाहायचं. हे मी माझ्या कुवतीनुसार करत आलो आहे. माझी भूमिका chroniclerची आहे.

काही सुट्या सुट्या आठवणी सांगतो. आणि माझ्यापुरते काढलेले काही निष्कर्ष.

बऱ्याच वर्षांअगोदरची ही गोष्ट. 'मौजे'च्या खटाववाडीच्या

कार्यालयात छान गप्पासत्र सुरू होतं. करता करता लता मंगेशकर हा विषय आला. प्रत्येक जण दीदींच्या गाण्याची (गाणं आणि गाणी यातला फरक ओळखणं गरजेचं.) तारीफ करत होता. तिथं उपस्थित एका गृहस्थानं मात्र एकदम समीक्षकीय आडा चौताल सुरू केला आणि संगीतबाह्य मुद्दा घेऊन– म्हणजे, मंगेशकर मक्तेदारी– तो दीदींवर टीका करू लागला.

गुरुवर्य राम पटवर्धन ('मौजे'चे संपादक आणि साक्षेपी, संवेदनशील विचारवंत) दहा मिनिटं शांतपणे ऐकत होते. मग म्हणाले, 'तुमचं काहीही मत असेल. पण लता मंगेशकर आणि व्ही. शांताराम या दोन मराठी माणसांनी महाराष्ट्राचं नाव देशपातळीवर नेलं. हे त्या दोघांचं मोठेपण आपण मान्य केलं पाहिजे. इतर मुद्दे गौण आहेत.'

त्या दिवशी पटवर्धनसर प्रत्येक मराठी माणसाच्या मनातलं बोलले. आणि हो, सर संकुचित मनाचे नव्हते. 'जो जे वांछिल तो ते लाहो', अशी विशाल जीवनदृष्टी बाळगणारे होते.

पटवर्धनसरांची ही गोष्ट दीदींना एकदा सांगितली पाहिजे.

एकदा 'एनसीपीए'त पं. मल्लिकार्जुन मन्सूर यांचं गाणं होतं. मैफिलीला मोजके रसिक हजर होते. पु.ल. होते. अण्णा तब्येतीत गायले. पक्ष्यानं काडी काडी जोडून घरटं बांधावं तसं त्यांनी लाचार तोडीचं भव्य नि भारदस्त आर्किटेक्चर रसिकांसमोर पाहता पाहता उभं केलं. गाणं संपलं. न्याहारीसाठी सगळे जमले. अण्णांच्या गाण्याचं कौतुक कोण नाही करणार? सगळे तारीफ करू लागले.

अण्णा आपल्या कानडी लहजातल्या मराठीत म्हणाले, 'अहो, आम्हांला कोण विचारतं हो?...बालगंधर्व, सैगल, बेगम अख्तर आणि लता मंगेशकर... बस्स. हे चार जण पब्लिकवर असं जाळं टाकतात... काहीतरी म्यॅजिक करतात हो.'

असं म्हणत अण्णा चहाचे घुटके घेऊ लागतात. बराच वेळ काही बोलत नाहीत. लोक आस्ते आस्ते पांगू लागतात. अण्णा शांतपणे विडी शिलगावतात आणि दीदींचं 'रैना बीती जाए, शाम न आए...' हे 'अमर प्रेम'मधलं गाणं गुणगुणू लागतात. मग पु.लं.कडे वळून म्हणतात, 'काय साफ सूर लावते हो... एकदम पाण्यासारखा साफ.'

मन्सूरअण्णांची ही आठवण दीदींना एकदा सांगायची आहे.

'रैना बीती जाए'ची आणखी एक आठवण. थोर संगीतकार सज्जाद हुसैन एकदा याच गाण्याविषयी मला म्हणाले, 'क्या कॉंपोजिशन है और लता क्या गाई है... हर सूर पर एक एक क़ील (खिळा) ठोका है उसने. क्या पाक़ आवाज पाई है उसने.'

हेदेखील दीदींना अजून सांगितलं नाहीए.

खरं तर दीदींना फोन करण्याअगोदर मनात एक यादी करून ठेवलेली असते. त्यांना काय काय सांगायचं, काय काय विचारायचं. परंतु पलीकडून त्यांचा आवाज आला की सगळं विसरायला होतं. सुन्या, निर्जन गावात सनई वाजू लागलीए असं वाटतं.

ही सनई पहिल्यांदा ऐकली तेव्हा मी पाचेक वर्षांचा होतो. गणपतीचे दिवस. आम्ही तेव्हा राहायला गिरगावात. मांगलवाडीत लाऊडस्पीकरवर सिनेमाची गाणी लागली होती. बहुतेक सगळी दीदी नि मोहम्मद रफींची. 'एहसान तेरा होगा मुझपर' सुरू झालं तसे वडील आम्हां मुलांना म्हणाले, 'सुनो, यह यमन है...'

आमच्या घरी बाजाची पेटी होती नि तबला. वडील हातात दीड किलोचा कडा बांधून पेटीची तालीम करायचे. मोठी बहीण कुंतला नि मी देवधरमास्तरांच्या ऑपेरा हाऊसच्या क्लासात गाणं शिकायचो. मधली मिथिला कथक शिकायची. आईचा गळा गोड होता. आवाजाला मधुर झार होती. रोज जेवल्यानंतर स्वीट डिश हमखास असायचीच– सिनेमाची गाणी. कैकदा रात्री झोपताना आम्ही मुलं आईला आग्रह करायचो. मग ती 'धीरे से आजा री अँखियन में, निंदिया आजा री आजा, धीरे से आजा...' हे गाणं म्हणायची.

एकदा रेडिओवर 'धीरे से आजा री' लागलं. वाटलं–अरेच्चा, आई गात्येय.

हे एकदा दीदींना सांगायचंय.

शाळा, शिक्षण, कॉलेज वगैरे नित्याच्या गोष्टी सुरू होत्या. घरची ढासळती परिस्थिती, वडलांचा आजार, रोज रोज जगण्याची सक्ती, वाढत्या वयाचे लोभस पेच, वाचन–लिखाण असा डोक्यात कल्ला सुरू होता. त्या जटिल काळात दोन मुख्य आधार लाभले. एक, माझं घर नि घरातली प्रेमळ माणसं. आणि दीदींची गाणी.

बातमीदारी करू लागलो. एकदा रात्रपाळी आटपून चर्चगेटला शेवटची लोकल पकडली. खिडकीपाशी बसलो होतो. हातात पुस्तक होतं. गार वारा गुदगुल्या करू लागला. डोळे जडावले. पेंग आली. खार स्टेशनला एक अंध बासरीवाला गाडीत चढला आणि 'ठंडी हवाएं, लहरा के आएं' हे दीदींचं 'नौजवाँ'तलं गाणं बासरीवर वाजवू लागला. मी आतून अक्षरश: थरारलो.

खिडकीबाहेर जांभुळपिकला काळोख. लोकलच्या डब्यातला धूसर, पिवळसर उजेड; लोकलची संथ लय...आणि 'ठंडी हवाएं...'

मनातले क्षोभ आस्ते आस्ते निवळताहेत हे समजत होतं. जगण्याची एक लय असते हे कळत होतं. दीदींच्या गाण्याचा हात धरून आपलं आयुष्य प्रकाश–काळोखाच्या संगमावर उभं आहे, असं वाटलं.



बुद्धिमान आणि संवेदनशील गायकांविषयी माझ्या अंत:करणात एक विशेष आदरभाव आहे. या दोन्ही देणग्या ईश्वराने लताबाईंना अगदी मुक्तहस्ताने दिल्या आहेत.

**– पं. रविशंकर**

आणखी एक आठवण. आमच्या कुटुंबात एक हुशार, समजूतदार मुलगी आहे. शिकली अन् चांगल्या ठिकाणी नोकरीही लागली. आणि काही हासभास नसताना अचानक तिच्या व्यक्तिगत आयुष्यात एक मोठी समस्या उभी राहिली. एकदा त्या मुलीची आई भेटली तर मी मुलीची विचारपूस केली. आई म्हणाली, 'तशी बरी आहे ती. हिमतीची आहे पोर. परवाच मला सांगत होती की, मी लतादीदींचं एक गाणं मनातल्या मनात सतत म्हणत असते: 'कभी तो मिलेगी, कहीं तो मिलेगी, बहारों की मंजिल है, राही.' की मला हुरूप येतो.

माझ्यासारख्या अन् त्या मुलीसारख्या लाखो लोकांना दीदीनं जगण्याचा विश्वास दिला. या उपकाराची परतफेड कशी करायची?

आपण इतरांवर करत असलेल्या उपकारांची माहिती खुद्द उपकारकर्तीलाच नाही. फुलांचा सुवास घेऊन वारा जगभर हिंडत असतो; पण त्यालाच आपलं सुगंधी गुपित ठाऊक नसतं. याला काय म्हणावं?

मी पाहिलंय की, भारतात चार जण एकत्र आले, की आधी राजकारणावर चर्चा सुरू होते आणि माणसं लगेच चिडीला येतात. मग गाडी हिंदी सिनेमाच्या गाण्यांकडे वळते. की मग प्रेमळ भांडण सुरू होतं-सी. रामचंद्र ग्रेट की नौशाद, ओ.पी ग्रेट की शंकर-जयकिशन. दीदींच्या गाण्यांवर बोलताना मात्र माणसं एकदम मऊ होतात. सगळे भेदाभेद नष्ट होतात, शिवाशीव संपते.

अलीकडे Idea of India या विषयावर पुष्कळ लिहिलं-बोललं जातंय. लतादीदी म्हणजेच Idea of India हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. एकात्म, स्वायत्त नि स्वयंपूर्ण भारताची संकल्पना म्हणजे लता मंगेशकर. विचारवंतांना हे सत्य कदाचित समजलं नसेल, पण या देशातल्या कोट्यवधी लोकांना ते समजलेलं आहे. आणि कोट्यवधी लोकांच्या मनातलं ज्यांना समजत नाही ते कसले विचारवंत? नाही का?

खरं तर आशाताई, मोहम्मद रफी, तलत महमूद, मुकेश, किशोरकुमार, गीता दत्त, सुमनताई, मन्ना डे हे सगळेच लोकप्रिय होते, गुणी होते; पण अग्रपूजेचा मान दीदींना मिळाला. एखादी नवी गायिका गाऊ लागली की, ती 'लता मंगेशकरसारखं गाते काय?' असंच लोक विचारायचे. या प्रश्नातली सुप्त कळ अशी की, दीदींसारखं कुणी गाऊच शकत नाही अन् कुणी गाऊही नये. दीदी म्हणजे दुष्प्राप्य ध्येय, दुर्लभ तारा. रात्री उशाशी स्वप्नं जळत असताना आपल्याला दीदींचंच गाणं हवंहवंसं वाटतं.

काहीतरी अनादी, आदिम आहे दीदींच्या आवाजात. त्यांच्या गाण्यांत मानवी जीवनाचं समग्र, सर्वंकष दर्शन घडतं. सुख-दुःखं, विरह-मीलन, स्थिती-गती, हर्ष-विमर्श असा एक भव्य पट दीदी आपल्यासमोर उभा करतात. त्याचप्रमाणे, प्राचीन आणि अर्वाचीन यांची सांगडही घालतात. म्हणूनच ब्लॅक अँड व्हाईट सिनेमाचा काळ कधीही न पाहिलेल्या आजच्या पिढीलासुद्धा दीदींची गाणी आवडतात. कारण त्या गाण्यांत एक निर्मळ सुख आहे. कधीही न पाहिलेलं; परंतु मनाला हुरहुर लावणारं, हवंहवंसं वाटणारं सुख.


दीदींच्या गाण्यांप्रमाणेच त्यांच्या सात्त्विक, करारी व्यक्तिमत्त्वाचा समाजावर गाढा प्रभाव आहे. त्यांच्या साध्या साध्या गोष्टीही लोक लक्षात ठेवतात. उदाहरणार्थ, एकेकाळी त्या ठसठशीत, चांदीच्या कलदार नाण्याएवढं कुंकू लावायच्या हे अनेकांना आजही आठवत असतं.

दीदींच्या सौम्य, pastel रंगाच्या साड्या; दोन लांब वेण्या; त्यांचं ते विख्यात, 'सहज जिंकी मना' असं प्रसन्न हसू; त्यांचं फोटोग्राफीचं प्रेम; सिनेमाच्या जगात सम्राज्ञीचा मान असूनदेखील दीदींची, मंगेशकर कुटुंबाची साधी, मराठमोळी जीवनशैली या सगळ्याचं लोकांना कौतुक असतं. थोडीथोडकी नाही, सत्तर वर्षं हा सिलसिला सुरू आहे. हे भाग्य फारच थोड्या कलावंतांच्या वाट्याला येतं.

मी १९८८ साली दीदींची पहिली दीर्घ मुलाखत घेतली. ती एका दिवाळी अंकात छापून आली. मुलाखत माझ्या मित्राच्या आईनं वाचली. नंतर एके दिवशी त्या मित्राच्या घरी गेलो तर त्याची आई माझं कौतुक करू लागली. खरं तर त्या मुलाखतीत 'मी परि हमाल, भार वाही' एवढीच माझी भूमिका होती.

बोलता बोलता त्या बाईंनी पटकन विचारलं, 'लतादीदी अजून शहाडे-आठवल्यांच्या दुकानातून साड्या घेतात काय रे?' जुगतीनं संसार करणाऱ्या साध्या बाई. त्यांची दीदींशी साधी ओळखही नव्हती; पण आपला दीदींशी चिरपरिचय आहे हे त्यांना पक्कं ठाऊक होतं. अन् त्यांच्या लेखी तेवढंच महत्त्वाचं होतं. दीदींशी, त्यांच्या गाण्यांशी चिरपरिचय याच भरवशावर लाखो लोक आपल्या आयुष्याचा गाडा हाकत असतात. तुकारामाचा विठ्ठलाशी, मीरेचा कृष्णाशी चिरपरिचयच होता ना?

सर्वसाधारण लोक दीदींचा उल्लेख एकेरी करायचे, आजही करतात. अरे, रात्री लताचं 'सपने में सजन से दो बातें' लागलं होतं किंवा अरे, 'चाला वाही देस'मध्ये लताचा काय ग्रेट सूर लागलाय यार, अशी वाक्यं नेहमी कानावर पडायची. ही फाजील सलगी नाही, हे परमावधीचं प्रेम आहे. आपण पाण्याला, झाडाला, नदीला



लताजी कि आवाज हमारे देश का एक संसृतिक तथ्य है,
जो हम पर हर दिन उजागर होता है.
उनकी मधुर आवाज सुने बगैर शाम नहीं ढलती.

**- गुलजार**

अहो-जाहो करतो काय?

महत्त्वाचं म्हणजे दीदी आपल्या प्रतिमेत अडकून पडल्या नाहीत. आपल्याच 'मिथ'च्या गुलाम झाल्या नाहीत. त्यांच्यात एक अकृत्रिम सहजपणा आहे. बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. दीदींकडे एक पर्स होती. प्रत्येक फोटोत ती त्यांच्या हातात असायची. एकदा मी त्यांना त्या पर्सबद्दल विचारलं. तर पटकन म्हणाल्या, 'मला खूप आवडायची ती पर्स; पण तिचं बक्कल तुटलं. माळ्यावर ठेवून दिली.' असा कमालीचा साधेपणा त्यांच्यात भरपूर आहे.

सिनेमा हा करोडोंचा व्यवसाय आहे. 'वाटेवरती काचा गं', अशी ही सृष्टी. वरपांगी प्रेम दाखवायचं, मनात काहीतरी वेगळंच शिजत असतं. सगळा पैशांचा नि ग्लॅमरचा कोल्हाळ आहे. 'आगे उसीने चल के दिए बेशुमार ग़म/ जिसने कहा था आप से मिलकर खुशी हुई', अशी सिनेमातली माणसं. या दुनियेत जपूनच चालावं लागतं. हा सावधपणा दीदींत भरपूर आहे. पण मनाच्या खोल भुयारात स्नेहाचा निर्झरही आहे.

दीदी यशाचं ओझं घेऊन फिरत नाहीत. फुलपाखराला आपल्या रंगांचं वजन वाटतं काय? तसं दीदींचं. एकदम नॉर्मल असतात. निरपेक्ष मनानं कुणी काही सांगितलं, विचारलं तर निरपेक्ष मनानं उत्तर देतात. आता जबाबदारी आपली असते. दीदींनी आपल्यावर विश्वास टाकलाय, त्या विश्वासाला तडा जाऊ नये हे पाहण्याचं काम खरं तर आपलं असतं. आपण चुकतो. आणि दीदी आपल्या कोषात परत जातात. मग आपण म्हणतो, दीदी लहरी आहेत. खरं तर लहर आपली फिरलेली असते. असे असंख्य धक्के दीदींनी पचवले असतील; पण त्याविषयी कधी बोलत नाहीत.

विचारलं पाहिजे त्यांना एकदा.

वडील अकाली गेले म्हटल्यावर दीदींनी वयाच्या तेराव्या वर्षी कुटुंबाची जबाबदारी आपल्यावर घेतली. आणि पाहता पाहता त्या देशातल्या लाखो कुटुंबांच्या पालक झाल्या. रेडिओच्या वायुलहरींवर आरूढ होऊन ही कुलदेवता दररोज प्रत्येक घरी पोहोचते आणि श्रांत, क्लांत जिवांना दिलासा देते. सरकार-दरबारातले लोक दर वर्षी राष्ट्रीय एकात्मतेवर कोट्यवधी रुपये खर्च करतात; पण या खंडप्राय देशाला एका धाग्यात ओवण्याचं काम दीदींनी केलं.

हे सगळं कुठून आलं?

रोज किमान चार गाणी रेकॉर्ड करायची; एक गाणं संपलं की पुढच्या गाण्याची तयारी, तालीम. तेव्हा रेकॉर्डिंगचं तंत्र पुरेसं विकसित झालं नव्हतं. एक बारीकशी चूक झाली की, पुन्हा नव्यानं सुरुवात. अन् तरीही गाण्यातला भाव, मूड, शब्दफेक, अभिव्यक्ती हे सगळं टवटवीत, अम्लान.

बिस्किटं, सँडविच, एखादं फळ यांवर पूर्ण दिवस काढायचा. सतत उभ्यानं गायचं. रात्री उशिरा घरी यायचं. त्या अडनीड वेळी जेवणाची भूक ती किती असेल? ऊन असो वा पाऊस, सकाळी नऊच्या ठोक्याला 'प्रभुकुंज'च्या दारात जयसिंग गाडी घेऊन हजर. दीदी गाडीत बसल्या, की आजूबाजूच्या इमारतीतले लोक आपापली घड्याळं लावायचे म्हणतात. कैकदा तर सणासुदीच्या दिवशीसुद्धा रेकॉर्डिंग. काम, काम आणि काम.

दीदी सिनेमासृष्टीत आल्या तो काळ फाळणी, दंगेधोपे, गांधींची हत्या असा अपूर्व धकाधकीचा होता. बंगाल, पंजाबातले बरेचसे कलावंत मुंबईत दाखल झाले होते. इथले काही पाकिस्तानला निघून गेले होते. सिनेमात मोठी रेटारेटी सुरू होती. या गिचाडगर्दीत एक अठरा-एकोणीस वर्षांची, कृश, शिडशिडीत मुलगी इंडस्ट्रीत येते आणि सिनेमाच्या गाण्यांचा पोत नि पैसच बदलून टाकते आणि नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारत देशाला स्वत:चा स्वर सापडतो.

मास्टर गुलाम हैदर, खेमचंद प्रकाश, सज्जाद, नौशाद, अनिल विश्वास असे महारथी दीदीच्या फूलकोमल, दंवभिजल्या आवाजाला दाद देतात. सज्जाद हुसैन एकदा मला म्हणाले होते, 'मैं लता की तारीफ क्या करूं? समुंदर की मछलियाँ भी लता की तारीफ करती हैं.' हे सज्जादसाहेब म्हणताहेत हे लक्षात घ्या.

हिंदी काय आणि हॉलीवूड काय, सिनेमाची दुनिया पुरुषसत्ताक असते. स्त्रीला कमी लेखण्याची एकही संधी सिनेमावाले सोडत नाहीत. अशा जगात दीदींना पर्वताएवढा मान मिळाला. फक्त आपल्या सुरेल आवाजाच्या बळावर.

अगदी सुरुवातीची एक आठवण. चित्रपट 'चांदनी रात'. नौशादसाहेबांचं संगीत. त्या काळातल्या एका ज्येष्ठ गायकाबरोबर दीदींचं ड्युएट रेकॉर्ड व्हायचं होतं. तालमी सुरू असताना तो गायक काहीतरी अचकटविचकट बोलत होता. दीदींनी नौशादना सांगितलं, 'मला अशी मस्करी आवडत नाही. तुम्ही यांना सांगा बघू.' नौशादनी त्या गायकाला झापलं.

तेव्हा दीदींच्या कारकिर्दीला नुकतीच सुरुवात झाली होती. तो गायक ज्येष्ठ नि नामांकित होता. कशाला मोठ्या आर्टिस्टशी वाईटपणा घ्या, उद्या काम नाही मिळालं तर, असा स्व-हितरक्षणाचा विचार, कुटुंबाचा भार वाहणाऱ्या नवख्या मुलीला सुचणं स्वाभाविक आहे, पण दीदी also ran मधल्या नाहीत. त्यांना आत्मसन्मान मोठा वाटला. पुढच्या काळातही दीदींनी आत्मसन्मानाच्या मुद्यावर 'शिकवीन चांगलाच धडा' अशीच भूमिका घेतली. सिनेमावाल्यांनी



माझे वडील सांगायचे सर्वकाही ऐक, पण फिल्मी संगीत अजिबात ऐकायचं नाही. ऐकायचं असेल तर फक्त लताजींचं गाणं ऐक. सूर शिकायचा असेल तर त्यांच्याकडून शीक. त्यांचं गाणं ऐक.

**– बेगम परवीन सुलताना**

त्यांचं मोठेपण मान्य केलं. याला कारण दीदींचं गाणं. टॅलंट.

टॅलंट, आपल्या कामावर श्रद्धा आणि कमालीची व्यावसायिक शिस्त या गुणांवर दीदी यशाच्या गौरीशिखरावर विराजमान झाल्या. एकेकदा वाटतं आयआयटी, आयआयएम अशा प्रतिष्ठित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांनी वेळेचं व्यवस्थापन, कामाचं नियोजन या विषयावर दीदींचं व्याख्यान ठेवलं पाहिजे. दीदी पाश्चात्त्य देशात जन्मल्या असत्या तर बीथोवन, चार्ली चॅप्लिन यांच्या तोडीच्या कलावंत म्हणून गाजल्या असत्या. आपल्या देशात भक्तिभाव पुष्कळ. सुजाण, संवेदनशील समीक्षा कमी.

सगळ्याच दिग्गज संगीतकारांकडे दीदी उत्तम गायल्या आहेत. अन् सगळीच गाणी कमालीची गाजली. परंतु, दीदींच्या आवाजाच्या सगळ्या शक्यता पडताळून, त्यांची अद्भुत रेंज लक्षात ठेवून त्यानुसार त्यांच्याकरता वैशिष्ट्यपूर्ण चाली बांधणारे काही संगीतकार होते. माझ्या यादीत सज्जाद हुसैन, मदनमोहन, रोशनलाल, सलिल चौधरी आणि जयदेव ही नावं आहेत.

मराठीत हे काम पंडित हृदयनाथ मंगेशकर आणि श्रीनिवास खळे यांनी केलं. दीदींच्या सांगीतिक विचारसृष्टीत पंडित हृदयनाथांचं विशेष स्थान आहे. हिराबाई बडोदेकरांच्या विचारव्यूहात जसं बंधू सुरेशबाबू मानेंचं स्थान आहे, तसं.

हिंदी सिनेमातलं संगीत डळमळू लागलं त्याच सुमारास पंडितजींच्या प्रयोगशील, आव्हानात्मक चालींनी दीदींतल्या कलावंताला छान डिवचलं हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. दीदी हृदयनाथजींचा उल्लेख 'माझा छोटा गुरू' असा करतात ते उगीच नाही. खळेअण्णांनीसुद्धा दीदींना काही अविस्मरणीय, अभिनव गाणी दिली आहेत.

मिष्कील नर्मविनोद ही दीदींची खासियत आहे. एकदा शांताबाई शेळके आपल्या एका मैत्रिणीसह (बहुधा कमलताई विचारे) दीदींकडे गेल्या. भरपूर गप्पा झाल्या. दीदीनं दोघींचा उत्तम पाहुणचार केला. निघताना शांताबाई म्हणाल्या, 'चल, निघते लता. खूप बरं वाटलं ग. इतका छान वेळ गेला.'

दीदी शांतपणे म्हणाल्या, 'तुमचा वेळ छान गेला. माझं काय?' ब्रिटिश ह्युमरचं हे अतिशय उत्तम उदाहरण आहे.

टेलिव्हिजनवर दीदींची मुलाखत. एक ख्यातनाम इंग्रजी पत्रकार जगज्जेत्या नेपोलियनच्या आविर्भावात प्रश्नावर प्रश्न विचारत होता. आस्ते आस्ते दीदींच्या नजरेला धार चढली. आणि तो नेमका त्यांच्या सापळ्यात अडकला. बिच्चारा!

मुलाखतीचा शेवट करताना म्हणाला, 'महात्मा गांधींनंतर तुम्हीच भारताचं सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्त्व आहात असं आम्ही मानतो.'

दीदी : नाही हो. मी फार छोटी आर्टिस्ट आहे.

तो : नाही. गांधी हे विसाव्या शतकातले सर्वात ग्रेट भारतीय असं आपण मानतो. त्यांच्यानंतर तुम्हीच आहात.

दीदी : तुमचा आग्रहच असेल तर मी एवढंच म्हणेन, की मी तुमची आभारी आहे.

तो : पण ग्रेट असण्याची किंमत चुकती करावी लागते. मनात नसताना काही गोष्टी कराव्या लागतात. असं झालंय कधी तुमच्या बाबतीत?

दीदी : हो ना. अनेकदा.

तो (आता गडी पुरता फसला) : एक उदाहरण सांगा ना.

दीदी : ही मुलाखत.

सट्ट्यॅकन्न आला ना उलट्या हाताचा. जगज्जेत्या नेपोलियनचा वॉटर्लू झाला होता.

एकदा दीदी आणि सचिनची (तेंडुलकर) संयुक्त पत्रकार परिषद होती. प्रेस आणि चॅनलवाल्यांनी ही गर्दी केली. खूप कलकलाट सुरू होता. काही केल्या गोंधळ कमी होईना. अखेरीस दीदी म्हणाल्या, 'तुमचा कोरस बंद करा बघू. इथं माझं आणि सचिनचं ड्युएट सुरू होणारेय.' केवढा हसला सचिन.

ही आठवण विख्यात डोग्री कवयित्री पद्मा सचदेव यांनी सांगितली. पद्माजी ऑल इण्डिया रेडिओत काम करायच्या. कविता, लिखाणही. खूप नाव त्यांचं. दीदींशी ओळख झाली. ओळखीचं रूपांतर स्नेहात व्हायला वेळ लागला नाही. दिलदार, मोकळ्या मनाच्या लेखिका.

एके दिवशी मुंबई आकाशवाणीत दीदींचं काहीतरी काम होतं. स्वागतासाठी दारात रेडिओची बडी ऑफिसर मंडळी हजर होती. पद्माजीदेखील होत्या. सगळे स्टुडिओत गेले. दीदींच्या हातात छानशी नि सुबक पर्स होती. पद्माजी गमतीत म्हणाल्या, 'घेते बरं का मी ही पर्स. बहुत माल होगा.'


आपल्या गळ्याकडे बोट दाखवून दीदी पटकन म्हणाल्या, 'पद्माजी, सब माल यहाँ छुपाया है.'

दीदींत एक नऊ-दहा वर्षांची हूड, नटखट मुलगी दडून बसलीए, असं वाटतं. दीदी खळखळून हसल्या की तिचं दर्शन घडतं.

हा लेख त्या मुलीला प्रेमपूर्वक अर्पण.

**– अंबरीश मिश्र**

**('संगीतक्षेत्रातील चंद्रमा लता'मधून साभार)**



'मैं लता की तारीफ क्या करूं?
समुंदर की मछलियाँ भी लता की तारीफ करती हैं.'

**– सज्जाद हुसैन**



वैभव मांगले

# लताबाईंच्या गाण्यांची नक्षी

**निसर्ग** सुंदर असतो. सर्व बाजूंनी. आपली समजूत वाढायला लागते तसतशी त्याची रूपं. त्याचे पदर आपल्याला दिसायला लागतात. त्या निसर्गाचा आवाज, सजीवांची लगबग, त्यांचे ध्वनी, सांजसकाळी घडणारा प्रकाशाचा खेळ; त्याचं कोण अप्रूप वाटायला लागतं. पाऊस, ते ढगांचं चित्कारणं, हिरवागार निसर्ग, फुलं, त्यांचे सुगंध, नद्या, त्यातले प्रवाह किंवा डोह, ध्यानमग्न असलेला औंदुबर. रणरणत्या उन्हात गार वाऱ्याची झुळुक. सतत असा हा रूप बदलणारा ऋतू पाहिला की वाटतं, कोणी निर्माण केलं हे आणि का निर्माण केलं? मला यातला भाव जाणता येतोय. मी हे सौंदर्य या नेत्रांनी भोगू शकतोय, हे सर्व मी जाणतो आणि माझे डोळे पाणावतात. हे कोण भाग्याचं वाटतं मला. मी स्वत:ला भाग्यवान समजतो. या निसर्गाशी आपलं नातं जाणिवेच्या पातळीवर समजून घेऊन आपणही त्यातला एक नश्वर भाग आहोत याचं भान घेऊन जगायला लागतो. त्यातलं सौंदर्य टिपून आपल्या परीनं आपण आपलं जगणंही सुंदर करत असतो. अधिकाधिक समृद्ध, भरीव करत असतो. जो या निसर्गाला समजून घेत नाही, स्वत:ला त्या निसर्गाचा भाग, हिस्सा मानत नाही. त्याच्या सौंदर्याचा दिवाना नाही तो माणूस माझ्या दृष्टीनं कितीही श्रीमंत, प्रसिद्ध असला तरी तो संपन्न नाही. तो सत्त्वहीनच असणार. त्याच्या आत खिन्नताच असणार. असो. हे सगळं सांगायचं कारण या निसर्गदत्त वरदहस्त असलेला आणखी एक चमत्कार म्हणजे लता मंगेशकर. साक्षात या निसर्गाचा सूर. सच्चा, पारदर्शक, पवित्र सूर म्हणजे लता मंगेशकर.

निसर्गाच्या रूपानं मला समज यायच्या वयातच भुरळ घालायला सुरुवात केली होती. माझं गाव अगदी सह्याद्रीच्या कुशीत आहे. संगमेश्वर तालुक्यात कासार कोळवण. फारच सुंदर होतं तेव्हा माझं गाव. मी पौगंडावस्थेमध्ये असताना पहिल्यांदा माझ्या कानावर या बाईंचा आवाज पडला. अर्थातच मी लहानपणापासून ऐकत होतो पण त्याच्याकडे जाणतेपणानं लक्ष नसेल गेलं. पण खरंच ते गाणं पहिल्यांदा माझ्या कानावर पडलं आणि आत काहीतरी झंकारलं. 'मालवून टाक दीप' हेच गाणं होतं. बाळासाहेबांच्या गाण्याची कॅसेट कुणीतरी लावली होती. ऐकत राहिलो होतो ती त्यांची गाणी. त्या आवाजरोबर काहीतरी सापडल्याचा साक्षात्कार झाला. आपलं असं काहीतरी सापडलंय असं झालं. आणि त्या आवाजानं माझी साथ कधीच सोडली नाही. तो आवाज माझं सर्वस्वच होऊन बसला. त्यांच्याइतका आवाज कुणाचाच इतका जवळचा वाटला नाही. त्यांचं गाणं ऐकल्याशिवाय दिवस मावळत नाही माझा.

गानसरस्वती किशोरी आमोणकर आणि लताबाई या दोन स्त्रियांनी माझं सांगीतिक विश्व पूर्णपणे व्यापून टाकलं आहे. या दोघींकडे जे आहे जे सगळ्या संगीतविश्वाकडे आहे त्यापेक्षा कणभर जास्तच आहे. त्यातल्या त्यात आवाज आणि स्वरसिद्धी यामध्ये लताबाई सगळ्यांपेक्षा कांकणभर पुढेच आहेत. जगातल्या सर्व कलांमधल्या कलाकारांमध्ये. निसर्गानं जे म्हणून उत्तम, लोकोत्तर, सुंदर असं तत्त्व टाकलं आहे, त्यापेक्षा लताबाईंच्या पारड्यात चिमूटभर जास्तच टाकलं.

त्यांच्या आवाजाबद्दल मी पामरानं काय बोलावं. आलम दुनियेतल्या सर्व कलाकारांनी उपमा, अलंकार, नानाविध विशेषणं लावून, त्यांच्या आवाजाच्या गायकीचं कौतुक केलं आहे. तरीही त्यांचं गाणं ऐकलं की वाटतं हे कौतुक अपुरंच आहे. कारण तो आवाज कौतुकाच्या पलीकडला आहे. त्यांचं गाणं हा अनुभव आहे. संवेदनेच्या पातळीवर क्षणोक्षणी अनुभूतींचे तरंग उमटत राहणारी अविरत प्रक्रिया आहे.

गाणं संपलं तरी त्याची आस अनेक काळ मनात रेंगाळत राहते. आपला गळा तहानलेला असताना मडक्यातलं थंडगार पाणी पीत जातो. क्षुधाशांती होत जाते, पाणी रंध्रारंध्रात पोचतंय याची जाणीव होते; तो आत्मा तृप्त करणारा अनुभव कसा काय शब्दांत मांडणार? लहानग्या पोराचं निरागस हास्य तुमच्या आत काहीतरी कालवतं त्याचं वर्णन काय करणार आपण? धावत येऊन मिठी मारणारी आपली मुलं 'बाबा, मला तुम्ही खूप आवडता'

असं म्हणतात तेव्हा जे खळ्कन पाणी उभं राहातं डोळ्यांत, कशात मांडणार तुम्ही तो अनुभव? ती अनुभूती शब्दातीत असते. चंद्राचं पाण्यावर पसरलेलं चांदणं आपण फक्त डोळेभरून पिऊच शकतो. बाकी त्याचं कशानंही वर्णन करता येणार नाही. मावळत्या सूर्याची किरणं हळूहळू सांज गिळून टाकायला लागते आणि ना धड अंधार, ना धड उजेड अशावेळी मनात काहूर माजतं. विनाकारण आत गलबलतं, ते कसं सांगायचं कुणाला? तो अनुभव फक्त आपण भोगूच शकतो. तेच सगळं लताबाईंचं गाणं ऐकल्यावर होतं. त्याचं वर्णन करता येत नाही. आत्म्याला सुख वाटावं असं काहीतरी त्या गातात एवढंच सांगू शकतो. आता म्हणजे काय विचाराल तर ते प्रत्येकानं अनुभवण्याचीच गोष्ट आहे.

१९४५ ते १९६० पर्यंत, नंतर ६० ते ७०, पुढे ७० ते ८५ या कालखंडात त्यांच्या आवाजाचा प्रवास अचंबित करणारा आहे. ६० पर्यंतचा आवाज अगदी कोवळा गुलाबाच्या कळीसारखा, ६० पासून ७० पर्यंत आवाज फुललेल्या गुलाबासारखा, ७० ते ८५ फूल पूर्ण उमेलेलं आहे आणि सुगंधांची परिसीमा गाठलेला ७० नंतर त्यांनी आवाजाला पूर्वीची धार नव्हती हे खरं, पण ज्या पद्धतीचं तंत्र त्यांनी वापरलं ते कमाल. व्हिब्राटोचा वापर, माईकवर आवाज फेकण्याचं तंत्रही त्यांनी बदललं. थोडा अधिक आवाज दाबून लाडिक आवाज त्या काढू शकत होत्या. अभिमान, गुड्डी, शोले, दिवार, बावर्ची, चुपके चुपके या चित्रपटांमधला त्यांचा आवाज ऐका म्हणजे कळेल. निव्वळ तंत्र वापरून त्यांनी आवाजाची धार शाबूत ठेवली. अतिशय तीक्ष्ण, कुशाग्र बुद्धी होती लताबाईंकडे. पार्श्वगायनात त्यांनी जी गुणवत्तेची फूटपट्टी तयार करून ठेवली आहे ती आजही वापरली जाते. असे काही मापदंड तयार करून ठेवले गायनाचे, तिथे कुणी पोहोचूही शकत नाही की त्यांच्या गाण्यानं भारतीय संगीतामध्ये आमूलाग्र बदल झाला असं माझं म्हणणं आहे. त्या दरम्यानच मायक्रोफोन आला हे खरंच आहे. मायक्रोफोनमुळे गाण्याचं तंत्रच बदललं. पूर्वीसारखं मोठ्यानं गायची गरज उरली नाही. त्यामुळे स्वरलगावही बदलले. त्यात हळुवारपणा आला. पण तो स्वरलगाव काय असतो, माईकवर आवाज कसा फेकायचा. त्यावर किती जोर द्यायचा, श्वासाचं तंत्र, याचा त्यांनी वस्तुपाठच घालून दिला. त्या यायच्या अगोदरही लोक गातच होते की, पण त्यांनी त्यातलं लालित्य असं काही दाखवलं की, दुसरं कुणाला तिथे पोचताच आलं नाही. तो धडा मात्र अनेक मोठ्या मोठ्या गायकांनी घेतला. अगदी शास्त्रीय गाणाऱ्या लोकांनीसुद्धा. माईकवर व्हॉल्युमपेक्षा फोर्स अधिक वापरला लताबाईंनी. त्यांच्यासोबत काम करणाऱ्या अनेक गायक, संगीतकार, वादकांनी सांगितलं आहे, की दहा फुटांवर त्या काय गाताहेत ते ऐकू यायचं नाही. म्हणजे काय तंत्र अवगत केलं असेल पाहा, मायक्रोफोनवर गायचं! दमसास तर त्यांचा निसर्गदत्तच होता. त्या म्हणायच्या, की माझा भाता मोठा आहे. श्वास खूप वेळ पुरत असल्यानं सुरांना नैसर्गिक ताकद मिळतेच. जोरकस सूर लागतोच. पण तेच आवाज मोठा न करता त्यांना आतून ताकद मिळून तो योग्य प्रमाणात माईकवर फेकला जात असे. हे केवळ अद्भुत होतं. हे रसायन इतर गायकांकडे नव्हतं, त्यामुळे त्यांची सगळी द्वंद्वगीतं ऐका, त्यांच्या सुरांची वेगळी ताकद कळते. त्यातला फोर्स कळतो. अनिल-विश्वास, हुस्नलाल-भगतराम, सज्जाद हुसेन यांच्याकडून त्या पार्श्वगायनाचं तंत्र शिकल्या हे खरंच, पण तसे शिकणारे बरेच होते की. असो. त्या गाताना तोंडानं श्वास घ्यायच्या त्यामुळे पटकन श्वास घेता यायचा आणि आवाजही व्हायचा नाही. तो खूप वेळ पुरतही असे. त्यामुळे गाण्यात कुठेही तुटलेपणा नसे. गाणं एकसंध वाटत असे. गाताना मध्ये मध्ये वाद्याचे तुकडे वाजत तर त्यादरम्यान श्वास घेत त्या असत. हे तंत्रच किती अवघड आणि कमाल आहे! हे कौशल्य त्यांनी आत्मसात केलेलं होतं. ते काही निसर्गाचं वरदान नव्हतं. पार्श्वगायनातल्या त्या माऊंट एव्हरेस्ट आहेत. त्यांच्या उंचीच्या आसपासही कुणी नाही.

बाईंची आणखी एक खासियत म्हणजे जे वाद्य प्रामुख्यानं वाजणार आहे त्यांच्या अंगानं ताना, मुरक्या, खटके घ्यायच्या. उदाहरणार्थ, ओ सजना बरखा बहार आयी (सतार), जादुगार सैंया (बीन), भेटी लागे जिवा (व्हायोलिन). लोक म्हणतात, लताबाई कोण नटी गाणार आहे त्याबरहुकूम आवाज काढायच्या. मला नाही वाटत, कारण त्यांचा आवाज तसा त्या जातकुळीचा नव्हता की त्या कुणाची मिमिक्री करतील. उलट, काम न येणाऱ्या अनेक नट्या त्यांच्या गाण्यावर चांगला अभिनय करायच्या. त्या आवाजातच असा भाव असायचा की झक मारत त्या नटीला अभिनय करावासाच वाटायचा किंवा तसं तिच्याकडून यायचंही. लताबाईंचं म्हणणं होतं, की मीनाकुमारी, नूतन, जया भादुरी, रेखा, सायराबानू यांना त्यांचा आवाज मॅच व्हायचा.

लताबाई आणि एस.डी. बर्मन हे समीकरण मला आवडतं. मदनमोहन-लताबाई, लताबाई-सलील चौधरी, आर.डी.-लताबाई. प्रत्येकाची थोडी थोडी गाणी मला फार आवडतात. बाईंना जसं काही संगीतकारांनी घडवलं तसं बाईंनीही संगीतकारांना घडवलं. आपलं गाणं हिच्या गळ्यातून बाहेर पडतं तेव्हा त्याचं सोनं होतं



अगर ताजमहल दुनिया का सातवाँ अजूबा है,
तो फिर लता मंगेशकर को आठवाँ अजूबा मानना पडेगा।

**– उस्ताद अमजद अली खान**



चित्र – वैभव मांगले

हे त्यांना कळलं नसेल का? म्हणून तर त्यांच्याही प्रतिभेचा कस लागलाच असेल की. आता हिच्यासाठी काय बनवू? अधिक सुंदर, अधिक माधुर्य असलेलं गाणं करायला चढाओढ लागली नसती संगीतकारांमध्ये तरच नवल. अपवाद फक्त ओ.पी. नय्यरचा. त्यालाही त्याचं संगीत अपूर्ण वाटलं असणारच हे नक्की. अनेक संगीतकारांच्या सामान्य चालीसुद्धा बाईंनी गायल्यानं अजरामर झाल्या आहेत. त्या संगीतकारांनाही माहीत असेलच, की काय बनवलं होतं आणि काय बाहेर पडलं. त्यांचा सूर म्हणजे सूरच; त्याच्या आजुबाजूचं काही नाही. उदाहरणार्थ, सूर हे एक वर्तुळ असेल तर कुणीही त्या वर्तुळाच्या परिघावर गायलं तरी तो सुरेलच वाटणार, पण बाई त्या वर्तुळाच्या मध्यबिंदूवर यायच्या. परफेक्ट, तो म्हणजे तोच सूर. परिपूर्ण होत्या त्या सगळ्याच बाबतीत. काळजाचं पाणी पाणी करणारा सूर लावतात त्या. त्यामुळे ते गाणं त्या पलीकडच्या जगातलं वाटतं. मानवनिर्मित नाही वाटत. हे गाणं, हा आवाज त्या निसर्गाच्या करिश्म्याचं उदाहरण आहे. त्याला दिव्यत्व प्राप्त आहे. बाई काय गातात किंवा अमुक-अमुक एका गाण्यात बाईंनी काय काय चमत्कार म्हणा किंवा करामती केल्या हे कळायलाही आपली मनाची-कानाची मशागत झालेली असली पाहिजे. ज्यांना सुमन कल्याणपूर आणि लताबाई यांमधला फरक कळत नसेल तो कान तयार आहे असं कसं समजायचं? मी अजिबात मानायला तयार नाही. बाईचं गाणं आत झिरपायलाही आपल्याजवळ वेगळी रसिकतेची उंची असावीच लागते.

बाईचं गाणं नुसतं मला आवडतं एवढ्यावर नाही भागत रसिकता. तर त्यातलं मर्म कळलं पाहिजे आणि मग काय आपण झिंगतो म्हणून सांगू! वारंवार गाण्याचा प्याला पीतच राहतो. याबाबतीत मी स्वत:ला भाग्यवान समजतो की मला लताबाई आणि किशोरीताईंच्या गाण्यातलं मर्म कळतं, आत झिरपतं आणि म्हणून मी समृद्ध आहे. या दोघींनी सुरांच्या सौंदर्याचा जो विचार केला आहे. तेवढा विचार फारच क्वचित कुणी केला असेल. त्यातलं माधुर्य तर ठेवलंच, सुराचं लालित्य त्यांनी जे निर्माण केलंय त्याला तोड नाही. दोघींनीही स्वातंत्र्योत्तर काळात लोकांचा कान तयार केला. चांगलं अभिजात संगीत काय असतं, ते दाखवून दिलं.

मानवी आयुष्यातला असा कुठलाच भाव नसेल त्यात त्याचं, त्या भावावर आधारलेलं गाणं नाही. प्रत्येक भाव त्यांच्या गाण्यामधून अत्यंत तीव्रतेनं बाहेर पडतो. यापेक्षा कुणी अधिक काही गाऊच शकणार नाही असं वाटतं. अंगाई तर अंगाई, विरह तर विरह, श्रृंगार तर श्रृंगार. तंतोतंत तोच भाव. त्यांच्या सुरांचा असा काही स्पर्श होतो शब्दांना की ते शब्दही धन्य धन्य होऊन जातात. 'ये कहाँ आ गये हम'मधला 'मुलायम' हा शब्द. 'पडोसन'मधलं 'शर्म आती है'मधला बिमार हा शब्द. 'बांगोंमें कैसे ये फूल'मधल्या शेवटच्या कडव्यात 'मेरे नैन' जे म्हणाल्यात ना, डोळ्यांत पाणीच येतं. केवळ कैवल्याचं चांदणंच हो! मला त्याचं गाणं जवळचं वाटायचं. आणखी एक मुद्दा. त्या माझ्याशी गाण्यातून बोलतात. त्या सुरांमधून संवाद साधतात. त्या माझ्या आत्म्याशी बोलतात. ते सूर त्यांच्या ओंजळीतून शब्द माझ्यापर्यंत घेऊन येतात. आणि माझ्या मनात त्यांचा नाच सुरू होतो. सुरांबरोबर इतकं माझ्या आत घेऊन येतं त्यांचं गाणं. बाकीचे गायक गायकी दाखवतात, आवाजाची करामत, मिमिक्री करतात; पण त्यांचं गाणं माझ्याशी बोलत नाही.

लताबाईंविषयी कितीही बोललं तरी त्या दशांगुळे वर उरतातच. आपल्या आयुष्यात सकस पौष्टिक अन्न जेवढं गरजेचं आहे की त्याच्यामुळे आपण निरोगी राहतो, व्याधीपासून दूर राहातो, अगदी तसंच त्यांचं गाणं माझ्या निरोगी मनासाठी आवश्यक आहे. माझी कुठलीच भावना नाहीये ज्या भावनेशी लताबाईंचं गाणं जोडलेलं नाही. प्रत्येक लहानमोठ्या भावनेशी त्यांच्या गाण्याचा संबंध आहे. माझ्या प्रत्येक भावनेच्या पदरावर लताबाईंच्या गाण्यांची नक्षी आहे.

लताबाईंच्या गाण्यानं अनेकांना सकारात्मक ऊर्जा दिली, त्या गेल्यावर जगभरातून लोकांनी जी हळहळ व्यक्त केली त्यावरूनच कळेल. खरं तर त्या जागतिक एकात्मतेच्या द्योतक आहेत. सगळ्यांना जोडणारा हा आवाज, गेली सात दशकं ज्यानं राज्य केलं. ही एकमेव बाई असेल जिनं आपल्या पुरुषप्रधान फिल्म इंडस्ट्रीमध्ये अधिराज्य गाजवलं. शत्रूही काही कमी नव्हते. अनेक गायिका आणल्या, पण कोण कसा टिकाव धरणार या प्रतिभेपुढे? शिंपल्यातला नैसर्गिक मोती असताना कृत्रिम मोती कोण वापरेल हो! त्यांच्या गाण्याविषयी सगळ्या थरांतल्या लोकांमध्ये आदरच होता. शास्त्रीय संगीतकार, फिल्म संगीतकार, गायक-वादक, सगळेच कलाकार यांना नितांत आदरच होता. कुणी टीका करायला लागला तर लोक म्हणतच, की हा आकसानं बोलतोय. असं वरदान फार कमी कलाकारांच्या वाट्याला येतं. सर्वकाळ सर्व थरांतल्या लोकांना आवडेल असा कलाकार मला वाटतं फक्त लताबाईच होत्या.

आजपर्यंतच्या ज्ञात काळातला सर्वात सुंदर आवाज. आता हिच्यासाठी कसं गाणं बनवू असा पेच पडला संगीतकारांना, अशी दैवी प्रतिभा. सुखाची पातळी वाढावी अन् दु:खाचा तळ दिसावा असं हिचं गाणं. एकटेपणाच्या माझ्या खोलीतला एक कोपरा या अभिजात गाण्यानं सदाचा उजळून निघाला आहे. या संगीतातल्या आदिमातेला नमन. तुम्ही इथल्या नव्हतातच. त्यापल्याडहून आला होतात. तुमच्या स्वरांतला पारदर्शीपणा, पावित्र्य, त्यातल्या सिद्धीनं माझं दु:ख धुऊन निघालं आहे. तुमच्या स्वरांची तुलना फक्त बुद्धाच्या स्मितहास्याशीच करतो, कारण ते मला शांत करतं, ते माझ्या जगण्यात उत्साह भरतं. तसाच तुमचा सूरही. कुणी मला म्हणालंच, लताबाईंचं गाणं आता तुला कधीही ऐकायला मिळणार नाही तर मी मृत्यू जवळ करेन. कारण माझ्या जगण्यातलं सत्त्व तुम्ही आहात लताबाई!

**– वैभव मांगले**
vaibhavmangale@gmail.com



जयश्री देसाई

# बहुगुणी स्वरसम्राज्ञी

**भारतरत्न** लता मंगेशकर!

सर्वांनाच सुपरिचित असलेली ही ओळख... पण हे व्यक्तिमत्त्व एवढ्याशा शब्दांत मावेल असं नव्हतंच मुळी. माझं भाग्य की गेली दहा वर्षं मला त्यांची मैत्री, त्यांचं अकृत्रिम प्रेम लाभलं. आणि या दहा वर्षांत झालेल्या भेटींतून, गप्पांतून, मी घेतलेल्या त्यांच्या मुलाखतींतून त्यांचं जे व्यक्तिमत्त्व माझ्यापुढे उलगडत गेलं त्यानं मी प्रत्येक वेळी नव्यानं थक्क होत गेले.

माझ्या लेखी त्यांची ओळखच बदलली. संपूर्ण ध्यास म्हणजे लता मंगेशकर, संपूर्ण समर्पण म्हणजे लता मंगेशकर आणि समोर येईल त्या आयुष्याला निर्भीडपणे सामोर जाण्याचा बेडरपणा म्हणजे लता मंगेशकर हे माझ्या मनात पक्कं ठसलं. हे फक्त त्यांची ओळख असलेल्या संगीताच्या बाबतीतच नव्हतं तर त्या जे जे शिकल्या किंवा त्यांनी आयुष्यात संगीताव्यतिरिक्त जे जे काही केलं त्या सगळ्याच बाबतीत लागू होतं.

दिवसाला सहा-सहा, आठ-आठ गाणी रेकॉर्ड करत असताना, तब्येतीच्या अनेक लहान-मोठ्या तक्रारींचा मुकाबला करत असताना त्या वेगवेगळ्या गोष्टी शिकतही होत्या. त्यांनी ज्या ३६ भाषांत गाणी गायली त्या भाषा तर त्या शिकल्याच... त्यातल्या अनेक भाषांत त्यांना अस्खलित बोलताना मी ऐकलंय. त्याशिवाय फोटोग्राफी, पेंटिंग, शास्त्रीय नृत्य, अत्तरांचं ज्ञान, ज्वेलरी डिझायनिंग, साड्या डिझायनिंग, गिटार अशा बऱ्याच कलांमध्ये त्यांनी प्रावीण्य मिळवलं. त्यांनी त्यांचा परफ्युमचा ब्रँड आणला, ज्वेलरीचा ब्रँड आणला, स्वतःच्या साड्या त्या मध्य प्रदेशातील चंदेरी येथील विणकरांना घरी बोलावून डिझाईन करून घेत आणि फोटोग्राफीतलं त्यांचं नैपुण्य तर भल्याभल्यांनी तोंडात बोटे घालावत असं होतं.


त्या एकदा सांगत होत्या, 'प्रफुल्ल पिक्चर्समध्ये माधवराव शिंदे नावाचे जे एडिटर होते, त्यांना फोटोग्राफीचा शौक होता. त्यांच्याकडे १९४६ साली मी पहिल्यांदा कॅमेरा बघितला. तो 'जर्मन मेक'चा 'रोलीफ्लेक्स' कॅमेरा होता. मला तो खूप आवडला. त्यानंतर एकदा विनायकरावांच्याच एका चित्रपटाच्या शूटिंगसाठी आम्ही सगळे आऊट डोअरला गेलो असताना मी माझ्या आयुष्यातला पहिला फोटो काढला. केशवराव दाते यांचे चिरंजीव प्रफुल्लमध्ये रेकॉर्डिंग करायचे. त्यांचा नदीकिनारी बसलेले असतानाचा फोटो मी काढला. पण तो खूप खराब आला. मात्र मी हार मानली नाही. शिकत राहिले आणि चांगली फोटोग्राफर बनले. तरीही मला कॅमेऱ्यात रोल घालता येत नव्हता. एक दिवस ज्यांचा माझ्यावर खूप प्रभाव आहे ते बाबा (भालजी पेंढारकर) म्हणाले, की 'साधा रोल घालता येत नाही मग तू कसली फोटोग्राफर? ते येत नाही तोपर्यंत फोटोग्राफी करू नकोस.' मग माझी जिद्द पेटली



स्वरसम्राज्ञी एकदम वेगळ्या रूपात



लहानगा
आदीनाथ मंगेशकर



हृदयनाथ
मंगेशकर




रचना
खडीकर-शहा
आणि
मीनाताईंची नात
सांजली खडीकर

आणि मी तेही शिकले.

दीदींनी त्यांच्या भावंडांचे, मुलांचे असे खूप फोटो काढलेत. त्यांना क्रिकेटची मॅच चालू असताना स्टँडमध्ये बसून फोटो काढायलाही खूप आवडायचं. त्या काळात त्या रेकॉर्डिंग बंद ठेवायच्या. असे त्यांनी बहुतेक सामन्यांचे फोटो काढले आहेत. पुढे आधी त्यांच्या लोकप्रियतेमुळे आणि नंतर त्यांच्या स्वास्थ्यापायी त्यांना स्टेडियमवर जाऊन मॅच बघणं अशक्य झालं तेव्हा त्या घरीच टीव्हीवर मॅच बघायला लागल्या. विशेष म्हणजे घरी टीव्हीवर मॅच बघतानासुद्धा त्यांची फोटोग्राफी चालू असायची. पुढे हात थरथरायला लागला तेव्हा त्यांनी ते थांबवलं. त्यांच्या फोटोग्राफीच्या गोष्टी त्यांच्याच तोंडून ऐकतानाही खूप मजा यायची. त्यांचा ध्यास आणि प्रत्येक गोष्टीकडे बघण्याची त्यांची वेगळीच दृष्टी थक्क करून सोडायची

त्यांच्या सुरुवातीच्या काळातल्या फोटोग्राफीची एक गमतीशीर आठवण सांगताना एकदा त्या म्हणाल्या होत्या, 'एकदा आम्ही सगळे अप्पांबरोबर म्हणजे गो.नी. दांडेकरांबरोबर रायगडावर गेलो होतो. माईपण होती. तिथे मी टकमक टोकावर अगदी टोकाला जाऊन फोटो काढायचा प्रयत्न करत होते. पण इतका सोसाट्याचा वारा सुटला होता की माझे उडणारे केस, साडी आणि गळ्यात लटकवलेला तो कॅमेरा सांभाळताना माझी नुसती तारांबळ उडाली होती. त्या गडबडीत तो कॅमेरा टकमक टोकावरून खाली पडला. मला खूप वाईट वाटलं कारण माझ्या पहिल्या कमाईचा तो अतिशय महागडा असा रोलीफ्लेक्स कॅमेरा होता. मग आम्ही खाली येऊन महाड पोलिसांकडे तक्रार नोंदवली. तो कॅमेरा मिळेल अशी आशा आम्हा कुणालाच नव्हती. परंतु तीन महिन्यांनंतर तिथल्या एका गुराख्याला तो सापडला. मी महाडला जाऊन तो घेऊन आले. त्याची लेन्स अर्थातच फुटली होती. मात्र बॉडी शाबूत होती. तो मी नीट बांधून अजून जपून ठेवलाय.'

गडकिल्ल्यांवर भटकणं हा त्यांचा अतिशय आवडता छंद होता. सह्याद्रीतले बहुतेक महत्त्वाचे किल्ले त्यांनी पालथे घातले आहेत एवढंच नव्हे तर तिथे जाऊन फोटोग्राफीही केलीय. पन्हाळ्यावर तर पुढे त्यांनी बंगलाच घेतला. तिथे त्या खूपदा जायच्या. त्यांच्याकडे जगातले सगळे महागडे कॅमेरे व लेन्स होत्या. रोलीफ्लेक्स, रोलीकॉर्ड, याशिका, मग निकॉन असे लेटेस्ट कॅमेरे त्या घेत गेल्या. विशेष म्हणजे त्यांचं यातलं ज्ञान इतकं अद्ययावत असायचं की अनेकदा व्यावसायिक छायाचित्रकारांपेक्षा दीदींना त्यातलं जास्त माहीत असायचं. फोटोंचं डेव्हलपिंग, प्रिंटिंग हेही



लतामुळे सर्वसामान्यांमध्ये शास्त्रीय संगीत लोकप्रिय झाले.

**- पं. भीमसेन जोशी**


त्या शिकल्या होत्या. त्यांच्या घरी त्यांनी डार्क रूम तयार केली होती आणि वेळ मिळेल तेव्हा त्या स्वतः ते फोटो डेव्हलप करत.

मी त्यांनी काढलेले अनेक फोटो बघितले. अनेकदा त्यांच्याशी त्यांच्या फोटोविषयी गप्पा झाल्या. त्यांच्या फोटोमध्ये छायाप्रकाशाचा फार सुंदर खेळ दिसतो आणि त्या फोटोंचं कंपोझिशन फार सुंदर असतं. कदाचित त्या उत्तम चित्रकार असल्यानं त्यांचं पिक्चर कंपोझिशन फार सुंदर असत असेल. त्यांच्या फोटोग्राफीचे दोन विशेष मला जाणवले. एक म्हणजे त्यांनी काढलेले बहुतांश फोटो कृष्ण-धवल आहेत. त्यांना कृष्ण-धवल फोटो काढायलाच जास्त आवडायचं. फोटोंचं खरं सौंदर्य त्यातच उठून दिसतं अशी त्यांची धारणा होती आणि दुसरं म्हणजे त्या फ्लॅशचा वापर करत नसत. फ्लॅशचा वापर केल्यास चेहऱ्यावर पांढरी झाक येते असं त्यांना वाटायचं आणि म्हणून त्यांना ते आवडायचं नाही. विलेपार्ले इथे झालेल्या त्यांच्या एकमेव छायाचित्रप्रदर्शनात ज्यांनी त्यांचे फोटो बघितले असतील त्यांना हे नक्की जाणवलं असेल

गंमत म्हणजे त्यांचं हे फोटोंचं वेड फक्त स्वतः फोटो काढण्यापुरतंच मर्यादित नव्हतं. तर त्यांना आणखीही एक छंद होता. उत्तमोत्तम फोटो जमवण्याचा! त्यांनी काढलेले फोटो तसंच वर्तमानपत्र, मासिकातून कापून ठेवलेले छान छान फोटो अल्बममध्ये नीट लावून ठेवणं याची त्यांना फार आवड होती.



**सिंहगडावर बहिणींसह विश्रांतीसाठी गेल्यानंतरही दीदींची फोटोग्राफी कशी चालूच होती, ते टिपले आहे छायाचित्रकार रवींद्र जोशी यांनी**



**कुत्र्यांचा अतिशय लळा असलेल्या लतादीदीनी मीनाताईंच्या मांडीवर बसवून त्याचाही फोटो काढला.**

छापून आलेला कुठलाही फोटो त्यांना आवडला तर त्या तो कापून व्यवस्थित ठेवून देत. हे अगदी शेवटपर्यंत, म्हणजे त्या करू शकत होत्या तोपर्यंत चालू होतं. तसंच, फार पूर्वी त्या रस्त्यावरून चालू शकत होत्या, किंवा ट्रेननं फिरत होत्या तेव्हा रेल्वेस्टेशनवर वगैरे जे वजन काटे असतात त्यावर उभं राहून वजन करायला त्यांना खूप आवडायचं. ते त्या करायच्याच. त्यावेळी त्या यंत्रातून आपलं वजन सांगणारं जे कार्ड यायचं त्याच्या मागच्या बाजूस एखाद्या परदेशी हिरॉईनचा फोटो यायचा, ते जमवायला त्यांना खूप आवडायचं. गंमत म्हणजे ते कार्ड हातात आल्यावर त्या लगेच त्यामागे लिहून ठेवायच्या की हे लता मंगेशकरचं कार्ड आहे. म्हणजे ते इतर कुणी घ्यायला नको! असे त्यांनी असंख्य फोटो जमवलेत आणि ते आजतागायत त्यांच्या संग्रहात आहेत.

एकूणच, त्यांच्या गाण्याबाबत त्यांचा अट्टहास असायचा ना की त्यातले सूर आणि शब्द अचूकच उच्चारले गेले पाहिजेत, तो भाव अचूकच प्रक्षेपित झाला पाहिजे, तसाच परफेक्शनचा अट्टहास त्यांनी केलेल्या फोटोग्राफीसकट प्रत्येक बाबीत होता. नुसते फोटो काढून उपयोगाचं नाही तर त्याचं शास्त्रशुद्ध ज्ञान असलंच पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. तीच गोष्ट त्यांच्या पेंटिंगबाबत!

त्यांच्या आई म्हणजे माई उत्तम चित्रं काढायच्या. तोच



बुजुर्गोंसे हमेशा सुना था कि सरस्वती और लक्ष्मी साथ नहीं रहती,
लेकिन लताजी को देखिये...

**- पं. हरिप्रसाद चौरसिया**


गुण दीदी आणि उषाताई यांच्यात आला. दीदी रांगोळ्याही सुरेख काढत. मात्र चित्रकलेचंही त्यांनी थोडं शिक्षण घेतलं होतं. हेही त्या कोल्हापूरला असतानाच शिकल्या होत्या. तिथे ‘प्रफुल्ल पिक्चर्स’मध्ये जाधवराव म्हणून आर्टिस्ट होते. त्यांच्याकडून त्या जलरंगात पेंटिंग करायला शिकल्या. तिथे त्यांना खूप काम नव्हतं. त्यामुळे तो त्यांच्या आयुष्यातला खडतर असला तरी खूप काही नवीन शिकण्याचा काळ होता. त्यामुळे तिथे त्यांनी खूप पेंटिंग केली. त्यांना लँडस्केप करायला खूप आवडायचं. आधी पैशांअभावी आणि नंतर अमाप लोकप्रियता मिळाल्यावर त्यामुळे, त्यांना बाहेर प्रत्यक्ष जाऊन लँडस्केप करायला कधी जमलं नाही. पण पूर्वी परदेशी चित्रकारांच्या चित्रांनी नटलेली पिक्चर पोस्टकार्डं मिळायची. ती जमवून त्यावरून त्या चित्रं काढायच्या.


त्या सांगत होत्या, ‘मॉने हा फ्रेंच आर्टिस्ट माझा आदर्श. तेव्हा जी पिक्चर पोस्टकार्डं मिळायची ती मी खूप जमवली. त्यावर त्याची पेंटिंग असायची. पुढे आमची परिस्थिती सुधारली तेव्हा त्याचं पॅरिसपासून तीस मैलांवर असलेलं घर मी तीनदा पाहून आलेली आहे. त्याची अप्रतिम निसर्गचित्रं म्हणजे त्याच्या घराचाच भाग आहेत. त्यांनी ते सगळं खूप सुंदर जतन केलंय. ते बघून मला खूप आनंद झाला.’

फोटोग्राफी आणि पेंटिंग याइतकंच आवर्जून उल्लेख करावा असं, त्यांच्या प्रतिभेचं दर्शन जिथे घडलं ते क्षेत्र म्हणजे ज्वेलरी डिझायनिंग! आपल्याला आठवत असेल तर त्यांच्या ज्वेलरीचा एक ब्रँड त्यांनी ३ मार्च २००५ रोजी मुंबईत लाँच केला होता. त्याचं नाव होतं ‘स्वरांजली.’

त्यांना त्याबाबत विचारलं असता त्या म्हणाल्या होत्या, ‘मी ज्वेलरी डिझायनिंग शिकलेली नाही, पण मला डिझाईन सुचतात. आमचे जे सोनार होते बाबूभाई नावाचे, त्यांना ती सांगून त्याप्रमाणे माझ्या डिझाईनचे दागिने मी बनवून घ्यायचे. त्यातूनच पुढे ही ‘स्वरांजली’ या ब्रँडची कल्पना आली. मी, माझी भाची रचना आणि आणखी दोघे अशा चौघांनी मिळून हा ब्रँड लाँच केला होता.’


त्या सांगत होत्या, ‘आम्ही प्रामुख्यानं तीन प्रकारची ज्वेलरी या ब्रँडअंतर्गत आणली. एक म्हणजे जे मी स्वतः डिझाईन देऊन बनवून घेतले होते त्या माझ्या जुन्या क्लासिक दागिन्यांच्या रिप्लिका. ते त्या लोकांना फारच आवडले होते. दुसरं म्हणजे मी खास डिझाईन केलेले मास्टर पीस. मला हिरे आणि पाचू







लतादीदींनी केलेली पेंटिंग



एक मुलगी रोज गाते, अविरत... हे जग फार व्यवहारी आहे.
तिची गाणी ऐकून कोणाचंही पोट भरत नाही.
तरीही सर्व जण वेडावून तिचं गाणं ऐकत आहेत.

**– विजय तेंडुलकर**

खूप आवडतात. त्यामुळे हे दागिने विशेष करून हिरे आणि पाचू जडवलेले असे होते. त्यात वापरलेले हिरे-पाचू हेही बऱ्यापैकी मोठ्या आकाराचे होते. एकूणच ही अतिशय 'हाय एंड ज्वेलरी' म्हणतात अशीच होती. तर तिसरा प्रकार होता तो आजच्या करिअर वुमनला डोळ्यांपुढे ठेवूनच तयार केलेला होता. मी या तीनही प्रकारांत सगळ्यांसाठीच गळ्यातले, कानातले, ब्रेसलेट यांची डिझाईन तयार केली होती. हे मी जवळपास पाच वर्षं केलं. त्या दागिन्यांना प्रतिसादही चांगला मिळाला. मात्र पुढे मला वेळ मिळेना आणि ठरलंच असं होतं की जोपर्यंत मी डिझाईन करून देतेय तोपर्यंतच तो ब्रँड चालू ठेवायचा. कारण नाहीतर त्याला काही अर्थ राहिला नसता. ती ग्राहकांची उगाचच फसवणूक केल्यासारखं झालं असतं... त्याप्रमाणे तो जवळपास पाच वर्षं चालला आणि मग आम्ही तो बंद केला.'

विशेष म्हणजे या प्रत्येक दागिन्यावर लता दीदींची लेसर सिग्नेचर होती!

मात्र त्याहीपेक्षा विशेष म्हणजे ही ज्वेलरी लाँच झाली आणि जम्मू-काश्मीरमध्ये भीषण भूकंप झाला. आपल्या या ज्वेलरीच्या माध्यमातून त्यांना मदत करावी असं लतादीदींना वाटलं. त्यामुळे यातील अत्यंत 'हाय एन्ड पीस'चा एक लिलाव ख्रिस्तीजच्या माध्यमातून २५ नोव्हेंबर २००५ रोजी लंडनमध्ये करण्यात आला. लतादीदी तर त्याला हजर होत्याच, शिवाय इंग्लंडमधलेच नव्हे तर जगातले अनेक नामवंत त्याला हजर होते. १ लाख ५ हजार पौंड किमतीचे 'स्वरांजली' दागिने या लिलावात अवघ्या पंधरा मिनिटांत विकले गेले. हा सारा पैसा लतादीदींनी काश्मीरच्या भूकंपग्रस्तांना व 'प्रथम' या, भारतात अतिशय चांगलं काम करणाऱ्या सामाजिक संस्थेला दिला होता.

त्या नृत्यही शिकल्या होत्या. प्रफुल्ल पिक्चर्समध्ये पागे नावाचे एक नृत्यशिक्षक यायचे. त्यांच्याकडे त्या वर्षभर कथक शिकल्या. त्याचा त्यांनी एक स्टेज शोसुद्धा केला होता. त्यांना गिटार आवडायची म्हणून त्यांनी तेही शिकायचा प्रयत्न केला, पण वेळेअभावी तो त्यांना सोडून द्यावा लागला.

जीवन म्हणजे जन्म आणि मृत्यू या दोन पडावांमधलं श्वासाचं अंतर असं म्हणतात. ते अशा अनेक कलांनी, रंगांनी ज्यांनी भरून टाकलं होतं... एवढ्याशा आयुष्यात काय काय करता येऊ शकतं याचा आदर्श प्रस्थापित केला होता, त्या लतादीदी मात्र आता आपल्यातून निघून गेल्या... कधीच परत न येण्यासाठी!

**– जयश्री देसाई**
jayashreedesaii@gmail.com

## लोकसंगीताचा उत्सव!



मधुर व त्यांच्या समूहाने रंगवलेली मैफल



'रंगकर्मी सन्मान' पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ दिग्दर्शक विश्वास सोहोनी

नानाविध प्रकारची वाद्ये, त्यातील बरीचशी कधी न ऐकलेली, पाहिलेली. लोकसंगीताचा असा आगळा-वेगळा अनुभव शनिवारी 'चैत्र चाहूल' या कार्यक्रमाद्वारे प्रेक्षकांना मिळाला.

'ॲड फिझ'तर्फे दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकाच्या प्रेक्षागृहात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे यंदा १५वे वर्ष होते. 'महाराष्ट्र टाइम्स' कार्यक्रमाचे मीडिया पार्टनर होते.

मधुर पडवळ यांनी लोकसंगीत व लोकवाद्य यांना समोर आणण्यासाठी 'फोक्स वॅगन' हा समूह स्थापन केला आहे. त्याअंतर्गत त्यांनी संगीताचे अफलातून सादरीकरण केले. कार्यक्रमाची सुरुवात गणेशासह देव-देवतांच्या वंदनेने झाली. हे सादरीकरण अस्सल महाराष्ट्रीय लोकसंगीतावर आधारलेले होते. त्यानंतर मधुर व त्यांच्या समूहाने विविध राज्यांतील लोकसंगीताचे स्फूर्तिपूर्ण सादरीकरण केले. सृजनशीलता होती. लोकसंगीत समोर आणण्याची धडपड होती आणि आधुनिकतेचा साज होता.

मधुर पडवळ हे गेली १२ वर्षे भारतीय लोकसंगीताचा जागर करत आहेत. विविध भागांत जाऊन तेथील लोककलावंतांशी संवाद साधायचा, लोकसंगीत जाणून घ्यायचे, लोकवाद्य शिकायचे आणि मग ते जगासमोर आणायचे, असे कार्य ते व त्यांचा समूह करत आहे.

भारतीय संस्कृती परिषदेचे अध्यक्ष व खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यावेळी प्रमुख पाहुणे होते. त्यांच्यासह ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. वामन केंद्रे, ज्येष्ठ कथा-पटकथा लेखक शफाअत खान व डॉ. अविनाश फडके यांच्या हस्ते 'ध्यास सन्मान' व 'रंगकर्मी सन्मान' हे दोन पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'ध्यास सन्मान' पुरस्कार ज्येष्ठ सिनेअभ्यासक सुधीर नांदगावकर यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात तो त्यांचे पुत्र सुनील यांनी स्वीकारला. 'रंगकर्मी सन्मान' पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक विश्वास सोहोनी यांना प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये रोख व सोनचाफ्याच्या फुलांची परडी असे त्या पुरस्काराचे स्वरूप होते.

महेंद्र पवार व विनोद पवार यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



**आनंद डबरे**

# आभाळमाया

**लतादीदींना** कधीच स्वतःला देवत्व बहाल केलेलं रुचलं नाही. त्या स्टुडिओमध्ये आल्यावर सगळे एकदम भारावून उभे राहिल्यावर म्हणायच्या, 'इतकं काही अवडंबर करू नका, नॉर्मलच राहा, वागा सगळे. उगाच मला देवत्व देऊ नका.' त्यामुळं दुपारी चारच्या सुमारास त्या स्टुडिओमध्ये आल्या, की नमस्कार करून झाल्यावर आपापल्या कामात मग्न व्हायचो. त्या कोपऱ्यात बसून असायच्या आणि रेकॉर्डिंगच्या वेळी माईकपुढं उभ्या राहायच्या. एरवी कुणाला दडपण येईल, की गाण्यातला अंतिम शब्द असलेल्या, साक्षात सरस्वतीमा आपल्यासोबत आहेत, पण तेव्हा रूममध्ये अरेंजर असेल, वादक असतील, संगीतकार-गीतकार असतील तरी दीदी त्यांच्यावर आपल्या वागण्यामुळं दडपण येऊ द्यायच्या नाहीत. त्या नेहमीच 'तुम्ही तुमचं काम करता, तसं मी माझं काम करते. तुम्ही रेकॉर्डिंग करता, वाद्य वाजवता तसंच मी गाते,' असं म्हणायच्या.

आताही मला लख्ख आठवतं आहे, की स्वरलता स्टुडिओमध्ये दीदींचं 'मेरे साई' हे संगीतकार म्हणून मयूरेश पै याचं पहिलं गाणं केलं होतं. त्या येणार म्हणून ट्रॅक पूर्ण तयार ठेवला होता. त्यांना पाठवला होता आणि त्यांनी तो ऐकलाही होता. तेव्हापासून त्यांचा एक शिरस्ता कायमच लक्षात राहिला. आधी गाणं ऐकून घ्यायच्या. त्यातल्या जागा मनात टिपून घ्यायच्या. त्या गाण्याचे शब्द बघायच्या. त्यांचा पूर्ण अर्थ समजून घ्यायच्या, काही शंका असल्यास त्या शंकाचं निरसन झाल्यावर मग पुन्हा वाचन करायच्या. वाचताना काही विशिष्ट खुणा आणि स्वतःच्या हातानं ते गाणं लिहून काढायच्या. गाणं पूर्ण आत्मसात झाल्यावरच मग माईकसमोर उभ्या राहायच्या. त्यांच्या लेखी शब्दांना प्रचंड महत्त्व होतं. एखादा शब्द त्याच जागी का आला आहे, हे समजून घ्यायच्या. त्यामुळं शब्दांना इतकं समजून घेतल्यानं साहजिकच त्यानुसार गाण्यातलं भावप्रकटीकरण अधिक यथार्थ व्हायचं. या कामाआधी काही दिग्गजांसोबत काम करायचा अनुभव माझ्या गाठीशी होता. आता साक्षात लता मंगेशकर गायला आल्यावर काय होईल, याच विचारात आम्ही होतो. तर काय, त्यांचं रेकॉर्डिंग इतक्या सहजपणं झालं की जणू कुणी नवख्याचं रेकॉर्डिंग झालं आहे की काय अशी शंका यावी, इतक्या त्या साधेपणानं वागल्या आणि गाणं गायलं होतं, 'लता मंगेशकर' यांनी. त्यांच्या मते, सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या कामावर पूर्णपणं लक्ष केंद्रित करायला हवं. गायक, वादक, रेकॉर्डर यांचा फोकस फक्त गाणं हाच असावा. कोण गातं आहे किंवा कोण वाजवतं आहे याला अर्थ नाही. कसं गातं आहे किंवा कसं वाजवतं आहे



**लता मंगेशकर, ए.आर. रहमान आणि आनंद डबरे**

हे जास्त महत्त्वाचं आहे, असं त्या म्हणायच्या. त्यांचं हे म्हणणं त्या वर्षांनुवर्षं आचरणात आणायच्या. त्या माईकवर गात तेव्हा जणू त्यांची स्वरसमाधी लागे. शब्दोच्चार कसे करावेत हे ठरवून घेतलेलं असलं तरीही त्यांच्या गाण्यात ते अतिशय नैसर्गिकपणे येत. एखादा त्यांना सांगितलं की 'हे जरा परत एकदा रेकॉर्ड करूयात', तर दुसऱ्या वेळी ते एकदम नव्या ढंगानं प्रकटे. मग आम्ही म्हणायचो 'हे छान वाटतं आहे आणि तेही छान वाटतं आहे. चारही पर्याय छान वाटत आहेत. यातला कोणता घेऊया.' यावर त्या म्हणायच्या, 'ते संगीतकारांनी ठरवावं. मला जे सुचतं आहे, जे वाटतं आहे ते मी सगळं गायले आहे. शेवटी हे गाणं संगीतकाराचं आहे, त्यानंच अंतिम निर्णय घ्यावा.' दीदींनी भारतातल्या सगळ्या चांगल्या संगीतकारांसोबत काम केलं आहे. पण नवखा संगीतकार असेल तरी अंतिम निर्णय संगीतकारानंच घ्यावा या म्हणण्यावर त्या ठाम असत आणि ही गोष्ट शेवटपर्यंत कायम होती. आणखी एक म्हणजे संगीतकार गाणं 'ओके' झालं असं म्हणत नाही, तोपर्यंत त्या रूममधून बाहेर जायच्या नाहीत. एकदा सगळं गाणं ऐकून घ्या, कुठं काही हवं असेल तर सांगा, असं त्या आवर्जून सांगायच्या आणि तसं होऊन 'ओके' झाल्यावरच बाहेर यायच्या. आपल्या कामाशी असलेली इतकी बांधिलकी आणि नम्रभाव विरळाच. संगीतकारानं ओके म्हटलं पण समजा, रेकॉर्डिस्टनं 'आणखी एक टेक घेऊया का,' असं म्हटलं तर तेव्हाही गायला त्यांची तयारी असायची.

गाण्यापूर्वी त्या जेवायच्या नाहीत. त्या तीन-चार वाजता यायच्या. कॉफी प्यायच्या आणि माईकसमोर उभ्या राहायच्या. सहाच्या सुमारास रेकॉर्डिंग संपायचं. सगळं ओके झाल्यावर म्हणायच्या की 'थोडं बरं नाही वाटत, चक्कर येते आहे. कारण विचारल्यावर म्हणायच्या की काय आहे, खाल्लं नाही काही सकाळपासून. गाण्याचं इतकं टेन्शन होतं.' कोणतंही गाणं हे छानच व्हायला पाहिजे ही कळकळ त्यांना नेहमीच वाटे. हे इतकं टेन्शन घेणं, ही कळकळ सगळं सिद्ध करून झाल्यानंतरही कायम राहिली, हे विशेष. काही वेळा वयोमानानं होणाऱ्या तब्येतीच्या कुरबुरींमुळं रेकॉर्डिंग पुढं ढकलावं लागायचं. मला आठवतंय की एकदा एक रेकॉर्डिंग असं दोन-तीनदा पुढं ढकललं गेलं. नंतर त्या आल्यावर त्यांनाच टेन्शन असायचं की एवढं पुढं ढकललं आहे तर आजतरी ते व्हायला हवं. मग आम्ही त्यांना आश्वस्त करायचो की ठीक आहे, उद्या करू, त्याला काही डेडलाईन नाही. तरी त्या म्हणत राहायच्या की 'तुमचा, स्टुडिओचा वेळ जातो आहे, ते व्हायला पाहिजे.' त्या नेहमीच अत्यंत बारकाईनं प्रत्येक गोष्टीचा आणि प्रत्येकाचा विचार करायच्या. एका गाण्याचं रेकॉर्डिंग असं पुढं ढकलायला लागलं. तेव्हा सोमवारची डेडलाइन होती. मग शुक्रवारी रेकॉर्डिंग ठरलं. तब्येत तितकी बरी नव्हती. थोड्या गायल्या, पण आवाजात खर येत होती. मग ठरलं नंतर करूया. पण रेकॉर्डिंग होणं तर गरजेचं होतं. मी रविवारी काम करत नाही, हे दीदींना माहीत होतं. त्यांनी मला स्वतःहून फोन केला, 'आनंद, आपल्याला ते रेकॉर्डिंग करायचं आहे. पण रविवार येतो आहे तर तुम्ही दोन तास याल का माझ्यासाठी?' मी म्हणालो की, 'दीदी, तुम्ही फक्त वेळ सांगायची. मग तो कोणताही वार असो. तुम्ही गाल आणि आम्ही रेकॉर्ड करू ते आमचं भाग्य आहे, आणिक काय.' इतकी मोठी व्यक्ती आणि इतका साधेपणा!

इतक्या वर्षांत अंदाजे त्यांची १०० ते १२० गाणी मी रेकॉर्ड केली असतील. मयूरेशचे तेरा प्रोजेक्ट केले. बाळासाहेबांच्या 'शतजन्म शोधताना' या नाटकातली गाणी चिन्मय हर्षेसोबत केली. वैशाली सामंत, सलील कुलकर्णी यांची गाणी केली. समीर टंडनची पाच-सहा गाणी केली. प्रत्येक गाण्यामध्ये प्रत्येक वेळेस दीदींच्या आवाजाचं एक नवं रूप समोर यायचं. माईकसमोर उभ्या राहिल्या की त्या पूर्णपणं वेगळ्या असायच्या. त्या गाताना एक प्रकारचा ऑरा दिसायचाच. त्यांचा फोकस इतका जबरदस्त होता की कधी कधी तो अविश्वसनीय भासायचा. एका गाण्याच्या वेळी आवाजात जाम खर येत होती. नेहमीचं मध-पाणी, कॉफी घेऊन झालं. तरी खर कमी झाली नाही. मग बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेली होमिओपथीची गोळी घेऊन बघितली. त्यांचा त्या गोळीवर किंबहुना त्यापेक्षा अधिक विश्वास बाळासाहेबांवर होता. मग म्हणाल्या की, 'जरासं बरं वाटलं, पण खूपच सर्दीमुळं पुरं बरं वाटत नाही.' आम्ही म्हणालो, 'हरकत नाही, नंतर करूया.' त्या म्हणाल्या, 'मी फक्त पाच मिनिटं इथं बसते.' आवाजात इतकी खर होती की त्या दिवशी गळा सुटेल असं वाटतच नव्हतं. पाच मिनिटांनी त्या उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, की 'चला, आपण टेक करूया. आता नाही येणार खर.' मग आम्ही जस्ट रन केला. त्या पूर्ण मुखडा गायल्या. एकाही शब्दावर कुठंच खर आली नाही. त्या थांबल्यावर मी विचारलं, 'काय केलं दीदी तुम्ही, थोडीही खर आली नाही.' म्हणाल्या, 'चांगलं आहे ना.' तरी पुन्हा पुन्हा काय केलं हे मी विचारल्यावर त्यांनी फक्त वर हात दाखवला – देवानं केलं अशा अर्थाचा. त्यांची इच्छाशक्ती प्रचंड होती आणि दृढ आत्मविश्वास होता. स्वतःच्या गळ्यावर हुकूमत होती. त्यांच्या गाण्याचं रेकॉर्डिंग म्हणजे एक उत्सव असायचा. पर्वणी असायची.



अनुजसोबत

एकेका शब्दासाठी त्या अडलेल्या असायच्या. त्या त्या शब्दांचा अर्थ त्यांना कळेपर्यंत गीतकाराला विचारत राहायच्या. सतत ब्रेन स्टॉर्मिंग सुरू असे. संगीतकारानं पाठवलेली पूर्ण चाल त्या समजून घेत. ते ते गाणं स्वतःच्या हातानं लिहून घ्यायच्या. त्यावर विशिष्ट खुणा करायच्या. आता मी माईकसमोर गायला रेडी आहे, पूर्ण गाणं आत्मसात झालं आहे, असं त्यांना वाटेल तेव्हाच त्या माईकसमोर उभ्या राहायच्या. कधी काही करेक्शन असेल तर आम्ही एखादा शब्द डब केला तरी चालेल किंवा तेवढी ओळ गायली तरी चालेल असं सांगायचो, पण त्या म्हणायच्या, 'ते मला काही कळत नाही. मी पूर्ण अंतरा गाणार. मला एकच शब्द, ओळ गायची सवय नाही. तुम्ही तुम्हाला हवं ते घ्या. तुम्ही हवं ते ठिगळ लावा. मी माझ्याकडून शंभर टक्के द्यायचा प्रयत्न करणार.'

मला आठवतंय की सलील कुलकर्णी यांनी 'आता विसाव्याचे क्षण' आणि 'संधिप्रकाशात' या बा.भ. बोरकर यांच्या कवितांची गाणी केली होती. बोरकरांच्या कविता गायला मिळत आहेत, म्हटल्यावर त्या खूपच आनंदात होत्या. काही वेळा त्या फक्त वाचतच बसायच्या. सतत दाद द्यायच्या. किती सुंदर लिहिलं आहे हे असं म्हणत राहायच्या. जणू दीदी त्या कवितांच्या, गाण्याच्या प्रेमात पडल्या होत्या. चंद्रशेखर सानेकर यांनी 'मेरे साई' लिहिलं होतं. 'सादगी'मध्ये 'मैं कहाँ अब जिस्म हूँ, एहसास ही एहसास हूँ' हे गाणंही सानेकरांनी लिहिलं होतं. दीदी सानेकरांनाही वेळोवेळी छान लिहिता असं सांगायच्या. त्यांनी आजवर अनेक सृजनशील गीतकारांची गाणी गायली. गाणं आवडलं की लगेच दाद देणं हा त्यांचा स्वभावच होता. आम्हाला सांगायच्या, तुम्ही व्हॉईस छान घेता. आम्ही म्हणायचो, की, आम्ही फक्त माईक समोर ठेवतो. बाकी काहीच करत नाही. बाकी सगळी जादू तुमची आहे. त्या म्हणायच्या, 'तसं नसतं. सगळे वादक, संयोजक, रेकॉर्डिस्ट अशा प्रत्येकाचा हातभार त्या गाण्याला लागलेला असतो. मी एकटीनं करून काही होत नाही. गाणं हे टीमवर्क आहे.' त्या बोलायच्या तसंच प्रत्येक वेळी त्यांचं वागणं असायचं.

एकदा स्टुडिओत माझ्या मुलाचं नाव काय ठेवावं यावरून गप्पा सुरू होत्या. तेव्हा त्या आल्या आणि म्हणाल्या, की 'तुमच्या मुलाचं नाव मी सांगणार. 'अनुज' नाव ठेवा. पण तुम्हाला आवडतं का ते बघा.' मी म्हणालो, 'हा तर आशीर्वाद आणि प्रसाद आहे त्याला आयुष्यभरासाठी. तो त्याला कायमच पुरणार आहे.' एकदा माझा सर्दी-खोकला खूप रेंगाळला. रक्त वगैरे यायला लागलं. दीदींना ते कळलं. त्यांनी दोन-तीनदा मला डॉक्टरकडं जाऊन यायला सांगितलं. मी हो म्हणायचो आणि कामाच्या दगदगीत जाणं राहायचं. एकदा दीदींचं रेकॉर्डिंग नव्हतं पण त्या बाळासाहेबांसोबत स्टुडिओत आल्या. माझं रेकॉर्डिंग सुरू होतं तर म्हणाल्या, त्यांना सांगा आज पॅकअप करायचं आहे. कारण विचारल्यावर म्हणाल्या की 'तुम्ही आता सरळ गाडीत बसा. आपल्याला डॉक्टरकडं जायचं आहे.' मी म्हणालो की, 'मी जाईन ना.' त्या म्हणाल्या, 'मी तीनदा सांगून झालं आहे. तुम्ही गेला नाहीत. म्हणून मी आले.' म्हणजे तेवढ्यासाठी त्या पेडररोडहून अंधेरीला स्टुडिओत आल्या होत्या. त्या मला मीनाताईंचे जावई, रचनाचे पती निशित शाह हे नाक-कान-घसातज्ज्ञ असल्यानं त्यांच्याकडं पेडररोडला घेऊन गेल्या. तपासणी, औषधं वगैरे झाल्यावर म्हणाल्या, 'आता ठीक आहे. आता ड्रायव्हर तुम्हाला स्टुडिओत सोडून येतील.' एकदा गप्पा मारताना अनुजला चष्मा लागल्याचं, थोडा त्रास होत असल्याचं कळलं. त्यांनी वांद्र्याच्या डॉ. श्रॉफ यांना फोन करून थेट त्यांची अपॉइंटमेंट घेऊन मला तसं सांगितलं. डॉक्टरांकडं जाऊन आल्यावर मी दीदींना फोन केला तर त्या म्हणाल्या, 'हो. झालं माझं बोलणं डॉक्टरांशी. तुमचं बोलणं झालं असेल या हिशोबानं मी त्यांना फोन केला होता.' सोबतच्या माणसांची काळजी त्यांनी सतत केली. त्यांना आपलं मानलं. वाढदिवस, दिवाळीच्या सुमारास प्रत्येकाच्या आवडी-निवडी लक्षात ठेवून प्रत्येकाला शुभेच्छा आणि भेट द्यायच्या. स्वरलता स्टुडिओमधल्या समीर आणि प्रबीर या कर्मचाऱ्यांची त्या आस्थेनं विचारपूस करायच्या. प्रबीरशी त्या कायम बंगालीतच बोलायच्या. प्रबीर स्वयंपाककलेत निपुण असल्यानं त्या त्याला 'प्रबीरदा, हे कसं केलंत' असं विचारत राहायच्या. एकदा त्या प्रबीरसोबत स्टुडिओच्या स्वयंपाकघरात काहीतरी पदार्थ करत होत्या. एका क्लायंटनं त्यांना पाठमोरं पाहिलं पण त्यांचा विश्वासच बसला नाही की त्या दीदी आहेत. मग त्यांनी पुन्हा जाऊन खात्री केल्यावर तो जवळपास निःशब्दच झाल्या होत्या. स्टुडिओतून समीर किंवा प्रबीर प्रभुकुंजला काही सीडी, सामान घेऊन गेल्यावर त्या त्यांची आपुलकीनं चौकशी करून खाऊ घालायच्या. त्यांचं प्राणिप्रेम सर्वश्रुत आहेच. स्टुडिओत गेली सात वर्षं बिट्टू हा पाळीव कुत्रा आहे. त्या रोज नित्यनेमानं दुपारी फोन करून त्याच्या खाण्या-पिण्याची चौकशी करायच्याच. त्या कुणाशीही कनेक्ट करू शकायच्या. कधीतरी म्हणायच्या, 'माणसांपेक्षा प्राणी जास्त भरवशाचे आहेत.' त्यांची 'आभाळमाया' कायमच राहिली आम्हा सगळ्यांवर...

आम्ही सतत त्यांच्या सहवासात होतो. त्यांच्याशी बोलायचो. तो कनेक्ट आता तुटल्यासारखा वाटतो. त्यांची गाणी तर लहानपणापासून ऐकतो आहे. कधी वाटलंच नव्हतं त्यांची भेट होईल म्हणून. ते एक स्वप्न होतं. इतकी वर्षं त्यांच्या सहवासाचं भाग्य लाभलं. आता त्यांच्याशी बोलणं थांबलं. पण गाणी तर आहेतच स्टुडिओत. कोणतीही गोष्ट केली की त्यात त्यांचा कनेक्ट जाणवतोच. मयूरेश पै यांच्या 'सादगी' या अल्बममधल्या 'मैं कहाँ अब जिस्म हूँ, एहसास ही एहसास हूँ, मैं उजाले की तरह तेरे दिये के पास हूँ' या चंद्रशेखर सानेकर लिखित गाण्यातल्या ओळींचा अर्थ आता बदलला आहे

**– आनंद डबरे**
ananddabre@gmail.com

**शब्दांकन – राधिका कुंटे**
kunte.radhika@gmail.com



**डॉ. सुरेश चांदवणकर**

# लता मंगेशकर ह्यांच्या ध्वनिमुद्रिका










**लता** मंगेशकर ह्यांच्या आयुष्यातली साठहून अधिक वर्षे पार्श्वगायनाच्या क्षेत्रात गेली. त्यांच्या गाण्याविषयी, आवाजाविषयी व एकूण कारकिर्दीविषयी भरभरून लिहिले गेले आहे. त्यांची गाणी १९४३ ते १९९० पर्यंत ग्रामोफोन रेकॉर्ड, कॅसेट व सी.डी.वर ध्वनिमुद्रित झालेली आहेत. त्याविषयी मात्र खूप कमी लिहिले गेले आहे. त्याचा थोडा मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न.

मा. विनायक ह्यांच्या 'माझं बाळ' या मराठी बोलपटात १९४३ साली कु. लता मंगेशकर ह्यांनी भूमिका केली व गाणीपण गायली. त्या रेकॉर्डच्या लेबलवर गायिका म्हणून Lata Mangeshkar असे नाव इंग्रजीमध्ये छापले आहे. माधव ज्युलियन ह्यांची 'आई' ही सात कडव्यांची कविता त्यात दोन भागांत गायली आहे. अतिशय उंच पट्टीतले बालगायिका लता मंगेशकर ह्यांच्या आवाजात हे गाणे आहे. संगीतकार दत्ता डावजेकर.

'भगवान गौतम बुद्ध' ह्या बॅलेकरिता (नृत्यनाट्य) १९४८ साली त्यांनी सहा गाणी गायली. कोलंबिया लेबलवरच्या तीन रेकॉर्डवर ही गाणी वितरीत करण्यात आली. ह्या रेकॉर्डच्या लेबलवरसुद्धा 'लता मंगेशकर' हे नाव ठळकपणे छापलेले आहे. बाजारात विक्रीसाठी आल्या नसल्याने त्या रेकॉर्ड मिळवणे अवघड होते. फारच थोड्या प्रती बनवून घेण्यात आल्या होत्या. मोजकेच प्रयोग झाल्यावर हे संच कलाकारांना भेट म्हणून देण्यात आले. त्यात समूहनृत्यामध्ये भाग घेतलेल्या एका मुलीने ते जपून ठेवले होते. १९९५च्या आसपास तिच्या घरातून काही रेकॉर्ड मिळाल्या. त्यात ह्या रेकॉर्डपण होत्या. ही गाणी आता इंटरनेटवर ऐकायला मिळतात.

'शारदा' ह्या मराठी बोलपटासाठी (१९५१) 'मूर्तिमंत भीती उभी' हे गाणे त्यांनी गायले आहे असे बुजुर्ग संग्राहकांकडून ऐकून होतो. याच नावाच्या नाटकावरून बोलपट बनवला होता. त्यामुळे हे नाट्यगीतच पण सिनेमासाठी गायलेले व एकमेव असे नाटकातले गाणे लता मंगेशकर ह्यांच्या आवाजातले मिळणे कठीण, पण एकदा चोरबाजारात रेकॉर्डचा भला मोठा ढीग तपासताना ही रेकॉर्ड दिसली. चेहरा निर्विकार ठेवून विक्रेत्याकडून माफक किमतीत ती मिळवली व संग्रहात एका अनोख्या व दुर्मिळ रेकॉर्डची भर पडली. ह्या रेकॉर्डच्या मागच्या बाजूला 'श्रीमंत पतीची राणी' हे पद आहे व ते मात्र आशा भोसले ह्यांच्या आवाजात आहे. रेकॉर्डवर त्यांची नावेपण छापलेली आढळतात. आज ही दोन्ही गाणी रसिकांना सोशल मीडियावर उपलब्ध आहेत.

साधारणपणे १९७०पर्यंत ७८ गतीच्या (RPM) पाठपोठ गाणे असलेल्या लाखेच्या ध्वनिमुद्रिका बनवल्या जात. त्या सहज फुटून जात. एका रेकॉर्डमध्ये दोन गाणी असत व एक गाणे तीनेक मिनिटे वाजत असे. त्याच्या छोट्या लेबलवर खूप काही माहिती देणे शक्य नसे. अशा शेकडो ध्वनिमुद्रिका लता मंगेशकर ह्यांच्या नावे वेगवेगळ्या

लेबलवर उपलब्ध आहेत व संग्राहकांनी मेहनतीने मिळवून जपून ठेवल्या आहेत.

पुढे ई.पी. व एल.पी. रेकॉर्डचा जमाना सुरू झाला. प्लास्टिकच्या (Vinyl) असल्याने फुटत नसत, पण चरे पडत असत. म्हणून पातळ प्लास्टिक किंवा कागदाच्या मध्ये ठेवून बाहेर पुन्हा जाड कागदाचे कव्हर असे. त्यावर मात्र भरपूर मजकूर व छायाचित्र छापता येई. त्यांचे डिझाईन मोहन वाघ, कमल शेडगे, मोहनमुरली करत असत. गाणे ऐकत असताना ही कल्पक वेष्टने पाहणेसुद्धा आनंददायी असे. अशा सुमारे शंभराहून अधिक कव्हरांवर लता मंगेशकर ह्यांच्या विविध भावमुद्रा फोटोमधून प्रकट झालेल्या पाहावयास मिळतात. आज इंटरनेटवर ही सगळी वेष्टने व गाणी सदैव उपलब्ध आहेत.

१९६८च्या वरील वेष्टनामध्ये धगधगते अग्निकुंड व ज्वाळा दिसत आहेत. कुणा अनामिकाने त्याचे डिझाईन केले आहे. स्वा. सावरकर यांच्या दिव्य प्रतिभेचे दोन तेजस्वी आविष्कार लता मंगेशकर व सहकारी ह्यांनी मुद्रित केल्याचे नमूद केले आहे. 'जयोस्तुते श्री महन्मंगले' हे गीत लता मंगेशकर व कोरसने मधुकर गोळवलकर यांच्या संगीतात तर 'सागरा प्राण तळमळला' हे गीत सर्व मंगेशकर भावंडांनी मिळून हृदयनाथ मंगेशकर ह्यांच्या चालीवर गायले आहे.

'मालवून टाक दीप' ह्या १९७१ च्या ई. पी. रेकॉर्डचे कव्हर छान बनवले आहे. मोहन वाघ ह्यांनी ते बनवले आहे. त्यात सुरेश भट ह्यांच्या तीन कविता लता मंगेशकर ह्यांनी गायल्या आहेत. एका बाजूला 'मेंदीच्या पानावर' व 'आज गोकुळात रंग खेळतो हरी' ही गाणी आहेत. कव्हर मात्र 'मालवून टाक दीप' ह्या गाण्यासाठी बनवले आहे असे वाटते. केवळ शब्द वाचून केले आहे की गाणे पण ऐकून हे कळायला मार्ग नाही. चित्रात दिसणारी स्त्री व पुरुष आधुनिक न वाटता पुराण काळातले एखाद्या राजमहालातल्या मंचकावर असावेत असे दिसतात. एकमेकांकडे पाठ करूनच मंचकावर दिसताहेत. स्त्रीला बराच विरह झालेला असूनही 'निवांत संग' हवा आहे व ती तसे मोकळेपणी शब्दांतून सांगते आहे. पुरुषाचे काय मत आहे ते कळायला मार्ग नाही, पण तो पूर्ण पाठ करूनच बसला आहे. द्विधा मनःस्थितीत असावा असे वाटते. केव्हाही उठून तरातरा निघून जाईल किंवा स्त्रीच्या बाजूला वळेल अशा दोन्ही शक्यता आहेत. जो दीप ती 'मालवून टाक' म्हणून सांगते आहे तो डाव्या हाताला मंचकाच्या कडेला असून चित्र नीट बघितले तरच दिसतो. गाणे लक्षपूर्वक ऐकले तर दोन कडव्यांमध्ये अगदी खर्जामध्ये वीणावादन ऐकायला मिळते. पुरुषाच्या मनातल्या भावना त्यातून प्रकट झाल्या असतील असे वाटते.




लता मंगेशकर ह्यांच्या गाण्यांना पंचवीस वर्षे पूर्ण झाली तेव्हा एक विशेष ई. पी. रेकॉर्ड ग्रामोफोन कंपनीने वितरित केली. सुबक व देखण्या पुस्तिकेबरोबर ३३ गतीची सात इंची रेकॉर्ड दोन भागांत असून त्यात गाजलेल्या गाण्यांचे नमुने मुद्रित केले आहेत. एक छायाचित्र पं. नेहरू यांच्याबरोबरचे असून दुसरे त्यांच्या लांबसडक केसांचे दर्शन घडवणारे आहे. ह्या रेकॉर्डच्या फारच थोड्या प्रती खाजगी वितरणासाठी बनवल्या होत्या. त्यातली एक मला दादर स्टेशनबाहेर रस्त्यावर मांडलेल्या एका विक्रेत्याच्या सामानात मिळाली. नगण्य किमतीला!

ई.पी.प्रमाणे एल.पी. रेकॉर्डची वेष्टने फार सुंदर, कलापूर्ण व अभ्यासाचा विषय ठरावीत अशीच आहेत. त्यांचेही शेकडो नमुने उपलब्ध असून संग्राहकांनी फार कष्ट घेऊन ह्या रेकॉर्ड मिळवल्या आहेत. ह्यातली काहींची माहिती लक्षणीय आहे.

'स्वरसुमनांजली' ह्या एल.पी. रेकॉर्डवर मंगेशकर कुटुंबीयांचा फोटो आहे. १९६७ साली मा. दीनानाथ मंगेशकर ह्यांच्या पंचविसाव्या पुण्यतिथीला ही रेकॉर्ड वितरित झाली. सर्व भावंडे शुभ्र कपड्यांत







आहेत. मागे बाबांचा म्हणजे मा. दीनानाथ मंगेशकर ह्यांचा रंगभूमीवरील पोशाखातला फोटो आहे. ह्या रेकॉर्डमध्ये स्वा. सावरकर, भा.रा. तांबे, आरती प्रभू, शांता शेळके, सूर्यकांत खांडेकर ह्यांच्या कविता आहेत. सर्व गाण्यांची संगीत रचना हृदयनाथ मंगेशकर ह्यांची आहे. 'सागरा प्राण तळमळला' हे गाणे सर्व भावंडांनी मिळून म्हटलेले आहे. त्या काळी ह्या गीताच्या चालीवर बरीच टीका झाली होती. मूळ काव्याची जाति 'अक्रूर' अशी लिहिलेली आढळते. त्याप्रमाणे संथगतीत व अतिशय धीम्या गतीत गायन वा पठण अपेक्षित आहे. माफक वाद्यमेळाच्या साथीने. सुधीर फडके व अन्य गायक तसेच गात असत. ह्या नव्या चालीत भरपूर वाद्यमेळ, कोरस व पुरुष नायक असलेल्या काव्यात स्त्री व पुरुषांच्या आवाजातले गाणे हे सारेच खटकणारे होते. आज हीच चाल लोकप्रिय झाली आहे. यूट्यूबवर पाच लाख लोकांनी ते ऐकले आहे. 'The Phenomenal Mangeshkars' असे इंग्रजी शीर्षक रेकॉर्डच्या कव्हरवर छापलेले आहे.

अशीच आणखी १९८४ सालातली एक एल.पी. रेकॉर्ड श्रीनिवास खळे ह्यांनी संगीत दिलेल्या गाण्यांच्या संकलनाची आहे. मंगेशकर भावंडांनी गायिलेली ही गाणी असून त्यात मागच्या बाजूला सर्व जणांचा माई मंगेशकर ह्यांच्याबरोबरचा फोटो छापला आहे. ही गाणी आधी ई.पी.वर आली होती. त्यात चार गाणी लता मंगेशकर ह्यांच्या आवाजातली आहेत. ती सगळी मंगेश पाडगांवकर ह्यांनी लिहिलेली आहेत. 'श्रावणात घननीळा बरसला', 'भावनांचा तू भुकेला रे मुरारी', 'जाहल्या काही चुका' व 'नीज माझ्या नंदलाला' ह्या ओळी वाचल्या तरी गाणे मनामध्ये आपोआप वाजायला लागतेच.

काही एल.पी. रेकॉर्डवर पेंटिंग आहेत व ती उषा मंगेशकर ह्यांनी केलेली आहेत. त्यांचे काही नमुने :


१९६९ साली मिर्झा गालिब ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ही रेकॉर्ड बनवण्यात आली. ह्यात गालिबच्या नऊ रचना असून संगीत हृदयनाथ मंगेशकर यांचे आहे


**शिवकल्याण राजा १९७१**

छत्रपती शिवाजीमहाराज ह्यांच्या राज्याभिषेकाला १९७४मध्ये तीनशे वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने १९७१ मध्ये 'शिवकल्याण राजा' ही रेकार्ड बनवण्यात आली. तिचे संगीत हृदयनाथ मंगेशकर ह्यांनी दिले.

ही पेंटिंग असलेल्या रेकॉर्ड आता फार दुर्मिळ झाल्या असून खूप महाग आहेत. १९८२ साली सर रिचर्ड अॅटनबरो ह्यांचा 'गांधी' हा बोलपट आला व गाजला. १९८३ साली 'गांधीप्रिय भजने' ही रेकॉर्ड बाजारात आली. त्यात सात भजने असून संगीत हृदयनाथ















मंगेशकरांचे आहे. त्यातली 'वैष्णव जन तो', 'पायो जी मैने राम रतन धन पायो', 'ठुमकी चलत रामचंद्र' ही भजने गाजली. चाली पारंपरिकच होत्या पण पुष्कळ दिवसांनी एखाद्या गायिकेने त्या गायल्या होत्या.

लता मंगेशकर ह्यांचे गाणे १९८० नंतर कमी होऊ लागले व देश-विदेशातले सार्वजनिक व मदतीसाठीचे कार्यक्रम वाढू लागले. त्याच्यापण रेकॉर्डचे अल्बम्स आकर्षक वेष्टनांसहित निघायला लागले, चांगलेच खपले व आता दुर्मिळ होऊ लागले आहेत. त्यांचे काही नमुने-

१९७०च्या सुमारास कॅसेट टेप तर नव्वदमध्ये सी.डी. व डी.व्ही.डी बाजारात येऊ लागल्या. त्यांच्या वेष्टनांवर खूपच कमी जागा असल्याने मजकूर कमी झाला. फोटोसाठी जागा कमी होऊ लागली.

२००५ पासून डिजिटलयुग अवतरले. घरोघरी डेस्कटॉप व लॅपटॉप येऊ लागले. सीडी/डीव्हीडीवर खूप गाणी व माहिती साठवता येऊ लागली. तेही अपुरे पडू लागले तेव्हा हार्डड्राइव्ह व पेनड्राइव्ह आले. मोबाइल फोनमुळे तर हे सगळेच मागे पडायला सुरुवात झाली.

आज २०२२ मध्ये सीडी/डीव्हीडी प्लेअर मिळणे अवघड होत चालले आहे. नवीन डेस्क व लॅपटॉपमध्ये सीडी/डीव्हीडी वाजवण्याची सोयच नाही. फेसबुक व यूट्यूब यासारख्या माध्यमांमुळे ही सगळी सामग्री खरेदी करून बाळगण्याची गरजच उरली नाही. अशावेळी खाजगी संग्रह करणारे व संग्रहालयांच्या तर्फेच ध्वनिमुद्रिकांचा हा अनमोल ठेवा जपून ठेवला जाणार आहे.

**- डॉ. सुरेश चांदवणकर**
chandvankar.suresh@gmail.com



लताबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील ठामपणा आणि निश्चयीपणा आठ दशकांत स्वरांतूनही तितक्याच नेमकेपणाने व सातत्याने उतरला. हे माझ्यासाठी विलक्षण आणि आत्मिक अनुभूती देणारे होते.

**– मनोज आचार्य**





शशी व्यास

# अलौकिक स्वराधीश

**कलाकारांचं** रसिकांशी असलेलं नातं म्हणजे परमेश्वराचं भक्तांशी असलेलं नातं, असं म्हटल्यास वावगं ठरू नये. ज्याप्रमाणे भक्त आपल्या आराध्य दैवताला 'अहो-जाहो' न करता जिव्हाळ्याच्या नात्यानं एकेरी संबोधतो तद्वत प्रस्तुत लेखामध्ये मी त्याच जिव्हाळ्याच्या नात्यानं माझ्या संगीतजगतातील लता मंगेशकर या आराध्य दैवताला एकेरी संबोधत आहे, तरी हा त्यांचा उपमर्द अथवा अनादर न समजावा ही नम्र विनंती.

लता म्हणजे संगीतविश्वातील अथांग समुद्र आहे. त्याची व्याप्ती आणि खोली, तांत्रिक अथवा भावनिक स्तरावर करायची पात्रता माझ्यात नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. गाणारे पुष्कळ आहेत, ते चांगलेही आहेत. आपापल्या ठिकाणी त्यांनी स्वत:चं एक स्थानही निर्माण केलं आहे; परंतु लता म्हणजे भारतीय संगीतातला किंवा वैश्विक संगीतातला एक दीपस्तंभ आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात, ज्यांनी ज्यांनी भारतीय संगीत ऐकलं आहे, त्या कोणत्याही व्यक्तीला, मग ती स्वानंदासाठी गाणारी, हौशी गाणारी अथवा व्यावसायिक गाणारी असू दे, तिला एकदा तरी आपला 'सूर' लताच्या सुरासारखा लागावा ही मनःपूर्वक इच्छा असतेच. आतापर्यंत अनेकांनी असे प्रयत्न केले, पण तिथपर्यंत आजतागायत कोणीही पोहोचू शकलं नाही. योगसाधनेच्या अत्युच्य स्थानापर्यंत पोहोचण्याच्या पायऱ्या सात आणि संगीतसाधनेच्या त्या अत्युच्य स्थानाच्या पायरीवर लता विराजमान आहे. इथे एक किस्सा सांगावासा वाटतो. एका संगीत मैफिलीत माझ्या गुजराती मित्राला म्हणालो, की 'आज ये गायक बडे सूर में गा रहा है.' माझा मित्र एकदम चिडला. तो म्हणाला 'त्यात काय मोठं आहे. गाण्यासाठी सुरात असणं ही तर मूलभूत गोष्ट आहे. ते यायलाच हवं.' त्यामुळे एखादा गायक सूर-ताल-लयीत गातोय ही काही मोठी गोष्ट नाही. त्यानंतर तर अस्सल कलावंताचा खरा कस लागतो. त्यापुढे त्याची गुणवत्ता महत्त्वाची ठरते. कारण संगीत हे तीन स्तरांवर ऐकलं जातं. शारीरिक रंजन, मनोरंजन, आणि आत्मरंजन. त्यामुळे सूर-लय-ताल याच्या पलीकडे जात आत्म्याला जागृत करण्याची लय ज्याला सापडते, त्याचं संगीत अलौकिकत्वाला पोहोचतं. मनुष्याला लयींचं ज्ञान जन्मजात असतंच. लहान मूल गाण्यातील काहीच कळत नसतानादेखील संगीताच्या तालावर पाय हलवतं. अगदी चालायला सुरुवात करणाऱ्या प्रत्येक बाळाची चालतानाची लय ही भिन्न असते. लताला जीवनाची लय सापडली, संगीताची लय सापडली, भावार्थाची लय सापडली, प्रेक्षकांची लय कळली. तिच्या गाण्यात अमुक-तमुक गोष्ट 'नाही' असं आपण म्हणूच शकत नाही, इतकं ते परिपूर्ण असतं. 'परमेश्वरानं तिला स्वर्गीय गळा दिला आहे' हे खरं आहे. 'गाता गळा' तर परमेश्वरानं अनेकांना दिलाय; (म्हणून प्रत्येकानं त्याचं सोनं केलं आहे, असं नाही.) जर लताच्या कारकिर्दीचा आढावा घेतला तर लक्षात येतं, की जन्मजात मिळालेला दैवी स्वर हा शारीरिक, बौद्धिक अथवा मानसिक विचारांनी अधिक परिपक्व आणि समृद्ध करत तिनं अतुलनीय केला आहे. लताचा स्वर ऐकल्यावर संगीत काय आहे ते नकळत वळतं. 'अदालत'मधील मदनमोहन यांनी संगीत दिलेलं, गीतकार राजिंदर कृष्ण यांचं 'उनको ये शिकायत है के हम कुछ नहीं कहते' हे मालगुंजी रागावर आधारित गाणं गाताना लतानं सुरांना जे भावार्थ दिलेत, लय दिलीये ते शब्दातीत आहे. वैफल्यग्रस्त स्त्रीचं दु:ख सुरांमधून बाहेर पडलंय.

सिनेसंगीताला एक पार्श्वभूमी असते. चित्रपटाची कथा लिहिणारा वेगळा, दिग्दर्शक वेगळा, गाणं लिहिणारा वेगळा, रेकॉर्डिंग करणारा वेगळा, चित्रित करणारा वेगळा, अभिनय करणारा वेगळा आणि गाणारा वेगळा असतो. त्यामुळे विशिष्ट सीनचा मथितार्थ काय आहे, दिग्दर्शकाला काय अभिप्रेत आहे, कोणत्या घटनेवर आधारित गाणं सिनेमात चित्रित होणार आहे, या सगळ्याचं सार काढून आपल्या सुरावटीतून गायकाला व्यक्त व्हायचं असतं. 'काँटो से खिंच के ये आँचल, तोड के बंधन बांधे पायल' हे गाणं ऐकताना आपल्या डोळ्यांसमोर मानसिक नैराश्याच्या गर्तेतून

बाहेर पडलेली एक मुलगी नवचैतन्यानं नाचताना दिसत असते. मानसिक मुक्तीचा आनंद ती साजरा करत असते. 'आज फिर जिने की तमन्ना है' म्हणताना लताचा आवाज त्या नायिकेचं भावविश्व आपल्यासमोर निर्माण करतो. म्हणूनच कलेला, दिग्दर्शकाला, अभिनेत्याला, कॅमेरामनला, सगळ्यांना जे अभिप्रेत आहे, त्यातील कुठलंही दृश्य डोळ्यांसमोर नसतानादेखील ते चित्र आपल्यासमोर उभं करण्याची ताकद लताच्या आवाजात आहे.

संपूर्ण मंगेशकर कुटुंब म्हणजेच भारतीय संगीताला मिळालेलं परमेश्वराचं वरदान आहे. एखाद्या कुटुंबातील, एखादा गायक या उत्तुंग पदापर्यंत जाऊ शकत असेल, तर कुटुंबालाच नव्हे तर संपूर्ण समाजालाच त्याचं कौतुक असतं आणि इथे तर संपूर्ण कुटुंबच अलौकिक स्वरांत गातंय. जणू परमेश्वरानं संगीताचा आनंद घेत असताना या पाच भावंडांची निर्मिती केली असावी असं वाटतं.

मी लताच्या संगीताचा विचार करतो तेव्हा मला जाणवतं की मी आधी 'नकळत' प्रभावित झालो, मग 'कळतपणे' अधिक प्रभावित झालो, मग विश्लेषणात्मक पातळीवर पोहोचलो, तेव्हा त्या संगीतातील मर्म मला उलगडत गेलं. लताच्या सुरांची किमयाच अजब आहे. माझी खात्री आहे की औरंगजेब, ज्यानं आयुष्यभर संगीताचा तिरस्कार केला, त्यानं जर लताचा सूर ऐकला असता तर तोही जगातील एक अनन्यसाधारण संगीतप्रेमी झाला असता. याचं कारण त्या अलौकिक सुरांची जादू! नवरसांपैकी कोणताही रस घ्या, अगदी शृंगार, करुण, भक्ती ते पार बीभत्सरससुद्धा. त्या सर्व रसांच्या भावार्थाला पूर्ण न्याय देण्याची ताकद लताच्या आवाजामध्ये होती. प्रत्येक रसाच्या भावार्थाला अनेक कंगोरे असतात. शृंगाररसाच्या भावार्थाला तर अगणित कंगोरे आहेत. मादकता किंवा वासना उद्युक्त करणाऱ्या गाण्यांना लतानं जाणीवपूर्वक डावललं. ती कोणतंही गीत गाऊ शकत होती. पण गाणं निवडताना तिनं स्वतःसाठी एक लक्ष्मणरेषा आखली होती. आपल्या सुरांचं पावित्र्य तिला शक्य तितकं जपायचं होतं. याला अपवाद म्हणजे 'इंतकाम' चित्रपटातील दोन गाणी – 'कैसे रहूँ चूप के मैने पी ही क्या है?' आणि 'आ जाने जा, मेरा ये हुस्न जवाँ.' दोन्ही गाणी लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी संगीतबद्ध केली होती तर गीतकार होते राजिंदर कृष्ण. फार कमी कलाकार असं धाडस दाखवू शकतात.

'दिल से' चित्रपटातील 'जिया जले जान जले' हे गाणं ए.आर. रहमाननं लताकडून गाणं गाऊन घेतलं. खरं तर रहमान फक्त रात्रीचं रेकॉर्डिंग करत असे आणि लता फक्त दिवसा रेकॉर्डिंग करत असे. रहमानची इच्छा होती की हे गाणं लतानंच गावं, म्हणून त्यानं हे गाणं लताच्या आग्रहानुसार दिवसाच ध्वनिमुद्रित केलं आणि शृंगाररसाच्या एका अजरामर गाण्याचा जन्म झाला. तिनं शृंगाररसातील गाणी गायली तेव्हा शृंगाररसातील विविध भाव आपल्याला प्रतीत झाले. समर्पित भावनेनं ओथंबलेलं भक्तिरसपूर्ण गाणं म्हणजे 'अल्ला तेरो नाम' किंवा करुणरसाचा कळसाध्याय म्हणजे 'ऐ मेरे वतन के लोगो' जे ऐकताना नकळत डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहत नाही किंवा 'ममता'मधील 'रहते थे कभी जिनके दिल में' या गाण्यात नायकाला जीवनाचं सत्य ऐकवतानाचा कडवटपणा तिनं शब्दांच्या पखरणीतून ज्या पद्धतीनं व्यक्त केलाय त्याला तोड नाही. लताविषयी बोलताना सूर-ताल-लय याविषयी बोलणं व्यर्थ आहे. या विषयी काय बोलणार! ते बावनकशी सोनं आहे! तिची तुलना इतर गायक-गायिकांबरोबर करणं हे अनाठायी आहे. इतर गायक-गायिकाही आपापल्यापरीनं उत्कृष्टच गात आहेत. अगदी वर्तमानकाळातल्या गायिका पहिल्या तर लक्षात येईल की १९५० पासून २००० सालापर्यंत लतानं जे संगीतसाम्राज्य उभं केलं त्या पायावरच आताच्या गायिका मोठ्या झाल्या. शेवटचं गाणं ती 'वीरझारा'साठी गायली. 'सारेगामापा' किंवा 'इंडियन आयडॉल' असू दे, या सगळ्या रिॲलिटी शोंमध्ये लताची गाणी गायल्यानंतरच गायिकांच्या पाठीवर शाबासकीची थाप पडली, हे सत्य आहे.

तिचं गाणं काळजाला का भिडतं याचं आणखी एक कारण म्हणजे तिच्या हृदयाचा प्रेमळपणा तिच्या गायकीत डोकावतो. उदाहरणार्थ, एक ऐकीव किस्सा आहे, राज कपूरनं 'सत्यम् शिवम् सुंदरम्'साठी आधी हृदयनाथ मंगेशकरांचं नाव ठरलेलं असूनसुद्धा लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांना संगीतकार म्हणून घेतलं तेव्हा लता नाराज झाली होती. तिची नाराजी लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याविषयी नव्हती. तेही तिचे आवडते संगीतकार होते. पण शब्द देऊन तो फिरवला याविषयी ती नाराज होती. आणि राज कपूरला तर लताशिवाय ही गाणी करणं मंजूर नव्हतं. सरतेशेवटी लता गायला कबूल झाली; पण एका अटीवर, ती म्हणजे ध्वनिमुद्रणाच्या वेळेस राज कपूर स्टुडिओत असता कामा नये. खरं तर राज कपूर त्याच्या कोणत्याही चित्रपटातील गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळी जातीनं हजर असायचाच. पण लताची नाराजी ओळखून त्यानं तिथं फिरकण्याचं धाडस केलं नाही. पण, यात राज कपूरवर असलेल्या नाराजीमुळे लतानं गाण्यांवर अन्याय केला का? तर त्याचं उत्तर – मुळीच नाही.

'सत्य न जाना शिव को न माना' यातील स्वर म्हणजे 'या हृदयीचे त्या हृदयी' जाण्याची किमया सुरावटींद्वारे तिनं केली



जो माहौल पैदा करते हुए हमें तीन घंटे लागते है,
वह काम लता तीन मिनट में कर लेती है.

**– उस्ताद आमीर खान**



आहे. आचार्य अत्रेंच्या शब्दांत बोलायचं झालं तर त्या पद्धतीचा सूर पुढील दहा हजार वर्षांतसुद्धा कोणी गाऊ शकत नाही. आजही नवोदित गायिकांना स्वत:ची गायकी सिद्ध करण्यासाठी लताच्या सुरांचाच आधार घ्यावा लागतो. श्रेया घोषालनं 'लग जा गले' गायल्यानंतर परीक्षकांना ती चांगली गाते याचा साक्षात्कार झाला होता. लताच्या गाण्यातील भाव फक्त ५० टक्के कोणाला उतरवता आला तरी त्याची सांगीतिक कारकीर्द घडते हे त्रिवार सत्य आहे.

'रुके रुके से कदम' हे गाणं ऐका किंवा 'आज सोचा तो आँसू भर आए. मुद्दते हो गईं मुस्काराए' हे गाणं ऐका, यातील 'मुद्दते' शब्द अशा अदाकारीनं उच्चारला आहे की खरंच 'अनेक वर्षांचा काळ' लोटलाय असं वाटतं. युगुलगीतात रफी आणि लता या जोडीला पर्याय नाही. 'झाले बहु, होतील बहु, पण यासम नाही' असं कॉम्बिनेशन होतं ते.

काही जण म्हणतात, की 'जो राग उभा करण्यासाठी आम्ही अर्धा-एक तास कसरत करतो, तो राग लतादीदी काही मिनिटांमध्ये उभा करतात.' मी या विधानाशी पूर्ण असहमत आहे. तीन मिनिटांत राग नाही तर रागाचं मर्मस्थान दाखवता येतं. रागाचं व्यक्तिमत्त्व उभं करणं हे एक वेगळं असामान्य कौशल्य आहे. मुखड्यावर राग होत नाही. रागदारी वेगळी असते. लतानं ठरवलं असतं तर ती हे निश्चितच करू शकली असती आणि अभिजात संगीत व सिनेसंगीत या दोन्हींचा सुरेख समन्वय साधला असता. तिनं सिनेसंगीत हा पर्याय निवडला त्याची कारणं सर्वश्रुत आहेत. त्यावर वेगळं भाष्य करण्याची गरज नाही. अभिजात संगीताला वाहून घेणं ही खूप मोठी तपश्चर्या आहे. अभिजात संगीताच्या महतीसंदर्भात एक किस्सा जरूर सांगावासा वाटतो. गप्पांच्या ओघात मी एकदा गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांना म्हटलं, की 'यमन रागावर आधारित चित्रपटसंगीतात अगणित गाणी आहेत. उदाहरणार्थ 'निगाहे मिलाने को जी चाहता है', 'चंदन सा बदन, चंचल चितवन', 'जब दीप जले आना' अशी अनेक गाणी आहेत. नवीन चित्रपटांमधील 'जाता है तू कहाँ' असू दे किंवा मराठीतील 'तोच चंद्रमा नभात', या सर्व गाण्यांमध्ये यमन रागातील वैविध्य प्रकर्षानं जाणवतं. त्यावर किशोरीताई पटकन म्हणाल्या की 'अरे शशा, म्हणून यमन तिथे संपत नाही. तो या सर्वांच्याही खूप पुढे आणखी.. आणखी... आणखी... व्यापक आहे.' त्यांच्या या वाक्याचा अर्थ फक्त संगीत साधक आणि अभिजात संगीतरसिकच समजू शकतो.

रागाचं मर्म सांगितलं म्हणजे रागाचा जीव उलगडून दाखवला असं नव्हे. त्याचा जीव वेगळा असतो. कारण शास्त्रीय संगीतात विस्ताराला महत्त्व आहे. एक कथा घेऊन दिग्दर्शक तीन तासांचा सिनेमा बनवतो हे त्याचं स्वत:चं कौशल्य असतं, त्याची प्रतिभा असते. तद्वत ओंकारनाथ ठाकूर जेव्हा केव्हा वेगवेगळे राग गातात तेव्हा प्रत्येक रागात षड्जाचं वैविध्य आणि त्यानुसार जाणवणारं त्याचं महत्त्व कळतं. गुलाम अलींचं 'याद पियाँ की आये' ऐकल्यावर रागाची ताकद कळते. शास्त्रीय संगीतातील माणूस जेव्हा पुरिया सादर करतो तेव्हा तो एकटाच पुरियाचं साम्राज्य तुमच्यापुढे उभं करतो. त्या दिवसाच्या, त्या क्षणातील सबंध पुरियाला तो स्वत:च्या कल्पनाशक्तीनं एक वेगळं रूप देतो. समोर कोणतीही कथेची, कहाणीची किंवा सिनेमाची पार्श्वभूमी नसताना तो तुमच्या कल्पनाविष्काराला एवढी चालना देतो की प्रत्येक जण आपापल्या परीनं त्याचा भावार्थ काढू शकतो. भारतीय अभिजात संगीताची परिमाणं वेगळी आहेत. शास्त्रीय संगीत हा एक वेगळा कलाविष्कार आहे ही बाब लक्षात घेणं अत्यंत गरजेचं आहे.

लतानं सगळी गाणी अप्रतिम गायलीत हे निर्विवाद; पण तोच चमत्कार ती शास्त्रीय संगीतात दाखवू शकली असती का हा प्रश्न अनाठायी आहे. कारण हे वेगळं क्षेत्र आहे. त्याच्यासाठी वेगळा

रियाज करावा लागतो. लतानं एकदाच रागदारीचं दर्शन घडवलं. तिनं एकदा मालकंस रागातील ‘पिर न जानी’ ही बंदिश अप्रतिम सादर केली होती. तीही फक्त नऊ ते दहा मिनिटं. हाच मालकंस भारतीय अभिजात संगीताचे महान गायक पंडित भीमसेन जोशी तास-दीड तास गात असत तेव्हा मालकंसचं भारावणारं रूप मनात साठवून रसिक मंत्रमुग्ध अवस्थेत सभागृहातून बाहेर पडत असत. बाहेर पडल्यानंतर त्यांच्या आजूबाजूला फक्त मालकंसच वावरत असे. सिनेसंगीताचं तसं नसतं. सिनेसंगीत म्हणजे सगळं मिळून जमवलेला एक रस असतो, ज्यात अनेकांचं योगदान असतं. कथा लिहिणारा वेगळा, दिग्दर्शक वेगळा, संगीत देणारा वेगळा, गाण्याला शब्द देणारा वेगळा. त्या पार्श्वभूमीवर गायक गाणं उभं करतो. म्हणजे त्याच्या एकट्याची ती निर्मिती नसते. आणि म्हणूनच नूरजहाँचे पती जेव्हा सज्जाद हुसेनला म्हणाले की त्यांचं एक गाणं नूरजहाँमुळे अप्रतिम झालं, तेव्हा नूरजहाँ यांनी पतीच्या वतीनं माफी मागूनसुद्धा सज्जादनं परत कधीही नूरजहाँचा आवाज वापरला नाही. ओ.पी. नय्यर यांनी लताच्या नावे दिला जाणारा, मध्यप्रदेश सरकारचा पुरस्कार नाकारला. ते म्हणाले, ‘साहिल लुधियानवीच्या नावानं पुरस्कार द्या, एक पैसा नको, मी येतो. लताने गाने का काम जरूर किया है, वो बेहतरीन गाती है इसमें कोई शक नही. लेकिन बाकी लोगों का भी उसमें हाथ है. वो भी देखो.’

लतानं अनेक भाषांत गाणी गायली. मी म्हणेन की गायिका म्हणून ती असामान्य आहे. अनेक विशेषणं तिच्या आवाजाचं वर्णन करायला कमी पडतील. मला वाटतं शास्त्रीय संगीत सामान्य लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सरस्वतीनं लताला या भूतलावर पाठवून दिलं. संगीत ही परमेश्वराच्या जवळ पोहोचण्याची निकटतम वाट आहे. लताच्या आवाजानं सामान्य माणसालासुद्धा समाधिस्थ अवस्थेला पोहोचवलं. तिच्या २५००० गाण्यांमधून दहा चांगली गाणी निवडणं कठीण आहे. माणूस फार फार तर म्हणू शकतो की ‘अमुकतमुक दहा गाणी मला कमी आवडतात.’ लताच्या गाण्यानं माझ्यातली माणुसकी जिवंत ठेवली. माझ्यातलं अव्यक्त प्रेम जिवंत ठेवलं. आपल्या सर्वांनाच मनातली प्रत्येक गोष्ट व्यक्त करता येतेच असं नाही. लताच्या आवाजामुळे काही प्रयत्न न करताही अनेक अव्यक्त गोष्टींशी आपण जोडले जातो. तिचा आशीर्वाद मिळणं ही भल्याभल्यांसाठी परमेश्वराच्या आशीर्वादासारखी गोष्ट असते. जयतीर्थ मेवुंडी यांना एकदा लतानं फोन करून त्यांचं कौतुक केलं तेव्हा ते म्हणाले, ‘‘आता आयुष्यात काही नको, यापेक्षा मोठा पुरस्कार असूच शकत नाही.’’

स्वत: लता म्हणते, की ‘पुढच्या जन्मी गायिका म्हणून जन्माला यायला आवडेल, पण लता मंगेशकर म्हणून नाही,’ तेव्हा तिच्या जीवनातील पोकळीवर प्रकाश पडतो. मला वाटतं आपण फक्त सुरांकडे बघावं. कलाकाराचं व्यक्तिगत अथवा खाजगी आयुष्य त्याच्या कलाजीवनाशी एकत्र करण्याची गल्लत करू नये.

असाच एक ऐकीव किस्सा. सुप्रसिद्ध संगीतकार सज्जाद हुसेन यांचा स्वभाव जरा फटकळ होता. एकदा लता त्यांची रचना गात असताना रचनेत अभिप्रेत नसलेली एक हरकत नकळत तिच्या गळ्यातून घेतली गेली. त्या हरकतीला सज्जाद यांनी आक्षेप घेतला. त्यावर लता म्हणाली, ‘सज्जादजी, ये रहने दीजिये. सुननेमे ज्यादा अच्छा लगता हैं.’ त्यावर सज्जादजींचा फटकळ स्वभाव उफाळून वर आला आणि ते लताला काहीबाही बोलले. यामुळे लता दुखावली आणि पुढे सज्जादजींसाठी कधी गायली नाही. कालांतरानं आपल्या पडत्या काळात सज्जादजी त्यांच्या नातवाला घेऊन लताकडे गेले आणि तिला नातवाला सिने-वाद्यवृंदामध्ये काम मिळवून देण्याची विनंती केली तेव्हा लतानं पूर्वीचं सर्व विसरून त्यांच्या नातवाला काम मिळवून देण्यासाठी मदत केली. हा लताच्या मनाचा मोठेपणा.

‘लग जा गले के फिर ये हंसी रात हो ना हो’ या गाण्याची पूर्वकथा प्रसिद्ध अभिनेता आणि सूत्रसंचालक अन्नू कपूर यांनी आपल्या ‘सुहाना सफर’ या कार्यक्रमात सांगितली होती. या गाण्याची रचना संगीतकार मदनमोहन यांची. काही कारणास्तव हे गाणं चित्रपटात न घेण्याचा निर्णय चित्रपटाचे निर्माते सिप्पीसाहेब आणि दिग्दर्शक राज खोसला यांनी घेतला होता. एका समारंभात मदनमोहन आणि चित्रपटाचा नायक मनोजकुमार यांची भेट झाली. गप्पांच्या ओघात मदनमोहन यांनी ‘लग जा गले’ हे गीत चित्रपटात घेण्याचं नाकारल्याची व्यथा मनोजकुमारला सांगितली. मनोजकुमारच्या आग्रहाखातर मदनमोहन यांनी ती रचना त्याला ऐकवली. मनोजकुमारनं सांगितलं की त्यानं ऐकलेली ही रचना इतकी अप्रतिम आहे की सिनेसंगीतात हे गीत नवा इतिहास निर्माण करेल. आणि इथेच न थांबता त्यानं चित्रपटाच्या निर्माता आणि दिग्दर्शकाला या गीताचा चित्रपटात समावेश करण्यास भरीस पाडलं. पुढचा इतिहास सर्वज्ञात आहे. यातील ‘शायद फिर इस जनम में, मुलाकात हो ना हो’ यातील ‘शायद’ या शब्दामधून व्यक्त होणारी ‘शक्यता’ त्या सुरांनी अशी काही व्यक्त केली आहे की काळीज चिरत जाते.

एक व्यक्ती जी कोणत्याही देशाची व राज्याची राणी नाही, जिच्याकडे कोणतीही सत्ता नाही, स्वत:चा गळा सोडला तर कोणतंही अस्त्र-शस्त्र नाही, कोणतीही सेना नाही, अशा व्यक्तीच्या फक्त स्वरांनी कायमचं अव्यक्त झाल्यामुळे, देशाचा झेंडा अर्ध्यावर उतरवला जातो, ही त्या स्वरांची ताकद आहे. पाकिस्तान आणि भारत यांच्यातील वैमनस्य जगजाहीर असताना तिथल्या राजकारणी लोकांनी आणि सामान्य माणसांनी तिला श्रद्धांजली वाहिली, ही लताच्या सुरांची ताकद आहे. लंडनमधील साडेसहा हजार प्रेक्षकक्षमता असलेला रॉयल अल्बर्ट हॉल सतत तीन दिवस हाऊसफुल करण्याची ताकद त्या आवाजात होती. शरीर, बुद्धी, मन आणि आत्मा या सगळ्यांना जागृत करणाऱ्या त्या अलौकिक स्वराधीशाला मनोमन साष्टांग दंडवत!

**– शशी व्यास**
panchamnishadacgmail.com

**शब्दांकन – डॉ. लतिका भानुशाली**
bhanushali.latika@gmail.com



**अरुण जोशी**

# जग(णं) व्यापलेला आवाज!

**तो** जमाना रेडिओचा होता. न दिसणाऱ्या व्यक्तीचा आवाज आपल्या काळजात शिरायचा. आपलंसं करून घ्यायचा. अशी आवाजाची मोहिनी पडलेले अनेक कलावंत सांगता येतील. एक उदाहरण द्यायचं तर-गद्यलता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नीलम प्रभू (करुणा देव). रेडिओ या माध्यमानंच अनेक आवाज सर्वदूर, सर्व घरांतील जनमनावर रुजले. मग ते गद्य असो, संगीत असो. पंडित पलुस्करांचा सात्त्विक स्वर, थिरकवांचा ठेका, जिच्या ठुमरीची 'करेजवा कटार' लागली ती बेगम अख्तर, विजय राघवरावांची बासरी, ज्यांच्या शहनाईनं मन सुखावलं ते बिस्मिल्ला खान. किती नावं घ्यावीत! शंभरी पूर्ण केलेल्या सिनेसृष्टीनं जादुई आवाजाची अशीच रत्नं दिली. आरंभीच्या काळात परंपरेचा पगडा असलेलं 'नाटकी' सादरीकरण झालं. सिनेमा एकोणीसशे चाळीसच्या दशकात पोचला आणि कुंदनलाल सैगलनं दर्दभरं गारूड केलं. नूरजहाँचा मोकळा सानुनासिक स्वर गायिकांची ढब बनावा इतका रुजला. शमशादबेगम, सुरैया, जोहराबाई अंबालावाली अशा गायिकांनी आपापल्या आवाजानं रसिकांची पकड घेतली. तीही त्या सानुनासिक स्वरातून. पुढे गीता दत्तही त्याच पठडीतली. सैगलच्या काळात लाहोरी पहाडी आवाज महंमद रफीच्या रूपानं उदयाला आला. तोवर सिनेसंगीताचा बाजही बदलला होता. इथे संगीताच्या सुवर्णकाळाचा सूर्य थोडा वर आला होता. खेमचंद प्रकाश, गुलाम हैदर, अनिल विश्वास, सज्जाद हुसेन, पंकज मलिक, सी. रामचंद्र, नौशाद, गुलाम महंमद, चित्रगुप्त, हुस्नलाल-भगतराम, विनोद, एस.डी. बर्मन, शंकर-जयकिशन, मदनमोहन, वसंत देसाई, स्नेहल भाटकर, रोशन, सुधीर फडके अशा संगीतकारांमध्ये उत्तमोत्तम संगीताची जणू निकोप स्पर्धाच लागली. त्यातून आपल्या आवाजाचा रंग मिसळणारे गायक जोडीला लाभले. गीतरचना नवा, अधिक भिडणारा, मोकळा शब्द घेऊन आल्या. सुवर्णकाळाचा सूर्य आता वर आला. मखमली आवाजाचा तलत मेहमूद, धीरगंभीर हेमंतकुमार, सामान्यांना आपल्याशा वाटणाऱ्या आवाजाचा मुकेश, कुठलंही गाणं कंटाळवाणं वाटणार नाही अशी किमया जन्मजात घेऊन आलेला मोकळ्या आवाजाचा, सदाबहार किशोरकुमार, आधी उल्लेख केला तो पहाडी महंमद रफी अशा आवाजांची सुवर्णदुनिया तयार झाली. त्यात जिला लौकिकात श्रेष्ठ म्हणावं ती आशा भोसले नावाची चतुरस्र गायिका एक मानबिंदू ठरली. या साऱ्या आवाजांनी आपल्यावर गारूड केलं. मात्र या साऱ्यांहून दशांगुळे वर राहिला तो अलौकिक स्वर म्हणजे लता मंगेशकर. सात अक्षरी हे नाव म्हणजे सप्तसुरांचा शुद्ध उद्गार! पाण्यासारखा नितळ, कुठलाही ढंग नसलेला स्वर म्हणजे लता. आवाजाच्या दुनियेत भारतीय संगीताचा 'वेलू' गगनावेरी नेणारी, 'लता!'



आपलं जगणं समृद्ध करणारा 'तो' देव. म्हणूनच 'तो' रफी, 'ती' आशा, तो सुनील, तो सचिन, तो अमिताभ, तशी 'ती' लता! असे अनेक...

फाळणी होऊन नूरजहाँ पाकिस्तानात गेली. नाही तर 'तेरी महफिलमें किस्मत आजमा कर' ही जुगलबंदी प्रत्यक्षात रंगली असती. नूरजहाँच्या आवाजाचा प्रभाव म्हणा किंवा आदर म्हणा लताच्या सुरुवातीच्या गाण्यांत त्या आवाजाचा माग दिसतो. 'हवामें उडता जाए'मधला आवाज 'आएगा आनेवाला' म्हणत नूरजहाँची पोकळी भरून काढणारा, त्यापुढचा कळसाध्याय आहे हे प्रतिभेचं

तितकंच लेणं लाभलेल्या संगीतकारांनी जाणलं. सुरुवातीला घेतलेल्या आवाज पातळ, शब्दोच्चारांमध्ये दोष, असल्या शंकांना शुद्ध स्वरांनी दिपवलं. त्यातून झळाळी मिळाली ती त्यांच्याच रचनांना. संगीतकाराच्या मनातली चाल काकणभर सरस होऊन साकारू लागली आणि संगीत कृतार्थ झालं.

अनिल विश्वास, सी. रामचंद्र, मदनमोहन यांच्या अनवट, अवघड रचनांना या स्वरांनी सहज पेललं. शास्त्रीय गायन करणारे त्या काळचे दिग्गज पंडित, खांसाहेबही लताबाईंच्या स्वरांचं मुक्तकंठानं कौतुक करताना म्हणत, 'आम्हाला एखाद्या रागात शिरायला नोम-तोम करावं लागतं, तिथे ही बाई तीन मिनिटांच्या गाण्यात परिपूर्ण रागाचं अद्भुत दर्शन घडवते.' इथे गायकीचा नाही; संगीतकाराचा कस लागत होता. लताबाईंच्या स्वरांनी संगीतकारांत चैतन्य कसं फुलवलं होतं, त्याची अनुभूती ती गाणी ऐकताना येते, शब्द-संगीत-गायकी यांच्या अद्‌भुत मिलाफाचा तो काळ म्हणूनच सुवर्णकाळ मानला जातो.

त्याकाळच्या साऱ्या गायकांच्या स्वरात उपजत ढब होती, वैशिष्ट्यं होतं. मराठीतही ज्योत्स्ना भोळे, मालती पांडे, सुलोचना चव्हाण यांनी आपल्या आवाजाचा ठसा उमटवला. लताबाईंच्या स्वराशी यातल्या कुठल्याच आवाजाचं साधर्म्य नाही. अपवाद फक्त काहीच गाणी गायलेल्या मीना मंगेशकर आणि सुमन कल्याणपूर यांचा. अन्य गायकांचे आवाज वाढत्या वयातही बरेचसे तसेच राहिले, हे त्यांची आरंभीची व कारकिर्दीच्या अखेरीची गाणी ऐकली की जाणवतं.

लताबाई आवाजाच्या या सलगतेतही अपवाद ठरल्या. काळानुरूप त्यांच्या आवाजात जाणवणारा बदल दिसतो. 'झरझर झरझर झरना बहता ठंडा ठंडा पानी' (बरसात) या गाण्यात नूरजहाँ काळाचा स्वर, 'आएगा आनेवाला'त (महल) तसाच होता. 'ये शाम की तनहाईयाँ'पेक्षा (आह), 'यह जिंदगी उसी की है'मध्ये (अनारकली) वेगळा वाटतो. नर्गिसची 'आह' आणि 'नया दिन नयी रात'मधली गाणी बदलत्या आवाजाची साक्ष देतात. 'छलिया'मधलं बाजे पायल छमछम्‌ हो के बेकरार' आणि 'रिमझिम के ये प्यारे प्यारे'मधला आवाज धारदार वाटतो, तोच 'पंख होते तो उड आती रे' आणि 'अंदाज तेरा मस्ताना'मध्ये रुंदावलेला वाटतो. बदलत्या नायिकांच्या टप्प्यांत हा आवाजातला बदलही दिसतो. 'ज्युली लव्ह यू' आर्त खरंच, तरी तेव्हापासून 'कोयल बोली' म्हणताना काही गाण्यांत आवाज थोडा कर्कश होत गेला. गाण्यात संगीतकारानं योजलेली कुठलीही जागा गळ्यातून न सुटणाऱ्या लतानं विरामाची जागा घेतली नाही, किंवा या अलौकिक स्वरानं आपलं गाणं गाऊन त्याचं सोनं करावं या संगीतकारांच्या इच्छेनं तिला गात ठेवलं. कारण तिच्या अलौकिक स्वरगायकीला पर्याय नव्हता.

निम्मी, मधुबाला, नलिनी जयवंत, मीनाकुमारी, नूतन, वहिदा रहमान यांचा काळ, त्यानंतर शर्मिला टागोर, माला सिन्हा, साधना, कल्पना कार्तिक आदींचा जमाना, पुढे हेमामालिनी, रेखा, सायराबानू यांचा काळ, श्रीदेवी, माधुरी दीक्षित, जयाप्रदा यांचा काळ आणि तनुजाकन्या काजोलपर्यंत अनेक नायिकांच्या अभिनयाला लताबाईंच्या गाण्यानं खुलवलं. त्यांच्या गळ्यातून उमटलेले शब्द चेहऱ्यांना इतके मोठे करून गेले, की पु.ल. म्हणाले तशा, नायिकांच्या पार्श्वगायिका नव्हे तर त्या 'नायिका' झाल्या आणि अभिनेत्री लतास्वराच्या 'पार्श्व'नायिका झाल्या. आवाजात बदल झाला तरी स्वरातली शुद्धता व परिपूर्णता कायम होती.

लताबाई तानपुरा घेऊन शास्त्रीय संगीत गात आहेत हा अनुभव श्रोत्यांना कधी घेता आला नाही. स्वर आणि सूर यावर हुकमत असूनही लताबाईंनी शास्त्रीय संगीताची एखादी मैफल का केली नाही ही रुखरुख वाटते. दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त तरी अशी मैफल करावी असं त्यांच्या मनात आलेलं दिसलं नाही. आलंही असेल, पण तो भाग्ययोग जमला नाही हे खरं. त्यांची एक छोटीशी मैफल पाहायला मिळते. त्यांनी गायलेला मालकंस राग. खास शास्त्रीय बैठकीतला; हाती तानपुरा घेतलेला. ही त्या सप्तस्वरांची एकमेव अप्राप्य ठेव आहे, जी श्रोत्यांना अनुभवता आली.

नूरजहाँ पाकिस्तानात गेली ती फाळणीची 'घडी' नक्कीच 'अनमोल' नव्हती. नूरजहाँ पाकिस्तानची मलिका-ए-तरन्नूम झाली. ज्या 'अनमोल घडी'तल्या तिच्या गाण्यांनी श्रोत्यांना मुग्ध केलं त्या चित्रपटात नूरजहाँचं नाव 'लता' असावं हा आगळा योग आहे. पुढे, 'आज मैं आझाद हूँ दुनिया की चमनमें' म्हणणारी लता विश्वव्यापी झाली. गानसम्राज्ञी झाली. सप्ताक्षरी नावात सप्तसुरांना अंकित करण्याची ताकद होतीच, म्हणूनच तिची तुलना कुणाशी करू नये. लताच्या आवाजाला विशेषणं लावण्याच्या भानगडीत न पडता, कोकिळेचं कूजन, पहिल्या पावसातला मातीचा गंध आणि निर्झराच्या खळखळीप्रमाणे फक्त अतृप्त राहून अनुभवावं!

**– अरुण जोशी**

scorpion.arun09@gmail.com



आम्ही शास्त्रीय संगीत, रागसंगीत जे गातो, ते गुरूंचं नाव घेताना कान पकडतो.
तसंच लताजींचं नाव घेतानाही कान पकडलेच पाहिजेत.
कारण त्या अनेक तऱ्हांनी आमच्या गुरूच आहेत.

**– कौशिकी चक्रवर्ती**



सायराबानू

# हमारा दिल का रिश्ता था

**माझ्यासाठी** लतादीदी, ज्या जगासाठी इंडियन नाइटिंगेल -गानकोकिळा लता मंगेशकर होत्या, त्यांचं आणि माझं नातं अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण होतं. मैं अपने शौहर (अभिनयसम्राट दिलीपकुमार) को 'साहेब' नाम से पुकारती हूँ, सम्बोधित करती हूँ। साहेब और लता मंगेशकर एक दूसरे के मुंह बोले भाई-बहन थे, लेकिन यह माना हुआ रिश्ता खून के रिश्ते से भी बढ़कर था।

भाऊबीज आणि रक्षाबंधन अशा दोन्ही दिवशी लतादीदी घरी येत. कधी साहेब त्यांच्या घरी जात, पण बहीणभावाचं हे निःस्वार्थ प्रेमाचं, आदराचं नातं ह्या दोघांनी कायम ठेवलं होतं. ७ जुलै २०२१ दिवशी साहेब गेले आणि ६ फेब्रुवारी २०२२ रोजी दीदी गेल्या. अवघ्या सात महिन्यांच्या फरकानं दीदी गेल्या! माझ्या जिवाभावाचे हे दोघेही मला एकापाठोपाठ पोरकं करून गेले. ही पोकळी कधीही न भरून येणारी आहे. दीदींना मी नियमित फोन करून त्यांच्या प्रकृतीची चौकशी त्यांची भाची रचनाकडे करत असे. ५ फेब्रुवारीलाही माझं रचनाशी बोलणं झाले तेव्हा ती म्हणाली, आत्या बरी नाहीये पण तिच्या तब्येतीत सुधारणा होईल ह्याची खात्री वाटते. हे ऐकून मला बरं वाटलं. पण ६ तारखेला सकाळी आठ वाजता त्या गेल्याची क्रूर बातमी मला सुन्न करून गेली!

'जंगली' या १९६१ मध्ये रिलीज झालेल्या सिनेमापासून माझी अभिनयातली कारकीर्द सुरू झाली. निर्माता-लेखक-दिग्दर्शक



सुबोध मुखर्जी असलेल्या ह्या सिनेमात माझा नायक होता शम्मी कपूर. ह्या फिल्मच्या गाण्यांचं रेकॉर्डिंग होतं. रेकॉर्डिंग स्टुडिओ बहुधा फिल्म सेंटर किंवा फेमस स्टुडिओ असावा. 'काश्मीर की कली हूँ मैं' त्यानंतर 'दिन सारा गुजारा तोरे अंगना', 'एहसान तेरा होगा मुझ पर' आणि 'जा जा जा मेरे बचपन' अशी माझ्यावर चित्रित झालेली चार गाणी लतादीदींनी माझ्यासाठी गायली होती अर्थात प्ले बॅक दिला होता. पण माझ्यासाठी दीदींनी गायलेलं पहिलं गीत म्हणजे 'जा जा जा मेरे बचपन.' त्या काळातही लता मंगेशकर ह्यांनी अभिनेत्रींना आपला आवाज देणं ही नायिकांसाठी मोठी प्रतिष्ठेची बाब होती. मी देखील खूप आनंदात होते. लता मंगेशकर ह्या देशातील सर्वोच्च गायिकेशी माझी भेट होणार, त्या माझं ऑन स्क्रीन असलेलं गाणं गाणार! सुबोध मुखर्जी यांनी मलाही रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये बोलावलं, वेळेवर ये हेही बजावून सांगितलं. सकाळी ठीक दहा वाजता लता मंगेशकर पांढरी शुभ्र लाल काठाची साडी नेसून स्टुडिओत सगळ्यांना नमस्ते म्हणत आल्या. त्यांची लहानखुरी मूर्ती असली तरी प्रसन्न चेहऱ्यावर सात्त्विकतेचं तेज होतं. त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची अपार उत्सुकता होतीच. सुबोध मुखर्जी ह्यांनी रीतसर माझा आणि दीदींचा परिचय करून दिला. मी हात जोडले आणि एक छान स्मित दिलं. दीदींना सुबोध म्हणाले, ही अभिनेत्री नवोदित आहे आणि वयानं देखील लहान. फिल्मच्या सिच्युएशनमध्ये नायिका आपल्या बालवयाला मागे टाकत तारुण्यात पदार्पण करतेय आणि म्हणून गातेय- 'जा जा जा मेरे बचपन कहीं जा के छूप नादाँ!' त्यामुळे तिच्या भूमिकेचा रस-रंग-गोडवा, उम्र का अल्हडपन ह्या गाण्यात उतरेल असं पाहा!

एखादी जादूची कांडी फिरावी आणि माझ्या फिल्ममधल्या व्यक्तिरेखेच्या हळुवार तारुण्यसुलभ भावना दीदींच्या खडीसाखरेप्रमाणे असलेल्या आवाजातून व्यक्त झाल्या आणि पहिल्याच भेटीत, त्यांच्या माझ्या पहिल्यावहिल्या ध्वनिमुद्रणापासून मी त्यांची, त्यांच्या आवाजाची निस्सीम भक्त झाले. कायम असेन! जगात दिलीपकुमार-लता मंगेशकर फक्त एकुलते एकच असतात. माझं

अहोभाग्य मी दिलीपकुमार ह्यांची पत्नी तर लता मंगेशकर ह्यांची भावजय होते. आमचं नातं नणंद-भावजयीसारखं राहिलं नाही, त्याही पलीकडे म्हणजे आम्ही खास मैत्रिणी झालो. फोनवरदेखील खूप गप्पा मारत असू. दीदी उपनगरात येत, त्या आवर्जून आमच्या घरी नक्की येत असत. अनेक तास गप्पांचा फड रंगत असे. दीदी लहान लहान चुटकुले सांगत आणि घर आणि मन आनंदाचे डोही, आनंद तरंग होऊन जाई! दीदींकडे विनोद, चुटकुले, नकला ह्यांचा छान संग्रह होता. त्यांच्या गप्पा ऐकताना तासन्तास वेळ निघून जात असे.

दीदी म्हणजे शालीनता, सौम्यता, प्रसन्नतेचा आल्हादक शिडकावा. त्यांचा सहवास, त्यांचं सोबत असणं, बोलणं मला नेहमीच आश्वासक वाटायचं.

दीदींना एकदा टीव्हीवर मुलाखत देताना पाहिलं. मुलाखतकर्त्यानं त्यांना प्रश्न टाकला, १९४९ पासून तुम्ही गाताय, अनेक गायिकांचा तुम्ही आवाज आहात. अभिनेत्रींच्या ह्या मांदियाळीत कुठल्या अभिनेत्रीला तुमचा आवाज सर्वाधिक सूट होतो असं तुम्हाला वाटतं? एका क्षणाचा विलंब न करता दीदी म्हणाल्या, माझा आवाज सायराबानूला खूप सूट करतो. त्यांचे हे अनपेक्षित शब्द ऐकले आणि मी माझ्या खुर्चीवरून अत्यानंदानं उडालेच. त्यांनी मला दिलेला हा सर्वोच्च सन्मान होता.

दीदींचा सहवास म्हणजे अनेक मधुर चिरंतन आठवणींचा महासागर! २०१३ चा काळ होता. दीदींनी आपल्या मोठ्या बंधूंना (दिलीपकुमार) भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्या घरी येत तो दिवस आमच्यासाठी ईद असायचा. दीदी आमच्या घरात सगळ्यांसाठी प्रिय होत्या. माझी आजी शमशादबेगम साहिबादेखील दीदींची आतुरतेनं वाट पाहत असत. माझी आजी शमशाद बेगमबद्दल दीदींना खूप आदर असे. आजी माझी नावाजलेली क्लासिकल सिंगर होती.

दीदी आमच्याकडे येणार होत्या कारण त्या काळात वरचेवर दिलीपकुमार यांची प्रकृती बरी नसे. साहेब कधी रात्री लवकर झोपत, कधी सकाळी उशिरा उठत. त्यांच्या आजारपणामुळे त्यांचं झोपेचं वेळापत्रक निश्चित नव्हतं. दीदींना ह्याविषयी मी बोलले होते. दीदी म्हणाल्या, माझी भाची रचना संध्याकाळी सातच्या सुमारास तिच्या कामातून मोकळी होते, मग रचनाला घेऊन मी पाली हिलला तुमच्या घरी येईन.

साहेबांना मी लतादीदी घरी येताहेत ही खुशखबर दिली.



आम्ही सगळे त्यांच्या येण्याची वाट पाहत होतो. दीदी आल्या. आम्ही सगळे साहेबांच्या 'स्टडी'मध्ये बसलो. अनेक दिवसांनी मी माझ्या पतीना इतकं दिलखुलास हसताना-बोलताना पाहिलं. त्यांच्या डोळ्यांत एक आनंदाची वेगळीच चमक पाहिली! भाई के गरीब खानेपर आज उसकी बहन तशरीफ लायी है! असं साहेब म्हणाले. गंमत म्हणजे ह्या दोघांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. ते आनंदाश्रू होते; पण त्यानंतर ही दोघं मौन होते. नेहमी अखंड बोलणारे त्या दिवशी मात्र काय बोलावं, काय काय बोलावं हे त्यांना सुचेना! काही काळ निःशब्द शांततेत गेला. नंतरच्या दहा मिनिटांत चहा आणि स्नॅक्स आला. दीदींनी स्वतः साहेबांना चहा पाजला, हातानं खाणं भरवलं.

एका प्रदीर्घ कालावधीनंतर मी साहेबांना काही खाताना बघितलं. त्यांचा चेहरा आनंदी दिसला. पौर्णिमेचं टिपूर चांदणं आमच्या घरावर पडल्यासारखं मला भासलं. लतादीदींच्या येण्यानं आम्ही पती-पत्नी त्या आनंदात न्हाऊन निघालो होतो!

तो दिवस अनेक अर्थांनी-अनेक संदर्भांनी अविस्मरणीय ठरला होता. त्यानंतर साहेबांच्या प्रकृतीत सकारात्मक बदल होत गेले. दीदी के साथ मेरा और दिलीप साहब का दिल का रिश्ता था! जितना इस रिश्ते के बारे में बयान करूं कम ही होगा!

**शब्दांकन – पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com



संगीतक्षेत्रातल्या अनेक दिग्गजांनी मला प्रभावित केलंय, पण एक नाव आहे,
जे मला याची सदैव जाणीव देतं, की संगीतापेक्षा अन्य शुद्ध, आध्यात्मिक काही नाही.
ते नाव आहे, लताजी!

**– श्रेया घोषाल**



**शर्मिला टागोर**

# त्यांच्या मैत्रीचे हळुवार क्षण

**माझ्या** बहुतेक चित्रपटांत मला लता मंगेशकर-लतादीदी यांनी प्ले बॅक दिला होता. माझ्यामुळे, माझ्या परफॉर्मन्समुळे नव्हे तर दीदींच्या आवाजामुळे माझ्यावर चित्रित झालेली गाणी खूप लोकप्रिय ठरली, गाजली, प्रेक्षकांच्या ओठी रुळली! हे सगळं श्रेय सात अक्षरांचं - लता मंगेशकर! एक मखमली जादुई आवाज, सरस्वतीच्या वीणेचा झंकार.

लता मंगेशकर यांच्याशी माझी पहिली भेट शक्ती सामंत यांच्यासोबत झाली होती. बहुधा 'आराधना' फिल्मच्या गाण्याचं रेकॉर्डिंग चालू होतं. 'चंदा है तू मेरा सूरज है तू' हे गीत त्यांनी रेकॉर्ड केलं त्या दिवशी! आराधना चित्रपटाला न भूतो न भविष्यती असं यश लाभलं ज्यात गीत-संगीताचं फार मोठं श्रेय आहे. दीदींचं गाणं पहिल्याच टेकला ओके झालं. शक्तीदा यांनी माझा परिचय ह्या गानकोकिळेशी करून दिला. दीदींच्या आवाजात खूपच माधुर्य, आपलेपणा आणि नम्रता होती. तेव्हादेखील त्यांना उत्तम बंगाली भाषा अवगत होती. सत्यजित रे यांनी दिग्दर्शित केलेला, माझं पदार्पण असलेला 'अपूर संसार' चित्रपट त्यांनी पाहिला होता. १९५९ मध्ये माझं वय १४ वर्षांचं होतं, इतक्या कोवळ्या वयात माझा परिपक्व अभिनय त्यांना भावला असं त्या पहिल्याच भेटीत म्हणाल्या. आमचे सूर जुळले ते असे.

पुढे शक्ती सामंत यांच्या 'कश्मीर की कली'मध्ये मी १९६४च्या सुमारास हिंदी चित्रपटांत कामाला सुरुवात केली आणि माझ्या सगळ्याच हिंदी फिल्ममध्ये लता मंगेशकर यांचा





**'चंदा है तू मेरा सूरज है तू'**

अभिनेत्रींचा आत्मा होत्या!

'अनुपमा' सिनेमातील माझ्या तोंडी असलेलं 'कुछ दिल ने कहा' हे गीत माझं अत्यंत प्रिय गीत आहे. दीदींचा आवाज खूप मखमली, तरल असा लागला आहे. गुलझार ह्यांनी लिहिलेलं 'खामोशी' सिनेमातील 'हमने देखी है इन आँखो की महकती खुशबू' हे गीतदेखील माझं प्रिय आहे, त्यांच्या हजारो गीतांमधून कुठलं गाणं प्रिय आहे हे निवडणं निव्वळ अशक्य! गाणी आधी ध्वनिमुद्रित होत असत मग त्यांचं चित्रण होत असे. दीदींच्या आवाजात आनंद, दुःख, प्रेम, तिरस्कार, दर्द सगळ्या भावभावना उतरत असत. मग आमच्यासाठी असं रेडिमेड गीत तयार झाल्यावर परफॉर्मन्स देणं कुठे मुश्किल होतं?

मला त्या 'लता मंगेशकर पुरस्कार' देणार होत्या. २०१९ मध्ये आमचं फोनवर बोलणं झालं. २०२०मध्ये त्यांनी मला मुंबईत आमंत्रित केलं. सगळं ठरलं. पण २०२०मध्ये कोरोनाची साथ पसरली. त्या वर्षी ह्या कार्यक्रमाचं आयोजन रद्द करण्यात आलं. पुन्हा २०२१ मध्ये मला हा पुरस्कार द्यायचं ठरलं. त्यांना प्रत्यक्ष भेटण्यास मी उत्सुक होते, पण २०२१ मध्ये पुन्हा कोरोनानं डोकं वर काढलं ..आणि मी लतादीदींना फोनवर सांगितलं. 'ह्याही वर्षी माझं मुंबईला येणं रहित करावं लागतंय... २०२२मध्ये मी येईनच आणि हा पुरस्कार दीदींच्या हस्ते नक्की घेईन,' असा निरोप मी त्यांची भाची रचनाकडे दिला. पण २०२२मध्ये माझ्या दुर्दैवानं दीदी नाहीत. त्यांच्या हातून त्यांच्या नावाचा पुरस्कार घेण्याचा सुवर्णयोग माझ्या हातून कायमचा गेला! २०१९मधेच मी दीदींना म्हटलं होतं, मुझे आपके साथ एक पिक्चर लेनी है, त्यावर त्यांनी हसून म्हटलं, जी बिलकुल!

दीदी आजारातून बऱ्या होतील अशा विश्वासात मी होते, त्यांचे लाखो हितचिंतक चाहतेही होते. पण दीदींशी माझी भेट राहून गेली. त्यांच्यासोबत एक छायाचित्र घेणंही राहून गेलं! त्यांचा प्रेमळ सहवास कायमचा मुकला. त्यांच्या मैत्रीतील हळुवार क्षण कायम आठवतील. आता हेच क्षण माझ्यासाठी मौल्यवान खजिना आहेत.

प्ले-बॅक हे समीकरण दृढ झालं. मी पडद्यावर गायलेली अर्थात परफॉर्म केलेली सगळी गाणी दीदी यांनी इतकी उत्कृष्ट गायलीत की शक्य होईल तेव्हा मी त्यांच्या रेकॉर्डिंगना उपस्थित राहत असे. ह्या काळातच लक्षात आलं, त्यांना क्रिकेटची खूप आवड आहे, आणि क्रिकेट बघताना त्या बायनॅक्युलरचा (दुर्बिणी) वापर करत असत. त्यांच्याजवळ बसलेल्या व्यक्तीकडे त्या क्रिकेटचं समालोचन करत असत.

प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू आणि माझे पती नवाब मन्सूर अली खान हे देखील लतादीदींचे चाहते झाले, आणि सहजगत्या दीदींची गाणी त्यांच्या ओठांवर येऊ लागली. टायगरशी (नवाब पतौडी) त्यांच्या गप्पा मुख्यत्वे क्रिकेट, वन्य जीवन, कार, विविध खाद्यसंस्कृतींवर रंगत. अतिशय साधी राहणी आणि उच्च विचारसरणी म्हणजे लता मंगेशकर. त्यांच्या काही गीतांच्या ध्वनिमुद्रणांना टायगरदेखील आले होते. आमची कौटुंबिक मैत्री अशी १९६०पासून आजतागायत राहिली. मला आणि सोहालादेखील दीदींनी प्ले बॅक दिला हे आम्ही आमचं भाग्य समजतो. शोभना समर्थ ते तनुजा, त्यानंतर काजोल! तीन पिढ्यांचा आवाज असलेली दुसरी कुठलीही गायिका ह्या अलम पृथ्वीतलावावर नसावी! दीदी समस्त भारतीय

**शब्दांकन – पूजा सामंत**

samant.pooja@gmail.com



लता मंगेशकर ही केवळ एक व्यक्ती नसून अशी एक दिव्यशक्ती आहे की जिने आपले स्वत:चेच नव्हे तर साऱ्या देशाचे नाव जगाच्या इतिहासात अमर करून ठेवले आहे.

**– सुधीर फडके**



वैजयंतीमाला

# साक्षात सरस्वती माझ्यासाठी गात होती!



**१९५१ मध्ये** रिलीज झालेला 'बहार' हा माझा पहिला चित्रपट. माझ्यासाठी लता मंगेशकर प्ले बॅक देणार आहेत हे समजल्यावर माझा आनंद गगनात मावेना. मी भरतनाट्यम डान्सर आणि शिवाय कर्नाटक संगीत गायिकादेखील आहे. मी गायिकाही आहे हे समजल्यावर अनेक निर्माते मला माझी ऑन स्क्रीन फिल्म गाणी मीच गावीत असा आग्रह करू लागले. नूरजहां ह्या अभिनेत्री-गायिकेमुळे निर्माते अशी ऑन स्क्रीन विचारणा मलाही करू लागले होते. आरंभी माझी द्विधा मनःस्थिती झाली. नेमकं काय करावं मला कळेना. मी हिंदीत नवी होते तेव्हा. एकदा लता मंगेशकर मद्रासला आल्या. दिग्दर्शक एम.व्ही. रमण त्यांच्यासोबत होते. नुकताच 'बहार' हा माझा पहिलाच सिनेमा रिलीज झाला होता. एकमेकींच्या आवाजाची तारीफ आम्ही केली खरं तर.. माझ्या एका फिल्मसाठी भरतनाट्यमम धील एक पूर्ण अंतरा होता आणि तो अंतरा गाणं लता मंगेशकर ह्यांना जमलं नाही असं डान्स डायरेक्टर ह्यांनी निर्मात्याला आणि दिग्दर्शकाला कळवलं. ह्या फिल्मचे संगीतकार शंकर-जयकिशन होते. लतादीदींच्या घरी गेले आणि त्यांना विनंती केली की त्यांनी फक्त क्लासिकलचा तो अंतरा पुन्हा गावा!

लता मंगेशकर ह्यांना हे अपेक्षित नव्हतं! कदाचित हा आरोप सर्वथा निराधार, चुकीचा असेल. त्या वेळेस मात्र लताबाईंनी जयकिशन ह्यांना म्हटलं, तुमच्या फिल्मच्या नायिका वैजयंतीमाला उत्तम गायिका आहेत, त्यांच्याकडूनच का नाही गाऊन घेत भरतनाट्यमचा अपेक्षित अंतरा! त्या उत्तम न्याय देतील!

जयकिशन ह्यांना काय करावं आणि काय करू नये हे समजेना. लताबाईंचा निरोप मला त्यांनी सांगितल्यावर मी स्तब्ध झाले. लतादीदी आदरणीय व्यक्तिमत्त्व होतं. त्यांनी प्लेबॅक दिल्यावर मी पुन्हा माझ्या आवाजात तोच अंतरा गाणं माझ्या नैतिकतेच्या व्याख्येत कधीही न बसणारं होतं. मी लतादीदी असताना कधीही संगीत आणि गाण्याच्या वाटेला गेले नाही, जे कालयत्री शक्य नव्हतं! साक्षात सरस्वती माझ्यासाठी गात असताना तिला डावलून मी माझ्या भसाड्या आवाजात माझ्याच फिल्मी गाण्यांना प्ले बॅक देणं म्हणजे सूर्याला वाकुल्या दाखवण्यासारखं होतं!

१९६२ - सर्वश्रेष्ठ अभिनेत्री पुरस्कार - गंगाजमुना

१९५९ - सर्वश्रेष्ठ अभिनेत्री पुरस्कार - मधुमती

१९५७ - सर्वश्रेष्ठ साहायक अभिनेत्री पुरस्कार - देवदास

ह्या माझ्या तिन्ही चित्रपटांना फिल्मफेअर पुरस्कार लाभलेत, पण माझा आवडता सिनेमा म्हणजे 'मधुमती'. दीदींचा आवाज ह्या फिल्ममधे फार सुरेख लागला होता. एका विरहिणीचे आर्त स्वर थेट काळजात रुततात! 'बिछुआ' हे गीत आजही माझं आवडतं गीत आहे. माझ्या ऑन स्क्रीन गीतांना दीदींनी अजरामर केलं!

त्यांनी माझ्यावर जिवापाड प्रेम केलं. खूप मोठ्या मनाच्या होत्या त्या. त्यांनी मला दिलेल्या दोन भरजरी साड्या आजही माझ्याकडे आहेत. त्यांनी हल्लीच मला दीनानाथ मंगेशकर पुरस्कार देण्यासाठी मुंबईला आमंत्रित केलं होतं. त्यानंतर लतादीदी पुन्हा भेटणार नाहीत असं मला कधीही वाटलं नव्हतं.

**शब्दांकन - पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com



*काळोख निबिड झाला तरीही पाथंस्थ चालला होता.*
*सूर्यास्ताची जाणीव कसली स्वरच प्रकाशत होता...*
**– सतीश भावसार**





## चंद्रकांत शिंदे

# संगीतात बदल होणे स्वाभाविकच आहे

**लता** मंगेशकर यांच्या आवाजाबाबत कितीही बोलले, कितीही शब्द खर्ची केले तरी त्यांच्या आवाजाची योग्य प्रशंसा करता येणे कठीण आहे. त्यांच्या आवाजाला न्याय देतील असे शब्दच नाहीत. स्वर्गीय आनंद देणारा आवाज पृथ्वीतलावर एखाद्यालाच मिळतो. आणि तो आवाज देवाने लतादीदींना दिला होता. भारताच्या कानाकोपऱ्यातच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात दीदींचा आवाज पोहोचला होता. दीदींशी अनेक वेळा भेटी झाल्या होत्या. मात्र या भेटींमध्ये सगळ्यात जास्त लक्षात आहेत त्या त्यांच्या 'हनुमान चालीसा' या अल्बमच्या रेकॉर्डिंगच्या निमित्ताने २००९ मध्ये झालेल्या सविस्तर गप्पा.

**दीदी, अचानक हनुमान चालीसा?**

तशी मी अनेक भक्तिगीते गायलेली आहेत, पण मला काहीतरी नवीन करावे असे वाटत होते. भगवद्गीता, रामायण संगीताच्या रूपात आणण्याचा माझा विचार होता. याशिवाय असा भक्तिगीतातील आणखी कोणता विषय आहे जो लोकांसमोर आणल्यास तो त्यांना आवडेल यावरही विचार करत होते. असाच विचार करता करता 'हनुमान चालीसा' गाण्याचा विचार मनात आला. मी हा विषय माझ्या काही मित्रांसमोर मांडला तेव्हा मला सांगण्यात आले, की हनुमान चालीसा महिला गात नाहीत. पण का कोणास ठाऊक मला हनुमान चालीसा गावेसे वाटत होते. त्यामुळे मी याबाबत माहिती घेण्यास सुरुवात केली तेव्हा समजले की दक्षिणेतील सुब्बलक्ष्मी यांनी हनुमान चालीसा गायला आहे. तेव्हा मी ठरवले, की आता हनुमान चालीसावरच अल्बम आणायचा. गेल्या दोन वर्षांपासून मी या अल्बमवर काम करत आहे. अल्बमचा विचार सुरू झाला तेव्हा मी बाळला (हृदयनाथ) संगीत देण्याबाबत विचारणा केली. पण तेव्हा तो मीराबाईच्या प्रोजेक्टमध्ये व्यग्र होता त्यामुळे तो प्रोजेक्ट पूर्ण झाल्यावर काम करू असे त्याने म्हटले. याच दरम्यान आमचा एक कौटुंबीक सदस्य असलेला मयूरेश पै आमच्या घरी आला होता. त्याच्याशी चर्चा करताना त्याने म्हटले की मी यावर काम करतो. तेव्हा मयूरेशसोबत अल्बम करण्याचे आम्ही ठरवले. त्यानंतर हनुमान चालीसा असलेल्या सर्व कॅसेट, सीडी मागवल्या, त्या ऐकल्या आणि या सगळ्यांपेक्षा आपण काय वेगळे देऊ शकतो याचा विचार आम्ही सुरू केला. आम्ही हनुमान चालीसावर काम करत आहोत याची माहिती टी सीरिजला मिळाली. टी सीरिजसोबत मी दोन वर्षांपूर्वी सादगी अल्बम केला होता. त्यामुळे त्यांनी हनुमान चालीसाची माहिती मिळताच आमच्याशी संपर्क साधला आणि अल्बम बाजारात आणण्याची तयारी दर्शवली. मयूरेशने अगोदरच्या सर्व हनुमान चालीसापेक्षा वेगळी चाल दिली आणि आम्ही आता रेकॉर्डिंग करत आहोत.



**सध्याच्या संगीतक्षेत्राच्या स्थितीबद्दल काय सांगाल?**


बघा. प्रत्येक क्षेत्रात बदल होत असतो. फोन आले, त्यानंतर आता मोबाइल आले. तसेच चित्रपट क्षेत्रातही बदल होत आहेत. आज तुम्ही पाहिले तर वेगळ्या प्रकारचे, वेगळे कथानक असलेले चित्रपट तयार होताय. नवीन दिग्दर्शक त्यांच्या कथा-कल्पना पडद्यावर मांडताहेत. जसा चित्रपट बदलतोय तसेच त्याचे संगीतही बदलतेय. संगीतक्षेत्रात नवीन संगीतकार, गीतकार, गायक येत आहेत. ते नवे नवे प्रयोग करत आहेत. जुने संगीतकारही त्यांचे काम



करत आहेतच, पण एक गोष्ट नक्की, की नवीन गाणी जास्त काळ टिकणारी नाहीत. थोडे दिवस ती गाणी ऐकली जातात आणि नंतर ती विस्मरणात जातात. जुनी म्हणजे अगदी ५०च्या दशकापासूनची गाणी पाहा आजही ती लोकांना आवडतात. आजही त्याच गाण्यांचे रिमेक, रिमिक्स होतात. मला मुळात रिमिक्स आवडत नाही. पण, आजची मुले करतात. काही काळ ही गाणी ऐकली जातात. पण नंतर ही गाणी कुठे जातात हे कोणालाही कळत नाही.

**५० आणि त्यानंतरच्या दशकातील गाणी आजही लोकप्रिय का आहेत?**

तो काळच वेगळा होता. गाण्याची सिच्युएशन पाहून गाणी लिहिली जायची. गाण्यातील प्रत्येक शब्दावर केवळ गीतकारच नव्हे तर निर्माता-दिग्दर्शकही लक्ष द्यायचे. संगीतकारही गाण्याचे बोल बघायचे. प्रत्येक गाण्यावर मेहनत घेतली जात असे. एकेका गाण्यासाठी अनेक बैठका होत. त्याचे चित्रीकरण कसे असेल यावर चर्चा होत असे. आपले प्रत्येक गाणे हे हिटच झाले पाहिजे असा प्रयत्न सगळेच करायचे. त्यामुळेच गीत, संगीत, गायन आणि चित्रीकरणासोबत कलाकारांचा अभिनय त्या गाण्याला कळसावर पोहोचवायचा. गाणे चांगले असेल तर ते वर्षानुवर्षे लोकांच्या मनावर राज्य करतेच. याचा अर्थ आज चांगली गाणी तयार होत नाहीत का? तर तसे नाही. आजही चांगली गाणी तयार होताहेत, लोकांनाही ती आवडताहेत. फक्त त्यांची संख्या कमी आहे. आजही सोनू निगम, अलका याज्ञिक, उदित नारायण, सुनिधी चौहान असे काही गायक आहेत जे खूप चांगले गात आहेत. उदित नारायण यांचा आवाज मला खूप आवडतो. त्यांचा आवाज वेगळा आहे आणि गाण्याची शैलीही वेगळी आहे. उदित नारायण यांच्यासोबत मी अनेक गाणी गायली आहेत. सुनिधी चौहानचाही आवाज आणि गाण्याची शैली वेगळी आहे. ती चांगली गायिका असून प्रत्येक गाण्याला न्याय देण्याचा प्रयत्न करते. संगीतकारांमध्ये जतिन-ललित चांगले काम करत होते, पण आता ते वेगळे झालेत. आताच्या संगीतकारांमध्ये सगळ्यात आघाडीवर नाव आहे ते ए.आर. रहमानचे. त्याची स्वतःची



लता आपल्या हृदयाचा एक अविभाज्य भाग आहे.
ती आपल्या हृदयात अशी वसली आहे, की तिथून निघण्याचं नावच घेत नाही;
आणि कोणी तिला काढूही शकत नाही.

**- दिलीपकुमार**

अशी एक वेगळी शैली आहे आणि तो नेहमी संगीतात नवे प्रयोग करण्याचा प्रयत्न करतो. ए.आर. रहमान केवळ हिंदीतच नव्हे तर परदेशातही प्रचंड लोकप्रिय आहे. नवीन प्रयोग होत आहेत, लोकांना ते आवडतही आहेत, पण प्रमाण कमी आहे.

**आज लोकांना भक्तिगीते आवडतात?**

आजच आवडतात असे नाही, पूर्वीपासूनच लोकांना भक्तिगीते आवडतात. गणपती, नवरात्री किंवा कोणताही सण घ्या तेथे भक्तिगीते वाजवली जातातच. आरत्या, भजने लोकांना खूप आवडतात. तुला सांगितले तर आश्चर्य वाटेल, पण चित्रपटगीतांच्या कॅसेट, सीडीपेक्षा भक्तिसंगीताच्या कॅसेट, सीडीची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. प्रेक्षकांना भक्तिगीते आवडतात म्हणून पूर्वी चित्रपटात भक्तिगीतासाठी विशेष सिच्युएशन तयार केली जायची. चित्रपटातील भक्तिगीते आजही लोकप्रिय आहेत आणि सणासुदीला वाजवलीही जातात. आता तसे होताना दिसत नाही. त्यामुळे प्रेक्षकांचा ओढा भक्तिगीतांच्या कॅसेट, सीडीकडे आहे. त्यामुळेच हनुमान चालीसानंतर मी तिरुपती बालाजीच्या एका प्रोजेक्टवर काम सुरू करणार आहे. बालाजीचे सगळ्यात मोठे भक्त संत अन्नामाचार्य होते. त्यांनी तिरुपती बालाजींवर संस्कृतमध्ये भक्तिगीते लिहिली आहेत. ती मी गाणार असून तिरुपती बालाजी संस्थान स्वतःच या प्रोजेक्टची निर्मिती करणार आहे.

आमचे बोलणे सुरू असतानाच तेथे पंडित जसराज पत्नी मधुरासह आले. दीदींनी दोघांचे उठून स्वागत केले आणि आम्ही तेथेच गप्पा मारू लागलो. मी दीदींची मुलाखत घेतोय असे समजल्यावर लताच्या बाजूला बसलेले पंडितजी म्हणाले, 'श्री विष्णूंना पुन्हा जन्म घ्यायचा असतो तेव्हा ते भगवान श्रीकृष्णाचा जन्म घेतात आणि जेव्हा देवी सरस्वतीला जन्म घ्यायचा असतो तेव्हा ती लताच्या रूपात जन्म घेते.' यावर दीदींनी चमकून पंडितजींकडे पाहिले. तेव्हा दीदींचा हात हातात घेऊन पंडितजी म्हणाले, हे मी अगदी मनापासून बोलतोय. तेव्हा दीदी म्हणाल्या, हो मला ठाऊक आहे तुम्ही मनापासून बोलताय. पण मी काही इतकी महान नाही. त्यावर दीदींचा हात स्वतःच्या डोक्यावर ठेवून पंडितजी म्हणाले, 'दीदी, मला फक्त तुमचा आशीर्वाद द्या.' माझ्यासमोर या दोन महान गायकांचा हा संवाद होत होता तेव्हा मागील जन्मी मी नक्कीच काहीतरी पुण्य केले असावे म्हणून मी या क्षणाचा साक्षीदार ठरलो असा विचार माझ्या मनात आला.

पंडितजींसमोरच मी दीदींशी पुढे बोलणे सुरू केले.

**चित्रपटातून भक्तिगीते नाहीशी झाली तशाच प्रकारे शास्त्रीय संगीतही नाहीसे झाले आहे का?**

मी मगाशीच म्हटले ना, सर्व क्षेत्रात बदल होतात तसाच बदल संगीतक्षेत्रात विशेषतः चित्रपटसंगीत क्षेत्रात झालेला आहे. शास्त्रीय संगीत म्हणजे सोपी गोष्ट नाही. रागदारीवर आधारित संगीत देणे सोपे नाही. पूर्वी शास्त्रीय संगीत ऐकले जायचे. शास्त्रीय संगीताच्या रात्ररात्रभर मैफिली व्हायच्या. चित्रपटात शास्त्रीय संगीतावर आधारित उत्कृष्ट गाणी तयार व्हायची. संगीतकारांना कोणता राग आणि तो कुठे वापरावा याचे उत्कृष्ट ज्ञान होते. उगाचच गाण्यात राग वापरायचा म्हणून ते वापररत नसत. आता सगळेच बदलले आहे. शास्त्रीय संगीत ऐकण्याएवढा वेळ आज कोणाकडेही नाही. सगळे फास्ट झाले आहे. याचा अर्थ असा नाही, की शास्त्रीय संगीत संपले आहे किंवा ऐकले जात नाही. शास्त्रीय संगीत ऐकणारे आजही आहेत आणि त्यांच्यासाठी कॅसेट-सीडी तयार होतात.

**रिमिक्सबाबत तुमची मते काय आहेत?**


आज रिमिक्सची संख्या वाढलीय. दोन-तीन गाणी एकत्र करून काहीतरी वेगळे करून दाखवतोय असा आव आणला जातो. जो योग्य नाही. स्वतः काहीतरी नवीन करून दाखवले पाहिजे. जसे ए.आर. रहमान, शंकर-अहसान-लॉय करतात.

**आशाताईंच्या एका अल्बमला ॲमेझॉन डॉट कॉमने सर्वश्रेष्ठ १०० अल्बमच्या यादीत समाविष्ट केले आहे. आशाताईंचे अभिनंदन केले का?**

मला ही बातमी समजली तेव्हा मला खूप आनंद झाला. मी नुकतीच लंडनहून परत आले आहे. आशा आज सकाळीच घरी आली होती. मी तिचे अभिनंदन केले आणि गप्पाही मारल्या. असा एखादा पुरस्कार मिळतो तेव्हा आम्हाला सगळ्यांना खूप आनंद होतो. आमचे संपूर्ण घराणे संगीतक्षेत्राशी जोडले गेलेले आहे. त्यामुळे संगीतक्षेत्रात असा बहुमान होतो तेव्हा आम्हाला आनंद होतोच.

**- चंद्रकांत शिंदे**

shindeckant@gmail.com



जशी एखादी धून असते; जिला काळ नसतो, एक आलाप असतो; ज्याची भाषा नसते, एक अखंड धारा असते; जिला ना आदि असतो ना अंत, अशा भाषांहून भाषेपलीकडे निःशब्द नात्यांच्या प्रशांत आत्म्याचा आवाज म्हणते लता मंगेशकर.

**- अमिताभ बच्चन**



**उदित नारायण**

# रियाज करत राहा...

**मला** लतादीदी यांचा सहवास लाभला, त्यांच्यासोबत गायला मिळालं हे माझं अहोभाग्य! दीदींना एकदा तरी प्रत्यक्ष भेटावं, त्या गातात कशा हे जाणून घ्यावं असं नेहमी वाटायचं. मी तेव्हा संगीतक्षेत्रात अगदीच नवखा होतो, एखादं फिल्म साँग गायलं तरी त्यात सराईतपणा तर नव्हताच. एका कॉन्सर्टवेळी दीदींशी भेट झाली. त्यांना पाहताच मी धन्य झालो. माझ्याकडे एक पुस्तक होतं, त्यावर त्यांची स्वाक्षरी घ्यावी, चरणस्पर्श करावा, म्हणून घाबरतच त्यांच्याकडे पोचलो, बराच वेळ त्यांच्या सभोवतीची गर्दी कमी व्हावी म्हणून वाट पाहिली. दीदींचं लक्ष माझ्याकडे गेलं. त्याच म्हणाल्या, आइए उदितजी! त्यांची सकारात्मकता पाहून मी सुखावलो. आप पीछे क्यों खडे है, आगे आइए! मी गोंधळून, बावचळून उभा होतो. हातातील पुस्तक दीदीपर्यंत न जाता, हातातच राहिलं! त्यांनी माझी मन:स्थिती ओळखली. उदित, तुम्ही स्वतःला लहान-कमी समजू नका. तुम्ही 'बडे दिलवाला' ह्या फिल्ममध्ये किती छान गायलात! त्यांनी मी गायलेलं एक गीत - एक ओळ गायलीदेखील! मी थक्क झालो! त्या पुढे म्हणाल्या, तुमचा आवाज ओरिजिनल आहे, क्लासिकलचा बेस पक्का करा! रियाझ करत राहा! त्यांनी मला दिलेली ओळख, मला दिलेला सल्ला अत्तराच्या कुपीसारखा आयुष्यभर सुगंध पुरवणारा आहे.

माझ्या सुदैवानं मला दीदींसोबत अनेक फिल्मससाठी प्ले-बॅक देण्याची संधी मिळत गेली. दीदी खरं म्हणजे क्रमांक एकच्या गायिका. त्यांचं गाणे प्रतिथयश निर्मात्याकडे. माझी तिथवर 'पहुँच' नव्हतीच. पण यशराजसारख्या दिग्गज बॅनरमध्ये मला त्यांच्या बरोबरीनं प्लेबॅकची संधी मिळाली आणि आमची सगळीच 'डुएट' गाजली. यशराज फिल्म्सचे सर्वेसर्वा यश चोप्रा यांना दीदी भाऊ मानत आणि इथे गाताना दीदींना घरच्यासारखं वाटत असे. त्या मोकळेपणाने वागत. एरवी गंभीर वाटणाऱ्या दीदींचं एक मिश्किल, खेळकर रूप मी यशराजमध्ये पाहिलं. रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये दरारा वाटणाऱ्या दीदी ह्याच का, असा मला प्रश्न पडे. माझा पोशाख बघून त्या चेष्टेनं म्हणत, यशभय्या, आज उदितने पहना कुडता देखिये, कितना ब्राइट है, बहुत मूड़ में नजर आ रहे है उदित! गाना भी उतना ही सुरीला गाएंगे! अशी थट्टा-मस्करी दीदी करत आणि आमच्या गाण्यांमध्ये अशी मस्ती-आनंद अलवार उतरे!

दीदी मला नेहमी म्हणत, उदित, एकदा तुमच्या घरी येऊन (दीदींपेक्षा वयानं लहान असून त्यांनी मला वा कुणालाही कधी एकेरी हाक मारली नाही!) मला तुमच्या घरचा सुप्रसिद्ध दार्जिलिंग चहा प्यायचा आहे. मी त्यांचं स्वागत करण्यासाठी तत्पर होतो, पण त्याला योग येत नव्हता. आणि एकदा गानकोकिळेचा मला फोन आला! मैं चाय पीने आ रही हूँ! मुझे भूख भी लगी है! साक्षात सरस्वती येणार! मन कावरं-बावरं झालं. तरीही मला वाटलं, त्यांनी थट्टा तर केली नसेल! त्याच दिवशी माझ्या घरात गावचे बरेच पाहुणे आले होते. दाराची बेल वाजली, त्या आल्या १५ मिनिटांसाठी, चहा घ्यायला, पण त्यांच्या १५ मिनिटांचे साडेचार तास झाले, आणि अवघी संध्याकाळ लतादीदीमय झाली. आम्ही-माझं घर पावन झालं. खूप गप्पा मारल्या दीदींनी. सगळे पाहुणे गारुड झाल्यासारखे स्तब्ध झाले होते.

माझा वाढदिवस १ डिसेंबरला असतो. काही वर्षांपूर्वी माझ्या वाढदिवशी आमची कॉन्सर्ट होती. बहुधा हैदराबाद अथवा कोलकाता शहर होतं. कॉन्सर्ट दीदी असताना न रंगली तर नवल! कॉन्सर्ट संपताना दीदींनी स्टेजवर येऊन रसिकांना माझा वाढदिवस असल्याचं जाहीर केलं, आणि गोल्ड चेन मला भेट दिली. हा माझ्यासाठी अलंकार नसून सरस्वतीनं दिलेला आशीर्वाद आहे असं मी मानतो.

'वीरजारा' सिनेमातील माझं गीत ऐकून त्यांनी मला अभिनंदनाचा फोन केला होता. दर वर्षी त्यांच्या वाढदिवसाला मी त्यांचं फोनवर अभीष्टचिंतन करत असे. मनाशी ठरवलं होतं, यंदाच्या २८ सप्टेंबरपासून दरवर्षी प्रभुकुंजमध्ये जाऊन त्यांच्या वाढदिवशी त्यांना प्रत्यक्ष भेटावं, त्यांचे आशीर्वाद घ्यावेत, पण... पण!

**शब्दांकन - पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com



## अनुप जलोटा

# त्यांचे स्वर पुढील पिढ्यांना तृप्त करतील

**दीदी** मलाच काय पण अवघ्या हिंदुस्थानला पूजनीय होत्या.. त्यांच्याशिवाय चित्रपटसृष्टी, संगीतक्षेत्राची मी कल्पनाच करू शकत नाही! माझ्या कारकिर्दीच्या आरंभीपासून दीदींनी मला नेहमी प्रोत्साहन दिलंय, कौतुक करून शुभेच्छा दिल्यात. ज्या शिखरावर दीदी होत्या, त्या उंचीवर व्यक्ती पोचली की पुढचं-मागचं काही दिसेनासं होतं. दीदी मात्र नवख्यांचीदेखील दखल घेत राहिल्या. हा गुण त्यांच्यासारख्या गानसरस्वतीकडून अपेक्षित नव्हता.. पण हेच सत्य आहे.

मी भजनगायक म्हणून बस्तान बसवत असताना माझी भजनं लोकप्रिय ठरू लागली आणि पॉलीडोर म्युझिक कंपनीतर्फे मला गोल्ड डिस्क देण्याचा सोहळा द ताज हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मी कुणाला आमंत्रित करू इच्छितो, असं आयोजकांनी विचारल्यावर माझ्या डोक्यात एकच नाव आलं, लता मंगेशकर! पण मी आयोजकांना तसं सांगितलं नाही, कारण दीदी सहसा कुठे जात नाहीत, म्हणून गप्पच बसलो! माझ्याही उमेदीचा काळ होता तो. त्यांना प्रमुख पाहुणे बोलावून त्या नाही आल्या तर! मनाचा हिय्या करून त्यांना फोन लावला. त्यांना विनंती करत म्हटलं, तुमच्या शुभ हस्ते गोल्ड डिस्क मिळाल्यास माझा हुरूप शतपटींनी वाढेल.. याल का?

दीदींनी होकार दिला आणि त्या आल्या. त्यांच्या हस्ते गोल्ड डिस्क घेतली, त्यांनी माझं कौतुक करत भाषणदेखील केलं. दीदीने मेरे प्रोग्रॅममें आकर मेरे करियरमें चार चाँद लगाएं, मेरी प्रतिष्ठा बढा दी। एका नवोदित गायकासाठी कोण इतकं करेल? त्या सर्वाथानं मोठ्या होत्या, म्हणून त्यांनी हिमालयाइतकी उंची गाठली.

पुढच्या कारकिर्दीत संगीतकार आर.डी.बर्मन यांनी 'प्रोफेसर की पडोसन' ह्या फिल्मसाठी मला दीदींसोबत ड्युएट गाण्याची सुवर्णसंधी दिली. 'एक दुजे के लिये' ह्या गाजलेल्या सिनेमात लोकप्रिय झालेलं गीत 'सोलह बरस की बाली उमर को सलाम' ह्यात दीदींसोबत मी गायलो!

१९८४-८५ मध्ये दीदींचा शो त्रिनिदादमध्ये (वेस्ट इंडिज) होता. दीदींसोबत पंडित हृदयनाथ मंगेशकर होते. योगायोगानं मीही त्या वेळेस त्रिनिदादमध्ये होतो. एक प्रेक्षक म्हणून मी हा शो पाहायला गेलो. कार्यक्रम खूप एन्जॉय केला. इंटरव्हलमध्ये दीदींची भेट घेतली तेव्हा दीदी म्हणाल्या, 'अनुप, आपने तो कमाल ही की!'



मी बुचकळ्यात पडलो. शो दीदींचा, मी कशी काय कमाल केली? त्यावर त्यांनी एक चिट्ठी दाखवत म्हटलं, प्रेक्षकांनी दीदींना फर्माईश केली की दीदींनी अनुप जलोटा यांचं भजन गावं!

दीदींनी माझं तेव्हाही कौतुकच केलं. अनुपजी, फक्त भजन गाऊनदेखील लोकप्रियता मिळवता येते हे तुम्ही शक्य केलंत, जे सोपं नाहीये! रियाज करत राहा!

दीदींची प्रत्येक भेट मला आत्मिक समाधान देत आलीय. गेल्या दोनेक वर्षांपूर्वी मी त्यांच्या घरी गणपतीच्या दिवसांत गेलो. दीदींना बरं वाटत नसल्यानं त्या त्यांच्या रूममध्ये आराम करत होत्या. मी त्यांना हाक न मारता निघणार इतक्यात त्यांच्या खोलीतून त्या बाहेर आल्या, नमस्कार अनुपजी! म्हणत अभिवादन केलं, मीच त्यांना म्हटलं, दीदी आराम करा.. पुढे भेटूच..

पण, ही भेट घडवणं नियतीला मान्य नव्हतं! आता त्यांचे स्वर पुढील अनेक पिढ्यांची गात्रं तृप्त करतील!

**शब्दांकन - पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com



**भरत दाभोळकर**

# स्वर्गाचे लेणे

**खरं** तर मी लताबाईंना कधीही भेटलो नाही किंवा त्यांना प्रत्यक्ष कधी दुरूनही पाहिले नाही. पण लतादीदींविषयी बोलताना त्यांच्याशी प्रत्यक्ष संबंध येणे गरजेचे नसतेच. तो एक चराचराला भारून टाकणारा विश्वव्यापी स्वर आहे. कोणी त्याला अलौकिक म्हणतो, कोणी स्वर्गीय म्हणतो; पण मला मात्र या स्वराचे वर्णन करताना गालिबचा एक शेर उद्‌धृत करायला नक्कीच आवडेल. गालिब म्हणतो

और भी है दुनिया में सुखनवर बहुत अच्छे
कहशते है की गालिब का है अंदाजे बयां और

स्वत:विषयी बोलताना गालिब म्हणतो, 'दुनियेत खूप जण असतील ज्यांनी उत्तमोत्तम शेरो-शायऱ्या केल्या असतील पण गालिबचा अंदाज या सर्वांपेक्षा भिन्न आहे. तसाच लताबाईंच्या गायकीचा अंदाज सर्वांपेक्षा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. एस.पी. बालसुब्रमण्यम एका मुलाखतीत म्हणाले होते, 'आपल्याकडे गाणं शिकणारे आणि गाणारे खूप आहेत, कारण सूर, ताल आणि आलाप जमले की गाणं कोणालाही गाता येते. पण गाण्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ सुरांच्या माध्यमातून जिवंत करणं हे फार कमी लोकांना जमते. त्यापैकी चार नावं म्हणजे महंमद रफी, किशोरकुमार, आशा भोसले आणि लता मंगेशकर'. ही माणसे ग्रेट झाली कारण ती फक्त गाणी म्हणत नव्हती तर गाणी जगत होती. प्रेमाचे द्वंद्वगीत हे चारही गायक अशा पद्धतीने गात की जणू ते खरोखरच एकमेकांच्या प्रेमात आहेत. प्रत्यक्ष मनात भाव नसताना गाण्यात ते भाव उतरवणे हे अत्यंत कठीण आहे. इथे लता या चारांमध्ये श्रेष्ठ ठरते कारण किशोरकुमार आणि आशा भोसले हे दोघे परफॉर्मरसुद्धा होते. विशिष्ट गाणे म्हणताना गाण्यातील अर्थाप्रमाणे, आशयाप्रमाणे, आविर्भाव देहबोलीतून व्यक्त करत-करत, मग हे दोघे गाणी म्हणत. परंतु लता एकमेव अशी होती की तिने अंगभर पदर आणि चेहऱ्यावरचा तटस्थपणा अजिबात न सोडता गाण्यातील भाव, सुरांच्या माध्यमातून सहज व्यक्त केले. तिच्या आवाजाला बाह्यघटकांची गरजच नव्हती. तो सूर इतका पक्का होता की अर्थाची वलये त्याला आपोआप लगडून गळ्यातून अलगद बाहेर पडायची.

आताच्या काळात अशी गायकी ऐकायला मिळत नाही. आज कदाचित तांत्रिकदृष्ट्या उत्तम गाणारे असतील; पण त्यात भाव नसतात. एक तर आधी ट्यून तयार करून त्यात बसणारे शब्द पेरले जातात. पूर्वीची बहुतांश सगळी गाणी, आधी कविता होत्या. त्यातील प्रत्येक शब्द हा विचारपूर्वक योजलेला असायचा. त्याला अर्थपूर्णता असायची. मानवी भाव-भावनांना साकार करणारे अनेक भाव शब्दांमधून बांधले जायचे. रुसवेफुगवे, अबोला, प्रेम, निसर्ग असे सगळेच त्यातून सार्थपणे पेरले जायचे. लताबाई हे सगळे भाव आणि साहित्यातील नवरस अगदी सहजपणे गाण्यातून व्यक्त करायच्या.




त्या ग्रेट का होत्या, स्टुडिओत येऊन कशा पाच मिनिटांत सगळे समजून घेऊन संगीतकाराला अपेक्षित असलेली गायकी सादर करायच्या, त्यात स्वत:चे ॲडिशन घेऊन गाण्याला आणखी उंचावर घेऊन जाण्यात त्यांचा कसा हातखंडा होता याविषयी अनेकांनी पाने भरभरून लिहिले आहे. त्यामुळे त्याविषयी मी अधिक काय सांगणार. पण त्यांची गाणी माझ्यासाठी काय होती हे मात्र मी नक्कीच सांगू शकतो. माझी सर्वात आवडती गाणी म्हणजे 'बहारों के सपने'मधील 'क्या जानू सजन होती है क्या गम की शाम' आणि 'संजोग'मधील 'वो भुली दास्ताँ, लो फिर याद आ गयी'. ही दोन्ही गाणी, आनंद आणि दु;ख यांच्या पलीकडे जातात ते केवळ लताबाईंच्या सुरांमुळे. या दोन्ही गाण्यात दु:खी वाद्यांच्या सुरावटी वापरल्या नाहीत. सरोद नाही, सारंगी नाही. तरीही विमनस्कतेकडे जाणारी ही दोन्ही गाणी twilight zone झोनमध्ये जातात. दोन्ही गाण्यांतील सुरांमधील गोडवा, शब्दांमधील आर्तता अप्रतिमपणे गळ्यातून उतरत जाते आणि आपण वेगळ्याच विश्वात जातो. लताबाईंची गाणी अशी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याबरोबर जोडली जातात. कारण ती शब्द, अर्थ आणि सुरांच्या पलीकडे जाऊन थेट जीवनाला भिडतात. ही त्यांच्या आवाजाची ताकद आहे असे मला वाटते. त्यांच्या आवाजाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ज्या नायिकांसाठी त्या गाणी गातात त्या नायिका स्वत:च गाणी गात आहेत हा फील देण्यात त्या यशस्वी होतात. त्या त्या नायिकांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे ठरणारे, आवाजातील अत्यंत सूक्ष्म बदल हे त्या सहजपणे दर्शवत. त्यासाठी त्यांना विशेष काही करावे लागायचे नाही. गाण्याच्या ओघात ते नैसर्गिकपणे होत असे. अगदी काजोल, प्रीती झिंटा यांना आवाज देताना तर नायिका आणि गायिका त्यांच्या वयात पन्नासपेक्षा अधिक वर्षांचे अंतर आहे हे लक्षातसुद्धा येत नाही इतकी आवाजाची कोवळीकता त्यांनी साधली आहे. कधी कधी तर गाणे सुमार असते, संगीतही सुमार असते पण केवळ लताबाईंच्या गळ्यातून ते गाणे गायले जाते म्हणून ते अलौकिक पातळीवर जाते.

पूर्वीच्या काळी आशा-लता यांनी एकत्र गाणे गाताना तर एकच माईक वापरला होता तेव्हा एकदा आशाताई आणि एकदा लताबाई आळीपाळीने माईकसमोर यायच्या आणि गाऊन बाजूला व्हायच्या, असेही रेकॉर्डिंग झाले आहे. त्यावेळी आशाने एखादी हरकत घेतली की लताबाई तिला दाद द्यायच्या. मग आशाताईंना आणखी हुरूप यायचा. आताच्या काळात प्रत्येक गायकाचे वेगवेगळे गाणे गाऊन घेतले जाते आणि मग त्याला इतर वाद्याशी जोडले जाते. पण त्यात एकसंध परिणाम मिळत नाही. तांत्रिकदृष्ट्या गाणी परिपूर्ण असतील पण भावनिर्मिती करण्यात ही गाणी अपूर्ण ठरतात. या पार्श्वभूमीवर लताबाईंचा आवाज म्हणजे साक्षात स्वर्गाचे लेणे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

**- भरत दाभोळकर**
bharatdabholkar@gmail.com

**शब्दांकन - डॉ. लतिका भानुशाली**
bhanushali.latika@gmail.com

ग्रंथाली




## वि श्ले ष ण


**पी. विठ्ठल**

**साहित्याच्या तरुण अभ्यासकांना एक नवी दिशा देणारं पुस्तक**

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

## सागरतळाशी

**सुजाता लोखंडे**




**वेगवेगळ्या धाटणीची १३ व्यक्तिमत्त्वे**

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



दिलीप वेंगसरकर

# आठवते कौतुकाची थाप

**आसिफ** इक्बालचा संघ मुंबईला आला होता त्यावेळची गोष्ट आहे. तेव्हा आम्ही टेस्ट मॅच जिंकलो होतो. लतादीदी आणि आशाताई खास आम्हाला सगळ्यांना भेटायला आल्या होत्या. आम्ही तेव्हा ताजमध्ये राहात होतो. मॅच जिंकण्याच्या निमित्ताने त्यांनी संपूर्ण क्रिकेट टीमला प्रत्येकी दोन हजार रुपये दिले होते. त्याकाळात ही मोठी रक्कम होती. त्यानंतर १९८३ मध्ये आम्ही विश्वकप जिंकला. लताबाईंचे घर लॉर्ड्सच्या बाजूला होते. त्यावेळी एन.के.पी. साळवे बीसीसीआयचे प्रेसिडेंट होते. त्यांनी जाहीर केले की प्रत्येक खेळाडूला २५ हजार मिळतील. एवढी मोठी रक्कम मिळणार म्हणून आम्ही खुश झालो होतो. ही गोष्ट लताबाईंना कळली. त्यांच्यामते ही रक्कम कमी होती. मग त्यांनी आमच्यासाठी दिल्लीत स्पेशल कार्यक्रम केला आणि आम्हाला प्रत्येकी एक लाख रुपये दिले. त्यावेळी पहिल्यांदा आम्ही एक लाख रुपयांचा चेक पाहिला. त्यांनंतर त्यांच्याबरोबर अनेक भेटीगाठी झाल्या. कारण त्यांचे क्रिकेटवर मनापासून प्रेम होते. इंग्लंडला मॅच असल्या की त्या नेहमी पाहायला यायच्या. जेव्हा मी लॉर्ड्सवर तीन शतकं ठोकली तेव्हापण त्या तिकडेच होत्या. त्यावेळी त्यांनी पाच-सहा जणांना घरी जेवायला बोलावले होते. अतिशय प्रेमाने त्यांनी स्वत: जेवण केले होते. कोल्हापुरी तांबडा रस्सा आणि गाजराचा हलवा असा बेत केला होता. त्या खूप खुश होत्या. प्रत्येक वेळी वानखेडे स्टेडियमवर त्या यायच्या तेव्हा पाठीवर कौतुकाची थाप पडायची. ती आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. एक जगप्रसिद्ध गायिका आमचे एवढे कौतुक करते याचे अप्रूप वाटायचे. अतिशय नम्र व्यक्तिमत्त्व. कोणालाही मदत हवी तर कायम तत्पर.. सगळ्यांवर प्रेम करायच्या. त्या अप्रतिम फोटोग्राफी करायच्या. त्यांचे किकेटवर मनापासून प्रेम होते. त्यामुळे आम्ही क्रिकेटपटू नशीबवान ठरलो की त्यांचा प्रत्यक्ष सहवास आमच्या वाट्याला आला.

**शब्दांकन - डॉ. लतिका भानुशाली**

bhanushali.latika@gmail.com



१९८३च्या क्रिकेट वर्ल्ड कप विजेत्या संघाबरोबर लता मंगेशकर



## चारुशीला साबळे-वाच्छानी

# एक कौटुंबिक मैत्र

**आमचे** बाबा म्हणजे शाहीर साबळे हे त्याकाळी महाराष्ट्रभर आपले कार्यक्रम करत फिरत असत. मात्र त्यांचा लालबागला 'कलाकार' हा फोटो स्टुडिओ होता. आमच्या बाबांना फोटोग्राफीची खूपच आवड होती. कार्यक्रम व लोकनाट्याचे अधिक प्रयोग होऊ लागले तसे स्टुडिओत जाणे कमी झाले. पुढे दुर्दैवाने स्टुडिओ हातातून गेला, असा कटू इतिहास आहे. एक पक्के होते की जेव्हा कधी ते दौऱ्यावर जात नसत, तेव्हा ते आपल्या स्टुडिओमध्ये बसत असत. तिथे लताबाई येत असत. आम्ही मुले तेव्हा लहान होतो. लताबाईंची गाणी खूप गाजत होती. कधी वेळ असेल तेव्हा सहज तासन्‌तास गप्पा मारायला त्या आमच्या बाबांच्या 'कलाकार'मध्ये येत असत. कधी कधी राजा मयेकरदेखील असत. बाबांचे कार्यक्रम हे मोठ्या मैदानात व्हायचे. खुल्या पहाडी आवाजात त्यांचे शाहिरी कार्यक्रम, लोकनाट्ये होत असत. लताबाई बाबांना आग्रह करत ''अहो, शाहीर, तुम्ही आता स्टुडिओमध्ये गाणी गा. तुमच्या शाहिरी गाण्यांच्या रेकॉर्ड निघाल्या पाहिजेत. तुम्ही ठिकठिकाणी जाऊन स्वत: कार्यक्रम करता हे चांगलेच आहे, पण तुमच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या तर तुमचा आवाज हजारो लोकांपर्यंत पोहोचू शकतो.'' शाहिरांना हे जरूर पटत असणार, मात्र त्यांची गायकी व एकूण पठडी खुल्या ठिकाणी गाण्याची असल्याने एखाद्या बंदिस्त स्टुडिओत गाणे अवघड वाटत होते. शाहिरी गाणे हे मोकळ्या वातावरणात, प्रेक्षकांच्या समवेत रंगत जाते अशी त्यांची धारणा असावी. शिवाय त्याकाळात महाराष्ट्राच्या राज्याच्या स्थापनेसाठी व पुढे मराठी बांधवांच्या न्याय्यहक्कांसाठी जनजागृती करण्यासाठी शाहीर अथकपणे महाराष्ट्र पिंजून काढत होते. खुल्या आवाजात गाऊन थेट प्रेक्षकांच्या भावनांना, विचारांना हात घालणाऱ्या बाबांना त्यांच्या दाद-प्रतिसादाची सवय असल्याने बंदिस्त गाणे म्हणणे अवघडल्यासारखे वाटणे स्वाभाविक होते. स्टेजवर गाणे हे त्यांच्या अतिशय जवळचे होते. मात्र बाबांचे जेव्हा जेव्हा कार्यक्रम होत असत, तेव्हा तेव्हा लतादीदी वेळ असेल त्याप्रमाणे येऊन शाहिरी गाण्याचा आनंद घेत. त्या दोघांमधील मैत्री पुढे कुटुंब-मैत्रीत रूपांतरित झाली. त्यांचे आमच्या घरी येणे-जाणे होते, आम्हीही त्यांच्या घरी जात असू. मला आठवते की हृदयनाथजींचे लग्न झाले तेव्हा आम्ही सहकुटुंब हजर होतो. रिटर्न गिफ्ट म्हणून त्यांनी आम्हाला एक चांदीचे ताट दिल्याचे व त्यावर 'लता' असे नाव लिहिलेले होते हे अजूनही चांगले आठवते.



लतादीदी आणि आमची आई भानुमती ह्यांचेही अगदी छान संबंध होते कारण आई कविता करायची. बाबांच्या व अन्य कार्यक्रमांत दोघी एकत्र बसून एन्जॉय करायच्या. लतादीदींना नाटके बघण्याची, फोटो काढण्याची खूप आवड होती. त्यामुळे बाबा आणि त्यांची मैत्री खुलण्यास या दोन गोष्टी पूरक होत्या असे वाटते.

**- चारुशीला साबळे-वाच्छानी**
vachhanicharusheela@gmail.com

**शब्दांकन - राजीव जोशी**
rmjoshi52@yahoo.co.in



सचिन पिळगावकर

# गानसम्राज्ञी

**मी** खरंच स्वत:ला भाग्यवान समजतो की मला लतादीदींचा सहवास लाभला. त्यांनी जीवनात संगीताला सर्वोच्च स्थान दिलं. त्यांनी अनेक संगीतकारांबरोबर काम केलं. अगदी त्या काळातले मातब्बर संगीतकार, ते आताच्या काळातले संगीतकार; पण त्यांनी कोणत्याही संगीतकाराला कमी लेखलं नाही, हा त्यांचा मोठेपणा! संगीतकाराच्या मनात असलेल्या गाण्याला गायक ७०-७५ टक्के जरी न्याय देऊ शकले तर संगीतकारला कोण आनंद होतो! पण लताबाई एकट्याच अशा होत्या की त्या गाण्याला, सुरांना, शब्दांच्या अर्थांना शंभर टक्के न्याय तर देतच होत्या, त्याच्यापलीकडे जाऊन, संगीतकाराच्या कल्पनेत नसलेलं सौंदर्यही त्या गाण्याला बहाल करत असत. म्हणूनच त्यांच्या आवाजाला स्वर्गीय, अलौकिक वगैरे विशेषणं वापरली जातात.

मी रसिक म्हणून त्यांच्या आवाजाचा चाहता आहे. मला त्यांची अनेक गाणी आवडतात. 'लग जा गले, के फिर ये हँसी रात हो ना हो' हे माझं अत्यंत आवडतं गाणं आहे. मदनजींच्या या गाण्याला लतादीदींनी ज्या प्रकारे गायलं आहे, त्याला तोड नाही. मदनजीसुद्धा आपल्या गाण्यांना योग्य न्याय देण्यासाठी ज्या गायिकेवर कायमच अवलंबून होते, त्या एकमेव दीदीच होत्या. त्या दोघांचं रसायन हे एक अजरामर रसायन होतं.

त्यांनी खरं तर सगळ्याच रसांचा परिपोष आपल्या गाण्यांतून केला. संत ज्ञानेश्वरांच्या रचनेला सादर करताना भक्तिभाव आणि शांतरस हा असा काही एकरूप होऊन गेलाय की माणूस समाधिस्त अवस्थेपर्यंत पोहोचतो ही त्यांच्या आवाजाची जादू आहे. माझ्या मते सगळ्या रसांमध्ये गाण्यासाठी सगळ्यात कठीण रस म्हणजे शृंगाररस होय. कारण शृंगाररस गाण्याच्या दोन पद्धती आहेत. एक आहे 'सहयोग शृंगार' आणि दुसरा आहे 'वियोग शृंगार'. एकाच रसाच्या दोन्ही पद्धतींना दीदींनी अचूक न्याय दिला. त्यांनी अनेक युगुलगीतं गायली. त्यात रफीसाहेब आणि दीदी हे सर्वोत्कृष्ट रसायन होतं, असं मला वाटतं.

प्रत्येक नायिकेसाठी गाताना त्या त्या नायिकांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा असा त्यांच्या आवाजाचा पोत बदलत असे. जणू ते गाणं लतादीदी नव्हे तर प्रत्यक्ष ती नायिकाच गात आहे, असं वाटत असे. स्वत: दीदी एकदा म्हणाल्या, की '''मनमोहना बडे झुठे' हे गाणं चित्रित होत असताना नूतनजींनी असे काही 'लिपसिंग' केलं की जणू मी नाही तर नूतनजीच गात आहेत.'' यामागे दोन कारणं होती. एक तर लताजींचं वादातीत असलेलं परकायाप्रवेश कौशल्य आणि दुसरं म्हणजे नायिकांनाही गाण्याची जाण होती, संगीताचे संस्कार त्यांच्यावर होते. त्यामुळे त्याही आवाजाशी समरस होऊन अभिनय करत असत. लतादीदींच्या गायकीची जबाबदारी नायिकांनाही वाटत होती, असा तो दुहेरी संगम होता.

लतादीदींनी हिंदी चित्रपटसृष्टीतच नव्हे तर सर्वच भाषांमधील सिनेसंगीतामध्ये जे साम्राज्य निर्माण केलं ते स्वत:च्या ताकदीवर आणि स्वत:च्या मेहनतीनं. त्यांनी कधीही कोणाचे उपकार घेतले नाहीत.

मी इतका नशीबवान कलाकार आहे की बालवयात काम करतानाही मला गाण्यांसाठी आवाज लाभला तो दीदींचा. 'बचपन' नावाचा सिनेमा करताना 'मदर मेरी माँ, हम तेरे दुलारे' या गाण्यांचं शूटिंग कोचीनला होते. दीदींच्या आवाजाची जादू अशी होती की मी गाण्यातील अर्थामध्ये, भावनांमध्ये इतका समरस होऊन गेलो, की मी अक्षरश: ओक्साबोक्शी रडायला लागलो. हा अनुभव मी संपूर्ण आयुष्यात दुसऱ्या कोणत्याही गाण्याच्या चित्रीकरणाच्या वेळी अनुभवू शकलेलो नाही.

त्यांना भेटलो की मी नेहमी त्यांना वाकून नमस्कार करायचो. त्यांना माझं काम आवडायचं. माझे अनेक सिनेमे त्यांनी बघितले होते. 'अशी ही बनवाबनवी' त्यांना खूप आवडला होता. एकदा फिल्मिस्तान स्टुडिओमध्ये एक गाणं चित्रित करण्यासाठी, मी माझी मुलगी श्रिया हिला घेऊन गेलो होतो. ती तेव्हा दहा वर्षांची होती. दीदींमध्ये एक लहान मूल दडलं आहे हा साक्षात्कार मी त्या दिवशी अनुभवला. त्यांनी आपल्या शेजारच्या खुर्चीवर श्रियाला बसवलं आणि एखाद्या जिवलग मैत्रिणीशी गप्पा माराव्यात तशा अर्धा तास

तिच्याबरोबर गप्पा मारल्या. एक दहा वर्षांची अल्लड बालिका जिला आपण कोणाशी गप्पा मारतोय हे माहीत नाही आणि एक स्वर्गीय आवाजाची जगप्रसिद्ध साम्राज्ञी! पण गप्पांमध्ये या कोणत्याही गोष्टींचा अडसर नव्हता. मी कधीही स्वत:बद्दल मुलीला काही सांगितलं नव्हतं, पण दीदी तिला विचारत होत्या, ''तू बाबांचे सिनेमे बघितले आहेस का?'' श्रिया म्हणाली, ''ते हिट होतात का?'' त्या खळाळून हसल्या. म्हणाल्या, ''सुपरहिट होतात.'' माझ्या कानावर हा संवाद पडत होता. मी खूपच रोमांचित झालो होतो. मी भरून पावलो. मग पुढे पुन्हा त्या तिच्याबरोबर मैत्रिणीसारख्या गप्पा मारू लागल्या. त्या म्हणाल्या, ''जेव्हा महात्मा गांधीजींची हत्या झाली तेव्हा याच स्टुडिओत मी रेकॉर्डिंग करत होते. मला लोकल ट्रेननं परत जायचं होतं. पण बाहेर प्रचंड दंगे उसळले होते. त्या वातावरणात मी घाबरतच ट्रेन पकडली.'' श्रियानं त्यांना पुढचा प्रश्न विचारला. इथे रेकॉर्डिंग कुठे होतं? त्या म्हणाल्या, ''चल मी तुला दाखवते.'' मग तिचा हात पकडून चालत-चालत दीदी फिल्मिस्तानच्या आवारात गेल्या. 'पाठमोऱ्या चालत जाणाऱ्या त्या दोघी' हे दृश्य माझ्या हृदयावर कायमचे कोरले गेलंय. माझ्या डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. स्वत:च्या भाग्याचा मलाच हेवा वाटला. त्या दिवशी त्यांची आवडती डिश, दक्षिणेकडील 'चिकन चेट्टीनाड आणि अप्पम' त्यांनी मागवली होती. मग आम्हा बापलेकींना त्यांनी प्रेमाने जेवणाचा आग्रह केला. त्यावेळी मला कळलं, माणसानं जमिनीला चिकटून राहणे म्हणजे काय असते. इतका निरागसपणा, नम्रपणा, संस्कारी मन पाहून त्यांच्यातील दिव्यत्वाचा मला नव्यानं साक्षात्कार झाला.


एकदा मी त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांना फोन केला. पण त्या दिवशी त्या फोनवर आल्या नाहीत. मी निरोप ठेवला की शुभेच्छा त्यांच्यापर्यंत पोहोचवा. दुसऱ्या दिवशी त्यांचा फोन आला. अत्यंत नाजूक, कोमल आवाज! 'मी दीदी बोलतेय. सचिनजी, काल मी तुमच्याशी बोलले नाही, कारण काल सर्वपित्री अमावास्या होती ना. या दिवशी वाढदिवसाच्या शुभेच्छा कधी घेऊ नयेत. म्हणून आज फोन केलाय. आज मला शुभेच्छा द्या.'' मी काय बोलणार!

असं त्यांचं आणि माझं नातं. मातृभाव, पितृभाव, वात्सल्य या सर्वांनी ओसंडून वाहणारं आत्म्याचं नाते, हृदयाचं नातं!

**– सचिन पिळगावकर**

**शब्दांकन – डॉ. लतिका भानुशाली**
bhanushali.latika@gmail.com



**ग्रंथाली**




## माझी कॉर्पोरेट दिंडी
### माधव जोशी

**लेखकाची जडणघडण आणि संस्कार, बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यसंस्कृती ह्याचं मनोहारी चित्रण**

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




## वसंतदादा
### दशरथ पारेकर

**वसंतदादांच्या कार्यकर्तृत्वाचा अतिशय आत्मीयतेने व अभ्यासूपणे घेतलेला वेध**

**मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रु.**



डॉ. विजय ढवळे

# सरस्वतीदेवी इंद्रलोकात परतल्या!

६ फेब्रुवारी २०२२. भारतरत्न, स्वरसम्राज्ञी, लताबाई मंगेशकर कायमसाठी काळाच्या पडद्याआड गेल्या. मराठी रंगभूमीला भूषणावह असणाऱ्या मास्टर दीनानाथांची ही थोरली कन्या. पाळण्यातले नाव हेमा, पण वडील लाडाने हृदया म्हणून हाक मारत. मंगेशकर हे मूळचे हर्डीकर. कऱ्हाडे ब्राह्मण. परंतु मंगेशाचे परमभक्त असल्याने आडनाव बदलून मंगेशकर झाले. दीदींचे बालपण, शालेय शिक्षण सांगलीत झाले. त्यांचा लहानपणापासून संगीताकडेच ओढा होता. मास्टर दीनानाथ गायनाचे वर्ग घेत असत. एकदा ते काही कामासाठी बाहेर गेले तेव्हा विद्यार्थ्यांना रियाज करण्यास सांगून गेले होते. एक मुलगा चुकला तेव्हा सहा वर्षांच्या लताने त्याची चूक सुधारली, ते व्हरांड्यात आलेल्या दीनानाथजींनी ऐकले. हा संगीतामधला अजोड, अद्‌भुत, अतुलनीय चमत्कार, गळ्यात गंधार घेऊन जन्माला आला आहे हे त्यांनी अचूकपणे हेरले आणि लता व धाकटी बहीण मीना ह्यांना संगीताचे धडे द्यायला सुरुवात केली. एका गायनस्पर्धेत लताबाईंनी वयाच्या आठव्या वर्षीच भाग घेऊन 'खजांची' चित्रपटातले लोकप्रिय गाणे सरसपणे म्हणून पहिला क्रमांक व सुवर्णपदक पटकावले होते. संगीत त्यांच्या रोमारोमांत इतके भिनले होते की त्या एकदा गाणे गुणगुणत घरात जिन्यावरून खाली येत होत्या. पायरीवरून पाय घसरला व त्या गडगडत गेल्या आणि जिन्याच्या शेवटाला आपटून बेशुद्ध झाल्या. कमाल म्हणजे अर्ध्या तासानंतर शुद्धीवर आल्या तेव्हा जे गाणे गुणगुणत होत्या; तेच गाणे त्यांच्या मुखातून बाहेर पडले!

एकेकाळी राजेशाही वैभव भोगलेल्या दीनानाथजींच्या बलवंत संगीत मंडळी या संस्थेला पुढे आर्थिक चणचणींतून जावे लागले. अवघ्या ४२व्या वर्षी ह्या नाट्यपुरुषोत्तमाने कायमची एक्झिट घेऊन मराठी रंगमंच सुना केला आणि अवघ्या तेरा वर्षीय दीदींवर प्रापंचिक जबाबदाऱ्या पडल्या. त्यांना मास्टर विनायकांनी आधार देऊन नोकरी दिली. प्रफुल्ल चित्रमध्ये त्या केवळ पार्श्वगायनच नव्हे तर अभिनेत्री म्हणूनही निष्ठेने काम करत होत्या. अंगात १०३ ताप असतानाही त्यांनी कधी शूटिंग चुकवले नाही. मास्टर दीनानाथांचा पहिला स्मृतिदिन माईसाहेबांनी साग्रसंगीत साजरा करण्याचे ठरवले. त्यावेळी मंगेशकर कुटुंब राहात असलेल्या घराला छप्पर म्हणून पत्रा होता. २४ एप्रिल १९४३ ह्या दिवशी कडक ऊन होते. लता आणि आशा या भगिनींनी साडेचार वर्षीय हृदयनाथांना दोन्ही हातांचा पाळणा करून छपरावर नेले व त्यांच्या हस्ते नैवेद्याचे ताट तिथे ठेवले. ४ वाजेपर्यंत कावळा फिरकलाच नाही. मुले भुकेने व्याकूळ झालेली, पण माईसाहेबांनी शिस्त कडक. शेवटी काकस्पर्श झाल्यावरच सर्वजण जेवले. इतका जेवणाचा थाट कसा परवडला ह्या दीदींच्या प्रश्नाला घरातले एकुलते एक चांदीचे ताट विकले असे समजले. लताबाई रागावल्या तेव्हा मातोश्री माईसाहेब कडाडल्या, ''हे मालकांचे श्राद्ध आहे. एका ताटासाठी काय रडता? मालकांसारखे गा, मालकांची गाणी गा, पायाशी सोन्याच्या नाण्यांचा खच पडेल.'' त्यांच्या मुखाने जणू नियतीच बोलत होती.

जयप्रभा स्टुडिओत सुलोचना ही बालतारकाही कार्यरत होती. त्यांचे मराठी उच्चार शुद्ध नव्हते म्हणून त्यांची टिंगल व्हायची. अशावेळी किशोरवयीन लताबाई त्यांची बाजू घेऊन प्रतिवाद करायच्या. दोघींची मैत्री इतकी घट्ट झाली की सहस्रचंद्रदर्शनाचा समारंभही एकत्र केक कापून केला होता! पण हा कित्येक तपांनंतरच्या गोष्टी झाल्या. स्टुडिओत मुख्य नटीच्या मेकअपकरता स्वतंत्र खोली होती. तेथे सुलोचनाबाई अनावधानाने गेल्या तेव्हा त्या नटीने आकांडतांडव करून स्टुडिओ डोक्यावर घेतला. खूप अपमान केला. बिचाऱ्या सुलोचना. त्या रडत कोपऱ्यात बसल्या असताना लताबाई तेथे आल्या व सर्व परिस्थिती समजल्यावर त्यांना सात्त्विक संताप अनावर झाला. सुलोचनाला खेचत त्या नटीच्या खास खोलीत शिरल्या व जाहीर केले, आपण इथेच बसायचे. बघू, कोण बाहेर घालवण्याची हिंमत करतो ते. नटीने सौम्यता धारण करून, दोघींचा सलोखा केला.

हिंदी चित्रपटसृष्टी तेव्हा कात टाकत होती. सर्व कलाकार लोकल गाडीने, तिसऱ्या वर्गातून प्रवास करायचे. एकदा संगीतकार गुलाम हैदर, अभिनेता युसुफ खान (दिलीपकुमार) आणि लताबाई



एकत्र होते, तेव्हा हैदरने त्यांची ओळख उदयोन्मुख पार्श्वगायिका म्हणून करून दिली. ही मुलगी मराठीभाषक आहे हे समजल्यावर युसुफमियाँ म्हणाले, 'ये महाराष्ट्रीय लोगों के उर्दू को दालभात की बू आती है।' लताबाईंनी प्रत्युत्तर दिले नाही; पण दुसऱ्या दिवसापासून उर्दूची शिकवणी लावली व काही महिन्यांत उर्दूवर इतके प्रभुत्व मिळवले की खुद्द दिलीपकुमार चकित झाला. त्याने हातचे न राखता कौतुक केले आणि दोघांमध्ये बहीण-भावाचे नाते बनले, ते आजन्म टिकले. त्याने इंग्लंडच्या रॉयल अल्बर्ट हॉलमधल्या भव्य कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदनही केले. पुढे त्या अभिनयसम्राटाला स्मृतिभ्रंशाने ग्रासले. भोवतालचे भान हरपले होते. माणसे ओळखू येत नव्हती. लताबाई त्याच्या समाचाराला गेल्या तेव्हा सायराबानू आपल्या पतिराजांना सूप पाजण्याचा निष्फळ प्रयत्न करत होती. दीदींना पाहिल्यावर त्यांची कळी उमलली व त्या दिलीपसाबना म्हणाल्या, ये देखो, आपकी बहेन आयी है। लताबाईंच्या हातात सूपचा बाउल दिला. दिलीपकुमारला त्या नेणिवेच्या क्षणीही मानलेल्या बहिणीची ओळख पटली व त्याने दीदींच्या हातून विनातक्रार सूप प्राशन केले होते.

'महल'मधील 'आएगा आनेवाला'ने दीदींना कीर्तीच्या शिखरावर नेऊन ठेवले व त्या स्थानीच त्या पुढची सात दशके विराजमान राहिल्या. त्या आधी शशधर मुखर्जींच्या 'शहीद' चित्रपटासाठी गुलाम हैदरना दीदींचा आवाज वापरायचा होता तेव्हा तो फार पातळ असल्याने नायिकेला शोभणार नाही असे म्हणून मुखर्जींनी तो नाकारला होता. दीदी हा पैलू न पडलेला अस्सल हिरा आहे असे ओळखणाऱ्या हैदरने म्हटले होते, 'आज ह्या मुलीला नकार देत आहात पण एक दिवस असा उजाडेल की तिच्या घराच्या समोर विनवण्या करणाऱ्या चित्रपटनिर्मात्यांच्या रांगा लागतील.' महलनंतर 'अंदाज' सिनेमा आला. त्यातल्या 'उठाये जा उनके सीतम्' आणि 'तोड दिया दिल मेरा' ह्या दीदींच्या दर्दभऱ्या गाण्यांनी लोकप्रियतेचे नवे उच्चांक स्थापन केले. काळीज भेदून आत शिरणाऱ्या त्यांच्या अद्‌भुत आवाजाची किमया त्याआधी 'आह'मधील 'राजा की आयेगी बरात' ह्या अप्रतिम गाण्यामुळे सिनेविश्वात मान्य झालीच होती. त्यावर 'बरसात'ने कळस चढवला. 'हवामें उडता जाये मेरा लाल दुपट्टा'ने रसिक तृप्त झाले.

राज कपूर, नर्गिस आणि लताबाई ह्या नेहमी शुभ्रवस्त्रांकित श्रेष्ठ कलाकारांना खूप मानत होता. आरकेच्या यशाच्या त्या भक्कम आधारस्तंभ होत्या. नर्गिसने 'मदर इंडिया' स्वीकारल्याचे त्याच्या पचनी पडले नाही. दोघांत बोलाचाली होऊन ती अभेद्य वाटणारी जोडी दुभंगली. तरी लताबाईंची संजीवनी अजून हाताशी होती. 'जिस देशमें'मधील त्यांचे 'ओ बसंती' किंवा 'संगम'मधले 'ओ मेरे सनम' ह्यांना तोड नव्हती. पाश्चात्त्य देशांत गायकांना रॉयल्टी मिळते तशी भारतात मिळावी ह्याविषयी दीदी आग्रही होत्या. 'मेरा नाम जोकर'च्या निर्मितीत व्यग्र असलेल्या राज कपूरकडे त्यांनी तो विषय काढला तेव्हा तो म्हणाला, 'हमारी बॅनर किसी को रॉयल्टी नहीं देती, हम इधर धंदा करने के लिये बैठे है.' लताबाई तत्काळ उद्‌गारल्या, 'मीही इथे राणीच्या बागेत फिरायला आले नाही. जोकरची गाणी तुम्ही दुसऱ्या कोणाकडून गाऊन घ्या.' प्रचंड गाजावाजा करून जोकर झळकला आणि सणसणीत आपटला. दीदींचे योगदान नसल्याने असे अपयश आले हा राज कपूरचा

समज झाला. त्यांच्या घरी जाऊन धरणेच धरून बसला. माझ्या पुढच्या सिनेमासाठी तुम्ही होकार देईपर्यंत मी इथून हलणारच नाही. शेवटी दीदी बधल्या. 'बॉबी' ही आरकेसाठी सोन्याची खाण ठरली. बॅनरची विश्वासार्हता आणि प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित झाली, दीदींच्या स्वरमयी अमृताचे शिंपण झाल्यामुळेच.

'बॉबी'नंतरच्या माझ्या चित्रपटाचे संगीत पं. हृदयनाथ करतील असे आश्वासन राज कपूरने दीदींची भलावण करताना दिले होते. मग त्याने शब्द फिरवून लक्ष्मीकांत-प्यारेलालना संगीतकार म्हणून पाचारण केले. ही फसवणूक दीदी सहन करणे शक्यच नव्हते. त्यांनी गाण्यास नकार दिला. लक्ष्मी-प्यारेंचे धाबे दणाणले. त्या गाणार नसतील तर आम्ही काम करणार नाही हे आर.के.ला सुनावल्यावर तो हादरला. शेवटी भरत व्याससारख्या ज्येष्ठ व आदरणीय व्यक्तीला मध्यस्थी घालून त्याने दीदींना राजी केले खरे, पण त्यांचा राग पुरता शमला नव्हता. सत्यम् शिवम् सुंदरम् हे टायटल साँग रेकॉर्ड करताना स्टुडिओत राज कपूर असता कामा नये अशी त्यांनी अट घातली! व्रात्य विद्यार्थ्याला शिस्तप्रिय शिक्षिका वर्गाबाहेर उभे राहण्याची सजा सुनावते तसेच हे होते. स्वत: निर्माता, स्टुडिओमालक, स्वत:च्याच रेकॉर्डिंग रूमच्या बाहेर बसून राज कपूर ते गाणे ऐकत होता. लताबाईंमधला कलावंत सर्वश्रेष्ठ. त्यांची वैयक्तिक नाराजी गाण्यांत उमटली नाही. गाणे मास्टरपीसच झाले.

'मित्र तयार करावे लागतात, शत्रू आपोआप निर्माण होतात' असे एक आंग्लवचन आहे. उत्तुंग यश न पाहवणारे मत्सरी, क्षुद्र जंतू असतातच. त्यापैकी एका व्यक्तीने लताबाईंच्या आचाऱ्याला फितवले व त्यांच्यावर विषप्रयोग झाला. एके दिवशी त्यांना लागोपाठ तीन उलट्या झाल्या आणि हिरवट द्रव बाहेर पडला. तो स्लो पॉयझनिंगचा प्रकार होता. जिवावर बेतले नाही पण तीन महिने सक्तीची बिछान्यात विश्रांती घेणे क्रमप्राप्त झाले. तेव्हा त्यांचे निस्सीम चाहते मजरूह सुलतानपुरी रोज संध्याकाळी त्यांच्या घरी जाऊन दीदींनी डिनर घेण्याआधी सर्व पदार्थ स्वत: टेस्ट करून पाहात. त्या तीन महिन्यांच्या दीर्घ कालावधीत एकाही संगीतकाराने दुसऱ्या पार्श्वगायिकेला पाचारण केले नव्हते, याहून आणखी मोठी, त्यांच्या श्रेष्ठत्वाची कोणती पावती असणार? त्या प्रथम माईकसमोर उभ्या राहिल्या त्या हेमंतकुमारच्या 'बीस साल बाद'मधील 'कही दीप जले, कही दिल'च्या रेकॉर्डिंगकरता त्या गाण्याला फिल्मफेअर मिळाले.

दीदींच्या संगीतकारकिर्दीचा १९६७ मध्ये रौप्यमहोत्सव मुंबईच्या रंगभवनमध्ये एस.डी. बर्मन नाइट म्हणून साजरा झाला. प्रमुख पाहुणे-संयुक्त महाराष्ट्राकरता केंद्रीय अर्थमंत्रिपद त्यागणारे चिंतामणराव देशमुख, प्रमुख वक्ता दिलीपकुमार, निवेदिका नर्गिस. असा कार्यक्रम पुन्हा होणे नाही. लताबाईंनी 'गाइड'मधले 'काँटोसे खींच के ये आंचल' ह्या गाण्याने सुरुवात करताना आवाज इतक्या सप्तकात नेला होता की श्रोतृवर्गाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांनी आणखी पाच गाणी म्हटली. त्यानंतर मुकेश, मन्ना डे, हेमंतकुमार ('प्यासा'तले 'जाने वो कैसे, लोग थे जिनके प्यार को प्यार मिला'), आशाताई भोसले (ओ मेरे सोना रे) असे स्वरभंडार खुले झाले. शेवटी बर्मनदांनी गाईडमधले 'यहाँ कौन तेरा' म्हणून सांगता केली. आपल्या सूरसामर्थ्याने दीदींनी कोट्यवधी रुपये उभारून, देणगीरूपाने विविध संस्थांना देऊन टाकले. बाबा आमटेंचे आनंदवन, भारतीय जवानांसाठी भव्य कार्यक्रम, १९८३च्या क्रिकेट विश्वविजेत्या संघातल्या प्रत्येक खेळाडूला किमान एक लाख रुपये मिळावेत ह्या हेतूने दिल्लीत केलेला समारंभ, परदेशांतल्या सामाजिक संस्थांच्या मदतीकरताही केलेले अनेक विनामूल्य कार्यक्रम... केवळ त्यांच्यासारख्या उदार मनाच्या त्याच.

दीदींमध्ये उपजतच नेतृत्व गुण होते. त्या किशोरवयीन होत्या तेव्हा 'संत तुकाराम' ह्या सिनेमाचा खूप बोलबाला होता. ह्यामध्ये विष्णुपंत पागनीस तुकाराममहाराजांची भूमिका अक्षरश: जगले होते. इतके ते तादात्म्य पावले होते की ते जेथे जातील तेथे खुद्द महाराजच आले आहेत असा जनतेचा भ्रम व्हायचा व त्यांच्या पायांवर डोके ठेवण्याकरता लोकांची झुंबड उडायची. चित्रपटातला एक अभंग खूप गाजला होता. 'आधी बीज ऐकले, बीज अंकुरले रोप वाढले' - हा शांताराम आठवलेंनी लिहिला होता पण तो तुकाराममहाराजांचाच आहे असा सार्वत्रिक समज पसरला होता. हरिभक्त परायण ज.र. आंजगावकर हे संतवाङ्‌मयाचे गाढे अभ्यासक, त्यांना तो अभंग महाराजांच्या मूळ गाथेमध्ये शोधूनही सापडला नाही तेव्हा त्यांनी चित्रपटनिर्मात्यांकडे चौकशी केली व त्याची उत्पत्ती आठवलेंच्या कल्पनाशक्तीतून झाली असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. मंगेशकर भावंडांनी सिनेमा पाहिला होता. दीदी लहानपणापासूनच एकपाठी होत्या. त्यांची स्मरणशक्ती संगणकालाही लाजवेल इतकी तीव्र होती व तशीच शेवटपर्यंत राहिलीही! सांगलीच्या घरात त्या चार गाद्या एकमेकांवर ठेवून उच्चासन तयार करायच्या. बाकी चौघा भावंडांना जमिनीवर पालथे झोपून राहायला फर्मावायच्या व आपल्या मंजुळ आवाजात 'आधी बीज एकले' अभंग म्हणायला लागायच्या. मग अभंग जसा पुढे जायचा तसे इतर भावंडांनी जमिनीवरून हळूच डोके वर काढायचे व डोलायला लागायचे - म्हणजे बीजाचा अंकुर वाढला असे दर्शवण्याकरता. दीनानाथ व माईसाहेब दीदींच्या कल्पकतेचे अतोनात कौतुक करायचे. हा खेळ पाहायला शेजारीपाजारीही जायचे.

श्री मंगेश, भगवान श्रीकृष्ण, आईवडील ही दीदींची कायम स्वरूपी श्रद्धास्थाने होती. शिवाजीमहाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, भालजी पेंढारकर, शिवशाहीर पुरंदरे ह्या सर्वोच्च आदरणीय व्यक्ती. दीनानाथजींच्या रूपाने साक्षात मंगेश आपल्या घरात वावरत आहे ह्यामध्ये त्यांना तीळमात्र शंका नव्हती. आपल्या भावंडांपैकी कोणीतरी डॉक्टर व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. योगायोग असा की सर्वांनी संगीताची मन:पूर्वक आराधना करण्यातच आपली जिंदगी व्यतीत केली. उषाताई मात्र एम.आर. आचरेकर ह्यांच्या हाताखाली शिकून उत्कृष्ट चित्रकार बनल्या. मंगेशकरांच्या घरी दहा दिवसांचा गणपती असतो. मंगलमूर्तीच्या भोवतालची सुरेख आरास दरवर्षी उषाताईच मोठ्या कल्पकतेने करायच्या. रोज

रात्री आरतीनंतर छानसा कार्यक्रम असायचा. त्यात सामील होणे हा मोठा बहुमान आहे असे संगीतक्षेत्रातले बुजुर्ग समजत असत. १९ वर्षीय झाकीर हुसेनने आपल्या तबल्यावरील करामती प्रथम १०१, प्रभुकुंजमध्ये दाखवल्या होत्या.

लताबाई ह्या हाडाच्या परफेक्शनिस्टच होत्या. त्यांना स्वच्छतेची अतोनात आवड होती. त्यामुळे घर नेहमी टापटीप असायचे. त्यांना स्वयंपाकाचीही खूप हौस होती. त्यांच्या हातचा 'गाजर का हलवा' इतका उत्कृष्ट व्हायचा की ज्याने तो एकदा खाल्ला तो त्याची चव कधी विसरू शकणार नाही. त्यांना फोटोग्राफीचा अतोनात छंद होता. तसेच, त्या सुरेख नकलाही करत असत. त्या बहुश्रुत तर होत्याच, त्यांना विनोदाचे चांगले अंग होते आणि त्यांचे संभाषणपटूत्व लाजवाब होते. सर्वच भावंडांवर त्यांचा जीव होता. उषाताईंना तर त्यांचा बही:प्राणच मानावे लागेल. हृदयनाथांची त्या दिवसांतून अनेकदा विचारपूस करत असत.

उस्ताद अमीर खाँ म्हणाले होते, जो मोहोल पैदा करायला आम्हाला तीन तास लागतात. ते काम लताबाई तीन मिनिटांत करतात. बडे गुलाम अली खाँचा आवाजही दीदींप्रमाणेच सातही स्वरांत, सगळ्या श्रुतींना स्पर्श करू शकायचा. त्यांनी दीदी ही अल्लाची सर्वात मोठी देन असल्याचे सांगून, त्या कधीही बेसूर होत नाहीत हा चमत्कार असल्याचे विधान केले होते. संगीतकार सज्जाद हुसेनचे विधान होते- लता गाती है, बाकी सब रोती है। भारतरत्न पं. रविशंकरांनी 'अनुराधा' व 'गोदान' हिंदी चित्रपटांना संगीत दिले. त्यातली दीदींची अप्रतिम गाणी रेकॉर्ड केल्यावर ते उत्स्फूर्तपणे उद्‌गारले- आखिर लता तो लताही है। पंडित जसराजांच्या मते दीदींनी शास्त्रीय संगीताची कांस धरली नाही हे त्यांचे आम्हा गायकांवर अनंत उपकार झाले आहेत. ताजमहालच्या स्थापत्यांत कुणी सुधारणा सुचवू शकत नाही, चांदण्यांची शोभा वाढवायला त्यांत दुरुस्ती सुचवता येत नाही, तसेच दीदींच्या स्वराला 'तत् त्वम् असि' असेच म्हणावे लागेल. प्रत्येक गाणे अल्टिमेट. दोषरहित मास्टरपीस. म्हणूनच 'ऐ मेरे वतन के लोगो' ऐकल्यावर नेहरू म्हणाले, बेटी, आज तुने मुझे रुला दिया.

लताबाई ह्या वीर सावरकरांसारख्या महान विभूतींच्या मुशीतून घडलेल्या अस्सल देशभक्त होत्या. तुष्टीकरणाचे, शौर्यहीन राजकारण त्यांना कधीच मानवले नाही. मराठी भाषा आणि महाराष्ट्र ह्यांचा त्यांना जबरदस्त अभिमान होता. शांतारामबापूंनी 'झनक झनक पायल बाजे' हा पहिला रंगीत चित्रपट काढला. तो देशात व परदेशात तुफान गाजला. अशा अनुपमेय बापूंच्या अभिनंदनार्थ १९५६ मध्ये शिवाजी पार्कवर तीन लाख लोकांनी अफाट गर्दी केली होती. समारंभाची सांगता करताना आता लताबाईंच्या राष्ट्रगीताने होईल असे निवेदकाने जाहीर केले असतानाही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबद्दलच्या मराठी माणसाच्या तीव्र भावनांची कदर करण्याकरता दीदींनी 'बहु असोत संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' - हे समयोचित गीत गायले होते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचे स्वप्न साकार झाले. शिवाजी पार्क तुडुंब गर्दीने ओसंडून वाहत होते. दीदींनी सुरुवातीला 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा-अरुणोदय झाला'. ही भूपाळी गायली तेव्हा त्यांचे कौतुक करणारा श्रोतृवर्गाचा टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट अस्मानाचेही छप्पर फाडून गेला होता!

आता थोडेसे वैयक्तिक. साल १९६७. नुकतीच विशी उलटलेला मी सुवर्णपदक विजेता दंतवैद्य ठाण्याला दवाखाना चालू केला होता. गानसम्राज्ञी दीदी पेशंट म्हणून यायच्या व ती बातमी शहरभर गाजायची. त्यांचे दर्शन घेण्याकरता बाहेर दीडदोनशे लोक ताटकळत उभे राहायचे. तत्कालीन ठाण्याचे नगराध्यक्ष कवी पी. सावळराम यांनी फोन करून लताबाई खरोखरच येऊन गेल्या ह्याची खात्री करून घेतली व पुढच्या रविवारी त्या पुन्हा येणार आहेत हे मी सांगितल्यावर म्हणाले, मला कळवा. म्हणजे त्यांना भेटायला येईन.

त्यांची विनोद सांगण्याची शैलीही उत्तम होती. असा एक विनोद- एक जण, चाळीत राहणारा, कपाळावर मोठे बँडेज लावून घरी आला. साहजिकच शेजारीपाजारी काय घडले हे जाणून घेण्याच्या उत्सुकतेपोटी त्याच्या घरी येत राहिले. प्रत्येकाला तेच ते सांगून तो कंटाळला. शेवटी १५व्या माणसाला तो घेऊन गॅलरीत गेला व म्हणाला, 'तो समोरचा खांब तुम्हाला दिसतो आहे ना? मला नाही दिसला!'

'ऐ मालिक तेरे बंदे हम' या गाण्याला बांगलादेशने राष्ट्रगीताचा दर्जा दिला आहे, त्याची आठवण झाली. तेव्हा देशात आणीबाणी लादली गेली होती. लताबाई म्हणाल्या, माझे गाणे हे काँग्रेसवाल्यांना वरदान ठरले आहे. इंदिरा गांधींच्या चेंबरमध्ये जाण्याआधी ते ऐ मालिक, तेरे बंदे हम - या शब्दांची रिहर्सल करतात व आत गेल्यावर बाईंसमोर ते कोरसमध्ये म्हणतात! अत्रे व पुलंचे विनोद त्यांना बेहद्द आवडायचे. अत्र्यांनी 'नेहमी हरू ते नेहरू' ही कोटी केली तेव्हा त्या खूप हसल्या होत्या. १९७७ मध्ये पुण्याहून विठ्ठलराव गाडगीळ व हरीभाऊ गोखले हे काँग्रेसतर्फे लोकसभा उमेदवार होते. दोघेही पराभूत झाले. नंतर जनतापक्षाच्या विजयसभेत पु.ल. भाषणाच्या आधी दोन्ही हात वर करून कीर्तनकाराच्या थाटात गर्जले-पुंडलिक वरदे- 'हारा' विठ्ठल!

मुक्या प्राण्यांवर दीदींचे अमर्याद प्रेम होते. मेहबूबच्या निधनानंतर त्यांचा कुत्रा सैरभैर झाला तेव्हा दीदी त्याला घेऊन घरी आल्या व शेवटपर्यंत सांभाळले. पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला कुडकुडत गारठलेली कुत्र्यांची पिल्ले त्या घेऊन यायच्या. त्यांना काही महिने पाळून मग इतरांना पाळण्याकरता देऊन टाकायच्या.

'रहे ना रहे हम. महका करेंगे' हे त्यांचे शब्द ऐकून प्रत्येक भारतीय व्याकूळ होईल; परंतु 'तू जहाँ जहाँ चलेगा - मेरा साया साथ होगा' ह्या त्यांच्याच अमृतमयी स्वरांनी त्याला दिलासा मिळेल. तीन शब्दांत त्यांचे सार्थ वर्णन करता येईल- 'संगीताच्या अंगणातील तुळस.'

**- विजय ढवळे**
vijaydhavale82@gmail.com



**सुराज साठे**

# सुरेल ऋणानुबंध

**आमच्या** साठे कुटुंबाचा मंगेशकर कुटुंबाशी असलेला ऋणानुबंध अगदी जुना म्हणायला हवा. आमचे नाना आणि मास्टर दीनानाथ ह्यांचा परिचय होता.पुढे दीनानाथ ह्यांचे दुर्दैवी निधन झाल्यावर माई मंगेशकर आमच्या नानांना म्हणाल्या होत्या, 'नाना, आमचे मालक गेले! आमचे छत्रच गेले! आमचे कसे होणार?' पुढे नाना छोट्या लताला घेऊन हिंदी-उर्दू संगीतकारांकडे जात असत. छोट्या लताला पाहून ते म्हणत असत की ही हिंदी गाणी कशी गाईल? पण तिचा आवाज ऐकत तेव्हा त्यांची खात्री पटत असे. पुढे मी वाद्य वाजवायला शिकत असताना नाना मला रेकॉर्डिंग स्टुडिओत नेत असत. एकदा असाच मी फेमसमध्ये गेलो असताना तिथे शंकर-जयकिशनपैकी जयकिशनजी आलेले होते. त्यांनी माझे वाजवणे ऐकले नि पटकन म्हणाले की हा मुलगा नाव कमावेल. त्यांनी जणू मला आशीर्वादच दिला. पुढे मी अकॉर्डियन वाजवायला लागलो. अनेक गाण्यांच्या रेकॉर्डिंगला जात असे. दीदींच्या गाण्याच्या वेळी सूर-साथ देत असे. हळूहळू त्यांचा, त्यांच्या कुटुंबीयांचा परिचय वाढत गेला. तालीम, शो ह्यातून त्यांचा सहवास मिळत राहिला. त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व जवळून पाहायला मिळाले हे मी माझे भाग्यच समजतो.



साल १९९२ - मी दीदींच्या बरोबर वाद्यवृंदात वाजवायला होतो. आमचा 'मस्कत-दुबई-आबुधाबी-शारजा' असा दौरा ठरला. मस्कतचे मोठे संयोजक पंकज खिमजी ह्यांनी आम्हां सर्वाना आपल्या घरी नेले आणि शानदार आतिथ्य केले. दीदीही सहभागी झालेल्या होत्या. एस. डी. बालसुब्रमणियम ह्यांनी रोजामधले जानेमन हे गाणे घेतले तर दीदींनी 'दिया जले' घेऊन प्रेक्षकांची वाहव्वा मिळवली. दोघांनीही संगीतकार ए.आर. रेहमान ह्यांचे कौतुक केले. पुढे मला त्यांच्यासमवेत सिंगापूर-हाँगकाँग-बँकॉक असा दौरा केला तेव्हा संगीत-साथ देण्यासाठी तिथला सुप्रसिद्ध सिंफनी ऑर्केस्ट्रा होता. लतादीदींचे एक वैशिष्ट्य म्हणजे जिथे शो असतील तिथे त्याआधी कटाक्षाने रिहर्सल करत. इतक्या मोठ्या गायिका असूनही परफेक्शनचा आग्रह धरून तालीम करायच्या. त्यामुळे इतर गायक-वादक ह्यांचा आत्मविश्वास वाढायचा. मी त्यांचे आणखी वेगळेपण अनुभवले ते म्हणजे ज्या देशांत जात, ज्या प्रांतांत आपले कार्यक्रम करायच्या तिथे तिथे त्या-त्या भाषेतील गाणी सादर करून उपस्थितांना खुश करायच्या.

साल १९९८ - आम्ही त्यांच्याबरोबर अमेरिका टूरवर गेलो होतो. योगायोगाने माझा तेव्हा वाढदिवस आला. तेव्हा सर्व वादक-गायक एकत्र जमले आणि वाढदिवस साजरा केला. मंगेशकर कुटुंबीयांनी सह्या केलेले मोठे ग्रीटिंग कार्ड भेट दिले. याशिवाय लतादीदींनी मला एक भेटवस्तू दिली, तो माझा वाढदिवस मी कधीच विसरू शकत नाही. इतक्या विश्वविख्यात गायिकेने माझा जन्मदिवस कौतुकाने साजरा करावा ह्याचे अप्रूप वाटते.

**शब्दांकन : राजीव जोशी**
rmjoshi52@yahoo.co.in



**जयंत ओक**

# लाख जन्मांची पुण्याई

**आपण** अभिमानाने सांगू शकतो, की आम्हाला 'लता मंगेशकर' ह्यांचे गाणे याचि देही याचि डोळा ऐकायला मिळाले. हे आपले भाग्य आहे. १९७७ ते १९९२ या कालावधीत मी मुंबई दूरदर्शनवर नोकरीला होतो. तसा १९८०-८५ हा सांस्कृतिकदृष्ट्या घडामोडींचा कालखंड होता. निर्माते अरुण काकतकर ह्यांच्याबरोबर मी काम करत होतो. शब्दांच्या पलीकडलेसारखे वेगवेगळे कार्यक्रम केले. दहा-पंधरा वर्षांत अनेकदा लतादीदी, हृदयनाथ मंगेशकर यांची गाणी, मुलाखतींचे कार्यक्रम झाले. खुद्द हृदयनाथजी म्हणायचे की टीव्हीने दीदी व आम्हाला लाखो लोकांकडे पोहोचवले. कारण तेव्हा दूरदर्शन हे एकमेव माध्यम होते. मला त्यांचा सहवास मिळाला. असंख्य आठवणींचे प्रसंग डोळ्यांसमोर येत आहेत. 'वैष्णव जन तो' हे गीत लिहिणारे पंडित नरेंद्र शर्मा यांचे 'मै केवल तुम्हारे लिये गा रही हूँ' हे गीत हृदयनाथ ह्यांनी स्वरबद्ध केले होते व दीदी गाण्यासाठी स्टुडीओमध्ये आल्या होत्या. ते शब्द, ती चाल व अनोखा आवाज ऐकून मला तर रडायलाच आले. पुढे अनेक कार्यक्रम केले. बहुतेक वेळा निवेदक म्हणून सुधीर गाडगीळ असायचा. हसरा, मिश्कील, शब्दांवर प्रेम करणारा सुधीर आणि अरुण ह्यांच्यामुळे दीदींच्या घरी जाण्याचे, त्यांचा सहवास मिळण्याचे पाच-सहा सोनेरी क्षण माझ्या आठवणींच्या कप्प्यात जपून ठेवलेले आहेत.



१९८०चा एक प्रसंग आठवतो. तेव्हा तर माझा त्यांच्या कुटुंबातील कोणाशीही परिचय नव्हता. तो रक्षाबंधनाचा दिवस होता. सकाळीच मला काही प्रेरणा झाली आणि मी तडक प्रभुकुंजवर गेलो. बेल वाजवली आणि विचारले, की 'लतादीदी आहेत का? मी जयंत ओक गिरगावातून आलो आहे. मला त्यांना भेटायचे आहे.' आणि काही क्षणांत त्या योगिनी माझ्यासमोर आल्या. मी पुन्हा माझे नाव सांगितले आणि म्हटले, 'आजचा दिवस रक्षाबंधनाचा. बहीण भावाला राखी बांधते. पण मला तुम्ही गुरुसमान, योगिनी आहात म्हणून इच्छा आहे की मी आणलेली राखी तुमच्या हाताला बांधावी.' त्यांनी मंद स्मित करत आपला हात पुढे केला आणि मी त्या स्वरदेवतेला माझ्या हातांनी राखी बांधली. ती राखीपौर्णिमा- तो दिवस आजही माझ्या स्मरणात आहे. पुढे कधीतरी मी 'संत योगिनी लता' असा एक लेख साप्ताहिक श्रीमध्ये लिहिला होता.

१९८४ सालची एक आठवण आहे. तेव्हा त्यांना पुण्यात दीनानाथ मंगेशकर ह्यांच्या नावे हॉस्पिटल बांधायचे होते. 'आनंदघन' नावाचा कार्यक्रम करायचा होता. त्यात गाणारी मंडळी सुधीर गाडगीळच्या चैत्रबन ग्रुपमधलीच होती. दीदी नेहमीच तालीम करतात. त्याप्रमाणे आम्ही सर्व गायक-वादक त्यांच्या पुण्याच्या घरात जमलो होतो. दीदी खुर्चीत बसलेल्या होत्या व मी त्यांच्या पायाशी बसलो होतो. जवळपास दोन तास तालीम झाली. त्या देवतेच्या पायाशी बसून वादन करण्याची सुसंधी मला मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो. पुढे असे अनेक प्रसंग आले, त्यांच्या कुटुंबाबरोबर काम करण्याची संधी मिळत गेली. अर्थात त्याचे सर्व श्रेय काकतकर व गाडगीळ ह्यांचा देतो. मी मुंबईत राहणारा तरीदेखील पुण्याच्या चैत्रबन ग्रुपमध्ये वादन करत असे.

लताबाई म्हणजे नैसर्गिक गंधार. लाख जन्मांची पुण्याई म्हणून त्यांची उत्तमोत्तम गाणी आपल्याला ऐकायला मिळाली. मला टीव्हीच्या व स्टेजवरील अनेक कार्यक्रमांत सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यातून दीदींचा व हृदयनाथजीचा सहवास व मार्गदर्शन लाभलं. मी एक ठेका देणारा, तानपुरा-तबला वाजवणारा हरहुन्नरी कलाकार. टीव्हीची नोकरी आणि पुढे अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने असे छाया देणारे भेटले, त्यामुळे आम्हां लव्हाळी मंडळींचे जीवन पावन झाले.

**- जयंत ओक**
jayantraooak@gmail.com
**शब्दांकन : राजीव जोशी**
rmjoshi52@yahoo.co.in



**अतुल अरुण दाते**

# लता - एक जगण्याचे कारण

**मला** एकदा बाबा अरुण दाते आणि काका (संगीतकार रवी दाते) यांनी एकदा एक आठवण सांगितली होती. ती म्हणजे माझे आजोबा रामूभय्या दाते यांनी १९४०च्या दशकाच्या शेवटी लता मंगेशकर यांचा इंदोरमधला प्रथम कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमासाठी संपूर्ण मंगेशकर कुटुंब इंदोरला आलं होतं. तोपर्यंतच्या दाते घराणातल्या जवळजवळ चार पिढ्यांच्या पुरुषांचा जन्म इंदोरला झाला होता आणि लताबाईंचा जन्मसुद्धा इंदोरचा असल्यामुळे त्यांना त्याचा प्रचंड अभिमान होता. माझ्या आजोबांनी माझ्या वडिलांना, काकांना व आजोबांच्या मित्रांना असं सांगितलं, की आज मला खूप धन्य वाटत आहे की, जगातल्या सर्वश्रेष्ठ लाईट म्युझिक गाणाऱ्या गायिकेचं गाणं मी तिच्या जन्मगावी ठेवू शकलो. मला याचा खूप आनंद आहे.

माझे आजोबा गेल्यानंतर त्यांच्या पुण्यतिथीला संपूर्ण मंगेशकर कुटुंबीय अनेक वर्षं येत असत. मी मंगेशकर कुटुंबीयांना बहुधा तेव्हाच पहिल्यांदा पाहिलं असावं. गाणं कसं असावं यापेक्षा उत्तम गाणं म्हणजे फक्त लता मंगेशकर, असं बालपणापासून मनामध्ये ठासलं गेलं आणि ते आजतागायत तसंच आहे.

मला बाबांनी सांगितलेला एक किस्सा आठवतो, एकदा हृदयनाथकाकांनी (पंडित हृदयनाथ मंगेशकर) माझ्या वडिलांना एक नवीन गाणं ऐकायला त्यांच्या घरी बोलावलं. बाबा तिकडे गेल्यावर नेहमीप्रमाणे बऱ्याच गप्पा झाल्या. नंतर हृदयनाथकाकांनी हार्मोनियमवर एका नवीन गाण्याची सुरावट वाजवायला सुरुवात केली. एक खूप वेगळ्या पद्धतीचं सुमधुर गाणं बाबा प्रथमच ऐकत होते. गाणं पूर्ण झाल्यावर हृदयनाथ काकांनी बाबांच्या हातात एक कागद ठेवला आणि सांगितलं, आता मी पुन्हा म्हणतो हे गाणं. तू कागदावर लिहून काढ. ते गाणं होतं गंगाधर महांबरे यांचं 'संधिकाली या अशा धुंदल्या दिशा दिशा...' हे युगुलगीत आहे हे एव्हाना बाबांच्या लक्षात आलं. बाबांनी त्यांना विचारलं, हे गाणं कोण कोण गाणार आहे? त्या बरोबर काका म्हणाले, मी तुला बांद्र्याहून पेडर रोडला तू फक्त हे गाणं ऐकावंसं म्हणून नाही बोलावलं. तू म्हणावंसं म्हणून बोलावलं आहे. बाबांना ते ऐकून खूप आनंद झाला. कारण वेगळ्या धाटणीचं गाणं ते पहिल्यांदा गाणार होते. मग बाबांनी विचारलं, की माझ्यासोबत कोण गाणार आहे. यावर काका म्हणाले, तू या गायिकेचं नाव ऐकलं असावंस. ते नाव आहे लता मंगेशकर. बाबा म्हणाले, मी हे ऐकल्यावर खुर्चीवरून खाली पडायचाच बाकी होतो. बाबा काकांना लगेच म्हणाले, मी माझं मगासचं वाक्य परत घेतो. 'माझ्या सोबत कोण कोण गाणार आहे, यापेक्षा मी लतादीदींबरोबर गाणार आहे', हे माझं स्वप्न तू पूर्ण करतोयस.

या गाण्याच्या रेक़ॉर्डिंगच्या दिवसाबद्दलही बाबांनी मला सांगितलं होतं. ते म्हणाले, रिहर्सल झाल्यावर मी आणि लतादीदी रेकॉर्डिंगसाठी गायला उभे राहिलो. तेव्हा जाणवलं, की माझी उंची लताबाईंपेक्षा बरीच मोठी असल्यामुळे एका मायक्रोफोनवर दोघांनी कसं गायचं हा संभ्रम निर्माण झाला, कारण त्या काळात युगुलगीत एकाच मायक्रोफोनवर गावं लागायचं. मग यावर उपाय म्हणून एक छोटंसं स्टूल मागवण्यात आलं. त्यावर लतादीदी उभ्या राहिल्या आणि मग त्या क्षणाला मला हे जाणवलं आणि जन्मभर जाणवत राहिलं, की जरी त्या क्षणाला माझ्या शारीरिक उंचीला मॅच करायला लतादीदींना छोट्या स्टुलावर उभं राहून गावं लागलं असेल, तरीही मी त्यांच्या गाण्याची उंची कधीही गाठू शकणार नाही.

या रेकॉर्डिंगनंतर अनेक वेळा लतादीदींचं आमच्या घरी येणं-जाणं असे. त्यामुळे लतादीदींचं दर्शन बऱ्याच वेळा घडत असे. माझे आजोबा आणि माझ्या वडिलांच्या संस्कृतीमध्ये मी वाढल्यामुळे मूर्तीरूपी देवाला मानण्यापेक्षा माणसामध्ये देव शोधण्याचा नेहमीच प्रयत्न राहील. म्हणून मी लतादीदींचं दर्शन अनेक वेळा घडत असे असं म्हटलं.

आपण नशीबवान की, लतादीदींनी या देशात जन्म घेतला. कारण आपण आज अभिमानाने सांगू शकतो की, आम्ही लता मंगेशकर ज्या देशात जन्मल्या त्याच देशात आम्हीही जन्माला आलो आहोत.

**– अतुल अरुण दाते**
भ्रमणध्वनी : ९८६७२००७०९



शरद काळे

# कार्बनचे स्थिरीकरण

**हवेतील** हरितगृह वायूंचे प्रमाण कमीत कमी कसे ठेवता येईल हे आज जगासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. ह्या हरित वायूंपैकी कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, नायट्रस ऑक्साईड यांची निर्मिती ही ऊर्जेसाठी किंवा स्वयंचलित वाहनांसाठी जी जिवाष्म इंधने वापरली जातात, त्यांच्या ज्वलनातून होते, तर मिथेनची निर्मिती रवंथ करणाऱ्या प्राण्यांच्या पोटात, डम्पिंग यार्डवर जैविक कचऱ्याच्या अनियंत्रित विघटनाने आणि भातशेतीमुळे सातत्याने होत असते. सन २०१९ मध्ये भारतात गायी, म्हशी, शेळ्या, उंट, घोडे, याक, खेचरे, डुकरे आणि गाढवे मिळून ५४ कोटी प्राणी होते. त्यात साधारण ३० कोटी गायी आणि म्हशी तर २१ कोटी शेळ्या व मेंढ्या होत्या. या संख्येत दरवर्षी २ ते ३ टक्के वाढ होत असते. कोंबड्यांची संख्या साधारण ९० कोटींच्या आसपास आहे. ह्यातील अनेक प्राण्यांचा वापर खाण्यासाठी होत असल्यामुळे त्यांची एकूण संख्या फोफावत नाही. जागतिक स्तरावर पाहिले तर गायी आणि म्हशींची संख्या भारतात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल युरोपीयन युनियन आणि अमेरिकेचा दुसरा व तिसरा क्रमांक आहे. दुधाच्या उत्पादनात मात्र युरोपीयन युनियनचे उत्पादन (२०० कोटी मेट्रिक टन) भारताच्या दूधउत्पादनापेक्षा दुपटीहून अधिक असून जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकावर आहे. दुसरा क्रमांक अमेरिकेचा (१०२ कोटी मेट्रिक टन) तर तिसरा क्रमांक भारताचा (९६ कोटी मेट्रिक टन) आहे.





भारतात गायी आणि म्हशींच्या शेणाचे उत्पादन साधारण दररोज साडेचार कोटी टन एवढे होते. प्रत्येक टन शेणातून १० किलो मिथेनची निर्मिती होण्याची क्षमता असते. म्हणजे दररोज भारतातील गायी-म्हशींपासून ४५००० टन मिथेनची निर्मिती होत असते. हा सर्व मिथेन विकेंद्रित पद्धतीने निसर्गऋण संयंत्रांमधून बंदिस्त करून वापरता आला तर भारतभर दररोज ४५००० टन इंधन उपलब्ध होईल आणि तेवढ्याच जिवाष्म इंधनाची बचत होऊन, त्याच्या ज्वलनातून वातावरणात मुक्त होणाऱ्या कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण कमी करता येईल. मिथेनच्या ज्वलनातून कार्बन डायऑक्साईड मुक्त होतो व वातावरणात मिसळतो हे खरे असले तरी या मिथेनचा किंवा कार्बन डायऑक्साईडचा स्रोत हे गायी-म्हशींनी खाल्लेला हिरवा चारा किंवा कडबा असतो. म्हणजेच हा कार्बन डायऑक्साईड चक्रीय स्वरूपाचा असून तो मुक्त झाल्यामुळे हवेतील त्याचे प्रमाण स्थिर राहाते. त्याला पर्यावरणाच्या भाषेत हरित कार्बन डायऑक्साईड असे म्हणता येईल (चित्र १). याउलट जिवाष्म इंधनाचा स्रोत हा पृथ्वीच्या पोटात बंदिस्त झालेला कार्बन डायऑक्साईड असतो. जिवाष्म इंधने जाळली तर ह्या कार्बन डायऑक्साईडमुळे हवेतील त्याचे प्रमाण नक्की वाढेल. त्याला आपण पर्यावरणाच्या दृष्टीने लाल (धोक्याचा) कार्बन डायऑक्साईड असे म्हणू शकतो (चित्र २). जिवाष्म इंधनांना नैसर्गिक म्हणजे सौर, पवन, अणुशक्ती यांसारखे पर्याय शोधणे, हे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण स्थिर राखण्यासाठी, म्हणूनच अतिशय निकडीचे झाले आहे. इलेक्ट्रिक वाहने हा पर्याय असू शकतो का? ह्या वाहनांमधील विद्युत घट

(बॅटरी) प्रभारित करण्यासाठी औष्णिक ऊर्जा वापरली जात असेल तर तो नक्कीच पर्याय नाही! कारण त्यामुळे फक्त प्रदूषणाचे क्षेत्र बदलेल, पण प्रदूषण कमी होणार नाही. औष्णिक ऊर्जा वापरून विद्युत ऊर्जा निर्माण करण्यासाठी जिवाष्म इंधने वापरावी लागतात हे दृष्टिआड करून चालणार नाही.

आपल्या देशात बहुतेक शेण वाया जाते, पण वातावरणात त्यातील मिथेन मुक्त होत राहातो. लुधियाना येथे दूध डेअरी आणि गायी म्हशींचे गोठे खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र तेथे शेणाचा वापर फारसा होत नाही. ते बहुतेक सर्व शेण बुढा नाल्यातून व नंतर सतलज नदीत वाहून जाते! बाकी शहरांतून कमीअधिक फरकाने हेच होत आहे. नद्यांचे प्रदूषण होण्याचे ते प्रमुख कारण आहे. देशात शेणाच्या गोवऱ्या जाळण्याचे प्रमाण लक्षणीय असले तरी शेण वापरण्याची ही पद्धत प्रदूषण निर्माण करणारी आहे. शेणातून मिथेन वेगळा करून तो ज्वलनासाठी वापरला तर प्रदूषण खूप कमी होते आणि त्यातून खूप मोठ्या प्रमाणावर सेंद्रिय खत शेतीसाठी उपलब्ध होऊ शकते. मिथेनची ही आकडेवारी छातीत धडकी भरवणारी असली तरी जनमानसात त्याची जाणीव अगदीच थोड्या मंडळींना असल्यामुळे त्यावर ठोस उपाययोजना होत नाही. त्यामुळे मिथेनचे प्रदूषण आपल्याकडून फार मोठ्या प्रमाणावर होत राहाते. प्रत्येक दूधउत्पादकाच्या स्तरावर या शेणाचे नियोजन आपल्याला करता आले पाहिजे. यासाठी प्रत्येक दूध उत्पादकापर्यंत आपल्याला पोहोचून त्याला हे सर्व पटवून देण्याची यंत्रणा देशात निर्माण झाली पाहिजे.


कोंबडीपालन हा विषयदेखील मिथेननिर्मितीच्या चष्म्यातून पाहणे गरजेचे आहे. मोठमोठ्या कोंबडीपालन केंद्रातून हजारो टन कोंबड्यांची विष्ठा आणि कोंबड्यांनी न खाल्लेले अन्न गोळा होत असते. मोठमोठ्या पोल्ट्री उद्योगांना पुढे या सर्व कचऱ्याचे नेमके काय करावे हे माहीत असूनही तो कचरा शेतांमधून गाडून टाकला जातो. त्यासाठी अनेक ठिकाणी शेतीची अनेक हेक्टर उपजाऊ जमीन कायमस्वरूपी वापरली जाते. कोणत्याही उद्योगात उत्पादन घेत असताना त्यातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे पूर्ण नियोजन करणे अपेक्षित असते. परंतु आपल्याकडे उद्योगातून जो नफा होतो, त्या नफ्यातून कचरा नियोजन व शून्य कचरा व्यवस्थापन केलेच पाहिजे अशी सक्ती केली जात नाही. प्रकल्प अहवाल बनवतानादेखील त्यासंबंधी फारसा विचार केला जात नाही आणि सरकारी नियंत्रण मंडळांकडून त्यासंबंधी फारशी हरकत घेतली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मोठमोठ्या नागरी किंवा शहरी वस्त्यांमधून निघणाऱ्या प्रदूषित सांडपाण्यावर शुद्धीकरण करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (sewage treatment plant) आणि औद्योगिक क्षेत्रांमधून निघणाऱ्या सांडपाण्याचे नियोजन आणि शुद्धीकरण करण्यासाठी एफ्लुएन्ट प्रक्रिया प्रकल्प (effluent treatment plant) लावले जातात खरे, पण त्यातील किती प्रकल्प पूर्ण क्षमतेने वापरात आहेत, हा संशोधनाचा विषय आहे! त्यासाठी जो खर्च येतो, तो प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात आला पाहिजे याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते. प्रकल्प लावण्यासाठी जो भांडवली खर्च असतो, तो विविध केंद्रीय योजनांमधून दिला जात असल्यामुळे प्रकल्प लावले तर जातात. परंतु तो प्रकल्प स्वयंपूर्ण (त्याचा चालवण्याचा खर्च त्याच्या वीज आणि खत यांच्या निर्मितीतून निघावा) असला पाहिजे ह्या अतिशय अशास्त्रीय स्वरूपाच्या हट्टामुळे, तो चालवण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नाही. परिणामी, बहुतेक अशा प्रकल्पांमधून प्रक्रिया न होताच अशुद्ध पाणी नद्यांमध्ये सोडले जाते, त्यामुळे जलप्रदूषण ही समस्या अक्राळविक्राळ स्वरूपात आपल्यासमोर उभी राहाते. हे सांडपाणी प्रकल्प किती फायदेशीर आहेत याचा हिशेब विचारल्यामुळेच ही परिस्थिती उद्भवली आहे. कोणताही कचरा प्रक्रिया प्रकल्प हा लौकिक अर्थाने फायदेशीर होत नसतो, पण निसर्गचक्र सुरळीत राहण्यासाठी ह्या सर्व प्रकारच्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे अतिशय आवश्यक असते. ह्या प्रक्रिया करण्यासाठी जो खर्च येईल तो प्रकल्पखर्चात अंतर्भूत असलाच पाहिजे. हा खर्च म्हणजे वसुंधरेच्या खात्यात भरला जाणार सामान्य सेवाकर किंवा जी.एस.टी. आहे. आपल्या अस्तित्वासाठी, आपले जीवन सुखी करण्यासाठी आणि सजीवसृष्टी सुरळीत राहण्यासाठी वसुंधरेच्या अंदाजपत्रकात जी तरतूद केली जाते, ती करताना तिच्या खात्यात आपल्यावर ह्या जी.एस.टी.चा भरणा करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली आहे. यालाच निसर्गऋण असे म्हणतात.




प्रत्येक माणसाला दररोज १७००० लिटर हवा व त्यातील तीन किलोग्रॅम ऑक्सिजन, पिण्यासाठी तीन ते चार लिटर शुद्ध पाणी आणि खाण्यासाठी पाऊण ते दीड किलो शिजवलेले किंवा प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ लागतात (चित्र ३). त्याशिवाय आवश्यक असे कपडेदेखील लागतात. ह्या गोष्टी देण्यासाठी पाणीशुद्धीकरण, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग आणि वृक्षलागवड व शेतीउत्पादन यांची आवश्यकता अनिवार्य ठरते. शिक्षणसुविधा, मनोरंजन आणि पर्यटन ह्यांच्या गरजादेखील माणसाला आवश्यक असतात. त्यासाठी विविध

निर्माण प्रणालींची आवश्यकता भासते. संगणक व इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्मिती, संदेशवहन यासाठी आणि ह्या सर्व सुविधा पुरवण्यासाठी, त्यांच्यावर नियंत्रण ठेवून त्यात समन्वय साधण्यासाठी ज्या प्रणाली उभ्या कराव्या लागतात, त्यात ऊर्जानिर्मिती, वाहतूकव्यवस्था आणि इतर पूरक पायाभूत सुविधा असाव्याच लागतात. त्यातूनच पोल्ट्री, दुग्ध, शेती, अन्नप्रक्रिया, शेळीपालन, डुक्करपालन यासारख्या उद्योगांची निर्मिती झालेली आहे. प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे शिक्षण आवश्यक असते, त्या गरजेतून शिक्षणक्षेत्राची निर्मिती होते. त्या क्षेत्राच्या निर्मितीत अनेक प्रकारचे नैसर्गिक स्रोत वापरात येतातच.




शिक्षण महाग होत चालले आहे असे आपण नेहेमी ऐकतोच. शिक्षणक्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या पेन्सिलीचे साधे उदाहरण घेतले तर किती पेन्सिली संपेपर्यंत वापरल्या जातात? किती बॉलपेन त्यातील शाई संपेपर्यंत वापरली जातात? किती वह्यांमधील सर्व कोरे कागद पूर्णपणे वापरले जातात? आमच्या शाळेत, उन्हाळ्याची सुट्टी लागण्यापूर्वी आणि वार्षिक परीक्षा झाल्यावर निकाल जाहीर होईपर्यंत, जो दोन आठवडे कालावधी मिळायचा, त्या कालावधीत जुन्या वह्यांमधील कोरे कागद गोळा करून त्यांच्या नव्या वह्या आम्ही बनवत होतो. त्या वह्यांचा वापर पुढील वर्षासाठी केला जाई. हा शालेय शिक्षणाचा अविभाज्य भाग होता. त्यातूनच नवनिर्मिती होत असते हे बाळकडू त्यातून मुलांना पाजले जाई. संगणकक्षेत्रातील प्रगतीमुळे कदाचित कागद, शाई आणि पेन्सिली कालबाह्य होतीलदेखील, पण नवीन प्रणालींमधून ज्या टाकाऊ गोष्टी निर्माण होतील, त्यांचे नियोजन करावेच लागेल. त्याचे मार्ग नवे असतील, बाळकडूंची रासायनिक घटना बदलेल, पण मुळातील बाळकडू ही संकल्पना मात्र बदलली जाणार नाही, ह्याकडे आपल्याला लक्ष द्यावे लागेल.

समाजात सुबत्ता वाढत जाते, तसतसे या निसर्गऋणाकडे दुर्लक्षच केले जाते. मोठमोठ्या शहरांमधून वाढता कचरा आणि त्याच्या नियोजनात येणाऱ्या अडचणी, त्यातून निर्माण होणारे डम्पिंग यार्ड, त्यामुळे होणारे जल-वायू-मृदा प्रदूषण ह्या सर्व समस्यांचे मूळ प्रत्येक व्यक्ती आहे, हे लक्षात न घेता, या समस्यांचे निराकरण करता येणे अशक्य कोटीतील गोष्ट आहे. त्यासाठी कितीही प्रयत्न केले गेले तरी ते वाया जाणार आहेतच, शिवाय त्यातून नवीन समस्या निर्माण होणार आहेत! मोठमोठ्या डम्पिंग यार्डांवर मिश्र कचऱ्यातून वीजनिर्मिती, मिश्र कचऱ्याचे मोठमोठ्या भट्ट्या लावून त्यात जाळून केलेले निर्मूलन, मिश्र कचऱ्यातून इंधन निर्मिती अशा स्वरूपांचे मोठमोठे प्रकल्प लावण्यात येतात. परदेशांमध्ये किंवा विशेषतः विकसित राष्ट्रांमध्ये हे प्रकल्प कसे फायदेशीर ठरते आहेत, याचे सुंदर सजावट केलेले प्रकल्प अहवाल संगणकाच्या पडद्यावर नगरसेवकांना किंवा प्रशासनातील अधिकाऱ्यांना दाखवले जातात. परदेशांमध्ये हे प्रकल्प किती यशस्वीरीत्या चालवले जात आहेत याच्या चित्रफिती दाखवल्या जातात. एक स्वप्ननगरीच त्यांच्यासमोर उभी केली जाते. मग त्यात स्वार्थ आणि परमार्थ हे किती छान साधले जाऊ शकतील यावर खल होऊन असे प्रकल्प उभे राहतात! आमच्या प्रकल्पात कचरा वेगवेगळा करण्यासाठी अत्याधुनिक प्रणाली कशी लावली गेली याचाही उदोउदो केला जातो. त्यासाठी किती ऊर्जा वापरली जाणार आहे, ह्या प्रश्नाकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते.

टनावारी मिश्र कचरा या प्रकल्पावर येऊन पडू लागला, की मग प्रकल्पातील त्रुटी स्पष्ट होऊ लागतात. त्यात काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आपल्या देशात कुणालाच वाटत नसते! अत्याधुनिक म्हणून आणलेली परदेशी यंत्रसामग्री आपल्याकडचा मिश्र कचरा हाताळण्यासाठी कशी कुचकामी आहे, याचा अचानक साक्षात्कार प्रकल्प चालकांना होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून आम्हाला योग्य वर्गीकरण झालेला कचराच पुरवला जात नाही अशी कुजबुज सुरू होते. हळूहळू कचऱ्याचे ढीग वाढू लागतात, प्रक्रियेने सुरुवातीपासून वेगच पकडला नव्हता, त्यामुळे तो बंद पडण्यास फारसा वेळ लागत नाही! डम्पिंगचे प्रमाण वाढत चाललेल्या त्या प्रकल्पाचा दुर्गंध आजूबाजूच्या आसमंतात पसरू लागताच पर्यावरणवादी जागे होतात! आणि नागरी क्षेत्रात हे असले प्रकल्प का लावता, नागरिकांचे आरोग्य किती धोक्यात आणले जात आहे, अशा प्रकारच्या त्यांच्या प्रश्नांनी ठळक मथळे वृत्तपत्रांमध्ये छापून येतात व प्रकल्प मग बंद करण्यासाठी आणखी एक सबळ कारण मिळते. मात्र प्रकल्प लावल्यामुळे स्वच्छ भारत स्पर्धेत कोणतेतरी पारितोषिक मिळाल्यामुळे सर्व प्रकल्प अधिकारी खुशच असतात. प्रकल्पाची इतिकर्तव्यता संपलेली असते. प्रकल्प चालला की बंद पडला यात नंतर कुणालाच स्वारस्य राहात नाही. बिचारी वसुंधरा मात्र खिन्न झालेली असते!


वेगवेगळ्या शहरांमध्ये पर्यटनासाठी आपण जातो, त्यावेळी तिथे पाहण्यासारखे काय आहे, ऐतिहासिक किंवा पौराणिक महत्त्वाची कोणती स्थळे आहेत ह्याची चौकशी होते. परंतु प्रत्येक शहरात असलेले डम्पिंग यार्ड न पाहायला जाताच कुठे आहे,

याची जाणीव नाकाला आधी होते. ही डम्पिंग यार्ड म्हणजे साक्षात नरकपुरी असते. शेकडो ट्रक किंवा ट्रॅक्टर भरभरून कचरा वाहून आणतात आणि या ठिकाणी रिकामे होऊन परत जातात. आणताना आणि परत जाताना त्यांच्या भोवती देवाभोवती असलेल्या तेजोवलयासारखे दुर्गंधीचे एक वलय असते! त्यामुळे अशा ट्रकच्या मागे असणाऱ्या वाहनांमधील प्रवाशांना काही क्षणांसाठी तरी त्यांनी केलेल्या पापाची शिक्षा इथल्या इथे त्या दुर्गंधित हवेमुळे मिळते! प्रत्यक्ष डम्पिंग यार्डवर हजारो टन कचऱ्याचे ढीग लागलेले असतात. त्या ढिगांमध्ये आपल्या उपयोगाचे काही मिळते का, या आशेने शोध घेत कचरावेचक फिरत असतात. त्यातील पुनर्चक्रांकन करता येणाऱ्या आणि म्हणून विकल्या जाऊ शकणाऱ्या गोष्टी ओढून काढताना त्यांना बऱ्याच वेळा गंभीर इजा होत असते. डम्पिंग यार्डचे अनभिषिक्त सम्राट म्हणजे भटकी कुत्री! या ठिकाणी त्यांच्यासाठी खाद्य भरपूर असल्यामुळे ते मालकच बनतात, आणि या कचरावेचकांसाठी त्यांच्यापासून मोठाच धोका निर्माण होतो. गांधीनगर नगरपालिकेच्या शहरातील कचरा गोळा करण्याच्या केंद्रावर एक मोठा वळू फिरत असताना आम्ही पाहिला होता आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांना जीव मुठीत धरून तिथे वावरावे लागत होते. ह्या वळूला तिथून हाकलण्यास नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी असमर्थतता दर्शवली आहे! असंख्य कावळे या डम्पिंग यार्डवर दिसतात. त्यांचे कर्तव्य ते इमानेइतबारे करण्याचा प्रयत्न करत असतात. माणसाने हे जे घाणीचे डोंगर त्यांच्यापुढे उभे करून ठेवले आहेत, ते पाहून तेही अवाक् होत असणार! कमीअधिक फरकाने सर्वच शहरांमधील डम्पिंग क्षेत्रावर अशीच परिस्थिती आहे. त्या कचऱ्याच्या ढिगांमधून जो स्राव झिरपत असतो तो सगळीकडे पसरून चिखल होतो. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होते. ही डम्पिंग यार्ड म्हणजे आजच्या वैज्ञानिक युगातील एक अभिशाप आहे. नरेचि केला हीन किती नर! म्हणजे माणसानेच माणसाला अतिशय हीन पातळीवर नेऊन ठेवले आहे, हे यातून दिसून येते. वैज्ञानिक स्तरावर झालेली प्रगती शून्य करून टाकणारी ही बाब आहे. हा मानवी स्वार्थ आणि हव्यास कमी झाला नाही तर फक्त विनाशच समोर येईल. डम्पिंग यार्डवरच्या कचरावेचकांना आणि कामगारांना जणू मानवी आयुष्य जगण्याचा हक्कच नसल्यासारखे असते. प्रत्येक व्यक्तीने घरी कचऱ्याचे वर्गीकरण केले तर हे सर्व अगदी सहजपणे टाळता येण्यासारखे आहे.


**– शरद काळे**
भ्रमणध्वनी : ७५०६४९८२८५
sharadkale@gmail.com

**मार्च २०२२ च्या अंकात 'आपले निसर्गऋण' या लेखात एक-दोन ठिकाणी पृथ्वीचे वय ४५ कोटी वर्षे असे लिहिले गेले आहे. ते ४५०-४६० कोटी वर्षे आहे. अनंत देशपांडे आणि आणखी एका जागरूक वाचकाने ह्या चुकीकडे लक्ष वेधले आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद.**

ग्रंथाली




शरद काळे
यांचे
मराठी आणि हिंदी
कवितासंग्रह




विज्ञानांजली

मराठी कवितासंग्रह

मूल्य ३५० रु.
सवलतीत २०० रु.

प्रेरणा

हिंदी कवितासंग्रह

मूल्य १५० रु.
सवलतीत १०० रु.



राजीव श्रीखंडे

# गलिव्हर्स ट्रॅव्हल्स - जोनाथन स्विफ्ट
# Gulliver's Travels by Jonathan Swift

**जोनाथन** स्विफ्टचा जन्म ३० नोव्हेंबर १६६७ रोजी आयर्लंडमधील डब्लिन या प्रसिद्ध शहरात झाला. इंग्लिश यादवी युद्धानंतर जोनाथनचे कुटुंब आयर्लंडला स्थलांतरित झाले होते. जोनाथनच्या वडिलांचेही नाव जोनाथनच होते आणि आपल्या वडीलभावाबरोबर ते कायद्याचा व्यवसाय आयर्लंडमध्ये करत होते. त्यांच्या मृत्यूनंतर सात महिन्यांनी जोनाथनचा जन्म झाला. पुढे जोनाथनची आई इंग्लंडला गेली. त्यावेळी तिने जोनाथनला त्याचे काका गॉडविन स्विफ्ट यांच्याकडे ठेवले. हा गॉडविन स्विफ्ट सर जॉन टेम्पलचा खास मित्र होता.

जोनाथनला त्याच्या एका चुलतभावाबरोबर Kilkenny विद्यापीठात त्याच्या काकांनी पाठवून दिले. तिथले शिक्षण जोनाथनने १६८२ मध्ये पूर्ण केले. तेव्हा तो पंधरा वर्षांचा होता. पुढे त्याने डब्लिनमधील प्रसिद्ध ट्रिनिटी विद्यापीठात प्रवेश घेतला. तिथून त्याने १६८६ मध्ये बी.ए.ची पदवी मिळवली. त्यात ॲरिस्टॉटलचे तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान हे विषय होते. पुढे पदव्युत्तर अभ्यासक्रमात जोनाथन गुंतला असतानाच आयर्लंडच्या अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे तो १६८८ मध्ये इंग्लंडला गेला. इंग्लंडमध्ये त्याच्या आईने त्याला सर विल्यम टेम्पलचा स्वीय साहाय्यक ही नोकरी मिळवून दिली. सर टेम्पल हे इंग्लिश डिप्लोमॅट होते. लंडनला जोनाथन Esther Johnson ला भेटला आणि त्यांची मैत्री पुढे आयुष्यभर टिकली. काही काळानंतर जोनाथन प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे परत आयर्लंडला गेला. त्याला Vertigo चा त्रास सुरू झाला होता आणि हा त्रास त्याला आयुष्यभर राहिला. परत इंग्लंडला येऊन त्याने Hart Hall, Oxford मधून एम.ए. ही पदवी मिळवली ती १६९२ मध्ये. मग त्याने चर्च ऑफ आयर्लंडमध्ये धर्मगुरूचे काम स्वीकारले. त्याची पहिली नेमणूक १६९४ मध्ये किलरूट या गावात झाली.

इसवी सन १६९६ मध्ये तो पुन्हा मूर पार्क, इंग्लंड येथे आला आणि सर टेम्पलच्या मृत्यूपर्यंत तिथेच राहिला. टेम्पलच्या आत्मचरित्राच्या लेखनात जोनाथनने त्याला खूपच मदत केली. याचवेळी The Battle of the Books हे विडंबन जोनाथनने लिहिले, पण ते प्रकाशित झाले १७०४ मध्ये. सर जॉन टेम्पलचा १६९९ मध्ये मृत्यू झाला. जोनाथनच्या माथ्यावरचे छतच हरवल्यासारखे झाले. तो सर टेम्पलचे आत्मचरित्र संपादित करण्यासाठी थोडा काळ इंग्लंडमध्ये राहिला. नंतर तो आयर्लंडला परतला आणि त्याने डब्लिनपासून साधारण ३२ किलोमीटर अंतरावर असलेल्या Laracor येथील चर्चमध्ये धर्मगुरूची जबाबदारी स्वीकारली.


इसवी सन १७०१ मध्ये जोनाथन स्विफ्टने Discourse on the Contests and Dissensions in Athens and Rome हे एक राजकीय परिपत्रक निनावीच लिहिले. १७०० नंतर तो ट्रीम या गावात राहिला. त्याचे बरेचसे लेखन त्याने या गावातच केले. १७०२ मध्ये ट्रिनिटी विद्यापीठाकडून त्याला Doctor of Divinity ही पदवी मिळाली. १७०२ च्या वसंतऋतूत जोनाथन इंग्लंडला गेला आणि येताना Esther Johnson आणि त्याची दुसरी मैत्रीण Rebecca Dingley या दोघींना बरोबर घेऊन आला.

इंग्लंडच्या फेऱ्या चालू असतानाच त्याने Tale of the Tub आणि The Battle of the Books ही पुस्तके १७०४ मध्ये प्रकाशित केली. त्या पुस्तकांमुळे त्याचे लेखक म्हणून चांगलेच नाव झाले. यामुळेच त्याचे Alexander Pope, John Gay आणि John Arbuthnot यांच्याशी घनिष्ट संबंध तयार झाले. त्याची परिणती १७१३ साली Martinus Scriblerus Club च्या स्थापनेत झाली.

या काळात स्विफ्टचा राजकारणातला सहभागही वाढत होता. १७२० साली सत्तेवर आलेल्या हुजूर पक्षाची तळी उचलून धरणाऱ्या

The Examine या नियतकालिकाची संपादकीय जबाबदारी त्याने स्वीकारली. हुजूर पक्षाच्या सरकारच्या उच्च, प्रभावशाली गटात त्याचा समावेश होता. आपले सगळे अनुभव Esther ला लिहीत असलेल्या पत्रातून तो कथन करत होता. हा सगळा पत्रव्यवहार जोनाथनच्या मृत्यूनंतर Journal of Stella या नावाने प्रसिद्ध झाला आणि चांगलाच गाजला.

आयर्लंडला परतल्यावर आयरिश प्रश्नांवर तो लेखन करू लागला. Proposal for Universal use of Irish Manufacture, Drapier's letters and Modest Proposal या पुस्तकांनी त्याला आयरिश देशभक्त हा किताब मिळवून दिला. Drapier's letters हे देशद्रोही लिखाण असल्याचा त्याच्यावर आरोप करण्यात आला, पण तो सिद्ध होऊ शकला नाही. या सुमारास त्याने Gulliver's Travels हे त्याचे सर्वात प्रसिद्ध पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली. यात त्याने त्याच्या गेल्या दशकातल्या राजकीय अनुभवाचा पूर्णपणे वापर केला. १७२६ मध्ये त्याने परत इंग्लंडला भेट दिली. त्याच्याबरोबर Gulliver's Travels चे हस्तलिखित होते. त्याच्या जुन्या मित्रांनी हे हस्तलिखित निनावी स्वरूपात प्रसिद्ध करायला मदत केली. नोव्हेंबर १७२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाने लगेच अफाट लोकप्रियता मिळवली.






जोनाथन स्विफ्ट

जोनाथन स्विफ्टने आयुष्यात मोजकेच लिखाण केले. Modest Proposal, Tale of the Tub, Drapier's Letters यांसारख्या पुस्तकांनी त्याला उदंड कीर्ती मिळवून दिली आणि Gulliver's Travels ने या कीर्तिशिखरावर कळस चढवला. इंग्रजी भाषेतला सर्वात मोठा आणि प्रसिद्ध विडंबनकार म्हणून जोनाथनचे नाव जागतिक वाङ्मयात अजरामर झालेले आहे.

पुढे १७३१ मध्ये जोनाथन स्विफ्टने Verses on the Death of Dr Swift हा स्वतःचा मृत्युलेख प्रकाशित केला. त्यानंतर त्याच्या हातून फारसे लिखाण झाले नाही. १९ ऑक्टोबर १७४५ रोजी, वयाच्या ८०व्या वर्षी त्याचा मृत्यू झाला. त्याच्यावर मोठ्या इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

आता आपण Gulliver's Travels या कादंबरीकडे वळूया. Gulliver's Travels or Travels into Several Remote Nations of the World हा एक काल्पनिक सफरनामा आहे. या सफरनाम्याच्या सुरुवातीला लेम्युयल गलिव्हर आपल्या आयुष्याची आपल्याला थोडक्यात ओळख करून देतो आणि मग तो आपल्याला त्याच्या वेगवगळ्या सफरींमध्ये आलेल्या अनुभवांचे वर्णन करून सांगतो.

गलिव्हरच्या पहिल्या सफरीत त्याचे जहाज बुडते आणि तो पोहत पोहत एका किनाऱ्याला पोचतो. हा देश असतो उंचीने सहा इंचांपेक्षा कमी असलेल्या अतिशय छोट्या लोकांचा. त्यांच्या देशाचे नाव असते लिलीपूट. ही छोटी माणसे गलिव्हरला आपला कैदी बनवतात. पण तो त्यांना आपण अतिशय चांगले असल्याचे पटवून देतो. लवकरच तो लिलीपूटच्या दरबारातला सगळ्यात लोकप्रिय माणूस बनतो.

सुरुवातीस लिलीपूटमधील लोक गलिव्हरला चांगले वागवतात. पण त्याच्या आकारामुळे त्यांच्या मनात त्याच्याविषयी सतत संशय आणि भीती असते. लिलीपूटचे लोक क्षुल्लक गोष्टींना फारच महत्त्व देत असतात. सत्तेचा देखावा आणि सत्तेचा माज त्यांना फारच प्रिय असतो. त्यांचे त्यांच्या शेजारच्या देशाबरोबर शत्रुत्वाचे संबंध असतात. एका युद्धात गलिव्हर लिलीपूटच्या शत्रूंच्या नौका पळवून नेतो आणि त्यामुळे लिलीपूटचा विजय होतो. पण गलिव्हर दुसऱ्या राज्याला लिलीपूटचे मांडलिक राज्य होऊ देत नाही. त्यामुळे लिलीपूटचा राजा आणि जनता गलिव्हरवर फारच नाराज होतात.

गलिव्हरवर राजद्रोहाचा आरोप ठेवला जातो. कारण त्याने एक आग विझवायला त्यावर लघवी केलेली असते. त्याच्यावर खटला चालवला जातो आणि त्याला दोषी ठरवले जाते. त्याला आंधळा करण्याची शिक्षा दिली जाते, पण दरबारातल्या एका मित्राच्या साहाय्याने तो शेजारच्या देशात पळून जातो. तिथे त्याला एक रिकामी बोट दिसते आणि तिच्यात बसून तो हा प्रदेश सोडतो. पुढे त्याला एक जहाज दिसते, जे त्याला परत सुखरूप इंग्लंडला घेऊन जाते. त्याच्याबरोबर लिलीपूटमधले काही प्राणी असतात.

गलिव्हर काही महिन्यांतच त्याच्या पुढच्या प्रवासाला निघतो. त्याचे जहाज वादळात सापडते आणि एका अनोळखी किनाऱ्याला लागते. तिथे तो पाण्याच्या शोध घेण्यासाठी उतरला असताना जहाजातील लोक त्याला तिथे एकटे सोडून निघून जातात.

उत्तर अमेरिकेतल्या या प्रदेशाचे नाव असते Brobdingnagian. इथले गवत मोठमोठ्या झाडांइतके उंच असते. गलिव्हरला तिथे एक शेतकरी भेटतो. तो जवळजवळ ७२ फूट उंचीचा असतो. हा राक्षसी शेतकरी गलिव्हरला घरी आणतो आणि त्याची मुलगी

Glumdalclitch त्याची काळजी घेते. हा शेतकरी गलिव्हरचा उपयोग एक प्रदर्शनीय गोष्ट म्हणून करतो आणि त्यायोगे पैसे कमावतो. त्यामुळे गलिव्हरची कीर्ती सगळीकडे पसरते खरी; पण या सततच्या प्रदर्शनामुळे तो शेवटी आजारी पडतो. मग हा शेतकरी गलिव्हरला त्याच्या देशाच्या राणीला विकतो. Glumdalclitch ला ती राणी छोट्याशा गलिव्हरची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या सेवेत रुजू करून घेते. तो त्या राज्यातल्या बाकीच्या जनतेपेक्षा खूपच बुटका असल्यामुळे तो त्यांच्या कुठल्याच गोष्टी वापरू शकत नाही. त्यामुळे ही राणी त्याच्यासाठी एक लहान घर आणि त्यातल्या अनेक वस्तू बनवून घेते म्हणजे टेबल, खुर्ची, ताट, चमचे, सुरी वगैरे. हे छोटेसे घर त्या देशाची माणसे फिरताना जवळ ठेवू शकत. त्यामुळे त्याला प्रवासी खोका (Travelling Box) असे नाव ठेवले जाते.

या ठिकाणी गलिव्हरवर बरेच प्रसंग येतात. त्याला राक्षसी कीटकाशी युद्ध करावे लागते. एक महाकाय माकड त्याला कित्येक शे फूट उंचीच्या झाडावर घेऊन जाते.. वगैरे. गलिव्हर Brobdingnagian च्या राजा-राणीला युरोपबद्दल बरीच माहिती सांगतो आणि युरोपमधील सतत चाललेल्या युद्धाच्या वार्ता ऐकून राजा-राणी चांगलेच अस्वस्थ होतात. एकदा एका समुद्रकिनाऱ्यावर सगळे सहलीला गेलेले असतात. एक गरुड हा प्रवासी खोका पळवतो आणि समुद्रात टाकतो. तिथल्या एका जवळच असलेल्या जहाजावरचे खलाशी हा खोका स्वतःच्या जहाजावर आणून गलिव्हरला वाचवतात आणि त्याला सुखरूप इंग्लंडला घेऊन जातात.

पुढे काही महिन्यांनी गलिव्हर पुन्हा सफरीला निघतो. या खेपेला समुद्री चाचे त्याच्या जहाजावर हल्ला करतात आणि तो एकटाच एका खडकाळ बेटावर अडकून बसतो. हे बेट भारताच्या जवळ असते. तिथून त्याला Laputa नावाचे उडणारे बेट वाचवते. हे बेट एक स्वतंत्र राज्य असते आणि या राज्यात संगीत, गणित आणि खगोलशास्त्र यांच्या अभ्यासावर भर दिलेला असतो. परंतु या सर्वांचा दैनंदिन आयुष्यात उपयोग करण्यात हा देश असमर्थ असतो. पुढे गलिव्हर Laputa चे मांडलिक राज्य Balnibarbi याला भेट देतो आणि शास्त्रावरच्या आंधळ्या भक्तीमुळे या राज्याची झालेली दयनीय स्थिती त्याच्या लक्षात येते. वेगवेगळ्या शास्त्रीय प्रयोगांद्वारे राज्याची सगळी शक्ती काही भलत्याच गोष्टीसाठी वापरण्यात येत असल्याचेही त्याच्या ध्यानात येते. नंतर गलिव्हरला या राज्याच्या प्रमुख बंदरात पाठवले जाते, कारण तिथे त्याला एक व्यापारी भेटणार असतो जो त्याला जपानला घेऊन जाणार असतो. तो येईपर्यंत गलिव्हर जवळच्या एका बेटाला भेट देतो आणि तिथल्या एका प्रसिद्ध जादूगाराला भेटतो. तिथून जवळ असलेल्या दुसऱ्या एका बेटावर तो अमर लोकांना भेटतो. हे लोक अमर असले तरी ते वृद्धापकाळाच्या अनेक त्रासांनी बेजार झालेले असतात आणि वयाच्या ऐंशीव्या वर्षी कायद्यानुसार ते मरण पावले अशी नोंद केलेली असते. पुढे गलिव्हर जपानला पोचतो. तिथल्या सम्राटाला भेटतो आणि काही महिने त्याचा पाहुणचार घेऊन इंग्लंडला परततो.

घरी स्वस्थ बसण्याचा निश्चय गलिव्हर फार काळ पाळू शकत नाही. काही महिन्यांनी तो सफरीवर निघतो. यावेळी तो एका जहाजाचा कप्तान असतो. मात्र त्याचे आणि त्याच्या कर्मचाऱ्यांचे संबंध सौहार्दाचे नसतात. पुढे ते कर्मचारी जहाजावर बंड करून गलिव्हरला एका खोलीत बंदी म्हणून ठेवतात आणि पुढे ते त्याला एका भूभागावर सोडतात आणि जहाज घेऊन निघून जातात. या प्रांतात त्याला रानटी, खुरकटलेले, माणसांसारखे असणारे असे Yahoos भेटतात आणि त्यांच्यावर राज्य करणारे Houyhnhnm नावाचे माणसांसारखे बोलणारे घोडेही भेटतात. त्यातल्या एका घोड्याच्या घरात गलिव्हरला आसरा मिळतो. त्यांचे सगळे जीवनमान बघून गलिव्हरच्या मनात त्यांच्याविषयी अपार आदर तयार होतो. त्याला समस्त मानवजात ही Yahoos यासारखीच किंवा त्यांच्याहूनही अधिक भयंकर वाटू लागते. पण Houyhnhnm च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत असा ठराव होतो की गलिव्हर हा Yahoos सारखा असल्यामुळे तो त्यांच्या संस्कृतीला आणि व्यवस्थेला धोका आहे आणि ते त्याला तो जिथून आला तेथे त्याला परत जायला सांगतात. त्याचा यजमान त्याच्यासाठी वेळ घेऊन त्याच्यासाठी एक मोठी होडी तयार करतो आणि गलिव्हर परतीच्या प्रवासाला निघतो. या खेपेला एक पोर्तुगीज जहाज त्याला वाचवते आणि त्याला परत सुखरूप इंग्लंडला आणून सोडते. पण परत आल्यावर तो मानवी समाजात मिसळू शकत नाही आणि तो आपल्या बायको-मुलांपासून दूर एकाकी जीवन जगू लागतो. तो दिवसातले अनेक तास त्याने पाळलेल्या घोड्यांशी बोलण्यात घालवतो. अशी ही कादंबरी संपते.

या कथानकावरून आपल्याला हे लक्षात येईल की या कादंबरीची रचना जोनाथन स्विफ्टने गलिव्हरच्या वेगवेगळ्या सफरीनुसार वेगवेगळ्या भागात विभागलेली आहे. गलिव्हरच्या चार सफरी आहेत. या सफरींचा कालखंडही त्याने या कादंबरीत दिलेला आहे. हा कालखंड जवळजवळ सोळा वर्षांचा आहे. या चारही सफरी तशा पूर्णपणे स्वतंत्र आहेत. या सर्वांतला एकमेव समान दुवा म्हणजे आपला कथानायक गलिव्हर. गलिव्हरमुळेच या कथानकाला एकसंधपणा प्राप्त झालेला आहे.

स्विफ्टची कथनशैली ओघवती आहे. या सगळ्या सफरींचा वृत्तांत आपण गलिव्हरच्या तोंडूनच ऐकत आहोत. या प्रसंगांचे आकलन आपल्याला गलिव्हरकडूनच होते. गलिव्हरचे व्यक्तिमत्त्व त्यामुळेच अतिशय महत्त्वपूर्ण ठरते. या कथानकाचा सूर हा उपहासात्मक टीकेचा, विडंबनाचा आहे. गलिव्हरच्या दुःसाहसांचा हा वृत्तांत आहे. या दुःसाहसांची व्याप्ती जसे हे कथानक पुढे जाते तशी वाढतच जाते. त्याची कारणे आणखीच गडद होत जातात. प्रथम त्याचे जहाज बुडते, मग पुढे त्याला एकटे सोडले जाते, मग अनोळखी लोक त्याच्यावर हल्ला करतात आणि शेवटी त्याचेच कर्मचारी त्याच्याविरुद्ध बंड करून त्याला एके ठिकाणी एकटाच सोडून देतात. या वेगवेगळ्या सफरींमध्ये गलिव्हरच्या विचारात आणि दृष्टिकोनात लक्षणीय फरक पडलेला आपल्याला दिसतो.

छोट्या लिलीपुटीयनच्या दुष्टपणामुळे तो आश्चर्यचकित होतो आणि शेवटच्या भागातील Yahoos ची वागणूक त्याला समस्त मानवजातीच्या वागणुकीशी जवळची वाटते. दुसरी विशेष गोष्ट म्हणजे प्रत्येक भाग हा आधीच्या भागापेक्षा पूर्णतः वेगळा नव्हे उलटच आहे. म्हणजे गलिव्हर पहिल्या सफरीत खूप मोठा, मग अगदीच छोटा, कधी शहाणा तर कधी अडाणी असा आपल्याला दिसतो. अनेक पातळ्यांवर हे कथानक पुढे सरकत जाते. तसे हे कथानक एका अर्थाने गलिव्हरच्या साहसांची सरळ वर्णने असली तरी त्याला अनेक वेगवेगळे स्तर आहेत. या वेगवेगळ्या देशांच्या सरकारांचे स्वरूप तसे वेगवेगळे आहेच आणि त्याकाळच्या युरोपच्या वेगवेगळ्या सरकारांवर हे एक अतिशय परिणामकारक भाष्य आहे. तसेच, वेगवेगळ्या धर्मांच्या क्षुल्लक फरकांमुळे होणाऱ्या संघर्षांविषयी अत्यंत मार्मिक विवेचनही आहे.

हे अतिशय वेगवान कथानक आहे. चित्रविचित्र लोक, त्यांच्या वेगवेगळ्या संस्कृती, त्यांची विभिन्न सरकारे, यांच्याविषयी तपशीलवार माहिती अत्यंत रोचक पद्धतीने जोनाथन आपल्याला देतो आणि त्यामुळेच ही कादंबरी अतिशय वाचनीय झालेली आहे. त्यावेळच्या युरोपीय राजकीय स्थितीवर त्याचे हे जहाल स्वरूपाचे विडंबन आहे. यामुळे या कादंबरीला एक वेगळेच परिमाण मिळालेले आहे.

त्याचे संवाद अत्यंत चमकदार आहेत, त्याच्या विखारी उपहासाला साजेसे असेच. मानवी जीवनाच्या, युरोपच्या त्याकाळच्या राजकीय स्थितीवर अत्यंत खोचक टिप्पणीही आपल्याला या संवादांत सापडते. या सगळ्या कथानकाची पार्श्वभूमी चमत्कृतिपूर्ण असल्यामुळे, या चमत्कृतिपूर्ण, अविश्वसनीय प्रसंगांना हे संवाद एक आगळीवेगळी शोभा देणारे आहेत. गलिव्हरच्या व्यक्तिमत्त्वात होणारे बदलही हे संवाद आपल्यापर्यंत सहजपणे पोचवतात. वरवर विनोदी, बाष्कळ वाटणारे संवाद अतिशय अर्थपूर्ण आहेत.

अनेक चित्रविचित्र, चमत्कृतिपूर्ण, मानवी अनुभवाच्या आकलनापलीकडे असलेल्या अशा व्यक्तिरेखांनी ही कादंबरी समृद्ध झालेली आहे. त्यात दुष्ट, कावेबाज पण अगदीच छोटे असणारे लिलीपुटीयन आहेत, प्रचंड मोठे असणारे Brobdingnag मधले रहिवासी आहेत, उडत्या बेटावरचे आणि त्या बेटाच्या हुकमतीखाली मांडलिक असलेल्या काही प्रांतांचे शास्त्रोक्त पद्धतीने जगणारे लोक आहेत. मानवजातीची एका अर्थी भ्रष्ट नक्कल असलेले Yahoos ही आहेत आणि त्यांचे स्वामी असणारे, बोलू शकणारे अतिशय उत्क्रांत असे घोडेही आहेत, वेगवेगळ्या देशांचे वेगवेगळे सत्ताधीश आहेत, त्यांच्या अत्यंत चमत्कारिक स्वभावधर्मांसकट. या सगळ्याच व्यक्तिरेखा जोनाथन स्विफ्ट याने अतिशय परिणामकारक रंगवल्या आहेत.

या कथानकातील सर्वात गहरी व्यक्तिरेखा म्हणजे आपला कथानायक गलिव्हर. साहसाचा ध्यास असलेला, आनंदी, आशावादी असा हा गलिव्हर वेगवेगळ्या सफरींमधल्या येणाऱ्या अनुभवांनी लक्षणीयरीत्या बदलत जातो. शेवटी तर तो एकलकोंडा, आढ्यताखोर, सबंध मानवजातीचा तिरस्कार करणारा असाच होतो. त्याच्या बदलत्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्या निवेदनावर होणारा परिणामही जोनाथन अगदी प्रभावीपणे आपल्या लक्षात आणून देतो. तसा हा गलिव्हर साधाभोळा, सगळ्याच गोष्टींवर सहजच विश्वास ठेवणारा, अतिशय प्रामाणिक आणि म्हणूनच तो बाकीच्यांना त्याच तराजूत तोलून शेवटी पस्तावतो. हा बदल अतिशय तरल आहे आणि तरीही जोनाथन स्विफ्टच्या लेखणीची ताकद हा बदल आपल्याला ठळकपणे दाखवते. गलिव्हरमध्ये Chamelon च्या काही छटा आहेत. कारण तो वेगवेगळ्या देशांच्या वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये स्वतःला सहजपणे सामावून घेतो. हेही स्विफ्ट अगदी विनासायास आपल्यासमोर उलगडतो. जागतिक वाङ्मयाच्या इतिहासातील गलिव्हर ही अत्यंत गुंतागुंतीची आणि केवळ अविस्मरणीय अशीच व्यक्तिरेखा आहे.

ही कादंबरी प्रकाशित झाली १७२६ मध्ये, म्हणजे डेनियल डेफोच्या जगप्रसिद्ध रॉबिन्सन क्रूसोनंतर सात वर्षांनी. प्रसिद्ध झाल्यावर लगेचच या कादंबरीला प्रचंड यश मिळाले. सगळ्या स्तरातल्या लोकांनी या कादंबरीला डोक्यावर घेतले. आबालवृद्धांनी या कादंबरीची पारायणे केली. जसा काळ गेला तसा अनेकांनी त्याच्या या कादंबरीच्या खोलीची, त्यातल्या भावार्थाची मुक्तकंठाने प्रशंसा केली, पण तशी टीकाही झाली. स्विफ्ट हा स्त्रीद्वेष्टा असल्याची आणि हे विडंबन फारच भडक असून मानवजातीबद्दल त्याची टिप्पणी अतिशय कठोर आणि अनाठायी आहे असेही म्हटले गेले. या कादंबरीवर अनेक चित्रपट आले, चित्रवाणी मालिका आल्या, नभोवाणीवर रूपांतरे झाली. या पुस्तकावर अनेक पुस्तके आलेली आहेत. कादंबरी या वाङ्मयप्रकाराला जगात मान्यता मिळवून देण्यात डॉन किहोटे, रॉबिन्सन क्रुसो या कादंबऱ्यांप्रमाणेच या कादंबरीचेही महत्त्वाचे योगदान आहे.

विखारी विडंबनाची एक सर्वोत्तम कलाकृती म्हणून जगमान्यता मिळालेली ही एक अलौकिक कादंबरी आहे. अनेक वेगवेगळ्या छटा असलेली, मानवी जीवन आणि मूल्ये, युरोपीय राजकीय पद्धती यावर अतिशय सखोल भाष्य करणारी ही कादंबरी कधी कधी गैरसमजामुळे कुमारकथा म्हणूनही गणली गेली आहे. मात्र तिचे जागतिक वाङ्मयातले स्थान अढळ आहे आणि ते तसेच कायम राहील यात शंका नाही.

**– राजीव श्रीखंडे**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०१७४६२
rshrikhande@yahoo.com

# एका वाचनप्रेमी लेखकाचे भावगर्भ आत्मनिवेदन


## – रे.फा.(डॉ.) रॉबर्ट डिसोजा

रविवार, ६ मार्च २०२२ रोजी सेंट जोसेफ चर्च, उमराळे येथे फादर फ्रान्सिस कोरिया यांच्या हस्ते जॉन गोन्सालविस लिखित ग्रंथाली प्रकाशित 'ज्याच्या हाती पुस्तक' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या प्रसंगी बोलताना फ्रान्सिस कोरिया म्हणाले, की ''जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी. तसेच ज्याच्या हाती हे पुस्तक त्याचे उन्नत मस्तक, याचा अनुभव वाचकांना आल्याशिवाय राहणार नाही. शेकडो वाचनवेड्यांचे स्वानुभव या पुस्तकात लेखकाने कथन केलेले आहेत. खऱ्या अर्थाने वाचनसंस्कार रुजवणे आणि वाचनसंस्कृतीचे संवर्धन व तिची जोपासना करणारे हे पुस्तक आहे.''

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर ग्रंथालीच्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली.

सेंट जोसेफ चर्चचे प्रमुख धर्मगुरू रे.फा.(डॉ.) अनिल गोन्सालविस म्हणाले, की '' 'ज्यांच्या हाती पुस्तक' हे शीर्षकच आकर्षक व प्रेरणादायी आहे. ज्याच्या हाती पुस्तक असते त्याची ज्ञानकक्षा मोठी असते. तरुण पिढीत वाचनाचे बीज पेरण्याचे काम हे पुस्तक करील.''

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना पसायदान केंद्र, नाळे यांचे संचालक रे. फा. (डॉ.) रॉबर्ट डिसोजा हे पुस्तकाचे अभ्यासपूर्ण परीक्षण करताना म्हणाले, की 'ज्याच्या हाती पुस्तक' हे पुस्तक वाचकप्रेमी लेखकाचे भावगर्भ आत्मनिवेदन आहे. उत्तम लेखक हा सर्वप्रथम उत्कृष्ट वाचक असतो ह्याची प्रचीती ह्या पुस्तकात पानोपानी येते. चोखंदळ, जातिवंत, बहुश्रुत, व्यासंगी, अभ्यासू आणि छांदिष्ट असे आदर्श वाचकांचे विविध पैलू त्यांनी ह्या आपल्या पुस्तकात उलगडून दाखवले आहेत. वाचन संस्कृतीवर लिहिण्यात आलेले हे पुस्तक खुद्द लेखकाच्या अफाट आणि चौफेर वाचनसवयीचे दर्शन घडवते. वाचनाविषयी आणि एकंदरीत जीवनाविषयी महान असे विचारधन ह्या पुस्तकात जागोजागी विखुरलेले दिसते.'




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

वसई धर्मग्रामाचे व्हिकर जनरल रे. फा. (डॉ.) जोएल डिकुन्हा म्हणाले, 'ज्याच्या हाती पुस्तक' यात बालकवींचे काव्य, खांडेकरांचे तत्त्वज्ञान, शिरवाडकरांचा क्लिष्ट विषय सोपा करण्याची पद्धत, पु.ल. देशपांडे यांचे मर्मविनोद यांचे दर्शन घडते. पुस्तकातील २६ प्रकरणे चिंतनशील आहेत. आजच्या काळात वाचनसंस्कृती कशी आवश्यक आहे, हे अधोरेखित केले आहे. वेगवेगळ्या भाषांतील, वेगवेगळ्या भागांतील, वेगवेगळ्या साहित्यिकांच्या पुस्तकांचा अभ्यास करून नेमक्या शब्दांत व्यक्त केलेला अर्क आहे हे या पुस्तकाचे व्यवच्छेद लक्षण आहे.

आपले मनोगत व्यक्त करताना लेखक जॉन गोन्सालविस म्हणाले, की पुस्तकांनी आयुष्यात प्रवेश केला आणि जीवन अधिक आनंदी, ज्ञानमय, शांतीमय, सौख्यमय झाले. जीवन अधिक समृद्ध, संपन्न व परिपक्व झाले आणि पुढे पुस्तक हाच जीवनाचा सखा-सोबती बनला.

९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रे.फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांनी पाठवलेल्या संदेशाचे वाचन विल्यम गोन्सालविस यांनी केले. शरद विचारे यांनी 'पुस्तक माझ्या हाती, पुस्तक माझा साथी' या लेखाचे अभिवाचन केले.


कार्यक्रमाची सुरुवात गायक संजीव गोन्सालविस यांच्या साथीने रिया गोन्सालविस यांनी 'इतनी शक्ती हमे देना दाता' या प्रार्थनागीताने केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांची ओळख प्रा. शैला गोन्सालविस यांनी केले. आभारप्रदर्शन ऑस्टीन गोन्सालविस यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पॅट्रेशिया गोन्सालविस यांनी केले.

●

# माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मराठी व इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन

माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या 'हे सांगायला हवं' हे मराठीतील पुस्तक आणि 'आय मस्ट से धिस' हे इंग्रजीतील पुस्तक, 'ग्रंथाली' एकाच वेळी प्रसिद्ध करण्यात आले. १६ मार्च २०२२ रोजी मुंबईच्या दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्रातील एका शानदार समारंभात, प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि रमेश भाटकर यांचे पद्मश्री दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या समारंभाला आणखी एक हृद्य आणि साजेसा योगायोगही जुळून आला होता. स्वातंत्र्योत्तर काळातील न्यायालयाच्या इतिहासात ज्यांना गौरवाचे अढळ स्थान लाभले आहे, ते सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विद्यारण्य दत्तात्रय ऊर्फ भाऊ तुळजापूरकर यांच्या १०१ व्या स्मृतिवर्षाचे!




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**




**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

यानिमित्त मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांचे व्याख्यान आयोजित केल्यामुळे या समारंभाला आपोआपच वैचारिक मंथनाचेही स्वरूप लाभले. न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी, न्यायमूर्ती तुळजापूरकर यांच्या अनेकविध आठवणी सांगताना, त्यांच्या न्यायालयीन कार्यकर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या अनेक निकालपत्रांचा उल्लेख करून त्यातील काही दिशादर्शक उतारे वाचकांसाठी सादर केले. न्यायमूर्ती तुळजापूरकर यांच्या मनाची निर्भयता, अभ्यासपूर्ण पद्धतीने विचार मांडण्याची वैचारिक खोली, मांडणीतील शिस्त आणि स्पष्टवक्तेपणा यांसारख्या विविध गुणांचा ऊहापोह करताना, न्या. तुळजापूरकर यांचे मनात कायमचे कोरले गेलेले 'न्यायदान करणाऱ्या न्यायाधीशांना पाठीचा कणा हवा' हे वाक्य माझ्याही आयुष्यावर खोलवर परिणाम करून गेल्याचे न्या. धर्माधिकारी यांनी, या प्रसंगी बोलताना विशद केले.

'हे सांगायला हवे' या पुस्तकामागील भूमिका मांडताना, माजी न्या. मृदुला भाटकर यांनी, त्यांचे पती दिवंगत रमेश भाटकर यांच्यावर २५ डिसेंबर २००७ रोजी, बलात्काराच्या आरोपाखाली खोटा खटला भरला गेला आणि त्यामुळे आयुष्यातील सर्वात क्लेशकारक, अपमानास्पद, चिंताजनक आणि आव्हानात्मक काळाला सामोरे जाताना दोघांचीही मनोवस्था किती खोल गर्तेत सापडली होती आणि त्यातून आम्ही दोघेही निर्दोषपणे कसे बाहेर पडलो, याबाबत दाहक वास्तव मांडले. अशाही परिस्थितीमध्ये न्यायव्यवस्थेवरील अढळ विश्वास आणि पती दिवंगत रमेश भाटकर यांच्या निरपराधपणाविषयीची खात्री त्याचबरोबर, मनाचा संयम बाळगल्यामुळे हा अंधःकारमय कालखंड संपला असेही त्यांनी कंठाने नमूद केले. २००७ साली सुरू झालेले अग्निदिव्य अखेर २०१४ मध्ये संपले. मुंबई उच्च न्यायालयाने रमेश भाटकर यांना पूर्णपणे निर्दोष ठरवले आणि त्यांची या खोट्या प्रकरणातून सुटका केली. मात्र या संपूर्ण प्रकरणाचा विचार करता, अशा प्रकारे खोटा खटला भरणारे कोण होते, त्यांनी या प्रकारचे कृत्य कोणत्या हेतूने केले गेले असावे, हा खटला जरी वरकरणी रमेश भाटकर यांच्यावर भासत असला तरी या मंडळींचा खरा निशाणा हा माझ्यावरच होता का, असे अनेक प्रश्न मला सातत्याने पडत होते. मात्र अशा प्रश्नांचे पुरावे सापडत नसतात आणि परिणामी, या प्रकारचे कृत्य करणारे हे नेहमीच पडद्यामागे राहतात अशी खंत व्यक्त करून, हा संपूर्ण दाहक अनुभव समाजापुढे मांडला गेला पाहिजे या प्रेरणेतून न्या. भाटकर यांनी पहिल्यांदा इंग्रजीतून - 'आय मस्ट से धिस' पुस्तक डिसेंबर २०१९ मध्ये पूर्ण केले आणि नंतर, मराठीतूनही या पुस्तकाचे लिखाण केले.

प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष पद्मश्री दिलीप वेंगसरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून, त्यांचे अतिशय जवळचे मित्र रमेश भाटकर यांच्या आठवणींना उजाळा दिला आणि उमद्या स्वभावाचे आणि क्रिकेटप्रेमाचे काही किस्सेही ऐकवले. त्यांच्या आकस्मिक मृत्यूने स्वतःच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली असे भावनिक उदगार काढून त्यांनी मृदुला भाटकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन माझ्या हस्ते व्हावे, हा मी माझा सन्मान समजतो असे म्हटले.

प्रारंभी सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविकात, 'ग्रंथाली' वाटचालीचा धावता आढावा घेतला. इंग्रजी भाषेतून झालेल्या या कार्यक्रमाचे प्रभावी आणि साजेसे सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले.


**- प्रशांत कोठडिया**

prashant.kothadiya@gmail.com

# NKD- Man of Conviction पुस्तक प्रकाशन

'मेडिकल'मधील माजी विद्यार्थी संघटनेने निवृत्त अधिष्ठाता डॉ. एन.के. देशमुख यांच्यावर काढलेल्या 'एनकेडी द मॅन ऑफ कन्व्हिक्शन' या पुस्तकाचे प्रकाशन मेडिकलच्या सभागृहात गडकरी यांच्या हस्ते झाले. खासदार डॉ. विकास महात्मे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून क्रीडामंत्री सुनील केदार, अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांच्यासह माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

'जे शिक्षक विद्यार्थिकेंद्रात असतात त्यांचीच विश्वसनीयता कायम असते. तेच खरे आयुष्याचे संचित आहे. डॉ. देशमुख यांनी आपल्या कार्यकाळात अनेक चांगले डॉक्टर तर घडवलेच, शिवाय त्यांनी समाजासाठीही कार्य केले', असे यावेळी बोलताना गडकरी यांनी सांगितले.



**Price : Rs. 400**
**Discount : Rs. 250**

'कोरोनाची लाट हा परीक्षेचा काळ होता. मात्र, येथे उपलब्ध सुविधांमध्ये सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न येथील डॉक्टरांनी केला. अशाच सेवाभावातून डॉ. देशमुख यांनी मेडिकलमध्ये रणसेवेचा धर्म जपला', असे केदार म्हणाले. माजी अधिष्ठाता डॉ. विभावरी दाणी, डॉ. दिलीप गोडे, डॉ. अशोक पाठक, डॉ. हिरेश नगराळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अतुल राजकोंडावार, डॉ. पिनाक दंदे यांच्यासह मेडिकलचे अनेक आजी-माजी प्राध्यापक या सोहळ्याला उपस्थित होते. संचालन डॉ. प्रमोद गिरी व डॉ. अनिल गोल्हर यांनी केले. आभार डॉ. अरविंद कुऱ्हाडे यांनी मानले. ●

# समाजसेवा, साहित्य, उद्योजकतेची गाथा, 'धडपड'

'वाचन करत राहिले, तरच व्यक्तिमत्त्व प्रगल्भ होते. त्यामुळे वाचाल तर वाचाल', असा मोलाचा सल्ला माजी केंद्रीय मंत्री व उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांनी वसईत पुस्तक प्रकाशन सोहळ्यात दिला. वसईतील माजी सरपंच, माजी नगरसेवक व भाजपचे प्रदेश प्रतिनिधी चंद्रशेखर धुरी यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या 'धडपड' या त्यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन ग्रंथालीतर्फे करण्यात आले. माणिकपूर येथील यंग मेन्स कॅथलिक असोसिएशनच्या सभागृहात पार पडलेल्या प्रकाशन सोहळ्यात राम नाईक यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'आदर्श समाजसेवा, साहित्यिक अभिरुची ते यशस्वी उद्योजकतेची गाथा म्हणजेच धुरी यांचे हे आत्मकथन होय', असे गौरवोद्गार राम नाईक यांनी काढले.



**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**


या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार डॉमनिक गोन्सालविस, माजी महापौर नारायण मानकर, तसेच विविध राजकीय पक्षांतील मान्यवर व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'चंद्रशेखर धुरी यांची दैनंदिनी लिहिण्याची सवय आज फळास आली असून पुस्तकात विविध प्रसंग अगदी तारखेनिशी नमूद केले आहेत. त्यामुळे नव्या पिढीला जोडायचे असेल, तर या तारखा महत्त्वाच्या आहेत,' असे प्रतिपादन करत हे पुस्तक इतर भाषांमध्येही प्रकाशित करावे, अशी सूचना राम नाईक यांनी केली. ●



## अभिनंदन

ज्येष्ठ कथालेखक भास्कर बंगाळे यांना 'होरपळ आणि हिरवळ' या आत्मकथनासाठी नुकताच जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा राष्ट्रीय दया पवार पुरस्कार जाहीर झाला आहे. ग्रंथाली परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.



# अति झालं नि हसू आलं पुस्तकप्रकाशन

ग्रंथाली प्रकाशित वसंत दाते लिखित 'अति झालं नि हसू आलं' ह्या विडंबनात्मक लेखसंग्रहाचा प्रकाशन समारंभ २७ मार्च २०२२ रोजी गोरेगाव पूर्व येथे, निर्मला निकेतन एक्स्टेंशन सेंटरच्या सभागृहात संपन्न झाला. अशोक नायगावकर व दिनकर गांगल हे ह्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते.

आरंभ हिंगलासपूरकर यांच्या ग्रंथालीबद्दलच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर पुस्तकाचे लेखक वसंत दाते ह्यांनी त्यांच्या विडंबनात्मक शैलीत मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना दिनकर गांगल यांनी त्यांच्या छोटेखानी भाषणात या पुस्तकाच्या लेखकाचे कौतुक केले. तसेच, विडंबन या साहित्यप्रकारात फार मोजके लिखाण असल्याचेही नमूद केले.



मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये

अशोक नायगावकर यांनी लेखकाची व त्यांच्या कल्पनाशक्तीची स्तुती करून, त्यांना ही लिखाणाची फक्त सुरुवात आहे, असे म्हटले. ते पुढे म्हणाले, वसंत दाते या अवलियाच्या प्रेमात पडल्याने, त्याने आतापर्यंत का लिहिले नाही अशी खंत व्यक्त करताना अजून काही लिहिण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस यांनी आगळी गणेशवंदना सादर केली तर कार्यक्रमाची सांगता नंदा गोखले यांनी 'हसायदान' गाऊन केली. ●


---

# 'गुंफियेला शेला' आगळ्या लघुकथासंग्रहाचे आगळे प्रकाशन

'गुंफियेला शेला' या लघुकथासंग्रहाचा प्रकाशनसोहळा ३ एप्रिल २०२२ रोजी ठाण्यात डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे संपन्न झाला.

ग्रंथाली प्रकाशित 'चार सख्य चोवीस' या पुस्तकाच्या लेखिका संपदा जोगळेकर कुळकर्णी, हर्षदा बोरकर, सोनाली लोहार आणि निर्मोही फडके या चौघींनी एकत्रित केलेला एक नवा साहित्यप्रयोग म्हणजे '.... गुंफियेला शेला' हे पुस्तक.

मुंबई विद्यापीठच्या माजी कुलगुरू व शल्यचिकित्सक डॉ. स्नेहलता देशमुख, मनोविकासतज्ज्ञ व लेखक डॉ. आनंद नाडकर्णी, निर्माता-दिग्दर्शक विजू माने व ज्येष्ठ अभिनेते अविनाश नारकर ह्यांच्या उपस्थितीत ह्या पुस्तकाचे दिमाखदार प्रकाशन झाले.



मूल्य ४०० रुपये
सवलतीत २५० रुपये

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर ह्यांनी प्रकाशकाचे मनोगत मांडले.

डॉ. नाडकर्णी ह्यांनी ज्ञानेश्वरांच्या रचनेचे निरूपण पुस्तकाच्या संकल्पनेशी जोडून ह्या अभिनव प्रयोगाचे साहित्यिक व सामाजिक महत्त्व विशद केले.

'पीस' या चित्रावरून सुचलेली आपली कथा प्रत्येक लेखिकेने उत्कृष्ट सादर केली. हे पुस्तकाचे अनोखेपण आहे ह्याचा प्रत्यय चौघींनी केलेल्या कथाअभिवाचनातून आला.

पुस्तकात प्रत्येक चित्रानंतर चार लेखिकांच्या कथा आहेत आणि त्यानंतर प्रत्येक ठिकाणी एक कोरे पान 'वाचकाचे पान' म्हणून राखून ठेवले आहे. चौघींच्या अभिवाचनानंतर त्याच चित्राला अनुसरून वाचक प्रतिनिधी या नात्याने लोकप्रिय अभिनेते अविनाश नारकर ह्यांनी त्यांना सुचलेल्या कथेचे अभिवाचन केले. तसेच, पुस्तकाबाबत आपले मनोगत मांडले. प्रत्येक कथेतून एक नवा अनुभव आणि बोध मिळतो आणि तो बराच काळ सोबत करतो, असे ते म्हणाले.

दिग्दर्शक विजू माने ह्यांनी पुस्तकाची संकल्पना आणि कलात्मक रचना ह्याचे कौतुक करून वाचकांना आकर्षित करणारे पुस्तक लिहिल्याबद्दल लेखिकांचे व ग्रंथाली प्रकाशनाचे अभिनंदन केले.

डॉ. स्नेहलता देशमुख ह्यांनी अत्यंत ममत्वाने चारही लेखिकांना आशीर्वाद देऊन, जीवनातील अनुभव कथन करून कार्यक्रमाला वेगळेच परिमाण दिले.

आरंभ 'कबीराचे विणतो शेले' या औचित्यपूर्ण गायनाने झाला. 'मोगरा फुलला' हा ज्ञानदेवांचा अभंग वेदश्री खाडिलकर-ओक गात असताना मोगऱ्याने भरलेल्या परडीतून कथासंग्रह प्रकाशित झाला.

पुस्तकातील चित्रांचे चित्रकर्ते पूजा रायबागी, आकाश पोतदार व चिन्मय जोशी ह्यांच्यासोबत पुस्तकाचे मुखपृष्ठकार व रचनाकार अतुल जोशी ह्यांना लेखिकांनी सन्मानित केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री दामले ह्यांनी केले.

ह्या देखण्या कार्यक्रमाकरता कला-साहित्य क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. ●

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**प्रिय प्रतिमास, रेणूकडून**
**रेणू दांडेकर**



**मी इतकुशी रेणू सारे आकाशाएवढे!**

*''मनाला प्रश्न विचारले, काय केलंस तू वेगळं? शिक्षक म्हणून जे काही केलंस ते करणं अपेक्षितच आहे. कदाचित आजूबाजूला असं घडत नसेल म्हणून तुझं काम वेगळं वाटलं असेल. हो ना! जे झालं ते माझ्या आनंदासाठी माझ्या अंत:स्फूर्तीनं. जे केलं ते सारं सगळ्यांमुळे वेगळं जाणवलं. माझं काहीच नाही. मी मला समृद्ध करत गेले. नि मीच नच उरले माझी, मीपण अवघे गळून गेलं.''*

आत्मचरित्र लिहिताना केवळ आपण कसे जगलो, जगण्यात आलेले प्रसंग कसे होते, आपल्या भोवतीचा कौटुंबिक गोतावला कसा होता, आता आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर असणे जाणवणारी कृतार्थता कशी आहे, या सगळ्याचा आढावा घेण्याकडे अनेकांचा कल असतो. मोजकेच काही असे असतात जे जगण्याविषयी तटस्थपणे आत्मचिंतन करतात, प्रत्येक टप्प्याचे मूल्यमापन करतात. मिळालेल्या यशापेक्षा आलेल्या अपयशाकडे जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित करतात आणि खुल्या दिलाने त्याचा स्वीकार करतात. आपल्या भोवतीचा भवताल आपल्यासोबत कायम ठेवतात. अशी आत्मचरित्रे ही केवळ त्या लेखकाची राहात नाहीत. ती वाचकाला कवेत घेतात. जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बहाल करतात आणि स्वत:चे स्थान ध्रुवासारखे अधोरेखित करतात अशी काही मोजकीच आत्मचरित्रे आहेत. त्यात एका नावाची भर पडली आहे. ते नाव आहे. 'प्रिय प्रतिमास रेणूकडून' लेखिका आहेत रेणू दांडेकर.

प्रिय प्रतिमा ही व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून रेणू स्वत: आहेत, लग्नापूर्वीच्या प्रतिमा केसकर! लग्नानंतर रेणू दांडेकर! त्यांच्याच शब्दात सांगायचे तर पहिली पंचवीस वर्षे प्रतिमाची आणि पुढील पस्तीस वर्षे आहेत ती रेणू दांडेकरची. असा एकूण साठ वर्षांचा कालखंड दोन कप्प्यांत विभागलेला आहे, उरलेला आहे. आताचा चिंतनाचा, पुन्हा मूल होऊन शिकण्याचा.

लेखिकेने मनोगतात नमूद केले त्याप्रमाणे ह्या आत्मचरित्रात प्रतिमाचे भावविश्व आहे. घरातील संस्कार, आई–बाबा आणि आजी यांची स्वभावचिन्हे. कॉलेज शिक्षण आणि शिक्षकीपेशाची सुरुवात – म्हणजे वाई ते नांदेड असा हा प्रवास आहे. यात प्राचार्य नरहर कुरुंदकरसर आहेत. एम.ए.चा रिझल्ट लागण्यापूर्वीच नेमणूक, त्याचा व्यासंग, भाषणे, शिस्त सारेच भारावून टाकणारे आहे.

दुसरा टप्पा राजा दांडेकर यांच्यासोबतचा वैवाहिक जीवनाचा आहे. म्हणजे रेणू दांडेकरचा आहे. तो नांदेडमार्गे कोकणात येतो दापोली चिखलगाव पर्यंत. लोकमान्य टिळकांचे जन्मगाव. येथे स्वत:ची शैक्षणिक संस्था सुरू करणे, शिकवणे, मुले आणि मुली यांना शाळेपर्यंत घेऊन येणे, मुलांना अभ्यासाची आवड लागावी त्यासाठी नवनवीन प्रयोग करणे. मुलींविषयी आग्रहपूर्वक काही प्रयोग आणि प्रयत्न करणे, एक वेगळी शाळा म्हणून नुसता प्रयत्न नाहीतर तिचे स्वरूपही वेगळे आणि परिपूर्णता यावर भर देणे, त्यासाठी अनेक स्तरांवर लढाया करणे, यात राजा दांडेकर यांची पूर्णपणे साथ मिळणे. या सगळ्या धडपडीचे वर्णन या दुसऱ्या भागात आलेले आहे. या धडपडीत पस्तीस वर्षांचा कालखंड कसा झरझर मागे पडला हे कळलेदेखील नाही असे लेखिका नमूद करतात. स्वत:ला झोकून देऊन सतत आपल्या ध्येयाशी मग्न असलेल्यांना वेळकाळाचे भान उरत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे रेणू दांडेकर! त्यांच्या या कर्तृत्वाची दखल घेतली गेलो नसती तरच नवल! अनेक शासकीय पाठ्यपुस्तक चित्रे, उपक्रम यावर त्यांची नेमणूक आपोआप होत गेली. अनेक पुरस्कार चालत आले. याच अनुषंगाने अनुभवसिद्ध असे लेखन झाले, त्यांनाही पुरस्कारांनी सन्मानित केले. देशपातळीवर प्रवास घडलाच. विदेशाचाही प्रवास घडला. त्यामुळे एक कृतार्थ प्रवास घडला असे म्हणत होते.

तिसरा टप्पा हा रेणूच्या स्वत:च्या परिघाचा आहे. सावल्या दूर गेल्या तरी झाडे जागेवरच असतात. सावलीचे परिमाण झाडांना लावता येत नाही. परंतु झाडे स्वत:ला परिमाणे लावून आपण अंदाज घेऊ शकतात. तसा लेखिका स्वत:च्या एकूण जीवनपटाचा, सांसारिक कालखंडाचा, आपल्या परिघाच्या रेषा तपासून चिंतन करताना दिसतात. हे चिंतन 'एक झाड आणि दोन पक्षी'चे स्मरण करून देते आणि संपूर्ण सार शेवटच्या ओळीत येतो, जे कुरुंदकरसरांच्या अनुभवातून आलेले आहे, 'काहीच अशक्य नाही. शक्याशक्यतेचा विचार नाही करायचा. जे घडलंय ते असं नि का घडलंय, याचाच विचार करायचा.''

नदी संपूर्ण प्रवास करून समुद्राच्या मुखाशी येते. थांबते आणि मागे वळून पाहते, किती आणि कसा झाला प्रवास? स्वत:लाच विचारते, चढउतार तर असतातच. खाचखळगेही असतात, तरीही इथपर्यंतचा प्रवास झाला हे वास्तव असते. तसा हा प्रवास आहे. अवखळ, खळळता, खोल, गूढ, भग्न तरीही कृतार्थच!

जसे सुचले तसे लिहिले असे लेखिका नमूद करतात, परंतु जे लिहिले ते सकस आहे. मोठा अनुभवाचा पट सोबतीला आहे आणि तो आपण कुणाशी बसून संवाद करतोय इतका मोकळा, प्रामाणिक आणि ओघवता आहे. एक उत्तम आत्मचरित्र वाचल्याचा आनंद कायम सोबत ठेवून आहे.

अन्वर हुसेन यांनी आशयसंपन्न असे मुखपृष्ठ या कलाकृतीला बहाल केलेले आहे.


**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**




# ग्रंथपान

## ज्यांच्या हाती पुस्तक

**जॉन गोन्सालविस**




**सर्वस्पर्शी व्यापक भूमिकेचे संस्कृतीतील लेखन**

*''गेल्या पाच दशकांहून अधिक काळ माझ्याजवळ Light from Many Lamps हे पुस्तक आहे. जेव्हा जेव्हा माझ्याकडे काही समस्या उभी ठाकते, तेव्हा तेव्हा मी हे पुस्तक उघडतो आणि ते माझे अश्रू पुस्तं. जेव्हा जेव्हा माझं मन आनंदानं काठोकाठ भरून सैरभैर होतं तेव्हा तेव्हा हेच पुस्तक माझ्या मनाला हळुवार स्पर्श करतं आणि मला समतोल विचार करायला लावतं.'' डॉ. कलाम.*

पुस्तक हातात असणे म्हणजे काय याचा प्रत्यय त्यातच असू शकतो, ज्याला पुस्तकाशिवाय चैन पडत नाही आणि त्याच्या हाती पुस्तक नाही. वाचनाचा आनंद म्हणजे काय, याचे वर्णन तोच करू शकतो, ज्याने अफाट वाचन केले आहे, करत आहे, तहानभूक विसरून. वाचन हा व्यासंग आहे, छंद आहे, आवड आहे आणि तो पूर्ण करण्याचे वेड, ध्यास ज्याच्या ठायी कायम वस्तीला आहे, तो पुस्तकाशिवाय जाणणे म्हणजे जिवंत मरण समजतो. म्हणूनच अनेक जण ग्रंथालयाचे सभासद होतात, स्वतः पुस्तके खरेदी करून स्वतःचा ग्रंथसंग्रह करतात. वाचकांचे अनेक प्रकार असू शकतात. अनेक प्रकारचे वाचन करणारे वाचक असू शकतात. काही त्याच्या आवडीचे, अभ्यासाचे म्हणूनही वाचन करणारे असतात. तसाच व्यासंग आपल्याला आणखी लक्षात येतो तो जॉन गोन्सालविस यांचा. त्या व्यासंगाचे दर्शन घडवणारे त्यांचे पुस्तक नुकतेच ग्रंथालीने प्रकाशित केले आहे, त्याचे नाव आहे, 'ज्यांच्या हाती पुस्तक'.

चोखंदळ आणि मनापासून वाचन करू पाहणाऱ्या वाचकांसाठी हा लेखसंग्रह 'गाईड' ठरावा. वाचनाची तहान भागवण्याचे सरोवर म्हणजे ग्रंथालये. या ग्रंथालयाविषयी लेखकाने वर्णनांची जी बरसात केलेली आहे, तिच्यात आपण चिंब होऊन जातो. वाचनालये म्हणजे प्रेरणेचे स्रोत, वैचारिक ऊर्जेचे शक्तिपीठ, विश्वज्ञानाचे ज्ञानपीठ, ज्ञानाचे तीर्थक्षेत्र, समाजाचा सांस्कृतिक ठेवा, वाचनाची ओढ, गावाचे सांस्कृतिक भूषण, बुद्धीला खाद्य पुरवणारे ज्ञानसम! हा वाचनालय/ग्रंथालयाचा जसा गौरव आहे, तसा लेखकाच्या दृष्टिकोनाचाही गौरव म्हणावा लागेल.

वाचनामागे प्रेरणा असते, तिचा मागोवा घेताना त्यांनी कवयित्री शांता शेळके यांचे वचन उद्धृत केले आहे आणि त्या अनुषंगाने स्वतःच्या प्रेरणेचा मागोवा घेतलेला आहे. तो घेताना अरुण टिकेकरांचाही संदर्भ देत नमूद केले आहे, की ''वाचनगुरू लाभला तर तो काय वाचावं हे सांगेल, कसं वाचलं पाहिजे ते सांगेल, का वाचलं पाहिजे हे सांगेल.' ही गोष्ट खरीच आहे, की वाचनाची शिस्त लागण्यासाठी वाचनगुरू लाभला तर वाटेल ते वाचत सुटण्यापासून सुटका होऊ शकते. वाचनात नेटकेपणा आला, की आपली आवडही निश्चित होते आणि त्यातून वाचनाचा मिळणारा आनंद अधिक वृद्धिंगत होत जातो. तो अनुभव लेखकाने इथे नमूद केलेला आहे. तसेच यादव शंकर बावीकर यांचे ५ नोव्हेंबर १९०० रोजी प्रकाशित झालेले पुस्तक 'वाचन' याचा मुद्दाम संदर्भ वाचकांसाठी उपलब्ध करून दिलेला आहे.

वाचनसंस्कृती हा खूप जिव्हाळ्याचा आणि तितकाच जबाबदारीचा शब्द आहे. तो नुसता उच्चारून जबाबदारी पार पाडल्याचे समाधान मिळवता येत नाही. त्यासाठी मुद्दाम प्रयत्न करण्याची, पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. ही वाचनसंस्कृती विकसित करण्यासाठी लेखकाने अष्टपदी दिलेली आहे. १) पालक, २) शाळा–शिक्षक, ३) वाचनालय, ४) विविध संस्था–समाजघटक, ५) प्रसारमाध्यमे, ६) शासनयंत्रणा, ७) अद्ययावत तंत्रसाधनांचा वापर आणि ८) स्वतः व्यक्तिगत, हे प्रमुख घटक आहेत. आपली जबाबदारी कशा पद्धतीने पूर्ण केल्यास ही संस्कृती विकसित होईल याचे विवेचन करताना त्यांनी केसातील गजऱ्याचे उदाहरण दिले आहे. जो गजरा केसात आहे याचेच समाधान, मात्र तो कधीच तिला दिसत नाही, इतरांनी कौतुक केल्यानंतर तो तिला दिसतो. हे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे.

विनोबा भावे, लोकमान्य टिळक, पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब, डॉ. कलाम आदींच्या वाचनव्यासंगाचाही परिचय लेखकाने या पुस्तकातून करून दिलेला आहे. राजकारणी आणि कलावंत यांनाही वाचनाची आवड असते. तेही चोखंदळ वाचक असतात, त्यांचीही माहिती दिलेली आहे. मोगलबादशहा अकबर, टिपू सुलतान, नेपोलियन, गोविंदराव तळवलकर, य.आ. जोगळेकर, अ.का. प्रियोळकर अशा अनेकांची नावे लेखकाने दिलेली आहेत.

पुस्तक आणि त्याचे वाचन, त्याद्वारे सिद्ध होणारी सांस्कृतिक अभिव्यक्ती, व्यासंग, छंद, प्रगल्भता यांचा उत्तम परिचय हे पुस्तक करून देते. परंतु तो परिचय वाचत असताना प्रचंड व्यासंग, वाचनाची अनिवार ओढ, त्यातून शोधलेले नेमके समर्पक संदर्भ, त्यांची केलेली यथोचित मांडणी. हे वाचून आपण थक्क तर होतोच, परंतु त्यातून प्रेरणाही जागृत होते. नुसते वाचन करायचे नाही तर त्यातले नेमकेपणही टिपून ठेवायचे असते. हे सगळे सांगत असताना लेखनाचा वाचनप्रवासही यातून उलगडत गेलेला आहे. हे वाचन चौफेर आहे तशी त्यांची दृष्टीही. लेखक स्वतः उत्तम लेखक आहेत. दहा मराठी आणि एक इंग्रजी अशी अकरा पुस्तके त्यांची प्रकाशित झालेली आहेत.

डॉ. श्रीपाल सबनीस यांची अतिशय प्रगल्भ अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. 'माझ्या आयुष्यात या पुस्तकातले सर्वस्पर्शी व्यापक भूमिकेचे संस्कृतिनिष्ठ लेखन यापूर्वी भेटलेले नाही.' त्यांच्या या एकाच वाक्यात पुस्तकाची आणि लेखकाची थोरवी सामावलेली आहे.

लेखक स्वतःच्या व्यासंगाविषयी मनोगतात व्यक्त होताना लिहितात, 'पुस्तकाच्या पावलांनी माझ्या घरी अक्षरे आली, शब्द आले नुसते शब्दच आले नाहीत, तर शब्दांचे झाड रुजले... मोहरले... फुलले... बहरले...

सतीश भावसारांचे सुंदर मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभलेले आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**




# ग्रंथपान

**हे सांगायला हवं**
**मृदुला भाटकर**




**नैतिक बैठक व कणखर मानसिकतेमधून काढलेली वाट**

*''न्यायालयीन नीतिमूल्यं प्रत्येक न्यायाधीशानं पाळावीत हे फारच निकडीचं असतं. न्याय हा फक्त 'न्याय दिला' म्हणून देऊन नाही चालत. न्याय दिला असं दोन्ही पक्षांच्या माणसांना दिसावंही लागतं. न्यायदानाचं काम पवित्र आहे. आणि ते तसं असणं आवश्यक आहे. हे पावित्र्य टिकवायचे नियम असणारच. असायलाच हवेत. हे नियम पाळण्याची जबाबदारी न्यायालयाची आहे.'*

न्याय मिळावा असे प्रत्येकाला वाटते. नव्हे तो त्याचा हक्क आहे, असे आपण सांगू शकतो. पण न्यायाच्या नावाखाली सत्याचा आधार घेत असत्य केस दाखल केली तर, त्यातून काय निष्पन्न होईल? केस दाखल करणाऱ्याला न्याय तर मिळणारच नाहीच; पण शिक्षाही होणार नाही. मात्र ज्याच्यावर केस दाखल केली त्याला न्याय मिळवताना किती दिव्यातून जावे लागते याची कल्पनाही करता येणार नाही. त्यातून प्रकरण चारित्र्याशी निगडित असेल तर बोलायलाच नको. अख्खे आयुष्य पणाला लागते. कौटुंबिक स्वास्थ्य उद्ध्वस्त होते. आणि काय काय सहन करावे लागते, हे जो सहन करतो त्यालाच कळते. तोंड दाबून बुक्क्याचा मार परवडला, हे त्यापेक्षा भयंकर, म्हणजे जिवंतपणी मरणच! यात पुन्हा ज्याच्यावर आरोप झाला तो सगळ्यांचा परिचयाचा असेल, त्याचे सामाजिक स्थान उंचावलेले असेल तर आत्महत्याच!

सुप्रसिद्ध अभिनेता, तो नाटक, सिनेमा, मालिकांमधून घराघरात पोहोचलेला आहे, ज्याच्या कसदार अभिनयावर अवघा प्रेक्षक लुब्ध आहे, त्याला अचानक ध्यानीमनी नसताना बलात्कारासारख्या खोट्या प्रकरणात गोवले गेले, तो अभिनेता आहे रमेश भाटकर. त्यांना, त्यांच्यावर अशा प्रकरणात पुण्यात एका जुजबी ओळख–एक–दोनदाच भेटलेल्या–असलेल्या मुलीने पोलीस ठाण्यात केस दाखल केली आहे अशी बातमी कळली तेव्हा भाटकरांची पहिली प्रतिक्रिया होती, मी आत्महत्या करतो. निष्पाप, संवेदनशील, भावनाप्रधान आणि प्रतिष्ठा असलेल्या व्यक्तीची प्रतिक्रिया अशीच असणार! पण इथे रमेश भाटकर एकटे नाहीत, पत्नी मृदुला भाटकर सोबत आहेत आणि त्याही पतीच्या कठोर निर्णयात संपूर्णपणे साथ द्यायला तयार होतात. परस्परांवरील प्रचंड विश्वास, प्रेम, निष्ठा, आदर, सहधर्म दिसून येतो तो इथे. ते घेतात हातात हात धरून जोडीने धावत्या गाडीपुढे झोकून देण्याचा पराकोटीचा निर्णय, जीवनाचे अखेरचे शिखर.

मृदुला भाटकर या न्यायदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या, न्यायाचे पावित्र्य जपणाऱ्या न्यायमूर्ती. आपल्या कर्तव्यात सदैव दक्ष असणाऱ्या, कुणाचाही मुलाहिजा न बाळगता आपल्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून आपला धर्म पाळणाऱ्या, पत्नीधर्मातही कुठे उणीव न ठेवणाऱ्या, प्रसंगी कठोर आणि प्रसंगी तितक्याच हळव्या असलेल्या मृदुला भाटकर यांचीही स्वत:ची प्रतिष्ठा आहे, वेगळे स्थान आहे आणि तरीही त्या रमेश भाटकर यांच्या पत्नी आहेत. त्यामुळे त्यांची कोंडी मोठी आहे. एका बाजूला न्यायमूर्ती आणि दुसऱ्या बाजूला आरोप असलेल्या अभिनेत्याची पत्नी. कुठलाही प्रसंग येऊ दे, रमेशला एकटा पडू देणार नाही हा निर्धार, परंतु न्यायमूर्ती असूनही न्याय स्वत: देता येत नाही, कुणाशी त्याविषयी बोलण्याची चोरी. मनाला समजावयाचे किती आणि कसे? तरीही त्यांनी ही लढाई लढण्याचे साहस केले. रमेश भाटकरांनीही स्वत: सर्व पचवून साथ दिली आणि एक लढाई सुरू झाली, निरपराधित्व सिद्ध करण्याची. स्वत:ची प्रतिष्ठा पुन्हा परत मिळवण्याची.

मृदुला भाटकर या मुंबई हायकोर्टात न्यायमूर्ती या पदावर आरूढ झाल्या. त्यापूर्वीच्या त्यांचा कालखंड, न्यायदान करताना आलेले अनुभव, न्यायालयीन प्रक्रिया, अंतर्गत व्यवस्थापन, त्यांची शिस्त, अशा अनुभवाशी निगडित प्रसंग येथे अनुषंगिक तपशिलासह आलेले आहेत. न्यायमूर्ती म्हणून वावरताना कोणते संकेत आणि रीतीरिवाज पाळावे लागतात, त्यांची माहिती इतर वेळी मनोरंजक ठरली असती, परंतु आरोप प्रकरणात याच संकेत व रीतीरिवाजांना अंगीकारताना किती संकोचाला सामोरे जावे लागले, ते वाचताना आपण गोठून जातो. त्यांनी हे सारे सहन केले. त्याचेही वर्णन त्यांनी अतिशय संयतपणे केलेले आहे.

या संपूर्ण प्रकरणाला सालोमन राजाच्या संकेताचा संदर्भ आहे. काजव्याचा संदर्भ आहे, जो काजवा प्रकाशाचा दिवा घेऊन वावरत असतो, परंतु त्याला तो त्याच्या डोळ्यांनी पाहता येत नाही. लेखनाची मांडणी करताना हे संदर्भ सतत सोबत ठेवलेले आहेत. घडलेल्या घटनांचे संदर्भ याच संकेताशी नाते सांगतात. दिसत नाही तरीही कुणी तिथे उभा आहे हा भास तर्काच्या रूपाने कथानकाच्या ओघात आपला पाठलाग करत राहतो.

कथानक सुरू होण्यापूर्वीच सुरुवातीला न्यायमूर्ती व न्यायाधीश यांनी पालन करायची न्यायव्यवस्थेतील १६ मूल्ये दिलेली आहेत, तीही कथानकाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांचे अस्तित्व दाखवत असतात. शेवटी प्रकरणाशी निगडित ठळक असे दस्तऐवज जोडलेले आहेत, ज्यावरून प्रकरणाचे स्वरूप लक्षात येते.

विषय अतिशय गंभीर आहे, त्याची मांडणी करताना भावनांचे अनेक पदर इथे संवेदनशीलपणे उलगडलेले आहेत. लेखनात कुठेही तोल सुटलेला नाही. अतिशय संयमितपणे व अलिप्तपणे मनाची प्रचंड उलथापालथ इथे नोंद केलेली आहे.

या पुस्तकाची निर्मिती ग्रंथालीने उत्तम केलेली आहे. त्यावर नीलेश जाधव यांनी सुंदर आशयसंपन्न साज चढवलेला आहे. हायकोर्टाच्या इमारतीच्या काळसर छटेची पार्श्वभूमी घेतली असून त्यावर प्रकाशणारा काजवा चितारला आहे. खूप छान मुखपृष्ठ आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

### चाकोरी मोडणारे पुरुष
**हरीश सदानी**



**सावित्रीच्या लेकींना समजून घेणारे जोतिबाचे लेक**

*'''डिजिटल इंडिया विथ लाडो' उपक्रमांतर्गत सुनीलनं घराबाहेरची नावाची पाटी मुलींच्या नावानं करण्यासाठी मोहीम राबवली. 'ईशा निवास', 'जैनम निवास' अशा मुलींच्या नावांच्या पाट्या घराबाहेर झळकायला सुरुवात झाली. बीबीपूरच्या तीस घरांपासून सुरू झालेली ही मोहीम राज्यात हळूहळू अनेक लोकांनी स्वेच्छेनं अंगीकारली. सध्या हरियाणा आणि इतर राज्यांत पंधरा हजार घरांवर अशी मुलींच्या नावांची 'नेमप्लेट' लावण्यात सुनील यशस्वी झाला आहे.''*

जगभरात असे खूप लोक आहेत, ते खूप वेगळ्या प्रकारची कामे करत आहेत. त्यांचे काम हा त्यांच्या ध्यासाचा परिचय करून देत असते. त्याची दखल होणाऱ्या बदलावर अवलंबून असते. हा बदल लहान स्वरूपात असेल, त्याचे उद्याचे स्वरूप व्यापक असेल अशी अपेक्षा यात अंतर्भूत असते. त्यासाठी चिकाटी, जिद्द, परिश्रम, पदरमोड हे सारे त्यात असते, नसते ती कुठली स्वार्थभावना, केवळ आणि केवळ एका ध्यासापायी ही मंडळी अहोरात्र काम करत असतात झपाटल्यासारखी. अनेकदा विरोध, असहकार्य, अपमान यांनाही सामोरे जावे लागते, तरीही ही मंडळी विचलित होत नाहीत, कुणी दखल घेतली, ना घेतली, पुढे जात राहतात. शेवटी ही वेळ येतेच, जाणकार होणाऱ्या बदलाची दखल घेतातच. काम कुठलेही असो ते सेवाभावी वृत्तीने केलेले असते आणि त्याचे परिणाम असतात ते सकारात्मक. अशाच वेगळ्या पद्धतीने कार्य करणाऱ्या व्यक्तींना हेरून, त्यांच्या कामाची घेतलेली दखल सर्वांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी हरीश सदानी यांनी पार पाडली आहे. त्याचा ऐवज म्हणजे 'चाकोरी मोडणारे पुरुष'.

'चाकोरी मोडणारे पुरुष' या पुस्तकात असे पुरुष आहेत जे आपली 'पुरुषप्रधान संस्कृती' या संस्थेला वेगळ्या वळणावर आणू पाहण्याचा प्रयोग करत आहेत. काय आहे ही पुरुषप्रधानसंस्कृती? ही काही व्याख्येतून स्पष्ट करण्याची आवश्यकता असलेली संस्कृती नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक 'पुरुष' नावाच्या बाळासोबत ती जन्माला येते आणि आयुष्यभर तिचाच पीळ घट्ट करण्यात सार्थकता सिद्ध करत राहतो. कुणाविरुद्ध? जिच्या पोटी जन्म घेतला ती 'स्त्री' येथे केंद्रस्थानी असते. अगदी तिच्या जन्मापासून तिच्या अखेरच्या श्वासापर्यंत. इथे स्त्री-पुरुष हे समानतेच्या पातळीवर आहेत हे वास्तव स्वीकारण्यास बंदी आहे. म्हणजेच ही संस्कृती लिंगभेदावर आधारित आहे. आणि ही भेदाभेदाची मजबूत भिंत ज्यांना अमान्य आहे, अशा निष्ठावान कार्यकर्ते, त्यांचे काम, त्यासाठी चाललेली लढाई यांचा परिचय या पुस्तकात करून दिलेला आहे. त्याचे शीर्षक हीच त्यांची ओळख म्हणायला हवी, 'चाकोरी मोडणारे पुरुष!'

स्त्रियांचे अस्तित्व, त्यांचे प्रश्न हे वेगळे आहेत. त्यांचे विश्व, भावभवना, संवेदना, त्यांची देहबोली वेगळी आहे, असे समजून त्याविषयी मोकळेपणाने चर्चा करणे, त्यावर उपाय सुचवणे, आपसातला संवाद मोकळा करून त्यांना अधिक व्यक्त होण्यास संधी देणे, आणि समानतेच्या पातळीवर आणून 'माणूस' म्हणून आपण सगळे सारखेच आहोत. यात जात, धर्म, वर्ण, लिंग असा कुठलाही भेद नाही. याची सुरुवात एकदम बाहेर करण्याऐवजी घरापासून करायला हवी. आपसातले नाते आणि मैत्र एका पातळीवर आणायचे. संस्कार घट्ट करायचे ते समानतेसाठी, आरोग्यासाठी, निरामय जगतासाठी. हे करताना पुढाकार घेतला आहे तो पुरुषांनी. त्यांना इतरांनी लढा देताना स्वतःच्या पुरुषी अहंकारासाठीही लढा द्यावा लागलेला आहे. या पुरुषाचा शोध घेताना लेखकाने त्यांच्या कार्याचा जसा शोध घेतला तसा त्यांच्या मानसिकतेचाही घेतलेला आहे, तो असा, ''स्त्रीशी निरामय नाते निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या पुरुषांना जाण आहे की त्यांच्यातील पुरुषसत्तेनं घालून दिलेल्या वर्चस्ववादी प्रवृत्तीपासून ते पूर्णपणे मुक्त नाहीत.'


याचबरोबर ते आशा व्यक्त करतात, 'लिंगभेद मिटवून स्त्रियांचं जगणं सशक्त, समृद्ध, सुरक्षित करण्याबराबेरच समस्त पुरुषांचं जगणंही मानुषी, माणूसपणाच्या वाटेकडे जाण्यासाठी हे पुस्तक प्रेरित करेल ही आशा. सावित्रीच्या लेकी वाढण्याबरोबरच जोतिबाचे लेकही समाजात निपजायला हवेत.'

हरीश सदानी हे लिंगभाव-हक्कासाठी तीन दशके कार्यरत आहेत. 'मेन अगेन्स्ट व्हायलन्स अँड अब्युज (मावा)' या लिंगभेद आणि स्त्रियांवरील लिंगाधारित हिंसेला प्रतिबंधित करण्यासाठी पुरुषांनी सुरू केलेल्या देशातील पहिल्या स्वयंसेवी संस्थेचे ते सहसंस्थापक व मुख्य कार्यवाह आहेत. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून त्यांनी समाजकार्याचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. देशभर सुरू असलेल्या समाजकार्य करणाऱ्या संस्था आणि कार्यकर्ते यांच्याशी त्यांचे नाते आहे. अशा निवडक सव्वीस जणांचा परिचय त्यांनी लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीतून दिला. त्या लेखांचे हे पुस्तक आहे. वृत्तपत्रीय लेखन असल्याने लेखकावर अनेक मर्यादा असतात. तरीही त्यातले नेमकेपण टिकवून आणि लेखनातले लालित्य सांभाळून वाचकापर्यंत आपला हेतू पोहोचवण्याचे खूप मोठे संयमी व कौशल्याचे कसब पणाला लावावे लागते. लेखक त्यात यशस्वी झालेले आहेत. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमातून त्यांनी व्यक्त केलेल्या आशेप्रमाणे इतरांना प्रेरणा मिळाली तर हे लेखन सार्थकी लागले असा निर्वाळा मिळेल.

या लेखसंग्रहाचे मुखपृष्ठ अनिल दाभाडे यांनी सजवलेले आहे. लेखात असलेल्या सव्वीस कार्यकर्त्यांचे फोटो सोबत आशयसंपन्न प्रतिमा साकारलेली आहे.

**मूल्य १५० रुपये सवलतीत १०० रुपये**

# दीदींवरचं पहिलं पुस्तक
## लतादीदींच्या प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित...




-: मूल्य :-
₹ ३६०/-
पृष्ठ : २५४

# स्व•र•ल•ता

**लेखक : वसंत भालेकर**

प्रस्तावना : शिरीष पै

मुखपृष्ठ : रंगचित्र–सम्राट रघुवीर मुळगावकर

ल ता...

या दोन अक्षरांमधलं फुलणं शब्दांत मांडता येत नाही हे फुलणं त्या दैवी गळ्याचं असतंच
पण त्या गळ्यातून उमलणाऱ्या निरामय सुराचंही असतं... तो सूर ऐकणाऱ्या कानांचं असतं, तसंच कानांना तोलणाऱ्या मनाचं असतं... मन भरभरून समाधान पावत जातं,
कानांनाही तृप्त करत जातं. या तृप्तीतूनच एक आस जन्म घेते.... त्या निरामय सुरांच अनिवार ओढ लागते. सुरानं दिलेली तृप्ती आणि त्या सुराचीच ओढ असं एक न संपणारं वर्तुळ तयार होत राहातं...
हवंहवंसं. या सुराचं मूळ शोधू जावं तर जाणवतं, आधारानं वाढणारी ही 'लता' नाहीच...
ही आहे करोडो कानामनांची आधारशीला.
म्हणूनच,
केवळ लता नाही,

स्व र ल ता...

© प्रकाशक :
हेमंत ग. रायकर ९८६७१२६१९६/९१५२७५७३६८
जय हिंद प्रकाशन, रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.,
५ बी, क्रिएटिव्ह इंडस्ट्रिअल इस्टेट, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई – ४०००११.
Email : shreedeeplaxmiclassic@yahoo.com, Website : www.jaihindprakashan.com

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

'हे सांगायला हवं' आणि 'I must say'
या पुस्तकांच्या प्रकाशनसमयी
लेखिका न्या. मृदुला भाटकर,
न्या. सत्यरंजन धर्माधिकारी,
दिलीप वेंगसरकर,
सुदेश हिंगलासपूरकर आणि
डॉ. मृण्मयी भजक





'ज्याच्या हाती पुस्तक'
या पुस्तकप्रकाशनसमयी
लेखक जॉन गोन्सालविस,
मॉन्सि. फ्रान्सिस कोरिया,
रे.फा.डॉ. अनिल गोन्सालविस,
रे.फा.डॉ. जोएल डिकुन्हा आणि
प्रा. शैला गोन्सालविस

'NKD-A Man of Conviction'
या पुस्तकप्रकाशनसमयी
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सुनील केदार,
विकास महात्मे, डॉ. राजा गजभिये,
लेखक एन.के. देशमुख, मिसेस देशमुख,
डॉ. राजेंद्र आगरकर
आणि सुदेश हिंगलासपूरकर





'अति झालं नि हसू आलं' या
पुस्तकप्रकाशनसमयी अपूर्वा गुप्ता,
सुदेश हिंगलासपूरकर,
अशोक नायगावकर
दिनकर गांगल,
लेखक वसंत दाते
आणि
मानसी दाते

'गुंफियेला शेला' या पुस्तकप्रकाशनसमयी
डॉ. निर्मोही फडके, डॉ. सोनाली लोहार,
विजू माने, डॉ. आनंद नाडकर्णी,
डॉ. स्नेहलता देशमुख, हर्षदा बोरकर,
संपदा जोगळेकर-कुळकर्णी,
अविनाश नारकर आणि
सुदेश हिंगलासपूरकर





'धडपड' या पुस्तकप्रकाशनसमयी
प्रा. डॉ. मधुमती जोगळेकर-पवार,
सायमन मार्टिन, लेखक चंद्रशेखर धुरी,
उ.प्र. माजी राज्यपाल राम नाईक,
मा. डॉमाणिक गोन्सालविस, नारायण मानकर
आणि सुदेश हिंगलासपूरकर

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.